गुरुवार
२८
मे २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : २०
अंक : ५५
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत



कगिसो रबाडा चा ‘रॉकस्टार’ परफॉर्मन्स!
(पान ७ वर)

## थोडक्यात

### विधान परिषदेचे जागावाटप मुंबईतच अंतिम होणार

**मुंबई** : संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विधानपरिषद निवडणुकांच्या १७ जागांसाठी महायुतीमधील जागावाटपाचा तिढा जवळपास सुटला असून केवळ २ ते ३ जागांवर अंतिम निर्णय होणे बाकी आहे. हा जागावाटपाचा तिढा दिल्लीत नव्हे, तर मुंबईतच मित्रपक्षांचे प्रमुख नेते एकत्र बसून सोडवतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी स्पष्ट केले आहे. विधानपरिषद निवडणुकीबाबत आमचे जवळपास एकमत झालेले आहे. फक्त नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या जागा आम्हाला मिळाव्यात, असा आमचा शिवसेनेकडे आग्रह आहे.

### थलपती विजय यांनी घेतली मोदींची भेट!

**नवी दिल्ली** : तामिळनाडूचे नवनियुक्त मुख्यमंत्री आणि प्रसिद्ध अभिनेते जोसेफ विजय (थलपती विजय) हे सध्या आपल्या पहिल्याच अधिकृत दिल्ली दौऱ्यावर आहेत. मुख्यमंत्रिपदाची धुरा हाती घेतल्यानंतर त्यांनी पहिल्यांदाच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. या हाय-प्रोफाइल भेटीमुळे राष्ट्रीय आणि तामिळनाडूच्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाल्या आहेत. विजय सेवा तीर्थ येथे पार पडलेल्या या बैठकीत दोन्ही नेत्यांमध्ये राज्याच्या विकासाच्या मुद्द्यांवर महत्त्वपूर्ण चर्चा झाल्याचे समजते आहे.

# ‘गॉड’ नंबरचे गूढ उलगडले; पुण्यात तेजस शाहला अटक


- पेपरफुटी प्रकरणी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता
- सीबीआयचे देशभरातील ४९ ठिकाणांवर एकाच वेळी छापे

**मुंबई :दि.२७ वृत्तसंस्था**

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या पेपरफुटी प्रकरणाचा तपास दिवसेंदिवस अधिक व्यापक होताना दिसत आहे. पुण्यातील प्राध्यापिका मनिषा हवालदार हिला अटक केल्यानंतर आता सीबीआयने या प्रकरणात आणखी एकाला अटक केली आहे.सीबीआयकडून राज्यभरात विविध ठिकाणी धाडसत्र सुरू असून तपासादरम्यान मनिषा हवालदार हिच्या मोबाईलमध्ये ‘‘गॉड’’ नावाने सेव्ह केलेला एक नंबर आढळून आला होता. या नंबरचा तपास केल्यानंतर तो तेजस शाह नावाच्या विद्यार्थ्याचा असल्याचे समोर आले.

त्यानंतर सीबीआयने पुण्यातून तेजस शाहला अटक केली आहे.

तपासात तेजस शाहने मनिषा हवालदारकडून प्रश्नपत्रिका घेतल्याचे उघड झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या प्रकरणातील ही आतापर्यंतची तेरावी अटक आहे. याआधी लातूरमधील डॉ. मनोज शिरुरे यांनाही या प्रकरणात अटक करण्यात आली होती. रसायनशास्त्र विषयाचे लीक झालेले प्रश्न विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. तेजस शाह हा विद्यार्थी असून या संपूर्ण पेपरफुटी रॅकेटमध्ये त्याची महत्त्वाची भूमिका असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्याच्या चौकशीतून या प्रकरणातील आणखी मोठी नावे समोर येण्याची शक्यता असून सीबीआय त्याची कसून चौकशी करत आहे. दरम्यान, सीबीआयने देशभरातील ४९ ठिकाणी छापे टाकले आहेत. या कारवाईदरम्यान अनेक महत्त्वाची (पान २ वर)







### देशव्यापी छापे आणि महत्त्वपूर्ण पुरावे जप्त

सीबीआयने या प्रकरणाच्या तपासासाठी दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि अहिल्यानगरसह देशभरातील ४९ ठिकाणांवर एकाच वेळी छापे टाकले आहेत. या कारवाईत मोठ्या प्रमाणात संशयास्पद कागदपत्रे, लॅपटॉप आणि मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि भौतिकशास्त्र अशा तिन्ही महत्त्वाच्या विषयांच्या प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वीच लीक झाल्याचा खळबळजनक दावा सीबीआयने आपल्या तपासात केला आहे. या संपूर्ण कटाचा मास्टरमाईंड कोण आहे आणि हे रॅकेट किती खोलवर पसरले आहे, याचा शोध घेण्यासाठी सध्या युद्धपातळीवर तपास सुरू आहे.

### शाह याने हवलदार यांना दिले २० हजार

पुण्यातून अटक करण्यात आलेला तेजस शाह हा शहरातील प्रतिष्ठित ‘डॉ. अभंग प्रभू मेडिकल ॲकॅडमी’ येथे भौतिकशास्त्राचा शिक्षक म्हणून कार्यरत होता. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, तेजस शाह याने यापूर्वीच अटकेत असलेल्या मनीषा हवलदार हिच्याकडून भौतिकशास्त्राचे लीक झालेले प्रश्न मिळवले होते. या प्रश्नांसाठी शाह याने हवलदार यांना २० हजार रुपये दिल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. मनीषा हवलदार यांनी दिलेल्या प्रश्नांची मालिका शाह याने स्वतःच्या वहीत लिहून काढली आणि त्यानंतर घरी जाऊन त्याचे छायाचित्र काढून पुन्हा हवलदार यांना पाठवले होते. सीबीआयने काल रात्री ९ वाजता शाह याला पुण्यातील विशेष न्यायालयात हजर केले.

## शरद पवार मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल

**मुंबई :दि.२७ वृत्तसंस्था**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवार यांच्या प्रकृतीबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. काही दिवसांपूर्वी पुण्यातील रुबी हॉल क्लिनिकमध्ये उपचार घेतल्यानंतर आता त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ही माहिती समोर येताच राजकीय वर्तुळात तसेच कार्यकर्त्यांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे. मात्र, प्राथमिक माहितीनुसार शरद पवार यांच्या प्रकृतीत कोणतीही गंभीर समस्या नसून त्यांना केवळ नियमित वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

वाढतं वय, सततचे दौरे आणि राजकीय-सामाजिक कार्यक्रमांमधील व्यस्त दिनक्रम लक्षात घेता डॉक्टरांनी काही आवश्यक आरोग्य तपासण्या करण्याचा सल्ला दिला होता. त्यानुसार सध्या डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्या विविध चाचण्या सुरू आहेत. शरद पवार रुग्णालयात दाखल झाल्याची बातमी समोर आल्यानंतर सोशल मीडियावर त्यांच्या प्रकृतीबाबत उलट सुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. काही ठिकाणी त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे दावेही करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून या सर्व अफवा फेटाळून लावत पवारांची प्रकृती स्थिर आणि (पान २ वर)

## सीआयडी ही कुचकामी यंत्रणा, केवळ बिनकामाचे ओझे- रोहित पवार

**मुंबई :दि.२७ वृत्तसंस्था**



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी राज्यातील तपास यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर अत्यंत गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूच्या तपासावरून रोहित पवार यांनी राज्य सरकार आणि विशेषतः गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर तोफ डागली आहे. सीआयडीसारखी यंत्रणा सध्या पूर्णपणे कुचकामी ठरली असून, ती सरकारवर केवळ बिनकामाचे ओझे आहे, अशा कडक शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला आहे.

गेल्या जानेवारी महिन्यात बारामती येथे झालेल्या एका दुर्दैवी विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले होते. या घटनेला आता बराच काळ लोटला असूनही तपासात कोणतीही ठोस प्रगती झालेली नाही. या पार्श्वभूमीवर बोलताना रोहित पवार म्हणाले की, अजितदादांच्या अपघात प्रकरणात सीआयडी नेमका काय तपास करत आहे, हेच कोणाला कळेनासे झाले आहे. ज्या गतीने आणि ज्या पद्धतीने ही चौकशी सुरू आहे, ते पाहता या यंत्रणेच्या अस्तित्वावरच शंका येते. अशा निष्क्रिय यंत्रणा जनतेच्या कराराच्या पैशांवर चालणारे ओझेच आहेत. अजित पवारांच्या मृत्यू प्रकरणाचा तपास पारदर्शक पद्धतीने व्हावा, यासाठी रोहित पवार सुरुवातीपासून आग्रही आहेत. महाराष्ट्रात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप करत, त्यांनी थेट शेजारील कर्नाटक राज्य गाठले होते. तिथे त्यांनी या प्रकरणाची ‘झिरो एफआयआर’ नोंदवली, जी नंतर कायदेशीर प्रक्रियेनुसार महाराष्ट्रात वर्ग करण्यात आली. मात्र, इतका मोठा संघर्ष करूनही महाराष्ट्र पोलिसांनी किंवा सीआयडीने यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. रोहित पवार यांनी या प्रकरणात मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वैयक्तिक लक्ष घालण्याचे आवाहन केले आहे. एका मोठ्या नेत्याचा अपघाती मृत्यू होतो आणि राज्याची प्रमुख तपास यंत्रणा हात जोडून बसते, हे चिंताजनक आहे, असे ते म्हणाले.


# श्री जागेश्वर माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय

## श्री जागेश्वर शिक्षण संस्था, वाडेगाव तालुका बाळांपूर, जिल्हा अकोला



## जिथे माती सुवर्ण होते..!


१९५९ सालची ती एक संथ सकाळ असेल. वाडेगाव (ज्याला अभिमानाने बारडोली म्हटले जाते) येथील काही सुजाण, निस्वार्थी आणि ध्येयवादी मनांमध्ये एकच विचार घोळत होता; 'आपल्या मातीतील गरिबाचे मूल शिकले पाहिजे.' याच विचारातून एका छोट्याशा रोपट्याची लागवड झाली, ज्याचं नाव ‘श्री जागेश्वर माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय.’ आज हेच रोपटे एक महाकाय वटवृक्ष बनून लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला सावली देत आहे. ही केवळ एका शाळेची इमारत नाही, तर हे 'शिक्षणाचे माहेरघर' आहे. इथे फक्त अक्षरे गिरवली जात नाहीत, तर माणसाचे नशीब घडवले जाते.

### पाया निस्वार्थाचा, इमारत विश्वासाची

जागेश्वर विद्यालयाचा इतिहास पाहिला, तर डोळे अभिमानाने आणि कौतुकाने ओलावतात. अमरावती विद्यापीठात 'अ' श्रेणी मिळवून अव्वल ठरलेली ही संस्था एका रात्रीत उभी राहिलेली नाही. यामागे आहे संस्थेच्या संचालक मंडळाचा निस्वार्थी त्याग. 'शिक्षणाचा व्यापार करायचा नाही, तर शिक्षणातून पिढ्या घडवायच्या आहेत,' या एकाच ध्येयाने प्रेरित होऊन या संस्थेने नर्सरी (बालवाडी) पासून थेट पदव्युत्तर शिक्षणाची दारे ग्रामीण भागातील मुलांसाठी खुली केली. आज या परिसरातल्या कुठल्याही पालकाला आपल्या मुलाच्या उच्च शिक्षणासाठी वणवण भटकावे लागत नाही, हेच या संस्थेचे सर्वात मोठे यश आहे.

### या इमारतीने वाडेगावला काय दिले?

१०० हून अधिक अधिकारी: 'महाराष्ट्र लोकसेवा आयोग' च्या परीक्षेत यश मिळवून देशाची सेवा करणारे १०० पेक्षा जास्त अधिकारी या शाळेने घडविले. २०० हून अधिक पोलीस: खाकी वर्दी घालून देशाचे रक्षण करणारे २०० पेक्षा जास्त पोलीस बांधव याच मैदानात धावून तयार झाले. देशाचे आधारस्तंभ: अनेक एमबीबीएस आणि एमएस डॉक्टर्स, उत्कृष्ट इंजिनिअर्स, नामवंत वकील, प्राध्यापक, पत्रकार आणि व्याख्याते आज जागेश्वरचे नाव अभिमानाने मिरवीत आहेत. मातीशी इमान राखणारे शेतकरी: केवळ नोकऱ्याच नव्हे, तर आधुनिक शेती करून देशाला अन्न पुरविणारे 'उत्कृष्ट शेतकरी' सुद्धा याच विद्यालयाने घडविले, कारण इथे पुस्तकांसोबत मातीवर प्रेम करायला शिकविले जाते.



"ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन त्यांचा सर्वांगीण विकास करणे, हेच आमच्या श्री जागेश्वर विद्यालयाचे मुख्य ध्येय आहे. विद्यालयाचे उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण, शिस्त आणि क्रीडा क्षेत्रातील राज्यस्तरीय कामगिरी यामुळेच शासनाने आमच्या संस्थेला 'A' दर्जा बहाल केला आहे. हा बहुमान शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांच्या एकत्रित परिश्रमांचे फळ आहे. भविष्यातही यशाची ही परंपरा अशीच अविरत सुरू राहील, असा मला ठाम विश्वास आहे."

- गोपाल मानकर
(प्राचार्य, श्री जागेश्वर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय



मी कैवल्य शिवशंकर मसने, श्री जागेश्वर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात बारावी विज्ञान शाखेत शिकत असून मला याचा सार्थ अभिमान आहे. आमचे विद्यालय ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे केंद्र आहे. दरवर्षी दहावीचा उत्कृष्ट निकाल, 'माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमात अकोला जिल्ह्यात प्रथम क्रमांक आणि मूल्यांकन 'A' दर्जा ही विद्यालयाची वैशिष्ट्ये आहेत. प्राचार्य गोपाल मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. येथे सांस्कृतिक कार्यक्रम, विज्ञान प्रदर्शन व विविध उपक्रम उत्साहात होतात. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शिस्त व संस्कार यावर येथे विशेष भर दिला जातो. अनेक माजी विद्यार्थी आज उच्च पदांवर कार्यरत आहेत.

- कैवल्य शिवशंकर मसने (विद्यार्थी)

गोपाल मानकर सर यांच्या प्रेरणेने अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात जाऊन मोठी भरारी घेईल आज समाजात आपले व्यवसायात मोठी ओळख निर्माण केली तर गोपाल सर यांनी शिकवलेल्या इतिहासामुळे व पिटी शारीरिक मेहनत करून अनेक विद्यार्थी देश सेवेत व विज्ञान विभागात कार्यरत आहेत या सर्व गोष्टीचे श्रेय श्री जागेश्वर कनिष्ठ महाविद्यालय चे मुख्याध्यापक माननीय गोपाल मानकर सर यांना देण्यास काहीही हरकत नाही व पुढील काळात विद्यार्थी विद्यार्थ्यांसाठी एक आदर्श शिक्षक व मार्गदर्शक म्हणून विद्यार्थी वर्ग गोपाल सर यांच्याकडे पाहत आहेत.

- ॲड. राहुल लोध,
माजी विद्यार्थी, जागेश्वर विद्यालय वाडेगाव

### गुणवत्तेची मोहोर: 'मुख्यमंत्री माझी शाळा' मध्ये प्रथम!

जेव्हा शाळा गुणवत्तेचा ध्यास घेते, तेव्हा शासनही त्याची दखल घेते. संपूर्ण जिल्ह्यात 'मुख्यमंत्री माझी शाळा' या अभियानात प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरण्याचा बहुमान श्री जागेश्वर विद्यालयाला मिळाला.

### शाळेची काही खास वैशिष्ट्ये

- ☑ **प्रशस्त परिसर:** भव्य देखणी इमारत आणि खेळण्यासाठी विस्तीर्ण मैदान.
- ☑ **आधुनिकता:** विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी स्वतंत्र संगणक वर्ग आणि अद्ययावत विज्ञान प्रयोगशाळा.
- ☑ **शारीरिक विकास:** विद्यार्थ्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी भव्य व्यायामशाळा आणि खेळाचे सर्व साहित्य.
- ☑ **संस्कार:** सर्वात महत्त्वाचे म्हणजे इथे ज्ञान देणारा 'निपुण शिक्षक वृंद' आणि ज्ञान घेणारे 'शिस्तप्रिय विद्यार्थी' आहेत.

### संस्थेचे ध्येय: प्रत्येक घरात प्रकाशाची किरणे

विज्ञान, वाणिज्य आणि कला अशा तिन्ही शाखांमधून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सुवर्णसंधी देणाऱ्या या संस्थेचे ध्येय अतिशय भावूक आणि प्रेरणादायी आहे: 'परिसरातील प्रत्येक घरातील विद्यार्थी एक आदर्श व्यक्ती म्हणून समाजात उभा राहावा. शिक्षण केवळ पुस्तकात राहू नये, तर ते प्रत्येकाच्या घरात पोहोचावे आणि एक दिवस फक्त जिल्हाच नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राने 'श्री जागेश्वर महाविद्यालया'चा आदर्श घ्यावा.'

### क्रीडांगण: जिथे स्वप्नांना पंख मिळतात

अभ्यासात हुशार असणारी जागेश्वरची मुले मैदानातही वाघासारखी लढतात. कबड्डी, खो-खो, क्रिकेट असो वा बॉक्सिंग, कॅरम, बुद्धिबळ, मॅरेथॉन आणि धनुर्विद्या... प्रत्येक खेळात या शाळेच्या विद्यार्थ्यांनी थेट राज्यस्तरापर्यंत मजल मारली आहे. ग्रामीण भागातील मुलांमध्ये असलेली ताकद आणि जिद्द या शाळेने ओळखली आणि त्यांना योग्य ते व्यासपीठ मिळवून दिले.

### थोडक्यात सांगायचे तर...

श्री जागेश्वर माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, वाडेगाव ही केवळ एक शाळा नाही; तो एक संस्कार आहे, एक चळवळ आहे आणि लाखो गरिबांच्या स्वप्नांना सत्यात उतरवणारा जिवंत स्वर्ग आहे! या पवित्र ज्ञानमंदिराला आणि तिथे घडणाऱ्या प्रत्येक भविष्याला कोटी कोटी प्रणिपात!

### शिक्षकेत्तर कर्मचारी

अविनाश शिंदे
पर्यवेक्षक
संदीप जढाळ
पर्यवेक्षक
ज्ञानेश्वर तराळे
प्रगणक
विजय गोस्वामी
प्रगणक
चक्रधर खेरडे
प्रगणक
लीलेश्वर नराते
प्रगणक
सौरभ यादव
प्रगणक
अभिजीत येवले
प्रगणक
माधव चांडे
प्रगणक
श्रीकांत पळसकार
प्रगणक
अतिक खान
प्रगणक



संकलन : चंदन जंजाळ (तालुका प्रतिनिधी) बाळापूर / वाडेगाव (मो. नं. 919860289166)

## पान 1 वरून...

### 'गॉड' नंबरचे गूढ उलगडले...

कागदपत्रे, लॅपटॉप आणि मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि अहिल्यानगर या ठिकाणी कारवाई केली असून आतापर्यंत १३ जणांना अटक करण्यात आली आहे. मनिषा हवालदार आणि तेजस शाह यांच्यात नेमके कोणते संबंध होते? तेजस शाह कोणाच्या संपर्कात होता? या संपूर्ण नेटवर्कमागे आणखी कोण आहेत? याचा सखोल तपास सध्या सीबीआयकडून सुरू आहे. तेजस शाहच्या चौकशीतून मोठे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्याच्यामार्फत आणखी किती विद्यार्थ्यांपर्यंत प्रश्नपत्रिका पोहोचली, याचा तपास सीबीआय करत आहे. या प्रकरणात लातूरमधील डॉक्टर मनोज शिरुरे यांनाही अटक करण्यात आली आहे. रसायनशास्त्र विषयाचे लीक झालेले प्रश्न विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. तसेच पुण्यातील काही शिक्षक आणि संबंधित तज्ज्ञांचाही तपास सुरू आहे. आणखी एक महिला प्राध्यापिका सीबीआयच्या रडारवर असल्याची माहिती मिळत आहे. दुसरीकडे, नीट पेपरफुटी प्रकरणामुळे संपूर्ण कोचिंग क्लासेस व्यवसायाची प्रतिमा मलीन होत असल्याच्या निषेधार्थ 'महाराष्ट्र क्लास ओनर्स असोसिएशन'ने मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. लातूरमधील मोटेगावकर क्लासेससारख्या काही मोजक्या संस्थांमुळे राज्यातील प्रामाणिक शिक्षकांची बदनामी होत असल्याची भावना संघटनांनी व्यक्त केली आहे. या आंदोलनाद्वारे शिक्षकांनी 'इंटिग्रेटेड क्लासेस' (शाळा-महाविद्यालयांशी संलग्न असलेले खाजगी वर्ग) ही पद्धत बंद करण्याची आग्रही मागणी सरकारकडे केली आहे. संघटनांच्या मते, कॉर्पोरेट क्लासेस आणि महाविद्यालयांचे साटेलोटे असल्यामुळेच पेपरफुटीसारखे गंभीर प्रकार घडत आहेत. जे शिक्षक सरकारी किंवा अनुदानित महाविद्यालयांमध्ये शिकवतात, त्यांना खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये शिकवण्यास सक्त मनाई असावी, असेही त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

### शरद पवार मुंबईतील ब्रीच ...

चांगली असल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून कार्यकर्त्यांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचं आवाहन करण्यात आले आहे. रुटीन चेकअप पूर्ण झाल्यानंतर शरद पवारांना डिस्चार्ज दिला जाणार असल्याची माहितीही पक्षाकडून देण्यात आली. दरम्यान, एप्रिल महिन्यात दिल्ली दौऱ्यावरून परतल्यानंतरही शरद पवार यांची प्रकृती अचानक बिघडली होती. त्यावेळी त्यांना काही दिवस रुग्णालयात उपचार घ्यावे लागले होते. डॉक्टरांनी त्यांना विश्रांतीचा सल्ला दिल्यानंतर ते आरोग्याची विशेष काळजी घेत आहेत. सध्याही त्यांना केवळ नियमित तपासणीसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं डॉक्टरांनी स्पष्ट केलं आहे.

# फडणवीसांनी पवारांच्या विश्वासू नेत्याला हेरले

## भाजप प्रवेशाची तारीख आली समोर; विधानपरिषदेवर जाणार असल्याची चर्चा



**मुंबई, दि. २७** वृत्तसंस्था

विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीत जागावाटपावरून जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे. भाजपाने १२ जागांवर दावा ठोकला असला तरी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे केवळ चार जागांवर समाधानी नसल्याची चर्चा आहे. दुसरीकडे पुण्यातील जागेसाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आग्रही असल्याचं सांगितलं जात आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार हे तिघेही दिल्लीत दाखल होणार असून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत जागावाटपाबाबत अंतिम चर्चा होणार आहे.

दरम्यान, भाजपाकडून संभाव्य उमेदवारांची चाचपणीही वेगाने सुरू आहे. १२ जागांसाठी तब्बल ४८ नावांची चर्चा पक्षात सुरू असून प्रत्येक जागेसाठी चार नावांची यादी दिल्लीतील पक्षश्रेष्ठींना पाठवण्यात आल्याची माहिती आहे. ही यादी घेऊन भाजप नेते रवींद्र चव्हाण दिल्लीला रवाना झाले आहेत. ते भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची भेट घेणार असून त्यानंतर अमित शाहांसोबत उमेदवारांबाबत चर्चा होणार आहे. या यादीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते आणि माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांचं नाव असल्याची चर्चा आहे. तनपुरे हे लवकरच भाजपामध्ये प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा असून त्यांना विधान परिषदेसाठी उमेदवारी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, ३० मे रोजी प्राजक्त तनपुरे भाजपामध्ये जाहीर प्रवेश करू शकतात. त्यांच्यासोबत राष्ट्रवादीतील आणखी एका मोठ्या नेत्याचाही भाजप प्रवेश होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तनपुरे भाजपमध्ये गेल्यास शरद पवार गटाला हा मोठा धक्का असणार आहे.

याआधी राहुरी पोटनिवडणुकीवेळीही तनपुरे यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा रंगल्या होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राम शिंदे आणि रवींद्र चव्हाण यांच्यासोबत त्यांच्या भेटी झाल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. ते भाजपकडून उमेदवारी मिळवण्याच्या प्रयत्नात असल्याचं बोललं जात होतं. मात्र, रवींद्र चव्हाण यांच्या भेटीनंतर त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल न करण्याचा निर्णय घेतला.

प्राजक्त तनपुरे हे अहमदनगर (अहिल्यानगर) जिल्ह्यातील राहुरी मतदारसंघाचे माजी आमदार आहेत. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसकडून मोठा विजय मिळवला होता. महाविकास आघाडी सरकारमध्ये उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यमंत्री म्हणून काम पाहिलं होतं. शहरी विकास, ऊर्जा आणि आदिवासी विकास ही महत्त्वाची खाती त्यांच्याकडे होती. विशेष म्हणजे ते राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांचे भाचे आहेत.

# नाशिकच्या काश्यपी धरणात बुडून चौघांचा मृत्यू

**मुंबई, दि. २७** वृत्तसंस्था



नाशिक जिल्ह्यात पिकनिकसाठी गेलेल्या एक दाम्पत्य आणि दोन किशोरवयीन मुलांचा काश्यपी धरणात बुडून मृत्यू झाला आहे. ही घटना मंगळवारी संध्याकाळी घडली. पोलिसांच्या माहितीनुसार, मखमलाबाद येथील रहिवासी सचिन कैलास ठोंबरे (३०) आणि त्यांची पत्नी रोहिणी (२५) हे आपल्या दोन वर्षांच्या मुलीसह आणि शेजारी राहणाऱ्या दोन मुलांसोबत, केतन अनिल पवार (१६) आणि कौशल अनिल पवार (१४) हे या धरणाच्या जलाशयावर गेले होते.यात दाम्पत्य आणि दोन किशोरवयीन मुले पाण्यात बूडाली. संगीता घाडगे नावाची एक महिला तिथून जात असताना तिला लहान मूलगी जलाशयाच्या दिशेने जाताना दिसली. तिने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि त्या मुलीला वाचवले. पाण्याचा दिशेने बोट दाखवत ती मुलगी सतत मम्मी, पप्पा असे रडत होती. धराच्या काठावर चपलांच्या जोड्या पडलेल्या दिसल्यानंतर घाडगे यांनी स्थानिक रहिवाशांना सावध केले, त्यानंतर स्थानिकांनी ठोंबरे दाम्पत्य आणि त्या दोन मुलांचे मृतदेह पाण्यातून बाहेर काढले. रोहिणीच्या मोबाईल फोनवर आलेला एक कॉल उचलल्यानंतर मृतांची ओळख पटली. नंतर अधिकाऱ्यांना असे आढळून आले की, रोहिणी गर्भवती होती. हर्सूल पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# शासकीय रुगणाल्यात बेड्ची संख्या वाढवीणयात यावी अन्यथा आंदोलन करणार: सुमय्या अली



**अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :**मागील काही दिवसा पासून शासकीय रुगणाल्यात रूगणानांना होत असलेल्या त्रासला पाहुण सुमय्या अली राष्ट्रीय अध्यक्षा नारी शक्ति सेवा फाउंडेशन त्या आपली टीम सोबत शासकीय रुगणाल्यात पहोंचले तिथे रूगणांच्या समस्या ला पाहुन त्यांनी आरोग्य मंत्री, तसेच शासकीय रुग्णालयाचे डीन आणि अकोला जिल्हा अधिकारी यांनी पाठपुरावा केले सुमय्या अली म्हणाल्या इथे एकच बेड वर दोन महिला रूगणानांना ट्रीटमेंट दिला जात आहे जेने करूण जे गर्भवती महिला आहे त्यांची कधीही जीवहानी होऊ शकते जर अशी दुर्घटना घड़ली तर याला ज़बाबदार शासन राहतील मुख्य म्हणजे आरोग्य डिपार्मेंट करीता लवकरात लवकर या समस्याचे निवारण करणयात यावे अन्यथा आम्ही नारी शक्ति सेवा फाउंडेशन च्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडणार असा इशारा सुमय्या अली यांनी दिला आहे.

# कुंभारीत दहा दिवसीय ग्रीष्मकालीन बालसंस्कार व क्रीडा शिबिराचे आयोजन

## १ ते १० जूनदरम्यान मोफत निवासी शिबिर; विद्यार्थ्यांना क्रीडा व संस्कारांचे धडे

**अजिंक्य भारत ।** प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** जय बजरंग व्यायाम शाळा, जय बजरंग विद्यालय कुंभारी आणि जिल्हा क्रीडा कार्यालय अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने १० ते १५ वर्षे वयोगटातील मुलांसाठी दहा दिवसीय ग्रीष्मकालीन निवासी बालसंस्कार व क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर १ जून ते १० जूनदरम्यान कुंभारी येथील जय बजरंग विद्यालयात होणार असून विविध शालेय क्रीडा प्रकारांसह संस्कारवर्गाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. शिबिर आयोजन समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी



प्रकाशभाऊ बिडकर होते. यावेळी शत्रुघ्न बिडकर, सदानंद जाधव, राजेंद्र जळमकर, डॉ. सूर्यभान नागुलकर, श्रीराम पालकर, दिनकर धामणकर, जानराव आगळे, प्रदीप जाधव, संजय तायडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. शिबिरात मुलांसाठी निवासी सुविधा उपलब्ध असणार असून मुलींसाठी अनिवासी स्वरूपात प्रशिक्षण दिले जाणार आहे. मुलींना सकाळी ६ वाजता शिबिरस्थळी आणून सायंकाळी ८ वाजता पालकांनी परत घेऊन जाण्याचे नियोजन करण्यात आले आहे. शिबिर पूर्णतः मोफत असून सहभागी मुला-मुलींसाठी भोजन, दोन वेळचा नाश्ता तसेच लोअर व टी-शर्ट स्वरूपातील गणवेश आयोजकांकडून उपलब्ध करून दिला जाणार आहे. प्रशिक्षणात योग, व्यायाम, कवायत, समूहगान, देशी खेळ, संस्कार प्रबोधन व ज्ञानामृत सत्रांचा समावेश राहणार आहे. तसेच धनुर्विद्या, योग, नेटबॉल, थ्रोबॉल आणि मल्लखांब यांसारख्या शासनमान्य खेळांचे प्रशिक्षण नामांकित प्रशिक्षकांकडून दिले जाणार आहे. कुंभारी, कातखेड, कैलासनगर, मराठा नगर, येवता आणि परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थी या शिबिरात सहभागी होऊ शकणार आहेत. आयोजकांनी इच्छुक विद्यार्थी व पालकांनी जय बजरंग विद्यालय कुंभारी किंवा आयोजकांशी संपर्क साधून नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे.

# रेल्वे स्थानकांवरील खाद्यपदार्थांच्या दरवाढीस तात्पुरती स्थगिती!



**नवी दिल्र्ली, दि. २७** वृत्तसंस्था


मध्य रेल्वेने प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांसाठी एक अत्यंत आनंदाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. रेल्वे स्थानकांवरील खाद्यपदार्थांच्या किमतीत वाढ करण्याचा जो निर्णय प्रशासनाने घेतला होता, त्याला आता तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. मध्य रेल्वेच्या 'मायनर स्टॅटिक कॅटरिंग युनिट्स'मध्ये (खाद्यपदार्थांचे स्टॉल्स) होणारी ही दरवाढ पुढील आदेश येईपर्यंत लागू केली जाणार नाही, असे रेल्वे प्रशासनाकडून अधिकृतपणे स्पष्ट करण्यात आले आहे.

मुंबईकरांचा आणि रेल्वे प्रवाशांचा सर्वात आवडीचा आणि हक्काचा नाश्ता असलेल्या वडापावचे दर वाढणार असल्याच्या चर्चेने प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण होते. नवीन प्रस्तावानुसार वडापावची किंमत २० रुपयांपर्यंत जाण्याची शक्यता वर्तवली जात होती; मात्र प्रशासनाने दरवाढीचा निर्णय मागे घेतल्यामुळे आता प्रवाशांना १ जूनपासूनही जुन्याच दरात, म्हणजेच अवघ्या १३ रुपयांमध्ये वडापाव उपलब्ध होणार आहे. सर्वसामान्यांच्या खिशाचा विचार करून घेतलेल्या या निर्णयामुळे नियमित प्रवास करणाऱ्या नोकरदार वर्गाला आणि सामान्य जनतेला मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. मध्य रेल्वेने या स्थगितीबाबतच्या सूचना आपल्या सर्व संबंधित विभागांना आणि विभागीय कार्यालयांना तातडीने जारी केल्या आहेत. १ जूनपासून कोणत्याही रेल्वे स्थानकावरील स्टॉलवर प्रवाशांकडून वाढीव दर आकारले जाणार नाहीत, याची खबरदारी घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### २५ मेच्या परिपत्रकाला प्रशासनाचा ब्रेक

मध्य रेल्वे प्रशासनाने २५ मे २०२६ रोजी एक विशेष परिपत्रक जारी केले होते. या परिपत्रकानुसार, रेल्वे स्थानकांवरील खाद्यपदार्थांच्या दरांमध्ये सुधारणा (वाढ) करण्याची घोषणा करण्यात आली होती आणि हे नवीन दर १ जून २०२६ पासून लागू होणार होते. मात्र, या निर्णयावर विविध स्तरांतून नाराजी व्यक्त करण्यात आली. सर्वसामान्य प्रवाशांचे हित आणि सामाजिक रोष लक्षात घेता, प्रशासनाने अत्यंत संवेदनशीलतेने पाऊल उचलत या निर्णयाला तूर्तास स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे.

# समृद्धी महामार्गावर बर्निंग कारचा थरार; कार जळून खाक



**मुंबई, दि. २७** वृत्तसंस्था

समृद्धी महामार्गावर बर्निंग कारचा थरार पहायला मिळाला आहे. सिन्नरहून शिर्डीकडे जाणाऱ्या टाटा नेक्सन इव्ही कारला अचानक आग लागल्याची घटना घडली. आज (बुधवारी) दुपारी दोन वाजेच्या सुमारास कांदळवाडी शिवाराजवळ ही आगीची घटना घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र क्षणांतच संपूर्ण कारने पेट घेतल्याने वाहन पूर्णतः जळून खाक झाले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, विजय गणेश गीते आणि योगेश प्रकाश घुगे हे दोघे सिन्नरहून शिर्डीकडे जात असताना त्यांच्या एमएच १५ एचवाय ५५६३ या क्रमांकांच्या टाटा नेक्सन ईव्ही कारमधून अचानक धूर निघण्यास सुरुवात झाली. प्रसंगावधान राखत दोघेही तात्काळ बाहेर पडले. यानंतर काही क्षणांतच वाहनाला भीषण आग लागली. दोघांच्याही प्रसंगावधानामुळे मोठा अनर्थ टळला. आग इतकी भीषण होती की काही वेळातच संपूर्ण वाहन आगीच्या भक्ष्यस्थानी पडले आणि कार पूर्णपणे जळून खाक झाली.

दरम्यान, घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलीस प्रशासन व महामार्ग प्रशासन तब्बल एक तास उशिराने घटनास्थळी पोहोचले. या घटनेमुळे काही काळ समृद्धी महामार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला होता. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, संबंधित यंत्रणांकडून पुढील तपास सुरू आहे.

# शाळेत प्रवेश द्या; मी अंध आहे, ही माझी चूक आहे का?

## प्रवेशासाठी अंध विद्यार्थ्याचे आर्त आवाहन

**नाशिक, दि. २७** वृत्तसंस्था



''मी अंध आहे, ही माझी चूक आहे का? मला शिकण्याचा अधिकार नाही का?'' असा हृदय पिळवटून टाकणारा सवाल एका गरीब अंध विद्यार्थ्याने शाळेच्या आवारात उपस्थित करत सर्वांच्या मनाला चटका लावला. सिडकोतील मोरवाडी परिसरातील एका शाळेत इयत्ता सहावीमध्ये प्रवेशासाठी गेलेल्या विद्यार्थ्याला केवळ तो अंध असल्यामुळे प्रवेश देण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मोरवाडी भागात राहणारा एक अंध विद्यार्थी आपल्या आईसोबत शाळेत प्रवेशासाठी गेला होता. मात्र विविध कारणे सांगत शाळा प्रशासनाकडून त्याला प्रवेश देण्यास टाळाटाळ करण्यात येत होती.

आपल्या मुलाला शिक्षण मिळावे यासाठी आईची सुरू असलेली धडपड, विद्यार्थ्याच्या डोळ्यातील अश्रू आणि त्याने व्यक्त केलेली वेदना उपस्थितांना अस्वस्थ करून गेली.

दरम्यान, हा प्रकार समजताच शिंदे सेनेच्या नगरसेविका किरण दराडे यांचे पती तथा सामाजिक कार्यकर्ते बाळा दराडे यांनी तातडीने शाळेत धाव घेतली. ''अंध असणे हा गुन्हा नाही. प्रत्येक मुलाला शिक्षणाचा समान अधिकार आहे,'' अशी भूमिका घेत त्यांनी विद्यार्थ्याची आई आणि विद्यार्थ्यासोबत शाळेच्या आवारातच ठिय्या आंदोलन सुरू केले.

विद्यार्थ्याला प्रवेश मिळेपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला.

आंदोलनानंतर शाळा प्रशासनाची एकच धावपळ उडाल्याचं पहायला मिळालं. अखेर शिक्षकांनी विद्यार्थ्याचा प्रवेश अर्ज भरून घेतला असून संबंधित विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाईल,

असे शालेय व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले. पण घडलेल्या या प्रकारामुळे शाळा प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

**तपपूर्ती** | मोदींच्या कार्यकाळाची १२ वर्षे पूर्ण

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मोदीजींच्या कार्यकाळाला 'राष्ट्रनिर्माणाचा सुवर्णकाळ'म्हणून केले अधोरेखित

**मुंबई, दि. २७** वृत्तसंस्था




देशाचा स्वाभिमान जागा करून परिवर्तन घडवलं जाऊ शकते, हे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी त्यांच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात केलेल्या कार्याने दाखवून दिले आहे. फक्त अनुदान घेणे ही वृत्ती न बाळगता देशाला जगामध्ये स्वाभिमानाने उभा असलेला भारत देश बनवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. एवढेच नाही तर देशात मेक इन इंडिया ही चळवळ राबवून मेक फॉर वर्ल्ड च्या दिशेने देशाची वाटचाल सुरू करण्यामागे मोलाचे योगदान दिले आहे. ज्या भारताकडे पूर्वी एक याचक राष्ट्र म्हणून पाहिले जायचे, त्याला जागतिक महाशक्ती बनविण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी केले आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत काढले. देशाचे लाडके पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी २६ मे २०२६ रोजी पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीची १२ वर्षे पूर्ण करत आहेत. मोदीजींच्या यशस्वी, दूरदर्शी आणि परिवर्तनकारी राष्ट्रसेवेचे एक तप हे भारतासाठी आणि समस्त भारतीयांसाठी वरदान ठरले आहे. या ऐतिहासिक पर्वानिमित्त राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती या विशेष संग्राह्य अंकाचे प्रकाशन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते आज मुंबईतील प्रभादेवी स्थित रविंद्र नाट्यमंदिर येथे करण्यात आले, या प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी त्यांच्या सोबत भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मुंबई अध्यक्ष अमित साटम, मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार निरंजन डावखरे, आमदार संजय कुटे, आमदार सुनील राणे उपस्थित होते. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या बारा वर्षांत भारताने केवळ विकास केला नाही, तर जगासमोर एका नव्या राष्ट्रशक्तीचा आदर्श उभा केला आहे. आजचा भारत आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करणारा, डिजिटल तंत्रज्ञानाने सक्षम झालेला, उद्योगशील आणि नारीशक्तीला केंद्रस्थानी ठेवणारा समर्थ राष्ट्र म्हणून जगभरात ओळखला जात आहे, असे गौरवोद्गार भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी ''राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती''या विशेष संग्राह्य अंकाच्या प्रकाशन सोहळ्यात काढले. ''राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती'' म्हणजे खरंतर देशाच्या जनतेने अनुभवलेला परिवर्तनाचा इतिहास आहे, असे सांगत रविंद्र चव्हाण पुढे म्हणाले की, गेल्या एका तपामध्ये सामान्य माणसाच्या आयुष्यात घडलेला बदल प्रत्येक भारतीयाने अनुभवला आहे. शेतकरी, कामगार, गरीब, वंचित आणि उपेक्षितांना सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारी व्यवस्था मोदी सरकारने निर्माण केली. पारदर्शक शासनपद्धतीमुळे सरकारी योजनांचा लाभ थेट शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला. देशातील गरीबांच्या घरात उजेड, महिलांच्या आयुष्यात सन्मान, युवकांच्या हातात संधी आणि सामान्य नागरिकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण झाला. ''एक भारत, अखंड भारत''ते ''विकसित भारत''या प्रवासातील परिवर्तनाची १२ विषयांवरील तथ्यपूर्ण मांडणी या विशेष अंकातून करण्यात आली असल्याचेही त्यांनी सांगितले.

# अशोक खरातची ९ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडीत रवानगी

**मुंबई, दि. २७** वृत्तसंस्था

महाराष्ट्राला हादरवणाऱ्या भोंदू अशोक खरातची रवानगी आता न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे. आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधित कायद्यांतर्गत (पीएमएलए) स्थापन विशेष न्यायालयाने मंगळवारी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) खरात याला वाढीव कोठडी देण्याची मागणी न केल्याने विशेष न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

कोठडीची मुदत संपल्याने खरात याला मंगळवारी विशेष न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. मात्र, सध्या त्याच्या वाढीव कोठडीची आवश्यकता नसल्याचे ईडीतर्फे स्पष्ट करण्यात आले. विशेष म्हणजे खरात याने चौकशीत सहकार्य केले नाही आणि उडवाउडवीची उत्तरे दिली, असा दावाही ईडीने एकीकडे केला. भविष्यात खरात याच्या चौकशीची आवश्यकता भासल्यास ती मागण्याबाबतचा अधिकार राखून ठेवत असल्याचे न्यायालयाला सांगितले. अशोक खरातवर ४७.७४ कोटी रुपयांच्या मनी लॉंड्रिंगचा आरोप आहे. ईडीच्या तपासानुसार, अशोक खरातने खंडणी आणि धार्मिक फसवणुकीच्या माध्यमातून मिळवलेले अंदाजे ४७.७४ कोटी रुपये वेगवेगळ्या बँक खात्यांद्वारे फिरवले आहेत. हा गुन्हा करून कमावलेला काळा पैसा कायदेशीर दाखवण्यासाठी त्याने स्वतःच्या आणि कुटुंबियांच्या नावावर अनेक मौल्यवान स्थावर मालमत्ता खरेदी केल्याचे तपासात उघड झाले आहे. मोठ्या आर्थिक गैरव्यवहारासाठी खरातने एक मोठे जाळे तयार केले होते. त्याने भक्तांना संमोहन आणि इतर धमक्या देऊन त्यांच्या संमतीशिवाय त्यांची कागदपत्रे मिळवली.

## महत्त्वाचे

### मोहन भागवत लखनौ दौऱ्यावर



**लखनौ :** उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण आधीच तापू लागले आहे. त्यातच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत तीन दिवसांच्या उत्तर प्रदेश दौऱ्यावर आल्याने राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे. लखनौ येथे तीन दिवसीय दौऱ्यात सरसंघचालक मोहन भागवत यांनी विविध कार्यक्रमांना उपस्थिती लावत संघ आणि भाजप नेत्यांसोबत महत्त्वाच्या बैठका घेतल्या. आरएसएस कडून हा दौरा नियमित संघटनात्मक कार्यक्रम आणि शताब्दी वर्षाचा आढावा असल्याचे सांगितले जात असले तरी राजकीय विश्लेषक या दौऱ्याकडे आगामी निवडणुकांच्या तयारीच्या दृष्टीने पाहत आहेत. उत्तर प्रदेशच्या आगामी विधानसभा निवडणुकांमध्ये सलग तिसऱ्यांदा सत्ता मिळवण्याच्या तयारीत असून त्यासाठी संघ आणि भाजपमधील समन्वय अधिक मजबूत कर्ण्यावर भर दिला जात असल्याची चर्चा आहे. याच पार्श्वभूमीवर आरएसएस आणि भाजपच्या 'ट्रिपल ' मॉडेल चर्चेत आले आहे. या मॉडेलनुसार संघ, संघटना आणि सरकार यांच्यात प्रभावी समन्वय साधण्याची रणनीती आखली जात आहे.आरएसएस वैचारिक बळ आणि कार्यकर्त्यांचे जाळे उभे करण्यावर भर देत आहे. भाजप निवडणूक आणि बूथ स्तरीय संघटन मजबूत करणार आहे.

### इराणचा एकच निर्णय भारतासह ८ देशांसाठी धक्कादायक!

**नवीदिल्ली :** जागतिक राजकारणातून आणि आंतरराष्ट्रीय अर्थकारणातून एक अत्यंत खळबळजनक बातमी समोर येत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून एकमेकांचे कट्टर शत्रू राहिलेले अमेरिका आणि इराण आता आपल्यातील संघर्ष संपवण्याच्या अंतिम टप्प्यात पोहोचले आहेत. दोन्ही देशांमध्ये एका मोठ्या सामंजस्य करारावर वेगाने काम सुरू आहे. परंतु, हा करार पूर्ण होण्यापूर्वीच इराणने अमेरिकेसह जगातील ८ मोठ्या अर्थव्यवस्थांचे धाबे दणाणून सोडले आहेत. इराणने स्पष्ट केले आहे की, जोपर्यंत परदेशात जप्त केलेली त्यांची १२० अब्ज डॉलर्सपेक्षा (११.४९ लाख कोटी रुपये) जास्त असलेली मालमत्ता मुक्त केली जात नाही, तोपर्यंत या करारावर अंतिम स्वाक्षरी होणार नाही. आंतरराष्ट्रीय माध्यम 'अल जझीरा' आणि 'सीएनएन'च्या रिपोर्टनुसार, इराणचा हा अब्जावधींचा खजिना जगातील शक्तिशाली देशांच्या बँकांमध्ये गोठवून ठेवण्यात आला आहे. यामध्ये सर्वाधिक २० अब्ज डॉलर्स चीनमध्ये अडकले आहेत. त्याखालोखाल कतारमध्ये १२ अब्ज डॉलर्स, भारतात ७ अब्ज डॉलर्स, इराकमध्ये ६ अब्ज डॉलर्स, अमेरिकेत १.२ अब्ज डॉलर्स, तर जपान आणि लक्झेंबर्गमध्ये प्रत्येकी १.५ अब्ज डॉलर्स जप्त आहेत.

# आंबा तैवानला, मिरची चीनला!

## तैवानच्या कार्यालयात हापूसची पेटी पोहोचल्याने नाराजी; थेट पंतप्रधानांकडे नोंदवली तक्रार

**नवी दिल्ली : दि. २७ वृत्तसंस्था**

अतिउत्साहाच्या भरात केलेली एक छोटी कृती दोन देशांतील संबंधातील तणाव वाढविण्यास कशी कारणीभूत ठरते याचा अनुभव सध्या राजधानीतील चर्चेचा विषय ठरला आहे. याच्या केंद्रस्थानी महाराष्ट्रातील एक तरुण खासदार असून त्यांनी भेट म्हणून पाठविलेल्या हापूस आंब्याच्या पेटीने मुत्सद्देगिरीच्या प्रदेशात मात्र दारूगोळ्यासारखे काम केले आहे. महाराष्ट्रातील एका तरुण खासदाराने राजधानीमध्ये अनेक मान्यवरांना हापूस आंब्याच्या पेट्या सप्रेम भेट म्हणून पाठविल्या. अनेक देशांच्या राजदूतांना आणि वाणिज्य प्रतिनिधींनाही त्या पाठविण्यात आल्या.त्यात तैवानचाही समावेश होता. त्यातील एक पेटी गेली तैपेई इकॉनॉमिक अँड कल्चरल सेंटरकडे आणि तिथूनच सगळा घोळ सुरू झाला.

तैवानवर मालकी सांगणाऱ्या चीनच्या गुप्तचरांच्या नजरेतून ही बाब सुटणार कशी? तैवानी कार्यालयात पसरलेला हापूसचा घमघमाट थेट बीजिंगपर्यंत पोहोचला आणि चिनी चेहरे आंबट झाले. चीनने थेट पंतप्रधान कार्यालयाकडे याबाबत लेखी नाराजी नोंदवल्याचे विश्वसनीय सूत्रांनी सांगितले. पंतप्रधान कार्यालयाकडून ही माहिती मिळताच संबंधित खासदाराच्या कार्यालयाने सारवासारव सुरू केल्याचेही कळते.

चीन-तैवान : आग आणि पाणी हे प्रकरण नीट समजायचे असेल तर चीन आणि तैवानमधील दशकानुदशकांचे वैर लक्षात




घ्यायला हवे. १९४९ साली माओ त्से तुंगच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट पक्षाने सत्ता काबीज केल्यानंतर च्यांग काई-शेकचे सरकार तैवान बेटावर आश्रयाला गेले. तेव्हापासून चीन तैवानला बंडखोर प्रांत मानतो आणि एक देश दोन व्यवस्था या तत्त्वाखाली तो पुन्हा मुख्य भूमीशी जोडण्याची भाषा करतो, गरज पडल्यास बळाने तैवान घेणारच हे चीनचे म्हणणे आहे. तैवान मात्र स्वतःला सार्वभौम लोकशाही राष्ट्र मानतो, त्याची स्वतःची राज्यघटना, निवडून आलेले सरकार आणि स्वतंत्र अर्थव्यवस्था आहे. गेल्या काही वर्षांत चीनने तैवानच्या हवाई हद्दीत सातत्याने लष्करी विमाने घुसवण्याचे प्रकार वाढवले आहेत. नॅन्सी पेलोसी तैवानला भेट देण्यासाठी गेल्या तेव्हा चीनने तैवानभोवती थेट लष्करी सराव केला होता. तैवानला जो कुणी स्वतंत्र देश म्हणून ओळख देईल त्याच्याशी चीनचे संबंध ताणले जातात हा इतिहास ताजा आहे.

भारत-चीन जखम अजून ताजी भारत आणि चीनमधील संबंध २०२० पासून कटू झाले आहेत. गलवान खोऱ्यात झालेल्या हिंसक चकमकीत भारताचे काही जवान शहीद झाले. अक्साई चीन आणि अरुणाचल प्रदेश सीमावाद अजूनही सुटलेला नाही. अनेक वर्षांच्या चर्चेनंतर काही ठिकाणी सैन्यमाघार झाली असली तरी विश्वासाची दरी अजून खोल आहे. अशा पार्श्वभूमीवर भारताच्या एखाद्या खासदाराने तैवानला अधिकृत भेट पाठवणे हे चीनला निव्वळ कूटनैतिक चूक वाटत नाही तर जाणीवपूर्वक डिवचणे वाटते. आंबा गोड, राजकारण आंबट हापूस आंबा दोन देशांमधील गोडवा वाढवेल या सद्हेतूने हा बेत आखला गेला होता. मात्र, कोकणच्या या रसाळ फळाने अनवधानाने मुत्सद्देगिरीच्या नावाखाली दारूगोळ्याचीच वात पेटवली. चीन तैवानविषयी किती संवेदनशील आहे हे यातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले. राजकारणात कधीकधी आंब्याचीही किंमत मोजावी लागते, आता ती किती आणि कशी मोजायला लागणार हे मात्र येणारा काळच ठरविणार आहे.

### भारत-तैवान संबंध

» अनौपचारिक पण घट्ट औपचारिक राजनैतिक संबंध नसले तरी भारत आणि तैवानमधील व्यावहारिक संबंध कमालीचे विस्तारत आहेत. द्विपक्षीय व्यापार १२ अब्ज डॉलरपेक्षा अधिक झाला आहे. सेमीकंडक्टर, इलेक्ट्रॉनिक्स आणि तंत्रज्ञान क्षेत्रात तैवान भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा भागीदार आहे. तैवानच्या धोरणात भारत केंद्रस्थानी आहे. भारतीय विद्यार्थी मोठ्या संख्येने तैवानमध्ये उच्च शिक्षणासाठी जात आहेत. नवी दिल्लीतील तैपेई इकॉनॉमिक अँड कल्चरल सेंटर आणि मुंबई व चेन्नईतील केंद्रे ही दूतावासाची सर्व कामे व्हिसासह अनौपचारिकपणे पार पाडतात.

# बायकोला शब्द दिला, पण पाळू शकला नाही!

## भारतीय तरुणाचा न्यूझीलंडमध्ये करुण अंत, कुटुंब धक्क्यात

**वेलिंग्टन : दि. २७ वृत्तसंस्था**

संध्याकाळी उशिरा उबरसाठी शिफ्टमध्ये काम करत असताना दोन गाड्यांच्या धडकेत भारतीय तरुणाचा मृत्यू झाला. त्याच्या पश्चात पत्नी आणि एक वर्षांची मुलगी असा परिवार आहे. न्यूझीलंडमधील पपामोआमध्ये झालेल्या अपघातात भारतीय तरुणाचा दुर्दैवी शेवट झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ३६ वर्षीय रमणदीप ढिल्लॉ याचा अपघातात जागीच अंत झाला. हा अपघात बे रोड आणि पॉप्लर लेन यांच्या दरम्यान झाला. दुसऱ्या वाहनातील दोन जण या अपघातात जखमी झाले.

मूळचा पंजाबचा रहिवासी असलेला रमणदीप २०१५ मध्ये स्टुडंट व्हिसावर न्यूझीलंडला गेला होता. २०२४ मध्ये त्याचा विवाह वीरपाल कौर सोबत झाला. लग्नासाठी तो काही दिवस भारतात आला. यानंतर तो वीरपाल सोबत न्यूझीलंडला परतला. दोघे पापामोआमध्ये वास्तव्यास होते. दोघेही किवी फळाच्या बागेत काम करायचे.

लेक कुदरतच्या जन्मानंतर ढिल्लॉनं तिच्या देखभालीसाठी उबर चालवण्यास सुरुवात केली. ज्या रस्त्यावर रमणदीपचा अपघाती मृत्यू झाला, त्या रस्त्यावरुन त्यानं याआधी अनेकदा प्रवास केला होता. बुधवारी संध्याकाळी सव्वा सातच्या सुमारास रमणदीपचा अपघात झाला.

रमणदीपचा बुधवारचा दिवस १८ महिन्यांच्या कुदरत सोबत सुरू झाला. कुदरत सोबत वेळ घालवल्यावर रमणदीप तो संध्याकाळी कामावर जाण्यास निघाला. रात्री जेवायला येतो. सोबत जेवू, असं सांगून रमणदीपनं घरातून निघताना कौरला सांगितलं. ठरलेल्या वेळेत रमणदीप न परतल्यानं कौरला काळजी वाटू लागली. रमणदीप कॉल्सही उचलत नव्हता. त्यामुळे चिंतेत भर पडली. त्याच रात्री पोलीस रमणदीप यांच्या घरी पोहोचले. पतीचा अपघातात मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांनी दिली. पतीच्या मृत्यूबद्दल कळताच मी सुन्न झाले. आता माझंही आयुष्य संपलं असा विचार मनात आला.

# अहमदाबाद विमान अपघाताच्या वर्षपूर्तीआधी सरकारचा महत्त्वाचा निर्णय

**गांधीनगर : दि. २७ वृत्तसंस्था**

## मृतांच्या कुटुंबांचा तीव्र विरोध



गुजरातच्या अहमदाबादमध्ये गेल्या वर्षीच्या जून महिन्यात एअर इंडियाचं विमान कोसळलं. या अपघातात २४१ जणांचा मृत्यू झाला. लंडनला निघालेलं विमान उड्डाण केल्यानंतर अवघ्या मिनिटभरानंतर कोसळलं. या अपघाताला लवकरच वर्ष पूर्ण होईल. त्या पार्श्वभूमीवर गुजरात सरकारनं महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. पण या निर्णयाला अपघातात मृत पावलेल्या प्रवाशांच्या कुटुंबियांनी आणि नातेवाईकांनी जोरदार विरोध केला आहे.

१२ जून २०२५ रोजी एअर इंडियाच्या विमानानं अहमदाबादमधून उड्डाण केलं. अवघ्या मिनिटभरानंतर बोईंग ७८७-८ ड्रीमलायनर विमान एका वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतिगृहावर कोसळलं. या अपघातात वसतिगृहाचं मोठं नुकसान झालं. वसतिगृहातील काही विद्यार्थी दुपारी जेवत असताना विमान कोसळलं. या अपघातात काही विद्यार्थ्यांचा मृत्यूदेखील झाला. दुपारी १ वाजून ३८ मिनिटांनी अहमदाबादच्या मेघानीनगर परिसरातील अतुल्यम वसतिगृहाच्या इमारतीवर एअर इंडियाचं विमान कोसळलं होतं. जिथे विमान कोसळलं, तिथे विद्यार्थ्यांची मेस होती. याच ठिकाणी ८+८ मजल्यांची अत्याधुनिक इमारत उभारण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. यामध्ये २३६ डॉक्टरांची राहण्याची व्यवस्था असेल. यासाठी टाटा एअरलाईन्सनं ५३ कोटी रुपयांची मदत देणार आहे.

राज्य सरकारच्या घोषणेला पीडितांच्या कुटुंबियांनी विरोध केला आहे. अपघातस्थळी नवीन बांधकाम करण्याऐवजी तिथे एक स्मारकस्थळ उभारण्यात यावं आणि ती जागा सन्मानपूर्वक जपली जावी, अशी मागणी मृतांच्या कुटुंबियांनी, नातेवाईकांनी सरकारकडे ई-मेलसच्या माध्यमातून केली आहे.

असारवाच्या जिल्हा रुग्णालयाजवळ नव्या मेंटल कॅम्पसमध्ये आता १०५ कोटी रुपये खर्चून एक अत्याधुनिक सुपर स्पेशॅलिटी वसतिगृह आणि कँटिन ब्लॉकची उभारणी केली जाईल. याबद्दलची माहिती आरोग्य राज्यमंत्री प्रफुल पानसेरिया यांनी दिली.

# लग्नानंतर अवघ्या सहा महिन्यात श्वेताने आयुष्य संपवले

**लखनौ: दि. २७ वृत्तसंस्था**

## पती शुभमवर माहेरच्या मंडळींचे गंभीर आरोप



लखनौमध्ये सोमवारी एका २६ वर्षीय महिलेने आयुष्याची अखेर केली. लग्नाला अवघे सहा महिनेच उलटले असतानाच तिने जीव देण्याचा निर्णय घेतला. हुंड्यासाठी पती आणि सासरच्या मंडळींकडून सतत होणाऱ्या छळाला कंटाळूनच तिने हे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप तिच्या कुटुंबीयांनी केला आहे. भोपाळ येथील त्विशा शर्मा या विवाहितेच्या मृत्यूचे प्रकरण चर्चेतच असतानाच आणखी एका महिलेने जीव दिल्याने देश हादरला आहे.

उत्तर प्रदेशातील लखनौ येथील ठाकूरगंज भागात असलेल्या सासरच्या घरी श्वेता सिंग गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आली. श्वेताकडे वारंवार हुंड्याची मागणी केली जात होती. चारचाकी वाहन आणण्यासाठी तिच्यावर दबाव आणला जात होता, असा आरोप तिच्या कुटुंबीयांनी केला आहे. तिच्या सासरच्या मंडळींनी तिची हत्या करुन, त्यानंतर तिने जीव दिल्यासारखे वाटावे यासाठी बनाव रचल्याचा दावाही माहेरच्या मंडळींनी केला.

श्वेताने २२ नोव्हेंबर २०२५ रोजी भूपेंद्र उर्फ शुभम सिंग याच्याशी विवाह केला होता. तिचे वडील उमेश कुमार सिंग यांच्या म्हणण्यानुसार, लग्नानंतर लगेचच तिचा छळ सुरू झाला. पती तिला दररोज मानसिक त्रास देत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. श्वेताला टोमणे मारण्यात तिच्या सासूने आपल्या स्वतःच्या नातेवाईकांनाही सामील करून घेतल्याचे सांगितले जाते; ज्यामुळे ती अत्यंत व्यथित झाली होती. उमेश कुमार सिंग यांनी दाखल केलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी मंगळवारी गुन्हा नोंदवून घेतला. आरोपींमध्ये भूपेंद्र सिंग, त्याची आई, वडील, भाऊ, वहिनी आणि बहीण यांचा समावेश आहे. त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ८० (हुंडाबळी) आणि कलम ८५ (क्रूरता) अन्वये, तसेच हुंडा प्रतिबंधक कायद्यातील तरतुदींनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ठाकुरगंज पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी ओमवीर सिंग चौहान यांनी सांगितले की, श्वेता गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळल्यानंतर तिच्या सासरच्या मंडळींनी तिला रुग्णालयात नेले; तिथे डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

आरोपी सध्या फरार असून, त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी धाडी टाकण्यास सुरुवात केली आहे. पुढील कारवाई ही शवविच्छेदन अहवालावर अवलंबून असेल, असे एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने स्पष्ट केले आहे. श्वेताची बॉडी शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आली आहे. श्वेताच्या आई-वडिलांनी तिच्या पतीच्या संपूर्ण कुटुंबावर हत्या आणि हुंड्यासाठी छळ केल्याचा आरोप केला आहे.

# आधी भरपूर सोने खरेदी केले, आता धडाधड विकतोय रशिया

**नवीदिल्ली : दि. २७ वृत्तसंस्था**



२०२२ मध्ये युक्रेनवर हल्लाबोल केलेल्या रशियाला गेल्या काही महिन्यांपासून आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. रशिया केवळ जगातील सार्वाधिक तेल आणि गॅस साठ्यांसाठीच नव्हे, तर प्रचंड सोन्याच्या साठ्यांसाठीही जगात ओळखला जातो. रशियाकडे ३३७.५ अब्ज मूल्याचे अंदाजे २,३०४.७५ टनांचा सोन्याचा साठा असून गेल्या २० वर्षांपेक्षा जास्त काळ सोनं खरेदी करणारा रशियाने गेल्या काही वर्षांपासून विक्रीचा सपाटा लावला आहे.

रशियाच्या मध्यवर्ती बँकेने मे २०२६ मध्ये अंदाजे ७३.९ दशलक्ष औंस सोनं विकलं आहे तर, याआधी जानेवारी ते एप्रिल या काळात रशियाने आपल्या तिजोरीतून ९००,००० औंस म्हणजे २८ टन सोन्याची विक्री केली ज्याचा थेट जागतिक सोन्याच्या बाजारावर परिणाम झाल्याचं पाहायला मिळालं असून २०२६ मध्ये रशियाच्या सुवर्णसाठ्यात गेल्या २४ वर्षांतील सर्वाधिक घट नोंदवली गेली आहे.

त्याचवेळी, आश्चर्यजनक बाब म्हणजे की रशियाने २००२ पासून इतक्या मोठ्या प्रमाणात कधीच सोने विक्रीचा सपाटा लावला नव्हता. अशाप्रकारे रशियाच्या सुवर्णसाठ्यातील गेल्या २४ वर्षांतील ही घट सर्वात मोठी आहे. बर्लिनमधील या वृत्तसंस्थेच्या अहवालानुसार, गेल्या काही वर्षांपासून रशिया मोठ्या प्रमाणात सोनं विकत आहे. २०२२ ते २०२५ या काळात रशियन सेंट्रल बँकेने अंदाजे १५० अब्ज किंमतीचे सोनं बाजारात विकले तर,२०२६ च्या पहिल्या दोन महिन्यांत ३५ अब्ज डॉलर्स किमतीच्या सोन्याची विक्री केली गेली असून एप्रिलपर्यंत २१.८ टनांपर्यंत सोन्याची विक्री केलेली.

२००२ ते २०२५ या काळात रशियाने जगात सर्वाधिक १९०० टन सोन्याची खरेदी केलेली. या दरम्यान साल २००८ ते २०१२ या काळात ५०० टन, तर २०१४ ते २०१९ मध्ये १२०० टन सोनं खरेदी केलं पण, २०२६ मध्ये रशियाने आपला 'गोल्ड गेम' पूर्णपणे बदलला आणि विक्रीचा सपाटा लावला.

## अडचर

### पार्थिव परत न आणण्याचा कुटुंबाचा मोठा निर्णय

# गिर्यारोहकाने शिखराजवळ सोडले प्राण

**हैदराबाद : दि. २७ वृत्तसंस्था**



गेल्या आठवड्यात माऊंट एव्हरेस्टवरुन खाली उतरत असताना हैदराबादस्थित ५३ वर्षीय अरुण कुमार तिवारी हिलरी स्टेपजवळ मृत्यू पावले. त्यांच्या कुटुंबीयांनी तिवारींचे पार्थिव पर्वतावरच सोडून देण्याचा निर्णय घेतला आहे. श्रद्धा, हिमालयाप्रती वडिलांचे प्रेम आणि डेथ झोनमधून बॉडी परत आणणे जवळपास अशक्य असल्याने त्यांनी जड अंतःकरणाने हा निर्णय घेतला. याशिवाय बॉडी परत आणण्यास लागणारा ९० लाखांचा खर्च हेही एक कारण ठरले.

**जवळपास ९० लाखांचा खर्च**

भारतीय मोहिमेच्या संघाचे व्यवस्थापन करणाऱ्या पायोनियर ॲडव्हेंचर या संस्थेने, ८,००० मीटरपेक्षा अधिक उंचीवरुन बॉडी हाताने खाली आणण्यासाठी सुरुवातीला १,१४,००० डॉलर्स (१.१ कोटी रुपये) इतका खर्च सांगितला होता; मात्र, नंतर सन्मान राखत त्यांनी ही रक्कम कमी करुन ९४,००० डॉलर्स (८९.७ लाख रुपये) इतकी केली.

पायोनियर ॲडव्हेंचरचे मालक निवेश कार्की यांनी टाइम्स ऑफ इंडियालाला सांगितलं की, त्यांची कंपनी काठमांडू-एव्हरेस्ट-काठमांडू या ५५ दिवसांच्या गिर्यारोहण मोहिमेसाठी ४५,००० डॉलर्स (४२.९ लाख रुपये) इतके शुल्क आकारते; परंतु डेथ झोनमधून (अत्यंत धोकादायक उंचीवरुन) शव खाली आणणे ही एक पूर्णपणे वेगळी आणि त्याहूनही कितीतरी अधिक धोकादायक मोहीम असते. शिखरावर यशस्वी चढाई करण्यासाठी येणाऱ्या खर्चाच्या ही रक्कम दुप्पट आहे.

**अरुण तिवारींची जिद्द :** निवेश यांनी सांगितले की, कॅम्प ४ वरुन अंतिम चढाई सुरु केल्यानंतर लगेचच अरुण तिवारी यांना प्रचंड थकवा जाणवू लागला होता; त्यांच्या वैयक्तिक शेर्पा मार्गदर्शकाने वारंवार खाली परतण्याचा सल्ला देऊनही, त्यांनी आपली चढाई सुरुच ठेवली. कार्की म्हणाले, ''तिवारी यांनी म्हटलं की, जेव्हा शिखराचं टोक इतकं स्पष्टपणे दिसत आहे आणि ते अगदी आवाक्यात आलं आहे, तेव्हा आपलं हे स्वप्न अर्धवट सोडून देणं त्यांना कोणत्याही परिस्थितीत मान्य नाही.''

तिवारी शिखरावर पोहोचले, परंतु खाली उतरताना हिलरी स्टेपजवळ एव्हरेस्टच्या ८,००० मीटरहून अधिक उंचीवरील आणि अत्यंत विरळ हवेमुळे मानवी प्रकृतीची झपाट्याने अवनती होणाऱ्या मृत्यूप्रवण क्षेत्रात त्यांना रक्ताच्या उलट्या होऊ लागल्या. शेर्पांनी त्यांना ऑक्सिजन देऊन पुन्हा शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांचा जागीच मृत्यू झाला.

हिलरी स्टेप हे ठिकाण सुमारे ८,७९० मीटर उंचीवर असून ८,८४८.८६ मीटर उंचीवरील शिखरापासून ते अवघ्या ६० मीटर खाली आहे. हेलिकॉप्टरद्वारे शव खाली आणणे केवळ कॅम्प पासूनच जे सुमारे ६,४०० मीटर उंचीवर आहे शक्य होते. शिखराची कडा आणि पर्वताच्या अत्यंत उघड्या व असुरक्षित भागांतून बॉडी सुमारे २,४०० मीटर खाली आणण्याची जबाबदारी शेर्पांवर येऊन पडते.

''ही दुर्घटना घडून पाच दिवस उलटले असल्याने, आता बॉडी परत मिळवणे जवळपास अशक्य आहे; कारण तो संपूर्ण परिसर दाट बर्फाने झाकलेला आहे. तिथे शेर्पांना पाठवणे म्हणजे आणखी काही जीव धोक्यात घालण्यासारखे ठरेल'' असे कार्की म्हणाले.

कार्की म्हणाले की, डेथ झोनमधून बॉडी बाहेर काढण्याच्या मोहिमेसाठी ८-१० शेर्पांना अनेक दिवस लागतात. या कामात त्यांना गोठलेले शव बर्फातून बाहेर काढावे लागतात, त्यांना दोऱ्यांनी सुरक्षित करावे लागते आणि उघड्या-हिमस्खलनाचा धोका असलेल्या प्रदेशातून खाली कॅम्प २ पर्यंत उतरवावे लागते. या मोहिमेत मोठ्या प्रमाणात बाटलीबंद ऑक्सिजनचा वापर होतो आणि बचावकर्त्यांना हिमदंश, वादळे, थकवा आणि जीवघेण्या अपघातांचा धोका असतो. ''विम्यामध्ये हेलिकॉप्टरद्वारे बॉडी बाहेर काढण्याचा खर्च समाविष्ट असतो, हाताने बाहेर काढण्याचा नाही,'' असे ते म्हणाले.

# देशात भीषण उष्णतेचा हाहाकार!

**नवी दिल्ली: दि. २७ वृत्तसंस्था**

देशाच्या अनेक भागांत वाढते तापमान आणि कडाक्याच्या उन्हामुळे लोकांचे जनजीवन अत्यंत कठीण झाले आहे. ''आकाशातून जणू काही अग्नीचा वर्षाव होत आहे,'' अशा या परिस्थितीत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना एक अत्यंत मनापासून आणि महत्त्वपूर्ण आवाहन केले आहे. या ऋतूत लोकांनी सावध, दक्ष आणि एकमेकांबद्दल संवेदनशील राहावे, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले आहे. नागरिकांनी आपल्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, अशी आग्रहाची विनंती पंतप्रधानांनी केली आहे. प्रत्येकाने आपल्या शरीरातील पाण्याचे प्रमाण (हायड्रेशन) पुरेसे राखले पाहिजे; घराबाहेर पडताना सोबत पाण्याची बाटली अवश्य बाळगली पाहिजे आणि दुपारच्या कडाक्याच्या उन्हात विनाकारण बाहेर जाणे पूर्णपणे टाळले पाहिजे, यावर त्यांनी भर दिला.

पंतप्रधान मोदी यांनी नागरिकांना दैनंदिन जीवनशैलीत काही महत्त्वाचे बदल करण्याचा सल्ला दिला आहे:

पाण्याची बाटली सोबत ठेवा: घरातून बाहेर पडताना पाण्याचे प्रमाण शरीरात कमी होऊ नये म्हणून प्रत्येकाने सोबत पाण्याची बाटली नक्की ठेवावी.

दुपारचे ऊन टाळा: दुपारच्या कडक आणि तीव्र उन्हामध्ये नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडणे पूर्णपणे टाळावे. ज्येष्ठ नागरिकांची काळजी: या ऋतूत घरातील वृद्ध व्यक्तींना उन्हाचा त्रास जास्त होऊ शकतो. त्यामुळे आपले आई-वडील, आजी-आजोबा आणि इतर प्रियजनांची सातत्याने विचारपूस करा. त्यांना भरपूर पाणी पिण्याचा आणि जास्तीत जास्त विश्रांती घेण्याचा सल्ला द्या. समाजातील परस्पर मदतीच्या महत्त्वावर भर देताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, जेव्हा जेव्हा शक्य असेल, तेव्हा एखाद्या तहानलेल्या व्यक्तीला एक ग्लास पाणी देण्याची सवय प्रत्येकाने लावून घेतली पाहिजे. शिवाय, या कडाक्याच्या उन्हात वाटसरूंना दिलासा देण्यासाठी, जे लोक आपल्या घराबाहेर किंवा दुकानांबाहेर माठातील थंड पाणी ठेवतात.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी डी. बी. कार्पोरेशन लिमिटेड, दिव्य मराठी, एन.एच.६, बनारसी धाब्याजवळ, बोरगाव मंजू, अकोला - ४४४००१ येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन, बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला- ४४४००१ येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले साहित्य या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## वृक्ष लागवड, वन क्षेत्रवाढ, निसर्ग संवर्धनाला द्या प्राधान्य!

भारतामध्ये गेल्या काही वर्षांत नोंदवले गेलेले तापमान हे आजवरच्या इतिहासातील सर्वाधिक राहिले आहे. सध्याचा उन्हाळा हा उपखंडातील आधुनिक नोंदींमधील सर्वात तीव्र आणि प्रदीर्घ उष्णतेच्या कालखंडांपैकी एक ठरणार आहे. मान्सून सुरू होण्यापूर्वीच्या काळात तापमान वाढणे सामान्य असले, तरी यंदा भूप्रदेशावर स्थिर राहिलेल्या 'अँटिसायक्लोन'मुळे निर्माण झालेल्या हवेच्या उच्च दाबामुळे उष्ण हवा एकाच ठिकाणी साचून राहिली. हवेची हालचाल मंदावल्याने जमीन अधिक प्रमाणात तापत चालली आहे. याशिवाय मान्सूनपूर्व पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहिल्याने जमिनीतील ओलावा संपला असून कोरडे वातावरण उष्णता अधिक वाढवण्यास कारणीभूत ठरत आहे. मानवी सहनशीलतेच्या मर्यादांची कसोटी लावणारा असा उन्हाळा गेल्या ५०-६० वर्षांमध्ये अनुभवास आलेला नाही. नवतपा म्हणजेच उन्हाळ्यातील सर्वाधिक नऊ उष्ण दिवस असतात. २५ मेपासून सुरू झालेला नवतपा २ जूनपर्यंत सुरू राहणार आहे. या काळात सूर्य पृथ्वीच्या अगदी जवळ असतो. त्यामुळे तीव्र सूर्यप्रकाश आणि उष्ण वाऱ्यांनी टोक गाठलेले असते. उत्तर व पश्चिम भारतात या कालावधीत कमाल तापमानाचा पारा ४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचू शकतो. यंदाच्या वर्षी अल निनो सक्रिय झाल्यामुळे २०२६ आणि २०२७ ही वर्षे आजवरची सर्वात उष्ण वर्षे ठरण्याचा अंदाज असून, यातील कोणतेही एक वर्ष सर्वोच्च तापमानाचा विक्रम मोडण्याची शक्यता आहे. हवामान बदलामुळे उष्णतेच्या लाटेची तीव्रता सुमारे २ अंश सेल्सिअसने अधिक वाढली. जगातील सर्वाधिक उष्ण ५० शहरांच्या यादीमध्ये सर्व शहरे भारतातील होती. २५ मे रोजी महाराष्ट्रातील ब्रह्मपुरीमधील तापमान ४७.६ अंशांवर पोहोचले. विदर्भातील प्रमुख जिल्ह्यांमध्ये याच समकक्ष तापमान आहे. राजस्थान, दिल्ली, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, ओडिशा, तेलंगणा आणि महाराष्ट्राचा समावेश असलेल्या भारताच्या मुख्य उष्णता क्षेत्रामध्ये (कोअर हीटवेव्ह झोन) उष्णतेच्या लाटांचे प्रमाण आणि कालावधी वाढला आहे. काही विशिष्ट क्षेत्रांत हे तापमान सरासरीपेक्षा तब्बल ८ अंशांनी जास्त आहे. राजस्थान आणि पाकिस्तानच्या वाळवंटी भागातून येणाऱ्या उष्ण वाऱ्यामुळे ही स्थिती निर्माण झाल्याचे सांगण्यात येत आहे. यवतमाळ जिल्ह्यात ४८ तासांत आठ जणांचा आकस्मिक मृत्यू झाला. हे सर्व उष्माघाताचे बळी असल्याचा अंदाज आहे. पशुपक्ष्यांना, गुराढोरांनाही उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागत आहे. छत्तीसगडमधील कोरबा जिल्ह्यात भीषण उष्णतेमुळे ६०० वटवाघळांचा मृत्यू झाला. तीव्र उष्णतेमुळे आणि पाण्याअभावामुळे पक्षी हवेतून थेट खाली कोसळत आहेत. अनेक गरूड आणि कबुतरे बेशुद्ध अवस्थेत रस्त्यांवर आढळत असून भटक्या प्राण्यांमध्ये पोटाचे विकार आणि संसर्ग वाढले आहेत. महाराष्ट्रातील शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्था उष्णतेमुळे कोलमडली आहे. आंबे अकाली गळणे आणि उन्हामुळे डाग पडणे यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. टोमॅटो, मिरची, वांगी आणि कोबी या पिकांची फुले गळत असून, त्यांची गुणवत्ता खालावली आहे. उष्णतेमुळे गायी आणि म्हशींचा चारा खाण्याचा वेग मंदावल्याने दूध उत्पादनात घट झाली आहे. कुक्कुटपालन व्यवसायात कोंबड्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. ओडिशा आणि तेलंगणामध्ये उष्माघातामुळे ३२ हून अधिक मृत्यू झाले. 'द लॅन्सेट' आणि इतर नामांकित वैद्यकीय नियतकालिकांमधील संशोधनानुसार, भारतात केवळ थेट उष्माघाताने मरणारे लोक कमी असतात; परंतु उष्णतेच्या लाटेमुळे हृदयरोग, मधुमेह, मूत्रपिंडाचे आजार यांसारखे जुने आजार बळावून दगावणाऱ्यांची संख्या प्रचंड मोठी आहे. संयुक्त राष्ट्राच्या विविध पर्यावरण अहवालांनुसार, जागतिक स्तरावर हवामान बदलामुळे सर्वात जास्त मृत्यू घडवून आणणाऱ्या नैसर्गिक आपत्तींमध्ये 'अतिउष्णता' अग्रस्थानी आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, २००० ते २०१९ या दोन दशकांत जगात दरवर्षी सरासरी ४,८९,००० लोकांचा मृत्यू उष्णतेशी संबंधित कारणांमुळे झाला. यापैकी ४५ टक्के मृत्यू एकट्या आशिया खंडात झाले. गेल्या एका दशकात भारतातील उष्ण आणि दमट दिवसांची संख्या १४,०८६ वरून १६,९७० इतकी वाढली आहे. भारतातील सरासरी आर्द्रतेचे प्रमाण २०१५-२०१९ या काळातील ६७.१ टक्क्यांवरून वाढून ७१.२ टक्के झाले आहे. रात्रीच्या सरासरी तापमानात प्रतिदशक सुमारे ०.२१ अंश सेल्सिअसने वाढ झाली आहे. यंदाच्या वर्षीही अनेक शहरांमध्ये रात्रीचे तापमान ३० अंश सेल्सिअसच्या आसपास आहे. यामुळे दिवसाच्या उष्णतेतून सावरण्यासाठी आवश्यक असणारा थंड वेळ मिळेनासा झाला आहे. शहरांमध्ये काँक्रीट रात्रभर उष्णता सोडते. यामुळे रात्रीचे तापमान सामान्यपेक्षा ५-७ अंश जास्त राहते. ग्रामीण भागातील माती आणि झाडे उष्णता परावर्तित करतात किंवा बाष्पीभवनाद्वारे वातावरण थंड ठेवतात. याउलट शहरांमधील बांधकामे ही उष्णता रात्री वातावरणात सोडू लागतात. शहरांमध्ये वाहनांची प्रचंड संख्या, कारखान्यांमधून निघणारा धूर आणि कोट्यवधी घरांमध्ये रात्रंदिवस चालणारे एसी तापमानवाढीत लक्षणीय भर घालत आहेत. शास्त्रज्ञांच्या मते, पूर्वीच्या दशकांच्या तुलनेत सध्या पृथ्वी सुमारे २ अंश सेल्सिअसनी अधिक तापली आहे. या तीव्र उष्णतेचा फटका देशातील सुमारे ४ कोटी ४० लाख लोकांना बसला असून, यामुळे सुमारे ३४१ अब्ज डॉलर्सच्या आर्थिक व्यवहारांवर विपरीत परिणाम झाला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, घरातील तापमान २४ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त असू नये. कारण, त्यामुळे हृदय व रक्तवाहिन्यांवर ताण येतो आणि झोपेत अडथळा निर्माण होतो. त्यामुळे हा काळ आरोग्याच्या दृष्टीनेही काळजीचा आहे. या शतकाच्या शेवटापर्यंत भारतात उन्हाळ्यातील उष्णतेच्या लाटांच्या तीव्रतेत आणि वारंवारतेमध्ये ३०० ते ४०० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची भीती आहे. म्हणजेच आज आपण ज्या सुख-सुविधांनी समृद्ध असलेल्या जीवनशैलीला यशाचे शिखर मानत आहोत, तेच वास्तव उद्याच्या पिढ्यांसाठी बिकट स्थिती निर्माण करणारे ठरणार आहे. अद्यापही वेळ गेलेली नाही. विकासामागे धावताना वृक्ष लागवड, वन क्षेत्रवाढ, निसर्ग संवर्धनाला गतिमानता आणि प्राधान्य दिल्यास उंबरठ्यावर असलेला हाहाकार टाळता येईल.

### ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

जीवन म्हणजे ! संकटी बुरुज !
हरेका खरुज ! जीवनाला !!

संकटी वादळे ! समस्यांचा पूर !
भयाचे आसुर ! बा आणती !!

संकट करती ! संघर्षा प्रवृत्त !
संकटा निवृत्त ! करण्यासी !!

गा अशात त्रासु ! आणि खचू नये !
आत्मजान नये ! हरवूया !!

संकट म्हणजे ! समस्यांचा डोह !
मधमाशी मोह ! चावतोया !!

निर्भीड जयाचा ! आत्मस्तम्भ आहे !
समस्यांचे आहे ! पलायन !!

# वेग आवरा.... जीवन सावरा

विचारायण



साधना काळबांडे
मो. 9767993827

आजचे जीवन हे धकाधकीचे जीवन आहे. आजचा जीवन जगण्याचा वेग हा खूप आहे. सर्वात पुढे जाण्याची चढाओढ ही प्रत्येकाला आहे. परंतु ही चळवळ करताना आपण विसरून जातो की कुठेतरी जीवनातही स्वल्पविराम, पूर्णविराम यांचा उपयोग करणे गरजेचे आहे. कारण आजच्या धावपळीच्या युगामध्ये जीवन जगताना वेगळा आवरणे तितकेच महत्त्वाचे आहे कारण दिवसेंदिवस वाढणारे अपघात हे फार दुर्दैवी आहे.काही अपघात हे अनपेक्षित पणे होत असले तर काही अपघात ही मानवी चूक असते.रस्त्यावर चालताना काही अपघात होऊन जीवाचा थरकाप उडतो. कारण या अपघातामध्ये कुटुंबाच्या कुटुंब उध्वस्त झालेले असतात.हेपाहून असे वाटते की आपल्या वेगाला आवर घालणे गरजेचे आहे. आज रस्त्यावर प्रत्येक दिवशी शेकडो अपघात होताना दिसून येतात. आणि या अपघातामध्ये मरणाऱ्यांची संख्या सुद्धा जास्त असते कधी कधी अपघात हा मानवी चुकीमुळे होतो. तेव्हा त्याला अति वेग हेच कारण दिसून येते. परंतु कधीकधी आपण हे विसरून जातो की आपल्या हातून घडलेली चूक ही कितीतरी कुटुंबे उध्वस्त करत असतात. अपघाताचा विचार करताना असे दिसून येते की देवदर्शन करून येताना सहलीला जाताना हे जास्तीत जास्त अपघात घडून येतात. आपण ज्या आनंदासाठी जिथे जात असतो तो आनंद या अपघातामुळे फिरवून घेतला जातो.अपघात केवळ रस्त्यावरच होतात असे नाही नद्या, समुद्र,डोंगर, पर्वत यावरही अपघात होताना दिसून येतात. कधी कधी तर असे दिसून येते की जिथे लिहिलेले असते की इथे धोका आहे तिथे काही लोक जाणून बुजून आपले मरण ओढून घेताना दिसून येतात. इशारा दिलेला असतानाही आपला जीव धोक्यात घालतात आज आपल्या भारतामध्ये अनेक प्रकारचे अपघात होताना आपण पाहतो वेगवान चालवली जाणारी वाहने ही आपल्याबरोबर इतरांचाही जीव धोक्यात घालत असतात. तेव्हा या वेगाला आवरणे गरजेचे असते. कारण कधी कधी रस्त्यावर मौजमजेसाठी या वेगाच्या शर्यती लावताना वाहने दिसून येतात आणि या शर्यतीच्या नादी लागून स्वतःचा जीव गमावून बसतात. केवळ स्वतःचा जीव गमावत नाही तर आपल्याबरोबर इतरांचाही जीव ते घेतात.तेव्हा या वेगाला आवर ने गरजेचे आहे कारण एकदा गे लेला जीव एकदा उध्वस्त झालेले कुटुंब परत त्याची घडी घालता येत नाही.तर ती विस्कटलेली राहते. आजची तरुण पिढी ही वेगाची दिवाणी दिसून येते.काही वाहने स्टंट बाजी करून रस्त्यावर चालवताना आपण पाहतो तेव्हा आपला



जीव या अपघातात गमावून बसतात आणि इतरांचाही घेताना दिसून येतात. परंतु विचार करण्यासाठी गोष्ट आहे की केवळ एकच जीव जात नसून त्या जीवाच्या मागे असलेले कुटुंब ही या अपघातामुळे उध्वस्त होते. म्हणून असे मौज मजा करताना तरुणांनी मात्र एवढे लक्षात घेणे गरजेचे आहे की आपल्या घरी कोणीतरी आपली वाट पाहत आहे.

आपण गेल्यानंतर आपल्या आई,वडील, भाऊ बहीण यांचे काय होणार? हे विचारही तरुणांच्या मनाला शिवने गरजेचे आहे. तेव्हा दैनंदिन जीवनामध्ये अपघात टाळायचे असतील तर वेगाला नियंत्रणात असणे गरजेचे आहे. ही आजच्या काळाची गरज आहे कारण रस्त्यावर असणारी वाहनांची गर्दी ही दिवसेंदिवस वाटतच वाढत जात आहे. कारण आज प्रत्येकाजवळ वाहने आहे परंतु ती चालवताना वेग मात्र नियंत्रणात ठेवणे गरजेचे आहे कारण एकदा मिळालेले जीवन हे पुन्हा मिळेल असे नाही. जेव्हा आपण रस्त्यावर चालतो तेव्हा आज काल आपल्या जीवनाचे शाश्वती उरलेली नाही की आपण घरी परत येणार आहोत की नाही.

तेव्हा या वेगाचा विचार केला असता प्रत्येकाने अपघात टाळणे गरजेचे आहे म्हणून वेगाला आवरा आणि जीवनाला असे म्हणावेसे वाटते. आजच्या या आधुनिक काळामध्ये बेभान आणि बेधडकपणे जगण्याची जणू स्पर्धाच लागलेली आहे परंतु वेगवान जगण्याच्या स्पर्धेमध्ये आपण भाग घ्यायचा की नाही हे प्रत्येकावर अवलंबून असते.आज आई-वडिलांची ही जबाबदारी आहे की आपल्या मुलांना वाहने देताना त्याचे वय लक्षात घेणे गरजेचे आहे आजकाल रस्त्यावर लहान लहान मुलेही वाहन चालवताना दिसून येतात आणि अपघात घडतात. तेव्हा आपल्या जीवाला मुकलेली ही मुले कायमचे दुःख देऊन जातात. तेव्हा प्रत्येक आई-वडिलांनी आपल्या मुलांना वाहने देताना विचार करण्याची गरज आहे. लहान लहान मुलांचे वाहन चालवताना आई-वडीलच कौतुक करताना दिसून येतात. जर शिकलेली लोक असे वागतात तेव्हा अशा लोकांना काय म्हणावे? तेव्हा आजकाल वाढणाऱ्या अपघातामुळे रस्त्यावर असुरक्षित जीवन आहे तेव्हा हे जीवन सुरक्षित करायचे असेल तर वेगाला आवर आवर गरजेचे आहे. म्हणजे आपल्याबरोबर इतरांचेही जीवन आपण सुरक्षित करू शकतो हा विचार करण्याची गरज आहे.उपाय करणेही आपल्या हाती असते. वेग आवरून वाहन चालवणे, हेल्मेट चा वापर करणे, मदयपान न करता वाहन चालवणे, मोबाईल चा वापर टाळणे हे उपाय करणे आपल्याच हाती आहेत. मग ते उपाय प्रत्येकाने करून आपले जीवन सुरक्षित करावे.

# 'शिवाजी कोण होता?': एक चिकित्सक आकलन

चर्चा



प्रा.मनोज संजय भगत
कानडी, मो. ७३५०१६०२०५

गोविंद पानसरे यांचे शिवाजी कोण होता? हे पुस्तक जितके आशयामुळे चर्चेत आले, तितकेच त्याच्या शीर्षकामुळेही वादाच्या केंद्रस्थानी राहिले. ''शिवाजी कोण होता?'' हा प्रश्नार्थक शीर्षकच अनेकांना धक्कादायक वाटला. कारण लोकमानसात छत्रपती शिवाजी महाराज हे श्रद्धा, अस्मिता आणि अभिमानाचे प्रतीक आहेत; अशा व्यक्तिमत्त्वाबद्दल ''कोण होता?'' असा प्रश्न विचारणे काहींना अवमानासारखे वाटले. परंतु हाच या शीर्षकाचा वैचारिक गाभा आहे. या शीर्षकाभोवती निर्माण झालेला वाद प्रत्यक्षात पुस्तकाच्या आशयाइतकाच महत्त्वाचा आहे. शीर्षकातून लेखक शिवाजींच्या इतिहासाभोवती उभ्या राहिलेल्या मिथकांना प्रश्न विचारतात. हा प्रश्न अवमानाचा नसून पुनर्विचाराचा आहे. 'शिवाजी फक्त एका धर्माचे प्रतीक होते का?', 'ते फक्त युद्धनायक होते का?', 'की रयतेचे राजा, लोककल्याणकारी शासक आणि सामाजिक न्यायाचे प्रवर्तक होते?' या सर्व प्रश्नांची दारे शीर्षक उघडते. याच ठिकाणी पुस्तकाची चिकित्सकता दिसते. शीर्षकानेच वाचकाला अस्वस्थ केले, विचार करायला भाग पाडले, आणि इतिहासाकडे प्रश्न विचारण्याची वृत्ती निर्माण केली. त्यामुळे शीर्षक हे केवळ नाव नसून वैचारिक विधान ठरते.

या शीर्षकावरील वादाची तुलना आजच्या समाजाशी केली तर एक गोष्ट लक्षात येते आपण अनेकदा महापुरुषांना पूजतो; पण त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न कमी करतो. पानसरे यांचे शीर्षक ही पूजावादी मानसिकतेला दिलेली बौद्धिक चुनौती आहे. यातून इतिहासाला प्रश्न विचारण्याचा अधिकार अधोरेखित होतो.

समीक्षेच्या दृष्टीने पाहिले तर या शीर्षकाची ताकद अशी की ते वाचकाला अस्वस्थ करते, संवाद घडवते आणि पूर्वग्रहांवर प्रहार करते. परंतु हाच मुद्दा काहींना वादग्रस्त वाटतो. कारण श्रद्धा आणि चिकित्सा यांच्यातील संघर्ष येथे स्पष्ट दिसतो. या संदर्भात या पुस्तकाची समीक्षा करताना असे म्हणता येईल की, या ग्रंथाचे मोठे यश पुस्तकातील आशयाइतकेच शीर्षकात आहे. कारण शीर्षकच एक वैचारिक हस्तक्षेप आहे. त्याने शिवाजींच्या प्रतिमे भोवतीच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक वादांना उजाळा दिला.

शिवाजी कोण होता? या पुस्तकाची समीक्षा केवळ मजकुरावर आधारित नसून शीर्षकाभोवतीच्या वादातून अधिक सखोल होते. हे शीर्षक प्रश्न उपस्थित करते, परंपरेला आव्हान देते आणि शिवाजींचे पुनर्मूल्यांकन घडवते. त्यामुळे या पुस्तकाचे मोठेपण केवळ आशयात नसून 'प्रश्न विचारण्याच्या धैर्यात' आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित नसून त्यांच्या कार्याचा खरा अर्थ समजावून सांगणारे पुस्तक आहे. या पुस्तकात लेखकाने शिवाजी महाराजांची प्रतिमा फक्त युद्धवीर किंवा एका धर्माचे रक्षण करणारा राजा म्हणून मांडलेली नाही, तर रयतेचा राजा, लोकहितवादी शासक आणि न्यायप्रिय नेता म्हणून उभी केली आहे.

या पुस्तकानुसार शिवाजी महाराजांचे स्वराज्य म्हणजे फक्त सत्ता मिळवणे नव्हते, तर सामान्य जनतेच्या कल्याणासाठी उभे राहिलेले राज्य होते. शेतकरी, गरीब, दुर्बल यांना न्याय मिळावा, स्त्रियांचा सन्मान राखला जावा आणि सर्व धर्मांना समान वागणूक मिळावी, ही शिवाजी महाराजांची भूमिका लेखक दाखवतात.

गोविंद पानसरे या पुस्तकातून सांगतात की शिवाजी महाराजांना केवळ धार्मिक चौकटीत पाहणे चुकीचे आहे. त्यांनी मुस्लीम सरदारांनाही महत्त्वाची पदे दिली, धर्मांधतेला विरोध केला आणि सर्वांना सोबत घेऊन स्वराज्य उभे केले. त्यामुळे ते लोकनायक होते. पुस्तकाचा मुख्य संदेश असा आहे की शिवाजी महाराजांचा खरा वारसा तलवारीत नसून लोककल्याणकारी विचारात आहे. आज अनेकदा शिवाजींचे नाव घेतले जाते; पण त्यांच्या न्याय, समता आणि लोकहिताच्या विचारांचे पालन कमी दिसतेयाकडे लेखक लक्ष वेधतात. या पुस्तकाची भाषा सोपी, विचार स्पष्ट आणि मांडणी प्रभावी आहे. त्यामुळे हे पुस्तक वाचकाला शिवाजी महाराजांकडे नव्या नजरेने पाहायला शिकवते.

शिवाजी कोण होता? हे पुस्तक शिवाजींचे खरे आणि व्यापक रूप समजून देणारे विचारप्रवर्तक पुस्तक असुन गोविंद पानसरेनी शिवाजी महा राज यांचे अनेक पैलू अधोरेखित करतात... पहिला संदेश म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांना केवळ पराक्रमी योद्धा म्हणून न पाहता लोकहित जपणारे, न्यायप्रिय आणि रयतेचे राजा म्हणून समजून घ्यावे. दुसरा संदेश असा की स्वराज्य म्हणजे फक्त राजसत्ता नव्हे, तर जनतेच्या कल्याणासाठी असलेली व्यवस्था होय. शासन हे लोकांसाठी असावे, हा विचार पुस्तकातून अधोरेखित होतो. तिसरा संदेश म्हणजे धर्म, जात, पंथ यापलीकडे जाऊन सर्वांना समानतेने वागवणे. शिवाजी महाराजांचा सर्वधर्मसमभाव आणि लोकाभिमुख दृष्टिकोन आजही प्रेरणादायी आहे. चौथा संदेश अन्यायाविरुद्ध लढण्याचा आहे. अन्याय, शोषण आणि दडपशाही याविरोधात संघर्ष करणे, हेच खरे शिवचरित्र समजणे होय. पाचवा संदेश इतिहासाकडे अंधश्रद्धेने किंवा फक्त गौरवगाथा म्हणून न पाहता चिकित्सक दृष्टीने पाहण्याचा आहे. प्रश्न विचारणे, सत्य शोधणे आणि इतिहास समजून घेणे आवश्यक आहे, हे पुस्तक शिकवते.

थोडक्यात संदेश : लोकहित हेच खरे स्वराज्य न्याय, समता आणि बंधुता जपा धर्मनिरपेक्ष आणि मानवतावादी विचार स्वीकारा अन्यायाविरुद्ध आवाज उठवा शिवाजींचा वारसा कृतीत जपा, केवळ घोषणेत नाही एकूणच, या पुस्तकातून वाचकांना संदेश मिळतो की ''शिवाजी समजणे म्हणजे लोकशाही, न्याय आणि माणुसकी समजणे.''

१) रयतेचा राजा म्हणून पुस्तकात शिवाजी महाराज सामान्य जनतेच्या हितासाठी लढणारे राजा म्हणून उभे राहतात. शेतकरी, गरीब, दुर्बल यांच्या संरक्षणासाठी त्यांनी स्वराज्य उभे केले, असे लेखक दाखवतात.

२) लोककल्याणकारी शासक म्हणून महाराजांचे राज्य हे जनतेच्या सुखासाठी होते. न्याय, सुरक्षितता आणि सुशासन हे त्यांच्या कारभाराचे वैशिष्ट्य पुस्तकात अधोरेखित केले आहे.

३) धर्मनिरपेक्ष राजा म्हणून पानसरे यांनी शिवाजी महाराजांना संकुचित धार्मिक चौकटीत न मांडता सर्वधर्मसमभाव मानणारा शासक म्हणून व्यक्त केले आहे. मुस्लिम सरदारांनाही स्थान देणारे आणि सर्वांचा सन्मान करणारे राजा

(पान ५ वर...)

# गतिमान प्रशासन आणि थेट शेतकऱ्यांना न्याय; महसूल विभाग राज्यात अव्वल!

कृषी जगत



नितीन सुरेशचंद्र भुतडा
समन्वयक भाजपा यवतमाळ पुसद

महाराष्ट्र शासनाचा महसूल विभाग म्हटला की, सर्वसामान्य नागरिकांच्या डोळ्यांसमोर उभे राहायचे ते सरकारी कार्यालयांचे हेलपाटे, प्रलंबित फाईल्स आणि क्लिष्ट कागदपत्रे. परंतु, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पदभार स्वीकारल्यापासून या विभागाचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलून टाकला आहे. लोकाभिमुख आणि पारदर्शक कारभार केवळ भाषणात न ठेवता त्यांनी घेतलेले काही धडाकेबाज निर्णय सध्या संपूर्ण महाराष्ट्रात कौतुकाचा विषय ठरत आहेत. जनतेला देण्यात येणाऱ्या प्रशासकीय सेवा अधिक सुलभ, गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी राबविण्यात आलेल्या गव्हर्नन्स प्रोसेसिंग री- इंजिनिअरिंग फेज -२ च्या आढावा बैठकीत महसुल विभागाने राज्यात अव्वल क्रमांक पटकावला आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विविध विभागांच्या कामगिरीचा आढावा घेण्यात आला, ज्यामध्ये महसूल विभागाच्या सर्वोत्तम कामगिरीबद्दल मुख्यमंत्र्यांनी विभागाचे आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे विशेष कौतुक व अभिनंदन केले. महसूल विभागामार्फत सध्या सेवा हक्क कायद्यांतर्गत एकूण ५४ सेवा पुरविल्या जातात. यामध्ये महसूल विभागाच्या २० सेवा, नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाच्या २० सेवा आणि जमाबंदी आयुक्त कार्यालयांतर्गत येणाऱ्या १४ सेवांचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनाने या सर्व सेवांचे म्हणजेच प्रशासकीय सुलभीकरण करण्याचा निर्णय घेतला होता त्यात महसूल विभागाने राज्यात अव्वल क्रमांक मिळवला.

ज्यांच्या साधनेमुळे हे शक्य झाले ते माननीय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे. चला तर मग जाणून घेऊयात, राज्याला गती देणाऱ्या त्यांच्या अशाच काही महत्त्वाच्या आणि धाडसी निर्णयांबद्दल.

१) प्रत्यय प्रणाली: महसूल सुनावण्या आता डिजिटल आणि पेपरलेस!

सरकारी सुनावणीसाठी नागरिकांचे होणारे हेलपाटे आणि पैशांचा अपव्यय रोखण्यासाठी बावनकुळे यांनी प्रत्यय ऑनलाईन प्रणालीची अंमलबजावणी सुरू केली आहे. या महत्वाकांक्षी पावलामुळे राज्यातील फेरफार, तक्रारी, अपील आणि रिव्हिजन यांसारखी प्रकरणे आता संपूर्णपणे डिजिटल स्वरूपात हाताळली जात आहेत. यामुळे सर्वसामान्यांचा वेळ आणि श्रम दोन्ही वाचत असून संपूर्ण यंत्रणेत पारदर्शकता आली आहे.

२) ६० वर्षांनंतर ऐतिहासिक निर्णय: जमिनीच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण

शेतकरी आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी त्यांनी घेतलेला एक सर्वात मोठा निर्णय म्हणजे शर्तभंग आणि जमिनीच्या नियमितीकरणाबाबत महसूल कोडमध्ये केलेली सुधारणा. शेतीसह घरांची लाखो छोटी प्रकरणे मार्गी लावण्यासाठी त्यांनी मंत्र्यांचे अधिकार थेट जिल्हाधिकाऱ्यांना बहाल केले आहेत. यामुळे मंत्रालयापर्यंत फेऱ्या मारण्याची गरज संपली असून ६० वर्षांनंतर झालेला हा बदल ग्रामीण महाराष्ट्राला मोठी ऊब देणारा ठरला आहे.

३) दक्षता पथके भ्रष्टाचाराला लगाम

महसूल विभागात होणारा गैरव्यवहार आणि संथ कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी महसूल मंत्र्यांनी विभागीय पातळीवर ७ दक्षता पथके स्थापन करण्याचा मोठा निर्णय घेतला. जमीन मोजणी, दुय्यम खनिजे, आणि मुद्रांक शुल्क यांसारख्या गंभीर तक्रारींची ही पथके अवघ्या १५ ते ३० दिवसांत चौकशी करून अहवाल सादर करतात. यामुळे अधिकाऱ्यांची जबाबदारी वाढली असून जनतेचा प्रशासनावरील विश्वास अधिक घट्ट झाला आहे.

४) स्वामित्व योजना आणि नमुना ८ दुरुस्ती: मोफत मिळकत पत्रिका

ग्रामीण भागातील मालमत्तांचे वाद कायमचे मिटवण्यासाठी त्यांनी ग्रामविकास विभागाच्या सोबतीने स्वामित्व योजनेअंतर्गत गावकऱ्यांना मोफत मिळकत पत्रिका देण्याचा आणि सनद फी पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे गावठाण आणि निवासी क्षेत्रातील घरांना हक्काची सनद मिळून ग्रामीण जनतेला त्यांचा कायदेशीर मालकी हक्क अत्यंत सुलभतेने मिळत आहे.

५) मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना: शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत विकास

शेतकऱ्यांना त्यांचा शेतीमाल बाजारात सुलभतेने आणता यावा म्हणून बावनकुळे यांनी मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते योजनेच्या कामांना गती दिली आहे. निधीचा पहिला टप्पा त्वरित उपलब्ध करून देत त्यांनी स्वतः

(पान ५ वर...)

# 'सर्वोच्च न्यायालयाचे हार्दिक अभिनंदन, पण...!'

विचारमंथन



डॉ. एम. आर. इंगळे
मो. 9423429060

मध्य प्रदेशची राजधानी भोपाळ येथील एका उच्चभ्रू व उच्चशिक्षित कुटुंबात ट्विशा शर्मा या कार्पोरेट व्यावसायिक व माजी अभिनेत्री असलेल्या विवाहितेचा हुंड्यासाठी छळ करून तिचा बळी घेतल्याचे प्रकरण सध्या गाजत आहे. सदर प्रकरणातील आरोपी हे उच्च शिक्षित असून वकील व न्यायाधीश आहेत. त्यांचा कायद्याच्या क्षेत्रात मोठा दबदबा असल्यामुळे सदर प्रकरणाचा तपास करण्यात पोलिसांनी हलगर्जी केली असून प्रकरण दाबण्याचा भरपूर प्रयत्न केल्याचे वृत्त आहे. मात्र ''सत्यमेव जयते'' असं म्हणतात ते अगदी बरोबर आहे. कारण ट्विशा शर्माचा हुंड्यासाठी सतत छळ केला जात होता, त्यातून तिने घरात फाशी घेऊन आत्महत्या केल्याचे बोलले जाते पण ही सासरच्या लोकांनी केलेली हत्याच असल्याचा दाट संशय आहे. या बहुचर्चित आणि अत्यंत संवेदनशील प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दाखल घेतली त्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाचे हार्दिक अभिनंदन. पण महिलेचा जीव गेल्यानंतर केल्या जाणाऱ्या कडक कार्यवाहीचा उपयोग काय? याउलट कोणत्याही स्त्रीवर कौटुंबिक हिंसाचार होणार नाही किंवा ती हुंडाबळी ठरणार नाही यासाठी संपूर्ण व्यवस्थेने संवेदनशील होऊन कायद्याची कडक अंमलबजावणी करावी यासाठी सर्वोच्च न्यायालय सकारात्मक पाऊल उचलणार काय? हा खरा महत्त्वाचा आणि गंभीर प्रश्न आहे. कारण अशा प्रकरणात स्त्रियांना भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४, १५ आणि २१ अन्वये मिळालेल्या समानतेच्या आणि जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याचे रक्षण या मूलभूत हक्काचे उल्लंघन होत असते.

ट्विशा शर्मा प्रकरण : भोपाळ येथील कटारा हिल्स भागात राहणाऱ्या उच्चभ्रू कुटुंबात १२ मे रोजी ३३ वर्षीय मॉडेल-अभिनेत्री आणि कार्पोरेट व्यावसायिक ट्विशा शर्मा या विवाहितेने फाशी घेऊन आत्महत्या केल्याचे प्रकरण उघडकीस आले. मात्र ट्विशाच्या आईवडिलांनी आपल्या मुलीला सतत हुंड्याची मागणी, मानसिक व शारीरिक छळ, सक्तीने गर्भपात यासारख्या गंभीर आरोपासह तिला ढकलून ठार मारल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष व पारदर्शक चौकशी व्हावी यासाठी भोपाळ येथील एम्स मध्ये केलेल्या शवविच्छेदन अहवालावर आणि पोलिसांच्या तपासावर आक्षेप घेऊन त्यांनी भोपाळच्या कनिष्ठ न्यायालयात दुसऱ्या शवविच्छेदनाची मागणी केली होती. मात्र कनिष्ठ न्यायालयाने ती फेटाळल्यामुळे ट्विशा शर्माच्या माहेरच्या लोकांनी उच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल केली. त्यावर सुनावणी करतांना, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अवनींद्र कुमार सिंह यांनी दिल्लीतील एम्स येथील एका विशेष पथकाला दुसरे शवविच्छेदन करण्याचे निर्देश दिले. या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतल्यामुळे या प्रकरणात न्याय होईलही पण इतर प्रकरणाचे काय?



हुंडाबळी : गंभीर सामाजिक समस्या : भारतातील हुंडाबळी ही फार गंभीर व संवेदनशील सामाजिक समस्या झाली आहे. कारण देशात महिलांवरील अत्याचार, कौटुंबिक हिंसाचार व हुंडाबळींचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोच्या अहवालानुसार, देशात दररोज सरासरी १५ ते २० महिलांचा हुंड्यासाठी बळी जातो, ही बाब देशाच्या कायदा व सुव्यवस्थेला लाजिरवाणी असून सरकारसाठी अत्यंत शरमेची आहे. कुटुंबात सासरच्या लोकांकडून हुंड्याच्या अवास्तव मागण्या व त्यासाठी विवाहित स्त्रीचा होणारा शारीरिक व मानसिक छळ यामध्ये महिलांचा बळी जातो किंवा त्यांना टोकाचे पाऊल उचलण्यास भाग पाडले जाते. याचा अर्थ आम्ही कितीही आधुनिकतेच्या आणि शिक्षित उच्चशिक्षित होत असल्याच्या गप्पा करत असलो तरी काही सन्माननीय अपवाद वगळता आमच्या भारतीय समाजाची मानसिकता जुन्या रूढी, परंपरेने ग्रस्त असून अत्यंत हलकट प्रवृत्तीची आहे. आजही कुटुंबात स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. तर विवाहाच्या वेळी हुंडा मागणे हा प्रतिष्ठेचा व हुंडा न देणे हा सामाजिक अपमान मानला जातो. त्यामुळे हुंडा देण्या घेण्यावरून विवाहित स्त्रीला छळले जाण्याचे प्रकार सर्रास घडत असतात. पण तो कौटुंबिक प्रश्न आहे असे समजून पोलिस यंत्रणा अशी प्रकरणे गंभीरतेने घेत नाहीत तर दुसरीकडे समाज अशा घटनांमध्ये अलिप्ततेची भूमिका स्वीकारतो, ही सभ्य समाजाची संस्कृती म्हणावी काय?

कायद्याची कडक अंमलबजावणी व जलद निर्णय: देशात वाढते कौटुंबिक हिंसाचार व हुंडा बळी ही समाजव्यवस्थेला लागलेली फार मोठी कीड असून त्यामुळे कुटुंब व्यवस्था उद्ध्वस्त होत आहेत. म्हणून आतातरी सर्वोच्च न्यायालयाने हुंडा बंदी कायदा, १९६१, भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ आणि कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ या महिलांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्यांची कडक अंमलबजावणी करण्यासाठी तातडीने पुढाकार घेणे गरजेचे आहे. याशिवाय कौटुंबिक हिंसाचार व हुंडाबळीची प्रकरणे स्वतंत्र व फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपींना तातडीने कठोर शिक्षा केली पाहिजे. तरच काही प्रमाणात का होईना आम्ही हुंडाबळीला पायबंद घालण्यास यशस्वी होऊ अन्यथा कायदे आहेत पण त्याची समाजात भीती नाही आणि कौटुंबिक हिंसाचारात निरपराध स्त्रिया मारल्या जातील हीच कायद्याच्या राज्यात समाजाची वास्तवता होत राहील हे निश्चित.

समानता आणि महिला संरक्षण कायदे: अलिकडील काळात काही बोटावर मोजण्या इतक्या घटनांमुळे महिला कायद्याचा गैरवापर करतात असा नरेटिव्ह हेतूतः चालविला जात आहे. पण माझा प्रश्न आहे की, गुन्हा सिद्ध न होता न्यायालय शिक्षा करते का? उलट शंभर गुन्हेगार सुटले तरी चालतील पण एका निरपराध व्यक्तीला शिक्षा होऊ नये हे न्यायालयाचे तत्त्व आहे. मग कायद्याचा दुरुपयोग होणार कसा? यासोबतच महिलांना संरक्षण देणारे कायदे आहेत मग पुरुषांना

(पान ५ वर...)

# ‘शिवाजी कोण होता?’: एक चिकित्सक आकलन

**(पान ४ वरुन...)** असे चित्रण आहे.

४) सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते म्हणून : महाराजांना केवळ तलवारीचे नव्हे तर न्यायाचे प्रतीक म्हणून दाखवले आहे. अन्यायाविरुद्ध उभे राहणारे नेतृत्व म्हणून त्यांचे दर्शन घडते.

५) आदर्श मानवतावादी नेतृत्व म्हणून : स्त्रियांचा सन्मान, शत्रूप्रती नैतिकता, प्रजेविषयी संवेदनशीलता यांमुळे त्यांना आदर्श शासक म्हणून व्यक्त केले आहे. थोडक्यात या पुस्तकात शिवाजी महाराज फक्त योद्धा नाहीत, तर जननायक आहेत. फक्त राजा नाहीत, तर लोकहितवादी शासक आहेत.फक्त इतिहासपुरुष नाहीत, तर सामाजिक न्यायाची प्रेरणा आहेत.म्हणून पानसरे यांच्या पुस्तकात शिवाजी महाराज ‘‘तलवारीपेक्षा विचारांचे राजा’’ म्हणून व्यक्त झालेले दिसतात.

# गतिमान प्रशासन आणि थेट शेतकऱ्यांना न्याय; महसूल विभाग राज्यात अव्वल!

**(पान ४ वरुन...)** नागपूर आणि इतर जिल्ह्यांमध्ये थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन या रस्त्यांच्या कामांची पाहणी केली. शेतकऱ्यांचे रस्ते मोकळे करणे हेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारे ठरणार आहे.

प्रशासकीय कामांत गतिशीलता आणि पारदर्शकता आणून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सिद्ध केले आहे की, इच्छाशक्ती असेल तर वर्षानुवर्षे रखडलेली व्यवस्था देखील बदलता येते. त्यांचे हे सर्व निर्णय डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून तळागाळातील शेतकऱ्याला आणि सर्वसामान्य नागरिकाला न्याय देणारे आहेत.प्रशासनाला अधिक लोकाभिमुख बनवणाऱ्या या धडाकेबाज नेतृत्वाचे आणि त्यांच्या दूरदृष्टीचे कौतुक करावे तितके थोडेच आहे!

# ‘सर्वोच्च न्यायालयाचे हार्दिक अभिनंदन, पण...!’

**(पान ४ वरुन...)** संरक्षण देणारे कायदे का नसावे जेणेकरून समानता पाळली जाईल असा एक वाद सुद्धा निर्माण केला जात आहे. यावरून स्त्रियांबाबत समाजाची मानसिकता कशी आहे हे दिसते. म्हणजे एकीकडे स्त्री ही जननी, आदिशक्ती आणि सृजनशील आहे असं म्हणायचं आणि दुसरीकडे तिने अन्याय सहन करत गुलामीतच जगायचं असाच समाजाचा समज आहे. त्यामुळे संविधानातील समानतेचा अर्थ आम्हाला कळलाच नाही असेच म्हणावे लागेल. भारतीय संविधानाला अभिप्रेत स्त्री-पुरुष समानता म्हणजे केवळ कायदेशीर समानता नव्हे, तर लिंगावर आधारित कोणताही भेदभाव न करता स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हक्क, संधी आणि सन्मान मिळवून देणे होय. म्हणून सामाजिक व ऐतिहासिक विषमतेने आणि रूढी परंपरेने शोषणग्रस्त, अन्यायग्रस्त व दुर्बल समजल्या गेलेल्या स्त्रियांच्या प्रगतीसाठी व सामाजिक समतेसाठी सरकारला विशेष कायदे बनवण्याचा अधिकार देण्यात आला आहे. या संवैधानिक तरतुदीनुसार स्त्रियांना समानतेची वागणूक व संरक्षण देण्यासाठी सरकारने हुंडा प्रतिबंध कायदा १९६१ मध्ये मंजूर करून हुंडा देणे, घेणे किंवा त्याची मागणी करणे हा गुन्हा आहे. दोषी आढळल्यास किमान ५ वर्षे कारावास आणि १५,००० रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा होते. भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ नुसार पती किंवा त्याच्या नातेवाईकांकडून महिलेचा छळ झाल्यास हा कायदा लागू होतो. यामध्ये ३ वर्षांपर्यंत कारावासाची व दंडाची तरतूद आहे. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा, २००५ अन्वये शारीरिक, मानसिक, आर्थिक किंवा लैंगिक छळाला बळी पडलेल्या महिलांना कायदेशीर संरक्षण आणि निवारा मिळण्याची तरतूद आहे. म्हणजे कायदे आहेत पण त्याची अंमलबजावणी करण्यासाठी अस्तित्वात असलेली यंत्रणा याबाबत फारशी गंभीर व संवेदनशील नाही म्हणूनच कौटुंबिक हिंसाचार व हुंडाबळींचे प्रमाण वाढत आहे, याची सर्वोच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेऊन कडक उपयोजना करणे आणि महिलांचे कौटुंबिक हिंसाचारात जाणारे बळी रोखण्यासाठी कायद्यात अधिक कडक तरतुदी करणे गरजेचे आहेच पण केवळ कायदे पुरेसे नाहीत, तर समाज आणि कुटुंबाच्या मानसिकतेत आमूलाग्र बदल होण्याची नितांत गरज आहे.

# वाढते तापमान एक मोठे संकट



वास्तव
मोहन शेळके
मो. 9623117110

आज संपूर्ण जगासमोर उभे राहिलेले सर्वात गंभीर संकट म्हणजे वाढते जागतिक तापमान होय. औद्योगिकीकरण, जंगलतोड, वाहनांची वाढती संख्या आणि नैसर्गिक संसाधनांचा अतिरेक वापर यामुळे पृथ्वीचे तापमान सातत्याने वाढत आहे. यालाच ‘‘जागतिक तापमानवाढ’’ किंवा ‘‘ग्लोबल वॉर्मिंग’’ असे म्हणतात. गेल्या काही दशकांत पृथ्वीवरील सरासरी तापमानात मोठी वाढ झाली असून त्याचे दुष्परिणाम मानव, प्राणी, वनस्पती आणि संपूर्ण पर्यावरणावर दिसून येत आहेत. जर योग्य वेळी उपाययोजना केल्या नाहीत तर भविष्यात हे संकट अधिक गंभीर होऊ शकते.

**तापमान वाढण्याची कारणे**

१. **औद्योगिकीकरण** : औद्योगिक क्रांतीनंतर जगभरात कारखान्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली. कारखान्यांतून बाहेर पडणारा धूर, कार्बन डायऑक्साइड, मिथेन आणि इतर विषारी वायू वातावरणात मिसळतात. हे वायू पृथ्वीभोवती उष्णतेचे आवरण तयार करतात. त्यामुळे सूर्याची उष्णता पृथ्वीवर अडकून राहते आणि तापमान वाढते.

२. **जंगलतोड** : झाडे वातावरणातील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि ऑक्सिजन सोडतात. परंतु शहरांचा विस्तार, शेती आणि उद्योगांसाठी मोठ्या प्रमाणावर जंगलतोड केली जाते. त्यामुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढते आणि तापमान वाढण्यास मदत होते.

३. **वाहनांची वाढती संख्या** : आज प्रत्येक घरात दुचाकी किंवा चारचाकी वाहन आढळते. पेट्रोल आणि डिझेलवर चालणाऱ्या वाहनांमधून मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. वाहनांमधून बाहेर पडणारे धूर आणि विषारी वायू हवामान बदलासाठी जबाबदार ठरतात.

४. **जीवाश्म इंधनांचा वापर** : कोळसा, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू यांसारख्या जीवाश्म इंधनांचा वापर वीज निर्मिती, उद्योग आणि वाहतुकीसाठी केला जातो. या इंधनांच्या ज्वलनामुळे हरितगृह वायू निर्माण होतात, जे तापमान वाढीस कारणीभूत ठरतात.

५. **लोकसंख्या वाढ** : लोकसंख्या वाढल्यामुळे अन्न, पाणी, निवारा आणि ऊर्जा यांची गरज वाढली आहे. त्यामुळे नैसर्गिक संसाधनांचा अतिरेक वापर होतो. यामुळे पर्यावरणावर ताण वाढतो आणि तापमानात वाढ होते.


६. **प्लास्टिक आणि प्रदूषण** : प्लास्टिकचा अति वापर आणि कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन यामुळे पर्यावरण प्रदूषित होते. कचरा जाळल्याने विषारी वायू तयार होतात. हे वायू वातावरणातील उष्णता वाढवतात.

**तापमानवाढीचे परिणाम**

१. **हवामानातील बदल** : तापमान वाढल्यामुळे पाऊस अनियमित होतो. काही भागांत अतिवृष्टी तर काही भागांत दुष्काळ पडतो. चक्रीवादळे, पूर आणि उष्णतेच्या लाटा यांची तीव्रता वाढते.

२. **हिमनद्या वितळणे** : ध्रुवीय प्रदेशांतील बर्फ आणि हिमनद्या वेगाने वितळत आहेत. त्यामुळे समुद्राची पातळी वाढत आहे. किनारपट्टीवरील अनेक शहरे भविष्यात पाण्याखाली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.

३. **पाण्याची टंचाई** : तापमान वाढल्यामुळे पाण्याचे बाष्पीभवन अधिक होते. त्यामुळे नद्या, तलाव आणि भूजल साठे कमी होत आहेत. भविष्यात पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो.



४. **शेतीवर परिणाम** : अनियमित पाऊस, दुष्काळ आणि उष्णतेमुळे शेतीचे मोठे नुकसान होते. पिकांचे उत्पादन घटते. त्यामुळे अन्नधान्याची कमतरता निर्माण होऊ शकते.

५. **आरोग्यावर परिणाम** : वाढत्या तापमानामुळे उष्माघात, त्वचारोग, श्वसनाचे विकार आणि हृदयविकार वाढत आहेत. डेंग्यू, मलेरिया यांसारख्या रोगांचा प्रसारही वाढतो.

६. **जैवविविधतेला धोका** : अनेक प्राणी आणि वनस्पती त्यांच्या नैसर्गिक अधिवासातून नष्ट होत आहेत. काही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. पर्यावरणातील समतोल बिघडत आहे.

**तापमानवाढ रोखण्यासाठी उपाययोजना**

१. **वृक्षारोपण आणि जंगलसंवर्धन** : जास्तीत जास्त झाडे लावणे आणि जंगलांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. झाडे कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि वातावरण शुद्ध ठेवतात.

२. **प्रदूषण कमी करणे** : वाहनांचा कमी वापर करणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवणे आणि सायकलचा वापर करणे गरजेचे आहे. उद्योगांमधून होणारे प्रदूषण नियंत्रित केले पाहिजे.

३. **अक्षय ऊर्जेचा वापर** : सौरऊर्जा, पवनऊर्जा आणि जलऊर्जा यांसारख्या पर्यावरणपूरक ऊर्जास्रोतांचा वापर वाढवला पाहिजे. त्यामुळे जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी होईल.

४. **प्लास्टिकचा वापर कमी करणे** : एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर टाळला पाहिजे. कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन आणि पुनर्वापर यावर भर दिला पाहिजे.

५. **पाण्याची बचत** : पावसाचे पाणी साठवणे, पाण्याचा योग्य वापर करणे आणि जलसंधारणाच्या योजना राबवणे आवश्यक आहे.

६. **जनजागृती** : लोकांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांनी यासाठी पुढाकार घ्यावा.

७. **सरकारी धोरणे** : सरकारने कठोर पर्यावरणीय कायदे लागू करणे आवश्यक आहे. हरित तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणे आणि प्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष** : वाढते तापमान ही केवळ एका देशाची समस्या नसून संपूर्ण मानवजातीसमोरील मोठे आव्हान आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. झाडे लावणे, प्रदूषण कमी करणे, ऊर्जा बचत करणे आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारणे ही काळाची गरज आहे. आज आपण योग्य पावले उचलली तरच पुढील पिढ्यांना सुरक्षित आणि निरोगी पर्यावरण मिळू शकेल. त्यामुळे ‘‘पर्यावरण वाचवा, पृथ्वी वाचवा’’ हा संदेश प्रत्येकाने मनापासून स्वीकारला पाहिजे.

# महिलांनी स्वतःच्या सुरक्षेसाठी सजग होणे हीच खरी ताकद



संवाद
ॲड. मनिषा ज्ञानेश्वर भोरे
केंद्र प्रशासक, सखी वन स्टॉप सेंटर, अकोला

आज महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून यशाची नवी उंची गाठत आहेत. घर, शिक्षण, नोकरी, व्यवसाय, प्रशासन, न्यायव्यवस्था, राजकारण अशा सर्वच क्षेत्रात महिलांचे योगदान उल्लेखनीय आहे. मात्र, समाजात वाढणारे अत्याचार, सायबर गुन्हे, मानसिक छळ, कौटुंबिक हिंसाचार आणि महिलांविरोधातील गुन्हे पाहता महिलांनी स्वतःच्या सुरक्षेसाठी अधिक सजग आणि सक्षम होणे ही काळाची अत्यंत मोठी गरज बनली आहे.

महिलेची सुरक्षा केवळ कायद्यांवर किंवा समाजावर अवलंबून राहून शक्य नाही, तर प्रत्येक महिलेने स्वतःमध्ये आत्मविश्वास, जागरूकता आणि धैर्य निर्माण करणे आवश्यक आहे. ‘‘भीती नव्हे, तर सजगता’’ हा प्रत्येक महिलेचा मंत्र असायला हवा.

अन्याय सहन करणे म्हणजे अन्यायाला प्रोत्साहन देणे होय. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा छळ, धमकी, हिंसाचार किंवा शोषण होत असल्यास तात्काळ आवाज उठवणे गरजेचे आहे.


आज सोशल मीडियाच्या माध्यमातून फसवणूक, ब्लॅकमेलिंग आणि सायबर गुन्ह्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. महिलांनी अनोळखी व्यक्तींवर सहज विश्वास ठेवू नये. वैयक्तिक माहिती, फोटो, लोकेशन किंवा खासगी गोष्टी सोशल मीडियावर शेअर करताना सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. मोबाईल आणि इंटरनेटचा वापर करताना डिजिटल सुरक्षा हीसुद्धा स्वसंरक्षणाचाच एक भाग आहे, हे महिलांनी लक्षात ठेवावे.

प्रत्येक महिलेला स्वसंरक्षणाचे प्राथमिक प्रशिक्षण असणे आवश्यक आहे. संकटाच्या वेळी स्वतःचा बचाव कसा करायचा, मदत कशी मागायची आणि योग्य निर्णय कसा घ्यायचा याचे ज्ञान महिलांना आत्मविश्वास देते. प्रवास करताना सतर्क राहणे, आपत्कालीन क्रमांक सेव्ह ठेवणे, कुटुंबीयांना माहिती देणे आणि संशयास्पद परिस्थितीत त्वरित प्रतिक्रिया देणे ही छोटी पण महत्त्वाची पावले महिलांचे संरक्षण करू शकतात.

कौटुंबिक हिंसाचार, मानसिक छळ, आर्थिक शोषण किंवा लैंगिक अत्याचार सहन करणाऱ्या महिलांनी गप्प बसू नये. शासन आणि कायदा महिलांच्या संरक्षणासाठी सक्षमपणे उभा आहे. सखी वन स्टॉप सेंटर, अकोला मार्फत पीडित महिलांना वैद्यकीय मदत, समुपदेशन, कायदेशीर सहाय्य, पोलीस मदत, मनोसामाजिक आधार आणि तात्पुरता निवारा अशा सर्व सेवा पूर्णपणे निःशुल्क उपलब्ध करून दिल्या जातात.

महिला ही केवळ कुटुंबाची नव्हे, तर संपूर्ण समाजाची शक्ती आहे. महिला सुरक्षित असेल तर कुटुंब सुरक्षित राहील आणि कुटुंब सुरक्षित असेल तर समाज सक्षम बनेल. प्रत्येक महिलेने स्वतःच्या आत्मसन्मानासाठी, स्वाभिमानासाठी आणि सुरक्षिततेसाठी धैर्याने पुढे येणे आवश्यक आहे. ‘‘स्वतःचे रक्षण करणारी महिला हीच खऱ्या अर्थाने सक्षम महिला असते.’’ ही भावना प्रत्येक महिलेमध्ये निर्माण झाली, तर समाजातील अनेक गुन्ह्यांना आपोआप आळा बसेल.


# ओळख पक्ष्यांची : स्टॉर्क-बिल्ड किंगफिशर



चित्रावरून, दाखवलेला पक्षी स्टॉर्क-बिल्ड किंगफिशर आहे. आकार आणि रंग: हा एक खूप मोठा खंड्या आहे, ज्याची लांबी अंदाजे ३५ सेमी (१४ इंच) असते. प्रौढ खंड्यांची वैशिष्ट्यपूर्ण लाल चोच, जैतुणी-तपकिरी रंगाचे डोके, हिरवी पाठ आणि निळे पंख व शेपटी असते.अधिवास आणि वितरण: हे वृक्ष खंड्या असून ते उष्णकटिबंधीय भारतीय उपखंड आणि आग्रेय आशियामध्ये आढळतात. ते नद्यांजवळील जंगले, शांत तलाव आणि किनारी खारफुटीच्या जंगलांसह विविध वातावरणात राहतात.आहार आणि वर्तन: मासेमारीत पारंगत असल्याने, ते मासे, बेडूक, सरडे आणि कीटक पकडण्यासाठी उंच ठिकाणांवरून पाण्यात डुबकी मारतात.

**(छायाचित्र : चंद्रकांत पाटील)**

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 407




संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे शब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द :–**

**दोन अक्षरी**
अजा, आच, जात, टप, त्रस्त, दमा, देठ, दोस्त, नाट, नातू, पाक, बट, बळ, बार, भार, भाषा, भोई, मण, मणी, माता, माय, मूळ, यव, रुळ, लाळ, लीप, वज्र, वात, वाम, शिरा, साप, सोय

**तीन अक्षरी**
अबब, अभ्रक, अमृत, अवाक, आगरा, आजार, आबाळ, आभार, आमिष, अंगठी, कारंजा, चितारी, जोगवा, डायन, डायरी, नकाब, नवल, पडदा, प्रवीण, बत्ताशा, भारत, मराठी, मस्जिद, मातम, मंथरा, रवंथ, वरठी, शिसारी, सतार, संभ्रम, स्मरण


**चार अक्षरी**
आमंत्रण, कणकण, कंठमणी, चितचोर, चीरगुट, जलचर, दानवीर, धरातल, नवलाई, बुद्धिबळ, मंदोदरी

**पाच अक्षरी**
अरुणोदय, एप्रिल फुल, एलिझाबेथ, जनगणना, पसायदान, प्रजासत्ताक, मगरमिठी, लीलावतार, विसरभोळा, सभामंडप, अमृत मंथन, अंगुली नर्तन, चोर दरवाजा, पाषाण हृदय

**अन्य अक्षरी**
साठी बुद्धि नाठी, झाकली मूठ सव्वा लाखाची


(उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 789



**आडवी विधाने:–** 1) रात्रीच्या जेवणानंतर थोड्यावेळ पायी फिरणे 3) रामायणात श्रीरामाला वनवासात पाठविण्याचा हट्ट धरणारी दशरथाची पत्नी 4) श्रीरामचंद्राची नगरी 6) रामायण या महाकाव्याची रचना करणारे महर्षि 7) खोडकर, नटणारा 9) सावकाश, हळूवार 10) रामायणात या राजाच्या शर संधानाने श्रावण बाळाचा वेध घेतला 13) वर्तुळाची मर्यादा दाखविणारी वक्ररेषा 15) सत्वांश, जातीचा गुण 17) पळून जाण्याचा मार्ग 20) सुटी, परवानगी 22) मराठी सिनेसृष्टीतील एक लोकप्रिय दिवंगत अभिनेत्री 25) श्रीरामचंद्राची एक निस्सीम भक्त भिल्लीण 26) मोत्यांची माळ, जिंकणे 27) शंभर घोडेस्वारांची टोळी 28) नाश पावलेले 29) विद्युत, वीज 30) टवाळखोर 31) सूर्य 32) प्रामाणिक, पतदार मनुष्य 33) डोळ्यात घलावयाचे अंजन 35) पत, प्रतिष्ठा 37) ताब्यातला 39) पत, साक्ष, पुरावा 41) खुप जाड दोर 43) श्रीकृष्णाने आपल्या करंगळीवर पेललेला पर्वत 44) गाढव 46) पूर्ण व्यवस्था, तजवीज 48) हिंदीत भय, भीती 49) नाकाने हुंगावयाची पूड 51) दक्ष, जागृत 54) काज, कृत्य 55) एक प्रसिद्ध दूरचित्रवाहिनी 56) धुंद, ताठरलेला 57) अधिकार (हिंदी) 58) फुलांचा एक एक वेगळा भाग 60) भोजन 62) एक लाख ही संख्या 63) इच्छिलेली वस्तु देणारी गाय 64) मान, प्रतिष्ठा 67) पलायन करणे, पळून जाणे 68) गळ्याचा मागचा भाग 70) मिठी, वेंध 71) स्वतःशीच केलेले संभाषण 73) मेंढ्या पाळणारी एक जात 75) फिर्याद, गाऱ्हाणे 76) औषधी वनस्पती 77) भूगोलावर उत्तर व दक्षिण ध्रुव यांना जोडणारे व भूमध्याला छेदून जाणारे वृत्त 78) जीभ, जिव्हा 80) धुणे 83) वृत्तपत्रसंस्थेत लिखाणासाठी मुख्य संपादकांना सहाय्य करणारे सहाय्यक 85) पुस्तकाचे पान, पातळ पत्रा 87) बांगड्यांचा व्यवसाय करणारा 88) खांद्यावर घेण्याचे लहान पातळ धोतर 89) श्रीविष्णुंची पत्नी

**उभी विधाने:–** 1) वर्षातील सहा ऋतुंपैकी एक 2) नम्र, निमग्न 3) बाजू घेणारा, मदतगार 4) विश्रांती न घेता 5) क्षणमात्रही विसर पडत नाही असा अंतःकरणाचा होणारा भास 6) मुंग्यांचे घर 8) विक्री, खर्च 11) एखाद्या पदग्रहणापूर्वी घेण्यात येणारा शपथ समारंभ 12) एकावर एक रचलेले 14) कुलीन, चांगल्या कुळात जन्मलेला 16) बलवान, बलिष्ठ 17) धोबी 18) गंध, राहणे 19) टिंगल, उपहास 21) लग्न समारंभात वरपक्षाकडील वऱ्हाडी मंडळीस उतरण्यासाठी दिलेली जागा 23) जमिनीत मिसळलेला, खाली पडलेला 24) आजी (हिंदी) 27) पूर्णतः दुसऱ्याच्या ताब्यात असलेला 34) सलग, न तुटलेले 35) वाढविणारे 36) लोक, रयत 38) बोटाच्या अग्रभागावरचे हाड 40) मस्तकविहिन शरीर 42) सिंहाची गर्जना 43) कथा, कहाणी, 45) पृथ्वी 47) अंड्याच्या आतील पिवळा भाग 50) समोर, साक्षात 52) लाजणे, ओशाळणे 53) वृत्तपत्रसस्थेतील एक महत्वाचे अधिकार पद 57) बजरंगबली 59) लाकूड कापण्याचे हत्यार 61) महत्व, श्रेष्ठपणा 62) रामायणात लक्ष्मणाने सीतेच्या रक्षणासाठी आखून दिलेली रेषा 63) वेळ, यम 65) बुधकौशिक ऋषिंनी रचलेले एक श्रीराम स्तोत्र 66) जलद, लवकर 67) माघार घेणे, मागे वळणे 69) कोतवाल, पोलिस 72) हत्ती 73) ठेव, अमानत, आठवण (हिंदी) 74) सैन्यासाठी पाठविण्यात येणारा दाणागोटा 79) घ्राणेंद्रिय 81) वाकणे, नम्र होणे 82) मनुष्य, पुरुष 83) एक अत्यंत चपळ पण भित्रा प्राणी 84) राग, त्वेष 86) वाईट मनुष्य, दुष्ट

**मागील महाशब्दकोड्याचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

## महत्त्वाचे

### महाराष्ट्र, गुजरातसह ७ राज्यांतील ७७ गाड्या रद्द

**नागपूर :** जर तुम्ही जून महिन्यात कुठे बाहेर फिरण्याचा किंवा प्रवासाचा बेत आखत असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. बिलासपूर रेल्वे मंडळाच्या चांपा स्थानकावर चौथ्या रेल्वे लाईनचे काम सुरू असल्याने रेल्वे प्रशासनाने जून २०२६ मध्ये तब्बल ७७ गाड्या रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ६५ एक्सप्रेस आणि १२ पॅसेंजर ट्रेनचा समावेश असून, यामुळे महाराष्ट्र, गुजरात आणि पश्चिम बंगालसह ७ राज्यांतील प्रवाशांचे हाल होणार आहेत. रेल्वेने जाहीर केलेल्या नवीन पत्रकानुसार, जून महिन्यात प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी पर्यायी व्यवस्था केली जात असली तरी महत्त्वाच्या ७७ गाड्या पूर्णपणे रद्द राहतील. याशिवाय ६ ट्रेन त्यांच्या नियोजित स्थानकावर पोहोचण्यापूर्वीच (शॉर्ट टर्मिनेट) थांबवल्या जातील, तर ५ गाड्या त्यांच्या ठरलेल्या वेळेपेक्षा उशिराने धावतील. ऐन सुट्ट्यांच्या हंगामात रेल्वेने घेतलेल्या या निर्णयामुळे हजारो प्रवाशांचे आरक्षण रद्द होणार असून त्यांना मोठा आर्थिक व मानसिक फटका बसणार आहे.

### लोकसेवा हक्क आयुक्त म्हणून संदीप देशमुख यांनी स्वीकारला पदभार

**नागपूर :** शासनाच्या सेवा प्रत्येक पात्र नागरिकाला पारदर्शक आणि विहित कालमर्यादेत मिळाव्यात, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम अमलात आणला. यामुळे प्रशासनातील दप्तर दिरंगाईचा अडसर दूर होण्यास मोठी मदत झाली आहे. नागपूर महसूल विभागात या अधिनियमाची अधिक काटेकोर अंमलबजावणी करण्यावर आपला विशेष भर राहील, असे प्रतिपादन संदीप देशमुख यांनी केले.राज्य सेवा हक्क आयुक्त म्हणून त्यांनी आज आपला पदभार स्वीकारला. यावेळी महाराष्ट्राचे मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.राज्य सेवा हक्क अधिनियमाबाबत व्यापक जनजागृती करण्यावर आपला भर राहील. शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये या अधिनियमांतर्गत असलेल्या जबाबदारीचे भान निर्माण करण्यासोबतच, ज्या अधिकाऱ्यांनी आपली कार्यतत्परता उत्कृष्टपणे सिद्ध केली आहे, अशा अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून प्रशस्तीपत्र देण्यात येईल,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.नागपूर महसूल विभागासाठी १ डिसेंबर २०२१ रोजी प्रथम आयुक्त म्हणून अभय यावलकर (सेवानिवृत्त भा.प्र.से.) यांनी कार्यभार स्वीकारला होता. १० जानेवारी २०२६ रोजी त्यांचा कार्यकाळ संपुष्टात आला. संदीप देशमुख यांनी यापूर्वी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात (अपर आयुक्त तथा विशेष सहकारी संस्था) सचिव म्हणून काम केले आहे. गृहनिर्माण सहकारी संस्थांना सहकार कायद्यात स्वतंत्र स्थान मिळवून देण्यासाठी विशेष चॅप्टर तयार करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता.

# दिल्लीत नव्हे मुंबईत: महायुतीचे जागावाटप अंतिम टप्प्यात-चंद्रशेखर बावनकुळे

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**नागपूर, दि. २७ :** विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील जागावाटपाबाबत ९९ टक्के चर्चा पूर्ण झाली आहे. तीनही पक्षांच्या प्रमुख नेत्यांमध्ये अंतिम चर्चा होऊन उद्यापर्यंत अधिकृत घोषणा केली जाईल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.यासाठी दिल्लीत बैठकीची आवश्यकता नसून राज्यातील प्रमुख नेते परस्पर चर्चेतून निर्णय घेतील. विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसने अनावश्यक खर्च टाळून निवडणूक बिनविरोध करावी, असे आवाहन बावनकुळे यांनी केले. विविध मतदारसंघांत महायुतीकडे ७० टक्क्यांपर्यंत मतदानाचे संख्याबळ असल्याचा दावा त्यांनी केला.

राज्यातील पाणीस्रोतांचे ऑडिट करण्यासाठी ''पाण्याचा सातबारा'' हा प्रायोगिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली. ग्रामपंचायत स्तरावर पाण्याचे स्रोत, पाण्याचा उपसा आणि भूजल पुनर्भरण यांचे परीक्षण करण्यात येईल. महसूल, ग्रामविकास आणि पाणीपुरवठा विभाग संयुक्तपणे ही योजना राबविणार असून याची सुरुवात मराठवाड्यातून होणार आहे.महसूल विभागाला जीपीआर अहवालात प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल बोलताना बावनकुळे यांनी विविध दाखले व प्रमाणपत्रांची प्रक्रिया सुलभ केल्याचे सांगितले. महसूल विभाग आणि आयटी विभागातील अधिकाऱ्यांच्या मेहनतीमुळे जनतेला उत्कृष्ट सेवा देता येत असल्याचे त्यांनी नमूद केले.राष्ट्रवादी काँग्रेसमधील कथित वादाबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, मला कोणताही वाद झालेला वाटत नाही. ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ काल रात्री उशिरापर्यंत माझ्यासोबत होते. त्यामुळे वादाच्या बातम्या कुठून येतात, हे माहिती नाही.

ओबीसी कॅबिनेट सबकमिटीची बैठक नुकतीच पार पडल्याची माहिती देत बावनकुळे म्हणाले की, राज्यातील ओबीसी समाजाच्या प्रश्नांसंदर्भात केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे. मराठा आणि ओबीसी समाजामध्ये संघर्ष निर्माण होणार नाही, याची काळजी सरकार घेईल, नवीन नागपूर आणि नव्या रिंग रोड प्रकल्पासाठी शासनाने दिलेला मोबदला समाधानकारक असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. प्रभावित शेतकऱ्यांना भूखंड देण्यात येणार असून या प्रकल्पासाठी लागणारी स्टॅम्प ड्युटी महसूल विभागाने माफ करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. तसेच नागपूरमधील नवीन प्रशासकीय इमारतीच्या प्रस्तावांनाही मंजुरी मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

### एसआयआर प्रक्रिया आवश्यकच !

मतदार याद्यांमध्ये एकाच व्यक्तीची अनेक नावे असल्याच्या तक्रारी आहेत. एसआयआरमुळे मतदार यादी शुद्ध आणि पारदर्शक होईल. लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी आणि निवडणूक प्रक्रिया विश्वासार्ह करण्यासाठी ही एसआयआर प्रक्रिया आवश्यक असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.वसतिगृहामधील विद्यार्थिनीच्या तक्रारीबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले की, संबंधित विद्यार्थिनी सोबत मी स्वतः संवाद साधला असून तिचे अनुभव ऐकले आहेत. हे प्रकरण गंभीर असून समाजकल्याण मंत्र्यांशी चर्चा करून संबंधित वॉर्डनवर योग्य कारवाई करण्याची विनंती केली जाणार आहे.

### जिल्हाधिकारी कार्यालयात रस्ते सुरक्षा समितीची बैठक

# अपघातप्रवण स्थळी 'आयटीएमएस' प्रणाली बसविणार

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** शहरात अपघात टाळण्यासाठी महत्वाच्या अपघात प्रवणस्थळी 'इंटलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम' (आयटीएमएस) बसविण्यासाठी जलद कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, उपजिल्हाधिकारी जोगेंद्र कट्यारे, सा. बां. विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील, निमंत्रित सदस्य प्रदीप गुरूखुद्दे, मनपा उपायुक्त गीता वंजारी, मोटार वाहन निरीक्षक मनोज शेळके आदी उपस्थित होते. 'इंटलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम'मध्ये ॲटोमॅटिक नंबरप्लेट रेकग्निशन, ट्रॅफिक व्हायोलेशन डिटेक्शन, सीसीटीव्ही ॲनालिटिक्स, व्हेईकल ट्रॅकिंग आदी सुविधांचा समावेश आहे. ही प्रणाली कार्यान्वित होण्यासाठी जलद कार्यवाही व्हावी, असे निर्देश जिल्हाधिकारी श्रीमती मीना यांनी दिले.

मस्तान चौक ते भोला चौक (अकोटपेठ पुलापर्यंत) दरम्यानची वाहतूक एकेरी करण्याबाबत, तसेच शहरातील काही भागांत जड वाहनांची वाहतूक प्रतिबंधित करण्याबाबत अधिसूचना काढण्यासंदर्भातही यावेळी आदेश देण्यात आले. अकोट पेठ रेल्वे उड्डाण पूल प्रस्ताव, कॅनल रोडला रेल्वे अंडरपास आदी विविध विषयांवरही यावेळी चर्चा झाली. रस्ते अपघात प्रणालीवरील प्रलंबित प्रकरणांचा संबंधित विभागांनी निपटारा करण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले.

# नागपुरात २४ तासांत तिघांचा गळफास

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** गेल्या ४५ दिवसांत झालेल्या खुनाच्या १२ घटनांनी शहरात गुन्हेगारांकडून कायदा व सुव्यवस्था वेशीला टांगली जात असतानाच तीन आत्महत्यांनी पुन्हा एकदा उपराजधानी हादरली. यशोधरा नगर, हुडकेश्वर आणि हिंगणा पोलीस ठाण्यांच्या हद्दीत घडलेल्या या आत्महत्यांच्या घटनांमुळे मानसिक तणावाचा मुद्दा एरणीवर आला आहे. गेल्या २४ तासांत शहर आणि ग्रामीण भागात, किशोरवयीन मुलीसह तिघांनी गळफास घेत जीवनयात्रा संपवली. वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत या घटना समोर आल्यानंतर, पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे. या तिन्ही घटनांमध्ये आकस्मिक मृत्यूच्या नोंदी करत पोलिसांनी तपास हाती घेतला आहे. या आत्महत्यांमागील नेमकी कारणे अद्याप स्पष्ट झालेली नाहीत.

पहिली घटना यशोधरा नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील 'वनदेवी नगर' येथे घडली. येथे १७ वर्षीय रोशनी रवी गिरी हिने मंगळवारी मध्यरात्री, घरातील पंख्याला ओढणी बांधून गळफास लावत जीवन संपवे. पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, रोशनीने काही काळापूर्वीच शाळा सोडली होती. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी तीरोजंदारीवर मजूर असलेल्या आई-वडीलांसोबत कामाला देखील जात होती. तिने आत्महत्या केल्याची माहिती मिळताच, संपूर्ण कुटुंबावर शोककळा पसरली आहे. पोलीस या प्रकरणाचा सर्व संभाव्य बाजूंनी तपास करत आहेत.

हिंगणा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील 'मोंढा' परिसरात जयंत तुळशीराम तरारे (२४) या तरुणाने शेतातील झाडाला दोरी बांधून गळफास लावत आत्महत्या केली. जयंत हा बऱ्याच काळापासून दुर्धर आजाराशी झुंज देत होता. त्यामुळे तो प्रचंड मानसिक तणाव आणि शारीरिक व्याधीमुळे आलेल्या नैराश्याने ग्रासला होता. यातच त्याने हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा संशय व्यक्त होत आहे.

हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील 'नरसाळा' येथील 'नीलकमल नगरात गोपाल दत्तोपंत टेके यांनी (५३) घराच्या छताच्या बसवलेल्या लोखंडी गजाला दोरी बांधून आत्महत्या केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गोपाल यांना मद्यपानाचे व्यसन जडले होते. त्यामुळे ते बराच काळापासून मानसिक तणावाखाली होते. सध्या पोलीस आत्महत्येच्या कारणाचा शोध घेत आहेत.आत्महत्येच्या घटना सातत्याने समोर येत असल्याने समाज आणि प्रशासन या दोघांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मानसिक तणाव, आजारपण, आर्थिक अडचणी आणि कौटुंबिक दबाव यांसारखी कारणे या घटनांमागे असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या तिन्हीही प्रकरणांमध्ये, पोलिसांनी 'अपघाती मृत्यू' म्हणून गुन्ह्यांची नोंद करत तपास हाती घेतला आहे.

# विरोधकांचे मनसुबे उधळले; काजळेश्वरच्या सरपंचांची अपात्रता रद्द

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**कारंजा (लाड), दि. २७ :** कारंजा तालुक्यातील काजळेश्वर ग्रामपंचायतीचे सरपंच नितीन विष्णू उपाध्ये यांना अखेर ग्रामविकास मंत्रालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. जिल्हा वार्षिक योजनेच्या कामांमध्ये अनियमिततेचा ठपका ठेवत अमरावती विभागाच्या अपर आयुक्तांनी १३ ऑक्टोबर २०२५ रोजी त्यांना सरपंच पदावरून अपात्र ठरवले होते. या अन्यायकारक निर्णयाविरोधात सरपंचांनी दाखल केलेल्या अपिलावर अंतिम सुनावणी घेऊन, मा. क्रीडा व ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी २२ मे २०२६ रोजी अपर आयुक्तांचा तो अपात्रतेचा आदेश रद्दबातल ठरवला आहे. मंत्रालयाच्या ग्राम विकास विभागाकडून २६ मे २०२६ रोजी यासंबंधीचे अधिकृत पत्र जारी करण्यात आले आहे.

या प्रकरणाची सविस्तर पार्श्वभूमी अशी की, काजळेश्वर ग्रामपंचायतीमध्ये सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत आयुर्वेदिक दवाखाना आवारभिंत, पोचमार्ग व ड्रेनेज मार्ग दुरुस्तीचे काम मंजूर करण्यात आले होते. या कामांमध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता झाली असून ई-निविदा प्रक्रियेचे उल्लंघन करण्यात आल्याची तक्रार विरोधी गटाच्या ज्योती गणेशपुरे यांनी केली होती. या तक्रारीची दखल घेत अपर आयुक्त, अमरावती विभाग यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३९(१) नुसार सरपंच नितीन उपाध्ये यांना दोषी धरून अपात्र घोषित केले होते. या कारवाईमुळे स्थानिक राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली होती.अपर आयुक्तांच्या या कारवाईविरोधात सरपंच नितीन उपाध्ये यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३९(३) अंतर्गत ग्रामविकास मंत्र्यांच्या न्यायालयात अपील दाखल केले होते. या प्रकरणी १७ फेब्रुवारी २०२६ रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आणि त्यानंतर २५ फेब्रुवारी २०२६ रोजी मंत्रालयात प्रत्यक्ष सुनावणी झाली. या सुनावणीत अपिलार्थी सरपंचांच्या वतीने बाजू मांडताना असा युक्तिवाद करण्यात आला की, सदर कामे कोणतीही कंत्राटदार पद्धत न वापरता ग्रामपंचायतीने विभागीय पद्धतीने (स्वतः साहित्य खरेदी करून) पूर्ण केली आहेत. लेखा संहिता आणि शासन निर्णयानुसार, अशा विभागीय कामांसाठी ई-निविदेची कोणतीही सक्ती नसते. तसेच जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी ५ सप्टेंबर २०२३ रोजी दिलेल्या तांत्रिक अहवालातही कामे दर्जेदार आणि सुस्थितीत असल्याचा निर्वाळा दिला आहे.मंत्रालयात झालेल्या या अंतिम सुनावणीत दोन्ही बाजूंचे म्हणणे आणि कागदपत्रे तपासल्यानंतर ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी महत्त्वाचा निष्कर्ष नोंदवला. सरपंचांवर ठेवण्यात आलेले दोषारोप तांत्रिक स्वरूपाचे असून त्यांना पदावरून दूर करण्याइतपत गंभीर स्वरूपाचे नाहीत, असे स्पष्ट करत त्यांनी अपर आयुक्तांचा १३ ऑक्टोबर २०२५ काळातील आदेश रद्द करण्याचा अंतिम निर्णय दिला.

''ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावच्या विकासासाठी सर्व कामे कायदेशीर आणि दर्जेदार पद्धतीनेच करण्यात आली होती. केवळ राजकीय द्वेषापोटी विरोधकांनी खोट्या तक्रारी करून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, वरिष्ठ पातळीवर आम्हाला न्याय मिळाला असून मंत्रालयाच्या या निर्णयामुळे अखेर सत्याचा विजय झाला आहे. यापुढेही ग्रामस्थांना विश्वासात घेऊन काजळेश्वर गावाच्या विकासाचा गाडा अधिक वेगाने पुढे नेणार,''

**नितीन उपाध्ये**
**सरपंच , ग्राम पंचायत काजळेश्वर**

# गडचिरोलीत एकीकडे नवनियुक्त जिल्हाध्यक्षांचे शक्तिप्रदर्शन, दुसरीकडे राजीनामा सत्र

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गडचिरोली, दि. २७ :** जिल्हाध्यक्ष निवडीवरून गडचिरोली काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत संघर्षातून दहा तालुकाध्यक्षांसह शंभरावर पदाधिकाऱ्यांनी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची भेट घेत सामूहिक राजीनामे दिल्याने खळबळ उडाली आहे. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष विश्वजित कोवासे यांनी २६ मे रोजी शक्तिप्रदर्शन करत पदग्रहण केले.

या कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशीच काँग्रेसच्या शंभरावर पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी महेंद्र ब्राह्मणवाडे यांना पुन्हा संधी देण्यात यावी, यासाठी मुंबई गाठल्याने काँग्रेसमधील गटबाजी उघड झाली आहे.युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव असलेले विश्वजित कोवासे यांची मागील आठवड्यात जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. मात्र, माजी जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे यांच्या समर्थकांनी या नियुक्तीवर आक्षेप घेत ती रद्द करण्याची मागणी केल्याने पक्षातील गटबाजी चव्हाट्यावर आली होती. या पार्श्वभूमीवर कोवासे समर्थकांनी मंगळवारी सायंकाळी पदग्रहण सोहळ्याचे आयोजन करत मोठी रॅली काढली आणि शक्तिप्रदर्शन केले.या कार्यक्रमाला काँग्रेसचे विधिमंडळ गटनेते आमदार विजय वडेट्टीवार, माजी मंत्री वसंत पुरके, काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव अजय चिकारा, महाराष्ट्र प्रभारी कुणाल चौधरी, प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, आमदार अभिजित वंजारी, आमदार रामदास मसराम, माजी खासदार मारोतराव कोवासे, माजी नगराध्यक्ष राम मेश्राम यांच्यासह अनेक नेते व पदाधिकारी उपस्थित होते.

# समाजात शांतता, बंधुता आणि शिक्षणातूनच खरी समानता निर्माण होऊ शकते-प्रवीण बागडे

अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**नागपूर, दि. २७ :**नागपूरच्या लष्करीबाग येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन सभागृहात शनिवार, दि. २३ मे २०२६ रोजी बहुजन हिताय संघाची ४७१ वी साप्ताहिक सभा उत्साहात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी सामाजिक न्याय विभागाचे माजी उपायुक्त मा. आयु. संजीव गाडे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रशासनिक अधिकारी व साहित्यिक, मा. आयु. प्रवीण बागडे उपस्थित होते, तर विशेष अतिथी म्हणून सहायक पोलीस आयुक्त मा. आयु. अशोक बागुल यांनी उपस्थिती दर्शविली.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून त्रिशरण, पंचशील आणि बुद्धवंदनेने करण्यात आली. बौद्धाचार्य देविदास राऊत यांनी आनापानसती ध्यानाचे मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी प्रवीण बागडे यांनी उपस्थितांकडून बावीस प्रतिज्ञा वदवून घेतल्या.

आपल्या मनोगतात प्रवीण बागडे यांनी समाजात शांतता, बंधुता आणि सामाजिक एकात्मता प्रस्थापित करण्याची आवश्यकता अधोरेखित केली. ''शिक्षणामुळेच खरी सामाजिक समानता निर्माण होऊ शकते,'' असे प्रतिपादन करत त्यांनी शिक्षण क्षेत्रातील वाढत्या बाजारीकरणाबाबत चिंता व्यक्त केली. त्यांच्या सामाजिक, साहित्यिक व प्रबोधनात्मक कार्याचा गौरव संस्थेच्या वतीने स्मृतिचिन्ह देऊन करण्यात आला.

सभेत विविध मान्यवरांनी धम्म, समाजप्रबोधन, शिक्षण आणि सामाजिक ऐक्य या विषयांवर मार्गदर्शन केले. विशेष अतिथी अशोक बागुल यांनी बहुजन हिताय संघ हा मानवतावादी विचार जोपासणारा सामाजिक संघ असल्याचे सांगत, ''जाती-धर्माच्या आधारावर माणसाचे मूल्यांकन करू नये. जाती, धर्म आणि पंथ यांच्या पलीकडे जाऊन मानवता प्रस्थापित करणे आवश्यक आहे,'' असा संदेश दिला. अध्यक्षीय भाषणात संजीव गाडे यांनी बौद्ध धम्म स्वीकारण्यासाठी विधिवत दीक्षा आवश्यक असल्याचे स्पष्ट केले आणि सामाजिक मूल्यांवर मार्गदर्शन केले.


**तहसिल कार्यालय, सिंदखेडराजा**
दुरध्वनी कंमाक -०७२६९-२३४२३६
Email Address-tahsildarsraja@gmail.com
क्र.कावी/प्र.१/ज.मृ./३२४/२०२६
दिनांक ०६/०४/२०२६

**जाहिरनामा**

विषय: जाहीर नोटीस प्रसिध्द करणे बाबत.
संदर्भ: जन्म / मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३)
गैरअर्जदार: ग्राम पंचायत लिंगा
याव्दारे जाहिर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, जन्म / मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे दिक्षा शिवाजी खरात यांच्या जन्माचे नोंदीबाबत गैरअर्जदार यांना आदेश होणेबाबत अर्जदार यांचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला आहे सदर अर्जात अर्जदार नामे शिवाजी ब्रम्हदेव खरात रा.लिंगा यांच्या मुलीचा जन्म दिनांक २४/११/२००६ रोजी मौजे लिंगा येथे झाला आहे व त्याच्या जन्माची नोंद केली नाही, असे नुमद केले आहे.उक्त नोंदीबाबत कोणाला काही हरकत घ्यावयाची असेल त्यांनी आपला हरकत अर्ज या कार्यालयात जाहिरनामा प्रसिध्दीपासुन १५ दिवसाच्या आत कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून सादर करावे. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**तहसिलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी सिंदखेड राजा**



**जाहीर प्रसिध्दी**

मी अताउल्ला खा रफिक खा पठाण रा. टूनकी बु. तालुका संग्रामपूर जिल्हा बुलढाणा असे जाहीर करतो की, माझा मुलगा साजिद रजा अताउल्ला खा पठाण ह्याच्या जुने पासपोर्ट (क्र.K ६३२४३७६)मध्ये माझे नाव ATTAULLAH KHAN PATHAN असे होते .ते आज रोजी ATAULLA KHA RAFIK KHA PATHAN असे आहे करिता प्रसिद्धी दिली आहे.

**आपला विश्वासू**
ATAULLA KHA
RAFIK KHA PATHAN
At post Tunki bk
Taluka sangrampur
Dist Buldhana


## वृक्षतोडीला विरोध

### ग्रामसभेला डावलल्याने संताप, पुस्के-मोडस्के परिसरात हालचालींना वेग

# एटापल्लीत बेकायदेशीर उत्खननाचा घाट

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**गडचिरोली, दि. २७ :** एटापल्ली तालुक्यातील पुस्के-मोडस्के-अडंगे परिसरात ग्रामसभेची परवानगी न घेता खनिज उत्खनन सुरू करण्याच्या हालचालींना वेग आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सामूहिक वनहक्क व पेसा कायद्यांतर्गत संरक्षित असलेल्या या भागात काही कंपन्यांकडून सर्वेक्षण, ड्रिलिंग तसेच वृक्षतोडीचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगत ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा भारतीय कम्युनिस्ट पक्षाने (भाकपा) दिला आहे.



पुस्के-मोडस्के परिसर हा सामूहिक वनहक्क आणि पेसा कायद्याच्या कक्षेत येतो. या कायद्यांनुसार अशा क्षेत्रांमध्ये कोणतेही खाणकाम, उत्खनन किंवा विकास प्रकल्प राबविण्यापूर्वी संबंधित ग्रामसभेची पूर्वसंमती घेणे बंधनकारक आहे. मात्र, ग्रामसभेला विश्वासात न घेता काही कंपन्यांकडून प्राथमिक हालचाली सुरू असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. कंपनीवर गुन्हे दाखल करण्याची मागणी

या संदर्भात भाकपाचे जिल्हा सहसचिव सचिन मोतकुरवार यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाला निवेदन देण्यात आले. या निवेदनात पेसा कायदा १९९६, वनहक्क कायदा २००६, पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ तसेच खनिज व खाण विकास नियमन कायदा (एमएमडीआर) १९५७ यांचे उल्लंघन होत असल्याचा दावा करण्यात आला आहे. हा परिसर आदिवासी समाजाच्या पारंपरिक हक्कांनी संरक्षित आहे. ग्रामसभेची संमती न घेता कोणतेही काम करणे हा कायद्याचा भंग आहे. स्थानिकांच्या इच्छेविरुद्ध खाण प्रकल्प लादण्याचा प्रयत्न आम्ही सहन करणार नाही. प्रशासनाने संबंधितांवर तातडीने गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी मोतकुरवार यांनी केली.

दरम्यान, या प्रकरणातील सर्व बेकायदेशीर कामे तात्काळ थांबविण्यात यावीत, संबंधित कंपन्या व अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी निवेदनातून केली आहे. निवेदन देताना सुरज जककुलवार यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. परिसरात सध्या तणावपूर्ण शांतता असून प्रशासनाच्या भूमिकेकडे स्थानिकांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलनाची तीव्रता वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


**महानिर्मिती**
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कं.मर्या.

**ई-निविदा सुचना-१४/२०२६-२७**

१) एम आय एस ई.नि १४९ कोड. ३००००६९२०२ :- औ. वि.के.पारस येथे दोन वर्षाच्या कालावधीसाठी (०१.०७.२०२६-३०.०६.२०२८) देखभाल कामांसहीत उपहारगृह चालवण्याचा कंत्राट.
(Esti. रू:- ४४७.११ लाख, EMD रू :- ४५०६१८/-)
१) ई निविदा अ.क्र. १ विक्रिचा कालावधी दि.२८.०५.२०२६ ते १७.०६.२०२६ सादर करण्याची दि १८.०६.२०२६ वेळ १६.०० वा.
टीप. सविस्तर माहिती करीता कृपया आमची वेब साईट पहावी
https://eprocurement.mahagenco.in

मुख्य अभियंता, औ.वि.केंद्र,पारस



**जाहीर प्रसिध्दी**

मी अमीरून्निसा अताउल्ला खाँ पठाण रा. टूनकी बु. तालुका संग्रामपूर जिल्हा बुलढाणा असे जाहीर करते की, माझा मुलगा साजिद रजा अताउल्ला खा पठाण ह्याचा जुने पासपोर्ट (क्र.K ६३२४३७६)मध्ये आईचे नाव AMIRUN NISA असे होते ते आज AMIRUNNISA ATAULLA KHA PATHAN रोजी असे आहे.
करिता प्रसिद्धी दिली आहे.

**आपला विश्वासू**
AMIRUNNISA ATAULLA
KHA PATHAN
At post Tunki bk
Taluka sangrampur
Dist Buldhana



NAME CHANGE
PASSPORT NO
J8891973
FILE NO
NGPZ05098511
OLD NAME
MOHAMMAD NADEEM RANGARI
NEW NAME
MOHAMMAD NADEEM MOHAMMAD HANIF RANGARI
ADDRESS
ANJUMAN SCHOOL ROAD, RANGARI KIRANA SHOP, BALAPUR, DIST AKOLA
MAHARASHTRA – 444001

FATHER NAME CHANGE
PASSPORT NO
J8891973
FILE NO
NGPZ05098511
OLD NAME
MOHAMMAD HANIF
NEW NAME
MOHAMMAD HANIF SABUDDIN RANGARI
ADDRESS
ANJUMAN SCHOOL ROAD, RANGARI KIRANA SHOP, BALAPUR, DIST AKOLA
MAHARASHTRA – 444001

MOTHER NAME CHANGE
PASSPORT NO
J8891973
FILE NO
NGPZ05098511
OLD NAME
NAZEMA BEGUM
NEW NAME
NAZEMA BEGUM MOHAMMAD HANIF RANGARI
ADDRESS
ANJUMAN SCHOOL ROAD, RANGARI KIRANA SHOP, BALAPUR, DIST AKOLA
MAHARASHTRA – 444001

## महत्त्वाचे

### राजा रणधीर सिंह काळाच्या पडद्याआड

**नवी दिल्ली:** भारतीय क्रीडा विश्वात सध्या दु:खाचे वातावरण आहे. कारण देशाचे दिग्गज नेमबाज आणि ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ आशियाचे माजी अध्यक्ष रणधीर सिंग यांचे निधन झाले. त्यामुळे क्रीडा विश्वात शोककळा पसरली आहे. त्यांच्या जाण्याने भारतीय क्रीडा क्षेत्रातील एका सुवर्ण युगाचा अंत झाला आहे.वयाच्या ७९ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसांपासून ते वयोमानानुसार उद्भवलेल्या आजारांशी झुंज देत होते. मात्र त्यांची झुंज अपयशी ठरली आहे. ते गेले अनेक दिवस हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते. मात्र आज त्यांनी प्राणज्योत मालवली आहे. राजा रणधीर सिंग यांचा जन्म १८ ऑक्टोबर १९५६ मध्ये पटियालामधील एका राजघराण्यात झाला होता.
राजा रणधीर सिंग यांनी बँकॉक येथील आशियाई खेळांमध्ये सुवर्णपदक जिंकले आहे. आशियाई खेळांच्या इतिहासात नेमबाजीत भारताला मिळालेले हे पहिलेच सुवर्णपदक होते. या एका पदकाने भारतामध्ये नेमबाजी या खेळाची पायाभरणी केली.

### साई सुदर्शनने चौकार मारला पण पंचांनी आऊट दिले

**मुंबई :** कर्णधार रजत पाटीदारच्या ९३ धावांच्या आक्रमक खेळीनंतर गोलंदाजांनी केलेल्या अचूक माऱ्याच्या जोरावर गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाने आयपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धेत क्वालिफायर-१ लढतीत मंगळवारी गुजरात टायटन्स संघावर ९२ धावांनी मात केली. यासह बेंगळुरू ने सलग दुसऱ्यांदा अंतिम फ ेरीत प्रवेश केला. गुजरात संघ आता क्वालिफायर-२ लढतीत हैदराबाद-राजस्थान यांच्यातील विजयी संघाशी लढेल. या सामन्यामध्ये असं काही घडलं की कोणालाही विश्वास बसला नाही. गुजरातची पहिली विकेट आरसीबीने घेतली नाही तर त्यांना देऊन टाकली गेली. साई सुदर्शन याने सुरूवातीपासूनच आरसीबीच्या गोलंदाजांवर तुटून पडत आपले इरादे स्पष्ट केले होते. पठ्ठ्याने दोन चौकार मारले त्यामुळे सामना अटीतटीचा होईल असे सर्वांना वाटले पण तिसऱ्या ओव्हरमध्ये ज्याची भीती तेच घडलं. साईने फटका मारला आणि चेंडू सीमारेषेच्या पार गेल्याने चौकार मिळाला खरा पण इकडे त्याच्या हातातील बॅट निसटली आणि मागे तो हिट विकेट ठरला.

# दिव्याची जगज्ज्ञेतीवर मात, ‘आर्मागेडॉन’ डावात वेन्जूनवर सरशी

**ओस्लो :दि.२७ वृत्तसंस्था**



भारताची युवा ग्रँडमास्टर दिव्या देशमुखने प्रतिष्ठेच्या नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत संस्मरणीय पदार्पण करताना पहिल्याच फेरीत महिला जगजेत्या जू वेन्जूनचा ‘आर्मागेडॉन’ डावात पराभव केला. विशेष म्हणजे, नागपूरच्या २० वर्षीय दिव्याने काळ्या मोहऱ्यांनी खेळताना बाजी मारली. खुल्या विभागात जगज्जेता दोम्माराजू गुकेश, आर. प्रज्ञानंद या भारतीयांनीही सकारात्मक सुरुवात केली.
रेटी/कॅटलान पद्धतीने खेळल्या गेलेल्या लढतीत दिव्याने पटाच्या मध्यभागावर नियंत्रण राखत जू वेन्जूनला प्रत्येक चालीसाठी विचार करायला भाग पाडले. दिव्याने हत्तीचा प्रभावी वापर करत बचाव भक्कम ठेवला. वेन्जूनने राजाच्या बाजूने आक्रमक चाली रचण्याचा प्रयत्न केला, पण दिव्याने अचूक खेळ करत वेन्जूनच्या राजावर दडपण निर्माण केले. अखेरीस ५२ चालींनंतर पारंपरिक डाव बरोबरीत सुटला. त्यानंतर बरोबरीची कोंडी फोडण्यासाठी झालेल्या ‘आर्मागेडॉन’ डावात दिव्याने शानदार खेळ करत विजय मिळवला.
‘आर्मागेडॉन’ डावात पांढऱ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या खेळाडूला १० मिनिटे, तर काळ्या मोहऱ्यांनी खेळणाऱ्या खेळाडूला ७ मिनिटांचा वेळ दिला जातो. पांढऱ्या मोहऱ्यांनी विजय मिळवणे आवश्यक असते, तर काळ्या मोहऱ्यांनी बरोबरीही पुरेशी ठरते. या दडपणाखाली दिव्याने संयम राखत विजय मिळवला. तिने अश्वाच्या अप्रतिम चालीने वेन्जूनला शरणागती पत्करण्यास भाग पाडले. त्या चालीमुळे वेन्जूनवर वजीर गमावण्याची वेळ आली आणि त्यानंतर पुनरागमन करणे तिला अशक्य झाले.

### गुकेश, प्रज्ञानंदचाही विजय

खुल्या विभागात गुकेश आणि प्रज्ञानंद यांनी आपल्या सामन्यांत ‘आर्मागेडॉन’ टायब्रेकमध्ये विजय मिळवला. गुकेशला जर्मनीचा ग्रँडमास्टर व्हिन्सेन्ट केमेरविरुद्ध संघर्ष करावा लागला. या दोघांमधील पारंपरिक डाव जवळपास पाच तास आणि १४४ चालींनंतर बरोबरीत सुटला. त्यानंतर टायब्रेकमध्ये गुकेश विजयी ठरला. दुसरीकडे, प्रज्ञानानंदने अमेरिकेचा ग्रँडमास्टर वेस्ली सो याच्याविरुद्ध पारंपरिक डाव बरोबरीत सोडवल्यानंतर ‘आर्मागेडॉन’मध्ये बाजी मारत १.५ गुण मिळवला.
महिला विभागातील अन्य भारतीय बुद्धिबळपटू कोनेरू हम्पीने मात्र निराशाजनक कामगिरी केली. तिला बिबिसारा असाउबायेवाने पारंपरिक डावातच पराभूत केले.

### कार्लसनला धक्का

मायदेशात विक्रमी आठव्या जेतेपदासाठी प्रयत्नशील असलेल्या मॅग्नस कार्लसनला पहिल्याच फेरीत पराभवाचा धक्का बसला. फ्रान्सच्या अलिरेझा फिरुझाने पाच वेळच्या जगज्ज्ञेत्या कार्लसनवर पारंपरिक डावातच मात केली. पायाला दुखापत असूनही या स्पर्धेत सहभाग नोंदवणाऱ्या फिरुझाचा कार्लसनवर हा पहिला ‘पारंपरिक’ विजय ठरला. ‘‘फिरुझाने मला सतत दडपणाखाली ठेवले आणि माझ्याकडून चुका झाल्या,’ असे कार्लसनने लढतीनंतर मान्य केले.

## आक्रमक पैलवानावर चढली वैभव सूर्यवंशीच्या खेळाची जादू!

### एलिमिनेटरसाठी दिला राजस्थान रॉयल्स च्या टीमला पाठिंबा

**मुंबई: दि.२७ वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ च्या सुरूवातीपासूनच १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने आपल्या नावाचा दबदबा कायम ठेवला आहे. तो एक वंडर चाईल्ड तर आहेच पण त्याची मेहनतही यामागे दिसून येत आहे. दिवसेंदिवस त्याच्या चाहत्यांच्या लिस्टमध्ये अनेक नावं वाढत चालली आहेत. आज सनरायझर्स हैदराबादसमोर वैभव सूर्यवंशी नक्की काय कमाल करणार त्याचीच चाहते वाट पाहत आहेत.
दरम्यान आक्रमक पैलवान ड्र्यू मॅकइंटायर वैभव सूर्यवंशीच्या फलंदाजीचा चाहता बनला आहे. आयपीएल २०२६ च्या एलिमिनेटर सामन्यापूर्वी, मॅकइंटायरने जिममध्ये वैभवचे नाव असलेली जर्सी घालून स्वतः चा एक व्हिडिओ पोस्ट केला, ज्याने संपूर्ण जगाचे सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. मॅकइंटायरने आपल्या सोशल मीडिया पोस्टला ‘चोझन वन’ असे कॅप्शन दिले. बुधवारी सनरायझर्स हैदराबादविरुद्ध राजस्थान रॉयल्सच्या नॉकआऊट सामन्यापूर्वी त्याची ही पोस्ट झटपट व्हायरल झाली. या आयपीएल हंगामादरम्यान, मॅकइंटायरने जसप्रीत बुमराहला प्रोत्साहन देणारी एक पोस्ट शेअर केली होती.आयपीएल २०२६ च्या एलिमिनेटर सामन्यात, १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीचा सामना एका बलाढ्य सनरायझर्स हैदराबाद संघाशी होईल, ज्याने स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्यात उत्कृष्ट फॉर्म दाखवला आहे. याशिवाय वैभव आज ख्रिसचा सिक्सर्सचा रेकॉर्डदेखील मोडणार की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. नियमित कर्णधार पॅट कमिन्स संघात परतल्यापासून, एसआरएचने आपल्या शेवटच्या सात लीग सामन्यांपैकी पाच सामने जिंकले आहेत.

## तो मैदानात आला अन् आरसीबीने सामना जिंकला

**धर्मशाळा: दि.२७ वृत्तसंस्था**

क्वालिफायर १ मध्ये गुजरात टायटन्सचा ९२ धावांनी दणदणीत पराभव करून रॉयल चॅलेंजर्स बेंगळूरने आयपीएल २०२६च्या अंतिम फेरीत प्रवेश केला. या दणदणीत विजयासह, आरसीबीने सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. या अत्यंत तणावपूर्ण सामन्यातील विजयानंतर, मैदानावर एक दृश्य पाहायला मिळाले ज्यामुळे आरसीबी चाहत्यांना विशेष आनंद झाला असावा.
दक्षिण आफ्रिकेचा दिग्गज खेळाडू एबी डिव्हिलियर्स गेल्या हंगामात आरसीबीच्या पहिल्या विजेतेपदाच्या वेळी संघासोबत होता आणि यावेळीही तो क्वालिफायर १ सामना पाहण्यासाठी धर्मशाला येथे आला होता. चाहते आता त्याला आरसीबीचा लकी चार्म मानतात. विराट आणि एबी डिव्हिलियर्स यांची मैत्री आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महान मैत्रींपैकी एक आहे. गेल्या काही वर्षांत, त्यांनी आरसीबीसाठी अनेक ऐतिहासिक भागीदारी रचल्या आहेत, ज्यात २०१६ मध्ये गुजरात लायन्सविरुद्धची २२९ धावांची ऐतिहासिक भागीदारी आणि २०१५ मध्ये वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सविरुद्धची २१५ धावांची भागीदारी यांचा समावेश आहे. जरी एबी डिव्हिलियर्सला आरसीबीसाठी एकही ट्रॉफी जिंकता आली नसली तरी, तो आजही संघाला आपलाच मानतो.
सामन्याबद्दल बोलायचे तर रसीबीच्या फलंदाजांनी मैदानावर धावांचे असे वादळ निर्माण केले की गुजरात टायटन्सच्या गोलंदाजांच्या डोळ्यात अश्रू आले.

## कगिसो रबाडाचा ‘रॉकस्टार’ परफॉर्मन्स!

**मुंबई: दि.२७ वृत्तसंस्था**




काल आयपीएल २०२६ मधील पहिला क्वालिफायरचा सामना पार पडला. धरमशाळा येथील स्टेडियमवर गुजरात टायटन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आमनेसामने आले होते. आरसीबीने गुजरात टायटन्सचा पराभव केला आहे. आरसीबी थेट अंतिम फेरीत पोहोचली आहे. मात्र गुजरातचा पराभव झाला असला तरी देखील कगिसो रबाडाने आपल्या नावावर एक रेकॉर्ड केला आहे.
आयपीएल २०२६ च्या पहिल्या क्वालिफायरमध्ये दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कगिसो रबाडाने नवा इतिहास रचला आहे. एकाच हंगामात पॉवर प्ले मध्ये सर्वाधिक विकेट्स घेणाराय गोलंदाज ठरला आहे. त्याने आरसीबीचा सलामीवीर व्यंकटेश अय्यरला बाद करून हा टप्पा गाठला. कगिसो रबाडाने पॉवर प्ले मध्ये सर्वाधिक विकेट्स घेण्याचा मोहम्मद शमीचा रेकॉर्ड मोडला आहे.
कगिसो रबाडाने केवळ मोहम्मद शामीला नव्हे तर, मिचेल जॉन्सन आणि ट्रेंट बोल्टला देखील मागे टाकले आहे. गुजरात क्वालिफायर १ पराभूत झाला असला तरी फायनलची आशा अजून जिवंत आहे.
सध्या रबाडा पर्पल कॅपच्या शर्यतीत आहे. त्याने आरसीबीविरुद्ध हा विक्रम केला आहे. वेंकटेश अय्यरला आउट करताच त्याचे हा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. शमीने २०२३ मध्ये पॉवर प्ले मध्ये १७ विकेट्स घेतल्या होत्या. आता रबाडाने १८ विकेट्स घेत नव्या विक्रम रचला आहे.

## खासगी प्रशिक्षण केंद्रांमुळे भारतीय ॲथलेटिक्सला नवी दिशा!

### बदलेली मानसिकता, मेहनत घेण्याची तयारीही निर्णायक

**पुणे : दि.२७ वृत्तसंस्था**



भारतीय ॲथलेटिक्समध्ये गेल्या काही वर्षांत लक्षणीय बदल दिसून येत असून विशेषत: ‘ट्रॅक अँड फील्ड’ प्रकारात भारतीय खेळाडूंचा वेग, सातत्य आणि आत्मविश्वास यामध्ये मोठी वाढ झाली आहे. अलीकडे झालेल्या फेडरेशन चषक स्पर्धेत ही प्रगती स्पष्टपणे दिसून आली. १०० मीटर शर्यतीत गुरिंदरवीर सिंग आणि अनिमेष कुजूर यांच्यातील चुरशीमुळे भारतीय धावपटू आता जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यास तयार होत असल्याचे संकेत मिळाले. या स्पर्धेत अवघ्या २४ तासांत १०० मीटरचा राष्ट्रीय विक्रम तीन वेळा मोडला गेला.
चारशे मीटरमध्ये विशालने ४५ सेकंदांच्या आत शर्यत पूर्ण करत नवा इतिहास रचला. हेप्टॅथलॉनमध्ये तेजस्विन शंकरने आठ हजार गुणांचा टप्पा गाठला, तर उंच उडीत महाराष्ट्राच्या सर्वे श कुशारेने उल्लेखनीय कामगिरी केली. अडथळा शर्यतीत तेजस शिरसे चमकला, तर हातोडाफ ेकमध्ये मनप्रीत कौरने प्रभाव पाडला, तर गोळाफेकमध्ये समरदीप सिंग गिल याने तेंजिदरपाल सिंग तूर याच्यासमोर आव्हान उपस्थित केले. भारतीय ॲथलेटिक्सपटूंच्या प्रगतीमागे खासगी प्रशिक्षण केंद्रे, खेळाडूंची बदलेली मानसिकता आणि मेहनत घेण्याची तयारी ही प्रमुख कारणे ठरत आहेत.
भारतीय ॲथलेटिक्सवर उत्तेजक सेवनाच्या घटनांचे सावट असले, तरी फेडरेशन चषकातील कामगिरी भारताच्या वाढत्या ॲथलेटिक्स क्षमतेचे सकारात्मक चित्र समोर आणते. या प्रगतीमागे खासगी प्रशिक्षण केंद्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. भारतीय ॲथलेटिक्स महासंघाने प्रशिक्षण व्यवस्थेत खासगी क्षेत्राचा सहभाग वाढवण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत. या केंद्रांमध्ये परदेशी प्रशिक्षक, वैज्ञानिक प्रशिक्षण पद्धती, पोषणतज्ज्ञ आणि आधुनिक उपकरणांची सुविधा मिळत असल्याने खेळाडूंच्या कामगिरीत सातत्याने सुधारणा होते.खेळाडूंच्या शरीररचनेचा अभ्यास, पावलांची हालचाल, वेग निर्माण करण्याची पद्धत, दुखापती टाळण्याचे तंत्र आणि योग्य आहार यावरही विशेष भर दिला जातो.

### एटीएममधून पैसे काढणे महागणार

**मुंबई:** वाढत्या इंधन किमती आणि वेतनवाढीमुळे कॅश लॉजिस्टिक्स कंपन्यांच्या अडचणी अधिकच वाढल्या आहेत. त्यांचा परिचालन खर्च अंदाजे २० टक्क्यांनी वाढला आहे. परिणामी, कॅश लॉजिस्टिक्स क्षेत्रात कार्यरत असलेल्या कंपन्यांनी बँकांकडून एटीएम व्यवस्थापन शुल्कात वाढ करण्याची मागणी केली आहे. उद्योग संघटनांचे म्हणणे आहे की, सध्याचा खर्च पाहता जुनी शुल्क प्रणाली आता टिकण्यासारखी नाही. पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार, कॅश लॉजिस्टिक्ससाठीची उद्योग संघटना असलेल्या करन्सी सायकल असोसिएशनने या मुद्द्यासंदर्भात इंडियन बँक्स असोसिएशनला पत्र लिहिले आहे. या संघटनेने एटीएम व्यवस्थापन आणि रोख वाहतूक सेवांच्या शुल्काचे पुनर्मूल्यांकन करण्याची मागणी केली आहे. सीसीएचे म्हणणे आहे की, वेगाने वाढणारा खर्च पाहता, शुल्क रचनेत त्वरित सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. संघटनेच्या मते, जर लवकरच यावर तोडगा काढला नाही, तर कॅश लॉजिस्टिक्स सेवांवर परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे एटीएम आणि इतर बँकिंग सेवांमध्ये वेळेवर रोख रक्कम पोहोचण्यास अडथळा निर्माण होऊ शकतो.
गेल्या काही काळापासून इंधनाच्या किमती सातत्याने वाढत आहेत. याचा थेट परिणाम रोख रक्कम पोहोचवणाऱ्या व्हॅन आणि सुरक्षा वाहनांच्या कामकाजावर झाला आहे. रोख रक्कम पोहोचवणाऱ्या कंपन्यांना दररोज एटीएम आणि बँकेच्या शाखांमध्ये मोठ्या प्रमाणात रोख रक्कम पोहोचवावी लागते. परिणामी, डिझेल आणि पेट्रोलच्या वाढत्या किमतींमुळे त्यांचा खर्च लक्षणीयरीत्या वाढला आहे.

# कर्ज काढून लावताहेत वेड्यासारखा पैसा!

## कोरियाच्या शेअर बाजारात विक्रमी तेजी, पण धोक्याची घंटा!

**नवी दिल्ली: दि.२७ वृत्तसंस्था**







अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर मध्यपूर्वेत निर्माण झालेल्या तणावाने जागतिक बाजारपेठा मंदावल्या आहेत, पण दक्षिण कोरियाची बाजारपेठ स्थिर राहिली आहे, आणि विशेषतः किरकोळ गुंतवणूकदार या बाजारावर पैसा छापायची मशीन म्हणून फिदा झाले आहेत.
भारतीय शेअर मार्केटसाठी २०२६ वर्षाचे पहिले पाच महिने काही निराशाजनक राहिले पण, दक्षिण कोरियाचा बाजार तेजीच्या रथावर सुस्साट वेगाने पळत आहे. यामुळे जगभरातील प्रमुख गुंतवणूकदारांना आश्चर्यचकित झाली असून कोरियाई शेअर बाजाराच्या इतिहासातील ही सर्वात मोठी तेजी मानली जात आहे.
दक्षिण कोरियाई बाजारातील या चित्तथरारक तेजीमुळे २०२६ सालातील एकूण नफा १००% वर पोहोचला असून निर्देशांकांच्या या कामगिरीने ‘डॉट-कॉम बबल’ फुटण्यापूर्वीच्या काळातील आणि १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धातील देशाच्या औद्योगिक भरभराटीच्या काळातील ऐतिहासिक तेजीलाही मागे टाकले आहे.
२०२६ मध्ये, दक्षिण कोरियाई शेअर बाजाराचा प्रमुख निर्देशांक, अधिक वाढीसह ८,१३१ अंकांच्या विक्रमी उचांकापलीकडे पोहोचला आहे. कोरियन बाजारातील या तेजीने १९९९ च्या अमेरिकन ‘डॉट-कॉम बबल’च्या ऐतिहासिक तेजीच्याही वरचढ ठरली आहे. डॉट-कॉम बबल अमेरिकेतील इंटरनेट कंपन्यांनी अनुभवलेल्या विक्रमी तेजीला म्हटले जाते. या काळात वर्षभरात अमेरिकन बाजार तेजीच्या रथावर स्वार झालेले तर कोरियन इक्विटी बाजाराने केवळ सहा महिन्यांतच विक्रमी तेजीचा स्पीड मिळवला आहे. इतकेच नव्हे तर परिस्थिती अशी आहे की, लोक कर्ज काढूनही शेअर बाजारात गुंतवणूक करत आहेत.कोरियन बाजारातील ही सुस्साट तेजी केवळ लहान कंपन्यांमुळे नव्हे, तर जगातील दोन सर्वात मोठ्या मेमरी चिप उत्पादक कंपन्या- सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स आणि एसके हायनिक्स - मुळे झाली आहे. यावर्षी सॅमसंगच्या शेअर्समध्ये १४९%, तर एसके हायनिक्सच्या शेअर्सनी २१५ टक्क्यांची दमदार तेजी अनुभवली आहे. बाजारातील ४२% हून अधिक हिस्सा एकट्या त्यांच्याकडेच आहे यावरूनच दक्षिण कोरियाच्या बाजारासाठी या दोन कंपन्यांचे महत्त्व यावरून लक्षात येते.

## कॉन्ट्रॅक्ट वर्कर्ससाठी सरकारचे कडक पाऊल

**नवी दिल्ली: दि.२७ वृत्तसंस्था**




संपूर्ण भारतात १ एप्रिलपासून अंमलबजावणीमुळे कंत्राटी कामगारांना म्हणजे कॉन्ट्रॅक्टवर काम करणाऱ्यांना महत्त्वाचा दिलासा मिळाला आहे. केंद्र सरकारच्या नवीन कामगार कायद्याच्या नियम १८५ नुसार, आता कंत्राटी कामगारांना दरवर्षी किमान २% वार्षिक पगारवाढ अनिवार्य असणार आहे.
ऑक्यूपेशनल सुरक्षा, आरोग्य आणि कामाची परिस्थिती केंद्रीय नियम, २०२६ अंतर्गत कोणतीही कंपनी किंवा कंत्राटदार आपल्या नियमित कॉन्ट्रॅक्टवरील कर्मचाऱ्यांना वार्षिक वेतनवाढ नाकारू शकत नाही. ८ मे २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनंतर, थर्ड पार्टी, म्हणजेच कंत्राटदारांमार्फत काम करणाऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत, जे अनेकदा फ ुल-टाइम कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सुविधांपासून वंचित राहतात.
केंद्रीय नियमांमधील नियम १८५ प्रामुख्याने कंत्राटदारांच्या नियमित कामगारांसाठी तयार केला गेला आहे. या नियमानुसार परस्पर संमत रोजगार अटींनुसार काम करणारे कंत्राटी कामगार दरवर्षी किमान २% वेतनवाढीस पात्र ठरतील. कॉन्ट्रॅक्टवर काम करणाऱ्यांचा पगार वर्षांनुवर्षे स्थिर राहतो अशा परिस्थितीत, या नवीन प्रणालीचा उद्देश थेट अशा कामगारांच्या उत्पन्नात सातत्यपूर्ण वाढ सुनिश्चित करण्याचा आहे जेणेकरून त्यांना फायनान्शिअल सिक्युरिटी मिळू शकेल.
सध्या हा नियम अशा संस्थांना लागू होतो जिथे केंद्र सरकार प्रमुख अथॉरिटी आहे. यामध्ये भारतीय रेल्वे, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाणी, तेलक्षेत्रे, प्रमुख बंदरे, हवाई वाहतूक सेवा, दूरसंचार, विमा कंपन्या आणि केंद्र सरकारच्या केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांचा समावेश आहे. त्याचवेळी, राज्य सरकारांच्याअधीन असलेल्या संस्थांसाठी राज्यांना स्वतःचे नियम अधिसूचित करावे लागतील.
नवीन कायद्यांतर्गत होणारी पगारवाढ केवळ कंत्राटदाराच्या ‘नियमित कामगार’ श्रेणीतील कर्मचाऱ्यांनाच मिळेल. म्हणजे कंपनीत नोकरी करणारे नाही पण, थर्ड-पार्टी कंत्राटदाराच्या वेतनपटावर काम करणाऱ्यांना या नवीन नियमाचा थेट फायदा होईल. एखादा कर्मचारी नियम १८५ अंतर्गत कंत्राटदार श्रेणीत येत असेल, तर त्याला वार्षिक वेतनवाढ अनिवार्य असेल. तसेच कंत्राटदार किंवा मुख्य कंपनीकडे स्वतंत्र मूल्यांकन किंवा वेतनवाढीचे धोरण नसले तरी, त्यांना सर्व परिस्थितीत नवीन कायद्यातील किमान वाढ देणे बंधनकारक असेल.

## ग्राहक नडला, बँकेला पंगा महागात पडला

**मुंबई: दि.२७ वृत्तसंस्था**




महाराष्ट्रातील संभाजीनगर येथील एटीएममधील एक किरकोळ तांत्रिक बिघाड एसबीआयसाठी एक मोठी समस्या बनली आहे. ग्राहकाच्या तक्रारीचे वेळेवर निराकरण करण्यात अयशस्वी ठरल्याबद्दल एसबीआयला आता नुकसान भरपाई आणि ५८,७०० रुपयांचा दंड भरावा लागणार आहे. हे प्रकरण संभागीनरगचे रहिवासी संबंधित आहे.
२०१६ मध्ये, त्यांनी एसबीआयच्या एटीएममधून १५०० रुपये काढण्याचा प्रयत्न केला, परंतु मशीनमधून फक्त ११०० रुपये मिळाले, म्हणजेच ४०० रुपयांची तूट आली. सुरुवातीला ही रक्कम किरकोळ वाटली, परंतु बँकेच्या निष्काळजीपणामुळे हे प्रकरण ग्राहक आयोगापर्यंत पोहोचले.
२०१६ मध्ये, व्यक्तीने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आवारात असलेल्या एसबीआयच्या एटीएममधून पैसे काढायला गेले. व्यवहार पूर्ण झाल्यावर त्यांच्या लक्षात आले की मशीनमधून पूर्ण रक्कम मिळाली नव्हती. त्यांनी तात्काळ बँकेला कळवले आणि ४ ऑक्टोबर २०१६ रोजी लेखी तक्रार दाखल केली. ही तक्रार बँकेच्या ग्राहक सेवा, नोडल अधिकारी आणि बँकिंग लोकपाल यांच्याकडे पोहोचवली. असे असूनही, बँक वेळेवर हा प्रश्न सोडवण्यात अयशस्वी ठरली. ते अनेक वर्षे बँकेत जात राहिले, पण त्यांना कोणताही दिलासा मिळाला नाही.
यानंतर हे प्रकरण जिल्हा ग्राहक आयोगाकडे पोहोचले. आयोगाने हे मान्य केले की, बँक ग्राहकाची तक्रार गांभीर्याने घेण्यात आणि आरबीआयच्या नियमांचे पालन करण्यात अयशस्वी ठरली. आयोगाने म्हटले की, ग्राहकाला वेळेवर दिलासा देणे ही बँकेची जबाबदारी होती. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार, जर एटीएममधून पैसे मिळाले नाहीत किंवा कमी मिळाले, तर बँकेने सात कामकाजाच्या दिवसांत तक्रार सोडवणे आवश्यक आहे.

अजिंक्य भारत
आपलं नागपूर
गुरूवार दि. २८ मे २०२६ www.ajinkyabharat.com


## थोडक्यात

### फ्लायओव्हर खाली आढळला वृद्धाचा मृतदेह

**नागपूर :** लकडगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीत ६५ वर्षीय अनोळखी वृद्धाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.
हा वृद्ध बेशुद्ध अवस्थेत फ्लायओव्हरखाली पडलेला होता, रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. माहितीनुसार, २७ मे २०२६ रोजी मध्यरात्री १.१५ वाजताच्या सुमारास लकडगंज हद्दीतील कृष्णा भोजनालय समोरील फ्लायओव्हरच्या खाली (पिलरजवळ) एक वृद्ध पुरुष बेशुद्ध अवस्थेत नागरिकांना आढळून आला. घटनेची माहिती मिळताच लकडगंज पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठून वृद्धाला उपचारासाठी मेयो रुग्णालयात दाखल केले.
मात्र, डॉक्टरांनी तपासून त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले. याप्रकरणी लकडगंज पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक सोनल शिंदे करत आहेत.

### विजेचा तीव्र धक्का

**नागपूर :** नंदनवन पोलीस ठाण्याच्या हद्दीत कुलरमध्ये पाणी भरत असताना विजेचा तीव्र झटका (इलेक्ट्रिक करंट) लागल्याने युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही धक्कादायक घटना खरबी रोडवरील गाडगे नगर परिसरात घडली. रवि सुभाष भालापुरे (वय ३६ वर्षे) असे मृत युवकाचे नाव आहे.
माहितीनुसार, रवि हा खरबी रोडवरील गाडगे नगर येथील धीरज भगत यांच्या घरात भाड्याने राहत होता. २६ मे २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास कुलरमध्ये पाणी भरत होता. यादरम्यान कुलरमध्ये उतरलेल्या विजेच्या तीव्र प्रवाहाचा त्याला जोरदार झटका बसला, ज्यामुळे तो जागीच बेशुद्ध पडला. घरमालक आणि नातेवाईकांनी त्याला तातडीने उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडीकल हॉस्पिटल) येथे दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी अंती त्याला उपचारापूर्वीच मृत घोषित केले., पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक निलेश दळवी करत आहेत..

### दीड लाखांचा ऐवज लंपास

**नागपूर :** एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जयताळा परिसरात एका घरात चोरट्याने धाडसी घरफोडी करून रोख रकमेसह सोन्या-चांदीचे दागिने, असा एकूण १ लाख ४६ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना २६ मे च्या मध्यरात्री घडली.
माहितीनुसार कविराज प्रेमदास मेश्राम ( फादर शाळेजवळ, जयताळा) यांच्या घराच्या तळमजल्यावर सिलिंगचे काम सुरू असल्याने, त्यांनी तळमजल्याला कुलूप लावले होते आणि ते आपल्या कुटुंबासह वरच्या माळ्यावर झोपण्यासाठी गेले होते. हीच संधी साधून २६ मे २०२६ रोजी मध्यरात्री ते सकाळी ९ वाजताच्या सुमारास चोरट्याने तळमजल्याच्या मुख्य दाराचे कुलूप आणि कढी-कोंडा तोडून घरात प्रवेश केला. चोरट्याने बेडरूममधील लोखंडी अलमारीतून १६,००० रुपये रोख आणि सोन्या-चांदीचे वेगवेगळे दागिने असा मुद्देमाल चोरून पोबारा केला. तक्रारीवरून पोलिसांनीगुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास आणि चोरट्याचा शोध पोलीस उपनिरीक्षक दिलीप थोरवे करत आहेत.

# भिक्षेकऱ्यांचे रस्त्यावरून सुरक्षिततेकडे पुनर्वसन

## मिशन मुक्ती-३ अंतर्गत मदत प्रक्रिया सुरू

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ : नागपूर शहराला भिक्षेकरीमुक्त आणि बालस्नेही शहर बनवण्याच्या उद्देशाने राबवण्यात येत असलेल्या मिशन मुक्ती – फेज ३ या विशेष मोहिमेला आता व्यापक गती मिळाली असून, नागपूर शहर पोलीस, नागपूर महानगरपालिका, महिला व बाल विकास विभाग, समाज कल्याण विभाग आणि विविध सामाजिक संस्थांच्या संयुक्त समन्वयातून मोठ्या प्रमाणात रेस्क्यू (सुटका), वैद्यकीय मदत आणि पुनर्वसन कार्य सुरू आहे.**



पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र कुमार सिंगल यांच्या मार्गदर्शनाखाली सीताबर्डी, सदर, जरीपटका व कपिलनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील एल.आय.सी. चौक, संविधान चौक, इंदोरा चौक, ऑटोमोटिव्ह चौक, मीठा नीम दर्गा, गड्डीगोदाम चौक, कडबी चौक या गजबजलेल्या परिसरांमध्ये विशेष मोहीम राबवली. यात नागपूर महानगरपालिका संचालित भिक्षेकरी निवारागृह, दिव्यवंदना आधार फाउंडेशन, हितज्योती फाउंडेशन, सह्याद्री फाउंडेशन तसेच आस्था शेल्टर होम या संस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवला. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर रस्त्यावर राहणाऱ्या निराधार, भिक्षेकरी व असुरक्षित नागरिकांना उष्माघातापासून संरक्षण देणे, त्यांना सुरक्षित निवारा, वैद्यकीय मदत व पुनर्वसन उपलब्ध करून देणे हा प्रमुख उद्देश आहे. मोहिमेदरम्यान एकूण ६० जणांना सुरक्षित ताब्यात घेऊन त्यांची पुनर्वसन प्रक्रिया सुरू करण्यात आली.ताब्यात घेण्यात आलेल्या सर्व बालकांना आणि महिलांना तातडीची वैद्यकीय सेवा व प्राथमिक मदत पुरवून, बालकांना पुनर्वसन व शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संबंधित बालगृहात सुपूर्द करण्यात आले आहे. सोबतच त्यांची वैद्यकीय तपासणी, समुपदेशन व कुटुंबीयांचा शोध सुरू असून या कारवाईमुळे शहरातील बालभिक्षावृत्तीच्या संघटित साखळीला आळा बसण्यास मदत झाली आहे.

> मी सर्व नागरिकांना आवाहन करतो की, या मोहिमेत आपण जास्तीत जास्त सहभागी होऊन आपल्या नागपूरला सुरक्षित व सुंदर शहर बनवूया.
> - डॉ. रवींद्र कुमार सिंगल
> पोलीस आयुक्त, नागपूर शहर

रस्त्यावर भिक्षा देऊन भिक्षावृत्तीला प्रोत्साहन देण्याऐवजी अशा गरजू व असुरक्षित व्यक्तींची माहिती संबंधित प्रशासन किंवा बाल संरक्षण यंत्रणेला द्यावी, जेणेकरून त्यांना योग्य मदत व पुनर्वसन उपलब्ध करून देता येईल. पोलीस, मनपा, सामाजिक संस्था आणि विविध विभागांच्या सातत्यपूर्ण समन्वयातून "मिशन मुक्ती – फेज ३" ही मोहीम नागपूर शहरातील सर्वात महत्त्वपूर्ण मानवतावादी आणि पुनर्वसन उपक्रमांपैकी एक ठरत असून, रस्त्यावरील असुरक्षित नागरिकांना सन्मानाने आणि सुरक्षिततेने जीवन जगण्याची नवी संधी उपलब्ध करून देत आहे.



# वैफल्यग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**कुही, दि. २७ :** रोजी तारणा ता. कुही येथे स्व. नरेश दादाजी निकुडे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. अल्पभूधारक शेतकरी असलेल्या स्व. नरेशजी यांच्याकडे अंदाजे २ ते ३ एकर शेती होती. याच शेतीच्या उत्पन्नावर त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह तसेच दोन मुलांचे शिक्षण सुरू होते.

मात्र सततची नापिकी, आर्थिक अडचणी आणि बँकेच्या कर्जवसुलीच्या तगाद्यामुळे नैराश्यातून त्यांनी टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या केली. त्यांच्या पश्चात पत्नी सौ. सविता, मुलगा संकेत व अक्षय असा परिवार आहे. यावेळी कुटुंबियांचे सांत्वन करून त्यांना धीर दिला तसेच वैयक्तिक स्वरूपात आर्थिक मदत करण्यात आली. यासंबंधाने जिल्हाधिकारी तथा तहसीलदार कुही यांच्याशी पिडीत कुटुंबाला तातडीने शासकीय मदत व्हावी यादृष्टीने चर्चा केली. मुलगा अक्षय यांच्या शिक्षणासाठी भविष्यात कोणतीही मदत लागल्यास आपण सदैव त्यांच्या पाठीशी राहू, असा विश्वास दिला. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब असून शासनाने अशा कुटुंबांना तातडीने आर्थिक मदत व आधार देण्याची गरज आहे.

# लोकसेवा हक्क अधिनियमाची काटेकोर अंमलबजावणी

## आयुक्त संदीप देशमुख स्वीकारला पदभार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** शासनाच्या सेवा प्रत्येक पात्र नागरिकाला पारदर्शक व कालमर्यादेत मिळाव्यात यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम महाराष्ट्र शासनाने अमलात आणला. यामुळे दप्तर दिरंगाई हा प्रशासनातील अडसर दूर होण्यात मोठया प्रमाणात मदत झाली. तथापी या अधिनियमाची नागपूर महसूल विभागात अधिक काटेकोर अंमलबजावणी व्हावी यासाठी आयुक्त म्हणून अधिक भर देऊ, असे प्रतिपादन संदीप देशमुख यांनी केले.

राज्य सेवा हक्क आयुक्त म्हणून त्यांनी आज आपला पदभार स्वीकारला. यावेळी महाराष्ट्राचे मुख्य माहिती आयुक्त राहूल पांडे यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.



राज्य सेवा हक्क अधिनियमाबाबत व्यापक प्रमाणात साक्षरता व्हावी यावर आपला भर राहील. शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये या अधिनियमाच्या अनुषंगाने कायदेविषयक जबाबदारीचे भान देण्यासह ज्या अधिकाऱ्यांनी आपली कार्यतत्परता उत्कृष्टपणे पार पाडली अशा अधिकारी कर्मचाऱ्यांनाही प्रोत्साहन म्हणून प्रशस्तीपत्र देऊ असे त्यांनी स्पष्ट केले. नागपूर महसूल विभागासाठी १ डिसेंबर २०२१ रोजी प्रथम आयुक्त म्हणून अभय यावलकर (से..नि. भा.प्र.से.) यांनी कार्यभार स्वीकारला होता. १० जानेवारी २०२६ रोजी त्यांचा कार्यकाळ संपुष्टात आला. संदीप देशमुख यांनी यापूर्वी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (अपर आयुक्त तथा विशेष सहकारी संस्था )येथे सचिव म्हणून काम केले आहे. गृहनिर्माण सहकारी संस्थांना सहकार कायद्यात स्वतंत्र स्थान निर्माण होण्यासाठी विशेष चॅप्टर तयार करण्यात त्यांचा विशेष सहभाग राहिला. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती येथे सचिव म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. कोविड काळात त्यांनी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत दिलेले योगदान उल्लेखनीय ठरले. ते कायद्याचे पदवीधर, असून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम दुरुस्ती व सुधारणा यासाठी त्यांनी कार्य पाहिलेले आहे.

# राष्ट्रीय महामार्गावरील अवैध वाहन पार्किंगविरुद्ध विशेष मोहीम

## वाहतूक अधिक सुरळीत व सुरक्षित होण्यास मदत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** पोलीस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार आणि अपर पोलीस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनात नागपूर ग्रामीण जिल्ह्यांतर्गत राष्ट्रीय महामार्गावरील सर्विस रोडवर अवैधरीत्या वाहन पार्किंग करणाऱ्यांविरुद्ध विशेष कारवाई मोहीम सुरू करण्यात आली आहे.

सदर मोहिमेअंतर्गत नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील पोलीस स्टेशन तसेच जिल्हा वाहतूक शाखा यांच्याद्वारे राष्ट्रीय महामार्ग व सर्विस रोडवरील वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर कठोर



कारवाई करण्यात येत आहे. विशेषतः पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील गोंडखैरी परिसरात राबविण्यात आलेल्या या विशेष कारवाईमुळे अवैध पार्किंगच्या प्रकारांमध्ये लक्षणीय घट झाली असून, सदर परिसरात ७१ वाहनांवर

> **मुख्य उद्देश**
> वाहतुकीचा प्रवाह सुळीत व कायम ठेवणे.
> अपघातांना प्रतिबंध करणे.
> रस्ते सुरक्षिततेला प्राधान्य देणे.

कारवाई करण्यात आलेली आहे. यामुळे वाहतूक अधिक सुळळीत व सुरक्षित होण्यास मदत झाली आहे.सदर विशेष मोहीम पुढील काळातही सातत्याने सुरू राहणार असून, सर्विस रोड व राष्ट्रीय महामार्गांवर अवैधरीत्या वाहन पार्किंग करणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल.

# कत्तलीच्या उद्देशाने डांबलेले ८६ गोवंश मुक्त!

## ८.६ लाखांचा मुद्देमाल जप्त

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**कामठी, दि. २७ :** जुनी कामठी ठाण्याच्या हद्दीत पोलिसांनी मध्यरात्री एकाच वेळी तीन वेगवेगळ्या ठिकाणी धाडसी छापे टाकून कत्तलीच्या उद्देशाने अत्यंत निर्घृणपणे कोंडून ठेवलेल्या ८६ गोवंश जनावरांची सुटका केली आहे. या कारवाईत अंदाजे ८ लाख ६० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, कामठी परिसरात यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

माहितीनुसार, २६ मे च्या रात्री २०:३० ते २७ मे च्या पहाटे २ वाजताच्या सुमारास जुनी कामठी पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार हद्दीत गस्त (पेट्रोलिंग) घालत होते. यादरम्यान गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलिसांनी भाजी मंडी, कुरेशी मोहल्ला परिसरातील चौधरी मशिदीच्या मागील मकबूल पैलवान याच्या घराबाजूची मोकळी जागा, फम्मो शेख यांच्या रिकाम्या घराच्या मागील बाजूचा कंपाउंडचा आतील भाग, पटेल क्लिनिकसमोरील रझा मैदानाच्या बाजूला असलेले लोखंडी टीनपत्र्याचे बंद गोडाऊन या तीन ठिकाणी पंचांसमक्ष एकाच वेळी छापा टाकला. याठिकाणी मिळून एकूण ८६ लहान-मोठी गोवंश जनावरे अत्यंत दाटीवाटीने, चारा-पाणी न देता, कत्तल करण्याच्या उद्देशाने निर्दयीपणे बांधून ठेवल्याचे आढळून आले. पोलिसांनी या सर्व जनावरांची सुटका करून त्यांची रवानगी 'गोसेवा समिती, गौशाळा, लुंबिनी नगर, कामठी, नागपूर' येथे सुरक्षितपणे केली आहे. जनावरांच्या मूळ मालकांचा शोध घेतला जात आहे. गोडाऊन आणि जागेचे मालक तसेच त्यांना मदत करणाऱ्या अज्ञात आरोपींविरुद्ध पोलीस उपनिरीक्षक मिना झाडे यांनी गुन्हा दाखल केला आहे: या मोठ्या कारवाईत जुनी कामठी पोलिसांसह पोलीस नियंत्रण कक्षाचे आर.सी. पी.पथक आणि एसआरपीएफ तुकडीतील अधिकारी व अंमलदारांनी संयुक्तपणे कामगिरी बजावली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार अभय मुन आणि सहकारी करत असून फरार आरोपींचा शोध सुरू आहे.

# सिद्धेश्वरी गोंड वस्तीत महावितरणचे विशेष शिबिर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** नागपुरातील सिद्धेश्वरी गोंड वस्ती परिसरातील नागरिकांना कायदेशीर आणि हक्काची वीज मिळवून देण्यासाठी महावितरणने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. या भागातील वीज ग्राहकांना अधिकृत जोडणी देण्याच्या उद्देशाने एका विशेष शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. महावितरणच्या या आवाहनाला वस्तीतील नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला असून, पहिल्याच दिवशी ५१ नागरिकांनी आपली आवश्यक कागदपत्रे आणि नवीन वीज जोडणीसाठीचा अर्ज महावितरणच्या अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केला आहे.

सुमारे २०० टिनाच्या झोपड्या असलेल्या या सिद्धेश्वरी गोंड वस्तीमध्ये मागील अनेक

## ५१ जणांचे वीज जोडणीसाठी अर्ज



दिवसांपासून वीज पुरवठ्याची मोठी समस्या निर्माण झाली होती. यापूर्वी या भागात लघुदाब वाहिनीवरून अनधिकृत मार्गाने म्हणजेच आकडे टाकून वीज चोरी केली जात होती. वाढती वीज चोरी आणि त्यामुळे निर्माण होणारे सुरक्षेचे धोके लक्षात घेऊन, काही दिवसांपूर्वी महावितरणने या परिसरातील जुन्या लघुदाब वीज वाहिनीच्या बदल्यात आधुनिक, अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेली आणि वीज चोरी अवरोधक केबल टाकण्याची धडक कारवाई केली. या तांत्रिक बदलामुळे अनधिकृत मार्गाने वीज घेणे अशक्य झाल्याने, वस्तीतील अनधिकृत वीज पुरवठा खंडित झाला होता आणि गेल्या काही दिवसांपासून येथील नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत होता. या तात्पुरत्या निर्माण झालेल्या अंधाराच्या स्थितीचा गैरफायदा घेत काही घटकांकडून वस्तुस्थितीची शहानिशा न करता, केवळ नकारात्मक चित्र रंगवण्याचा प्रयत्न झाला. लहान मुलांना समोर करून आणि चुकीची माहिती पसरवून काही माध्यमांमधून विदारक चित्र रंगविण्यात आले. मात्र, दुसरीकडे अशा प्रकारच्या अनधिकृत प्रकारांना आळा घालणेही तितकेच गरजेचे होते. या संपूर्ण पार्श्वभूमीवर, महावितरणने केवळ कारवाई करून न थांबता, नागरिकांच्या सुविधेसाठी थेट वस्तीतच विशेष शिबिर सुरू केले. नागरिकांना वीज जोडणीसाठी कार्यालयात चकरा माराव्या लागू नयेत, म्हणून प्रशासनाने ही थेट दारात सेवा उपलब्ध करून दिली. महावितरणच्या या सकारात्मक पुढाकारामुळे आणि वस्तीतील नागरिकांनी दाखवलेल्या सामंजस्यामुळे आता कायदेशीर वीज जोडणीचा मार्ग मोकळा झाला आहे. प्रशासनाचा हा समन्वय पाहता, उर्वरित नागरिकही लवकरच अधिकृत वीज जोडणी घेतील आणि संपूर्ण परिसर कायदेशीर विजेच्या प्रकाशाने उजळून निघेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## रूट मार्च ... विविध परिस्थितींवर नियंत्रण मिळवण्याचा सराव

# सावनेर येथे दंगल नियंत्रण योजनेचे प्रात्यक्षिक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**सावनेर, दि. २७ : आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत गांधी चौक येथे दंगल नियंत्रण योजनेचे प्रात्यक्षिक (मॉकड्रिल) आणि रूट मार्च आयोजित करण्यात आले होते. सदर मॉकड्रिलद्वारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी ढाल, लाठी, हेल्मेटसह सज्ज होऊन आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ प्रतिसाद देणे, जमाव नियंत्रण, दंगल परिस्थिती हाताळणे तसेच नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनांची प्रात्यक्षिके केली.**

सावनेर शहरातील मुख्य रस्त्यावरून नगरपरिषद क्रीडा ग्राउंड सावनेर, होळी चौक , जामा मशीद, मडकी चौक, जयस्तंभ चौक ,गडकरी चौक, गांधी चौक, पोलीस स्टेशन. मार्गाने रूट मार्च काढण्यात आला. रूट मार्चनंतर गांधी चौक सावनेर येथे मॉकड्रिल घेण्यात



आली. मॉकड्रिल दरम्यान पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दंगल नियंत्रण साहित्य, सुरक्षा उपकरणे तसेच शस्त्रसामग्रीसह विविध परिस्थितींवर नियंत्रण मिळवण्याचा सराव केला. सणोत्सव काळात गर्दीच्या ठिकाणी बंदोबस्त, वाहतूक नियंत्रण, संशयास्पद व्यक्तींवर लक्ष ठेवणे, अफवांवर नियंत्रण ठेवणे यासारख्या तत्काळ कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. नागरिकांनी सणोत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा करावा, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी तसेच कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास तत्काळ पोलीस प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले.

या मोहिमेत सावनेर उपविभागातील सर्व पोलीस स्टेशन (सावनेर, कळमेश्वर, खापा, केळवद) येथील अधिकारी व अंमलदार, पोलीस मुख्यालय येथील दंगल नियंत्रण पथकाचे पोलीस अंमलदार, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ४ चे अधिकारी व अंमलदार तसेच होमगार्ड यांनी यशस्वीरीत्या सहभाग नोंदवला. सदर दंगल नियंत्रण प्रात्यक्षिक आणि रूट मार्चमध्ये एकूण ६ पोलीस अधिकारी, ४९ पोलीस अंमलदार, राज्य राखीव पोलीस बलाचे १ अधिकारी व २५ अंमलदार तसेच होमगार्ड हजर होते.

# अव्यावसायिक अभ्यासक्रम: प्रथम वर्ष प्रवेशाचे वेळापत्रक घोषित

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. २७ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालयांमधील शैक्षणिक सत्र २०२६-२७ च्या प्रथम वर्ष अव्यावसायिक पदवी (यु.जी.) अभ्यासक्रमांचे प्रवेश वेळापत्रक घोषित केले आहे. विद्यापीठाने दिलेल्या निर्देशानुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांना आपापल्या स्तरावर ही प्रवेश प्रक्रिया राबवावी लागणार आहे.

जाहीर झालेल्या वेळापत्रकानुसार, महाविद्यालयांना विद्यार्थ्यांसाठी माहिती आणि प्रवेश पुस्तिका ३ जून २०२६ पासून उपलब्ध करून देता येईल. तसेच, इच्छुक विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश अर्ज भरण्यासाठी ३ जून ते २० जून २०२६ पर्यंतची मुदत देण्यात आली आहे. यानंतर प्रवेशाची गुणवत्ता आणि प्रतीक्षा यादी २२ जून २०२६ रोजी प्रसिद्ध केली जाईल. मुख्य गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया २३ जून ते ४ जुलै २०२६ दरम्यान पार पडेल, तर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी ५ जुलै ते ८ जुलै २०२६ दरम्यान प्रवेश प्रक्रिया राबवली जाईल. महाविद्यालयांना त्यांच्या गरजेनुसार समुपदेशन (Counseling) आणि स्पॉट ॲडमिशन प्रक्रिया राबवण्याची मुभाही देण्यात आली आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार संपूर्ण प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख ३ ऑगस्ट २०२६ असेल, अशी माहिती कुलसचिव डॉ. राजू हिवसे व उपकुलसचिव डॉ. राजेंद्र उतखेडे यांनी दिली आहे.

# अजिंक्य भारत आपलं अकोला

अकोला, गुरूवार, दि. २८ मे २०२६ www.ajinkyabharat.com

## बाल कीर्तनकार महोत्सवात महानगरातील बालकांचा सहभाग

**अकोला:** अखिल भारतीय कीर्तन संस्थेच्या वतीने झालेल्या बाल कीर्तनकार महोत्सवात महानगरातील चार बाल कीर्तनकारांनी सहभाग घेत उत्कृष्ट कीर्तने सादर करीत भाविकांची मने जिंकली. अ. भा. कीर्तन संस्थेचे अध्यक्ष माधव खरे यांच्या मार्गदर्शनात विठ्ठल रुक्मिणी मंदिर सभागृहात आयोजित या महोत्सवात नागपूर, पुणे, मुंबई, नेरळ समवेत अनेक जिल्ह्यांतील बाल कीर्तनकारांनी सहभाग घेत कीर्तन सादर केले. यात स्थानिक आदर्श गोसेवा कीर्तन कुल येथील डॉ. अभय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात संगीत अलंकारचे प्रशिक्षण घेणारे बाल विद्यार्थी दीप मंगेश कडू, स्मरण यशवंत देशपांडे, आराध्या प्रफुल लक्रस, स्वरांगी परेश व्हरसाळे आदींनी सहभाग घेतला.

**महत्त्वाचे**

## ट्रॅक्टरखाली येऊन चालकाचा दुर्दैवी मृत्यू



**अकोट :** तालुक्यातील बेलुरा येथे सध्या शेतीच्या मशागतीचे जोमाने कामे सुरू आहेत. शेतामध्ये काम सुरू असताना ट्रॅक्टर चालकाला अचानक चक्कर आल्याने तो ट्रॅक्टरखाली पडला. त्यामुळे चालकाचा जागेवरच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सविस्तर माहिती अशी की गणेश रामदास सोळंके वय ३२ असे संबंधित मृतक चालकाचे नाव आहे. दि.२७ मे बुधवारी दुपारी ५ वाजता दरम्यान गणेश ट्रक्टरने गावातीलच रामा सोळंके यांच्या शेतात फंटन मारत होता. त्याला चक्कर आल्याने चालू ट्रॅक्टरमध्ये तोल जाऊन मागील चाकात आला त्यामुळे जागेवरच त्याचा मृत्यू झाला. सदर घटनेची पोलिसांना माहिती मिळताच ग्रामीण पोलीस स्टेशनचे कर्मचारी बेलुरा येथे घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला व प्रेत अकोट ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले.घटनेचा पुढील तपास आकोट ग्रामीण पोलीस स्टेशनचे कर्मचारी करत आहेत.

# ‘मृत्यू महामार्गावर प्रशासन झोपेत!’

### रुंदीकरणाचा फाईलचा फेरा सुरूच; अपघातांत नागरिकांचे बळी, तरीही लोकप्रतिनिधी गप्प

। विठ्ठल महल्ले ।

**अकोला, दि. २७ : अकोला-मंगरूळनाथ राष्ट्रीय महामार्गावरील अकोला ते महान दरम्यानचा रस्ता आज अक्षरशः ''मृत्यूचा सापळा'' बनला असून, रुंदीकरणाच्या घोषणा आणि मंजुरींचे फक्त कागदी घोडेच दौडताना दिसत आहेत. वर्षानुवर्षे फाईलींचा खेळ सुरू असताना नागरिक मात्र रोज जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. अपघात, जखमी आणि मृत्यूंची मालिका सुरू असतानाही प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची संवेदनशीलता हरवली आहे का, असा संतप्त सवाल आता जनतेतून उपस्थित होत आहे.**



**■ दररोज मृत्यूशी सामना करणाऱ्या नागरिकांचा संयम आता सुटत चालला आहे. संबंधित विभागाने आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने ठोस निर्णय घेतला नाही, तर तीव्र जनआंदोलन उभारण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. ‘रस्ता अरुंद... व्यवस्था मुर्दाड... आणि नागरिकांच्या जीवाशी रोजचा जुगार!’ अशी संतप्त भावना आता अकोलेकरांच्या तोंडी ऐकायला मिळत आहे.**

अकोला-मंगरूळनाथ राज्य महामार्गाचे राष्ट्रीय महामार्गात रूपांतर होऊन जवळपास सहा वर्षांचा कालावधी उलटला. महामार्ग रुंदीकरणाचे काम मंगरूळनाथकडून महानपर्यंत करण्यात आले; मात्र महान येथील जलशुद्धीकरण केंद्रापासून अकोल्यापर्यंतचा सर्वाधिक वर्दळीचा पट्टा आजही अरुंद आणि धोकादायक अवस्थेतच आहे.

यामागचे मुख्य कारण म्हणजे रस्त्याच्या दुतर्फा असलेली अकोला महानगरपालिकेची जलवाहिनी. जलवाहिनी हलविण्यासाठी निधी नसल्याचे कारण पुढे करत राज्य शासन आणि महानगरपालिका दोघांनीही हात झटकले. परिणामी, पाच वर्षांपासून रुंदीकरणाचे काम थंडबस्त्यात पडले आहे.

दरम्यान, वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून या मार्गावर अपघातांची मालिकाच सुरू आहे. आठवड्याला मोठे अपघात तर रोज किरकोळ धडकांचे प्रकार घडत आहेत. अनेक निष्पाप नागरिकांनी आपला जीव गमावला असून, कित्येक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. तरीही संबंधित विभाग आणि लोकप्रतिनिधींकडून केवळ आश्वासनांची धूळफेक सुरू असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. विशेष म्हणजे, जलवाहिनी हलविणे आर्थिकदृष्ट्या शक्य नसल्याने पर्यायी उपाय म्हणून दोन्ही बाजूंना दीड मीटर रस्ता रुंद करणे आणि एक मीटर भराव टाकण्याची योजना तयार करण्यात आली. यासाठी निधीही उपलब्ध असल्याचे सांगितले जाते. मात्र धक्कादायक बाब म्हणजे, या कामाच्या निविदाच अद्याप काढण्यात आलेल्या नाहीत.

यामुळे प्रश्न उपस्थित होत आहे की, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातील अधिकाऱ्यांची उदासीनता याला कारणीभूत आहे की स्थानिक लोकप्रतिनिधींची निष्क्रियता? नागरिकांच्या जीवापेक्षा फाईलवरील सही अधिक महत्त्वाची झाली आहे का, अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे. २९ किलोमीटर लांबीच्या या मार्गातील सिंधी कॅम्प ते खडकी बायपासदरम्यान चौपदरीकरणाचे नियोजनही करण्यात आले आहे; मात्र त्या कामाच्या निविदाही अद्याप उघडण्यात आलेल्या नाहीत. शहरातील अनेक ठिकाणची अतिक्रमणे हटविणे महानगरपालिकेसाठी मोठे आव्हान ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

### भरधाव ट्रकची दोन दुचाकी व कारला जोरदार धडक

अकोला : अकोलामहान या अतिवर्दळीच्या आणि अरुंद मार्गावर मंगळवारी रात्री सुमारे १० वाजताच्या दरम्यान भरधाव ट्रकने दोन दुचाकी आणि एका कारला जोरदार धडक दिली. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र तिन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले. या मार्गावर सायंकाळी ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत वाहनांची मोठी गर्दी होत असल्याने नागरिकांना रस्ता ओलांडतानाही जीव मुठीत धरावा लागत आहे. वारंवार होणारे अपघात पाहता अकोलामहान मार्गाच्या रुंदीकरणाची मागणी पुन्हा जोर धरू लागली असून प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

## सोनोग्राफी सेंटर्सवर प्रशासनाची करडी नजर

### ट्रॅकिंग सिस्टीम होणार अधिक कडक

अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. २७ :** जिल्हा एड्स नियंत्रण समिती, तंबाखूविरोधी अभियान, तसेच गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायद्याअंतर्गत स्थापित समित्यांच्या बैठका बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडल्या. गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायद्यानुसार कडक कार्यवाही करण्यासाठी सोनोग्राफी सेंटर्सची अचानक तपासणी आणि धाडींची संख्या वाढवावी, तसेच ‘ट्रॅकिंग सिस्टीम’ प्रभावीपणे राबवावी. त्याचप्रमाणे, या कायद्याची व संबंधित उपक्रमांची व्यापक जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी मीना म्हणाल्या की, जिल्ह्यात पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. बेकायदेशीर गर्भलिंग निदानाबाबत माहिती देणाऱ्यास १ लाख रुपयांचे बक्षीस देण्याची तरतूद आहे. या तरतुदीबद्दल आणि कायद्याबद्दल लोकांमध्ये जागृती निर्माण करण्याचे निर्देश त्यांनी दिले. या बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, डॉ. आशा मिरगे, मोहन खडसे, डॉ. सीमा तायडे, प्रतिभा अवचार, डॉ. विनोद करंजीकर, समितीच्या विधी समुपदेशक ॲड. शुभांगी ठाकरे, डॉ. मनीष शर्मा, जिल्हा कार्यक्रम अधिकारी दर्शन जनईकर आदी उपस्थित होते.

### तंबाखूविरोधी मोहिमेचे आयोजन

कोटपा कायद्यांतर्गत तंबाखूजन्य पदार्थांच्या प्रतिबंधासाठी प्रत्येक शाळेत नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच या कायद्याच्या अंमलबजावणीचे अधिकार सर्व विभागप्रमुखांना देण्यात आले आहेत. जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त पोस्टर स्पर्धा, रील्स स्पर्धा यांसारखे विविध उपक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती आरोग्य विभागातर्फे देण्यात आली. दरम्यान, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील एआरटी (अँटी रिट्रोव्हायरल थेरपी) सेंटर राज्यात उत्कृष्ट ठरल्याबद्दल, या केंद्रातील सहकाऱ्यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

## ५ गोवंशांना जीवनदान, ९० हजारांचा मुद्देमाल जप्त

### कत्तलीच्या उद्देशाने पायवाटेने नेत असताना आरोपी ताब्यात



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** शहरातील अकोट फाईल पोलिसांनी ‘ऑपरेशन प्रहार’ मोहिमेंतर्गत प्रभावी कारवाई करत पाच गोवंशांची सुटका करून त्यांना जीवनदान दिले. या कारवाईत एका आरोपीस ताब्यात घेण्यात आले असून सुमारे ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. २७ मे २०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजताच्या दरम्यान अकोट फाईल पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी पोलीस ठाण्यात हजर असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक व्यक्ती काही गोवंशांना पायदळ अकोट रोडवरील सुफा शाळेच्या मागील मैदानातून कत्तलीच्या उद्देशाने विक्रीसाठी घेऊन जात आहे.

माहितीची खातरजमा करून पोलीस निरीक्षक शेख रहीम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तत्काळ सापळा रचला. पोलीस कर्मचारी प्रशांत इंगळे, हर्षल श्रीवास, इम्रान शाह व अमीर यांच्या पथकाने सुफा शाळेच्या मागील परिसरात पाळत ठेवली. दरम्यान, एक व्यक्ती पाच गोवंशांना पायदळ घेऊन जाताना आढळून आला. पोलिसांनी तत्काळ त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने आपले नाव आसिफ खान मोबीन खान (५२, रा. सोळाशे प्लॉट, मुनाफ वे गल्ली, कादरीपुरा, अकोट फाईल, अकोला) असे सांगितले. आरोपी हा ईद सणानिमित्त कुर्बानी व कत्तलीच्या उद्देशाने गोवंश विक्रीसाठी नेत असल्याचे निष्पन्न झाले. मुख्य रस्ता टाळून शेतातील पायवाटेने गोवंशांची वाहतूक केली जात असल्याचेही तपासात उघड झाले. या प्रकरणी पोलिसांनी पाच गोवंशांसह सुमारे ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपीविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९५५ चे कलम ५, ५(अ) व ९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेल्या पाचही गोवंशांना संगोपन व देखभालीसाठी म्हैसपूर येथील गोरक्षण संस्थेत दाखल करण्यात आले आहे.

## ईद-उल-अजहा आज उत्साहात साजरी होणार

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** अकोला शहरासह जिल्ह्यात आज (गुरुवार) इस्लाम धर्माचा प्रमुख सण ईद-उल-अजहा म्हणजेच बकरीद मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार आहे. रमजान ईदच्या (ईद-उल-फित्र) बरोबर ७० दिवसांनंतर येणारा हा सण अल्लाहप्रती असलेले समर्पण आणि हजरत इब्राहिम यांच्या ऐतिहासिक त्यागाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो.

या पवित्र दिवशी मुख्य नमाज जुने शहर येथील ईदगाह मैदानावर आणि जिल्ह्यातील इतर प्रमुख ईदगाह व मशिदींमध्ये वेगवेगळ्या वेळेनुसार अदा केली जाईल. या विशेष प्रार्थनेसाठी मुस्लिम बांधवांमध्ये कमालीचा उत्साह असून प्रशासनानेही ईदगाह आणि मशिदींच्या परिसरात चोख व्यवस्था ठेवली आहे. हा सण आनंद वाटण्याचा आणि गरीब व गरजू लोकांना मदत करण्याचा संदेश देतो. शहरातील विविध ठिकाणी होणाऱ्या नमाजच्या वेळा पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार शिवनी ईदगाह येथे सकाळी ८.०० वाजता, खदान ईदगाह येथे ९.१५ वाजता, तर अकोट फैल आणि शाही ईदगाह हरिहर पेठ येथे सकाळी ९.३० वाजता नमाज होईल.

## जिल्ह्यात एड्स रुग्णांमध्ये घट : जिल्हाधिकारी

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** दि २७ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा सभेत गेल्या दहा वर्षाचा एच आय व्हि रुग्णांचा आलेख घटता दिसून आल्याची माहिती एड्स पथकाने सादर केली. एच आय व्हि बाबत जनजागृती , तपासणी चे वाढते प्रमाण व त्या प्रमाणात रुग्णांची संख्या ही दिवसेंदिवस कमी होताना दिसून येत आहे. जिल्ह्यात प्राथमिक आरोग्य केंद्र ते जिल्हास्तरीय शासकीय रूग्णालयात मोफत एच आय व्हि निदान व औषधोपचार सुविधा शासनाने उपलब्ध करून दिल्या आहेत. एच आय व्हि ची





बाधा झालेला व्यक्ती औषधोपचारावर अगदी सामान्य जीवन जगू शकतो हे खरे असले तरी एच आय व्हि होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करणे ही काळाची गरज आहे असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. समाजातील तळागाळापर्यंत जाऊन अती जोखीम असलेल्या व्यक्तींची एच आय व्हि तपासणीसाठी नियोजन करावे असे आदेश त्यांनी आरोग्य विभागाला दिले. राज्यस्तरावर विविध निकषांच्या आधारावर उत्कृष्ट औषधोपचार केंद्रांच्या यादीत पहिल्या १० केंद्रामध्ये अकोला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील ए आर टी केंद्राचा समावेश झाला असून जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते राज्यस्तरीय प्रशस्तीपत्र ए आर टी केंद्रास देण्यात आले.

गर्भवती महिलांमध्ये एच आय व्हि बाधित मातांचे घटते प्रमाण बघून तिच्यापासून जन्मणाऱ्या प्रत्येक बाळाला एच आय व्हि चा संसर्ग होऊ नये यासाठी जनजागृती व गर्भवती मातेची वेळेत तपासणी असा द्वी सूत्री कार्यक्रम हाती घेण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले. या सभेला जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा माता बाळ संगोपन अधिकारी , निवासी वैद्यकीय अधिकारी, जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी एड्स प्रतिबंध व एड्स समितीचे इतर सदस्य उपस्थित होते.

## कामाचा बोजा वाढणार, पदोन्नतीचे प्रस्ताव धूळखात

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** महानगरपालिकेतून येत्या डिसेंबर महिन्याअखेर एकूण ३६ कर्मचारी सेवानिवृत्त होणार असून, इतर तीन कर्मचाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे. निवृत्त होणाऱ्या या कर्मचाऱ्यांमध्ये वर्ग-२ चा १ आणि वर्ग-३ च्या १४ कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याने, डिसेंबरनंतर महापालिकेत कर्मचाऱ्यांची मोठी वानवा जाणवणार आहे. याचा थेट परिणाम मनपाच्या प्रशासकीय कामकाजावर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महापालिकेत गेल्या अनेक वर्षांपासून नियमित पदभरती झालेली नाही; केवळ अनुकंपा तत्त्वावर काही जागा भरण्यात आल्या आहेत. त्यामुळे सध्या तांत्रिक आणि इतर महत्त्वाच्या विभागांतील कामे मानसेवी तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरवशावर सुरू आहेत. दुसरीकडे, दरवर्षी कर्मचारी सेवानिवृत्त होत असल्याने रिक्त जागांचा आलेख वाढतच आहे. सद्यस्थितीत महापालिकेत वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांची संख्या अधिक असली, तरी वर्ग-२ आणि वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांची संख्या पुरेशी नाही. अशातच या दोन्ही वर्गांतील एकूण १५ अनुभवी कर्मचारी यावर्षी सेवानिवृत्त होत आहेत. यामध्ये प्रभारी उपायुक्त विजय पारतवार, निवडणूक अधिकारी अनिल बिडवे, विधी अधिकारी शाम ठाकूर आणि नगररचना विभागातील शिरसाट यांच्यासारख्या महत्त्वाच्या अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्तीमुळे कामकाजाचा वेग मंदावण्याची भीती व्यक्त होत आहे.

दरम्यान, सेवानिवृत्त होणाऱ्या या कर्मचाऱ्यांपैकी काहींच्या पदोन्नतीचे प्रस्ताव गेल्या अनेक दिवसांपासून शासनाकडे धूळखात पडून आहेत. डिसेंबर महिन्यापूर्वी जर या प्रस्तावांना मंजुरी मिळाली, तर या कर्मचाऱ्यांना आर्थिक व सेवाविषयक लाभ मिळू शकतात; अन्यथा त्यांना सध्या कार्यरत असलेल्या पदावरूनच सेवानिवृत्त व्हावे लागेल. या वरिष्ठ कर्मचाऱ्यांसोबतच महापालिकेतील वर्ग-४ चे १८ कर्मचारी देखील डिसेंबरअखेर सेवानिवृत्त होत असल्याने मनपाचा आकृतीबंध अधिकच अडचणीत येण्याची चिन्हे आहेत.

## बकरी ईद पार्श्वभूमीवर अकोला पोलीस सज्ज

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** जिल्ह्यात गुरुवारी (दि. २८ मे) साजऱ्या होणाऱ्या बकरी ईद उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अकोला जिल्हा पोलीस प्रशासनाने व्यापक बंदोबस्त आणि विशेष उपाययोजना केल्या आहेत. गोवंश वाहतूक, अवैध कत्तल तसेच धार्मिक भावना दुखावणाऱ्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी जिल्हाभरात पोलीस यंत्रणा अलर्ट मोडवर ठेवण्यात आली आहे.

जिल्हा पोलीस प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, जानेवारी २०२६ पासून आजपर्यंत अवैध गोवंश वाहतुकीचे ७० गुन्हे दाखल करण्यात आले असून ३१४ गोवंशांची सुटका करण्यात आली आहे. तसेच गोमांस जप्ती संदर्भात ४६ गुन्हे नोंदवून तब्बल ४१०१ किलो गोमांस जप्त करण्यात आले आहे.

या कारवायांमध्ये एकूण १५६ आरोपींना अटक करून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. गोवंश तस्करी करणाऱ्या रेकॉर्डवरील गुन्हेगारांविरोधातही कठोर पावले उचलण्यात आली असून ३ एमपीडीए प्रकरणे आणि महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम ५६ अंतर्गत २ कारवाया करण्यात आल्या आहेत.

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर बाहेरील जिल्ह्यांतून होणारी गोवंश तस्करी रोखण्यासाठी जिल्ह्यातील १७ पोलीस स्टेशन हद्दीत एकूण २७ चेकनाके उभारण्यात आले आहेत. त्यामध्ये ६ आंतरजिल्हा चेकनाक्यांचा समावेश असून वाहनांची काटेकोर तपासणी सुरू आहे.

**मुक्त विद्यापीठाचा कारभार** | **सॉफ्टवेअरमधील बिघाडामुळे विलंब**

# जुनी प्रश्नपत्रिका मिळाल्याने परीक्षार्थींना मनस्ताप

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची उन्हाळी परीक्षा-२०२६ सुरू झाली आहे. मात्र, काही परीक्षा केंद्रांवर ई-मेलद्वारे २०२४ ची जुनी प्रश्नपत्रिका मिळाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. हा प्रकार लक्षात आल्यानंतर सुधारित (२०२६ ची) प्रश्नपत्रिका पाठवण्यात आली; परंतु या गोंधळात सुमारे पाऊण तास वाया गेला. त्यामुळे परीक्षार्थींना पेपरसाठी वेळ वाढवून देण्यात आला.



मुक्त विद्यापीठाच्या उन्हाळी परीक्षा-२०२६ सुरू झाल्या असून, सकाळी परीक्षार्थी वेळेवर केंद्रांवर पोहोचले होते. मुक्त विद्यापीठात सॉफ्टवेअरद्वारे परीक्षा केंद्रांना प्रश्नपत्रिका पोहचवल्या जातात. मात्र, सकाळी १०.३० वाजताच्या परीक्षेची प्रश्नपत्रिका सॉफ्टवेअरमधील बिघाडामुळे डाऊनलोडच झाली नाही. त्यामुळे सॉफ्टवेअरचा वापर न करता, सर्व परीक्षा केंद्रांवर ई-मेलद्वारे प्रश्नपत्रिका पाठवण्यात आली. परीक्षा केंद्रांनी त्या प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांच्या झेरॉक्स काढल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. मात्र, त्या प्रश्नपत्रिका वर्ष २०२४ च्या परीक्षेच्या असल्याचे समोर आल्याने परीक्षा केंद्रांवर एकच गोंधळ उडाला. त्यानंतर पुन्हा सुधारित प्रश्नपत्रिका ई-मेलद्वारेच परीक्षा केंद्रांना पाठवण्यात आल्या. दरम्यान, नियोजित वेळेनुसार १०.३० वाजता सुरू होणारी परीक्षा अखेर ११.१५ वाजता सुरू झाली. मात्र, विद्यार्थ्यांना नंतर वेळ वाढवून देत संपूर्ण तीन तासांचा अवधी देण्यात आला, अशी माहिती एलआरटी महाविद्यालय केंद्राचे प्रा. रतनलाल येऊल यांनी दिली. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला डिजिटल विद्यापीठ करण्याचा घाट घातला गेला होता. बरे झाले की शासन वेळीच जागे झाले आणि मुक्त विद्यापीठाला डिजिटल विद्यापीठ म्हणून मान्यता दिली नाही, अशी चर्चा यानिमित्ताने शिक्षण क्षेत्रात रंगली आहे.

### शासनाने कारवाई करावी

राज्य शासनाने परीक्षेच्या कामात हयगय किंवा बेजबाबदारपणे वागणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी; अन्यथा अशा प्रकारांमुळे विद्यार्थ्यांचा परीक्षा घेणाऱ्या संस्था आणि विद्यापीठांवरील विश्वासच उडून जाईल.

- **प्रा. डॉ. संजय खडक्कार,** माजी विद्वत परिषद सदस्य, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

## अपहरण प्रकरणातील पीडितेचा शोध; आतापर्यंत १३३ गुन्ह्यांचा उलगडा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** जिल्ह्यातील महिला व बालकांवरील अत्याचार तसेच अपहरण प्रकरणांच्या तपासात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, अकोला यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावत आतापर्यंत तब्बल १३३ गुन्ह्यांचा उलगडा केला आहे. ताज्या कारवाईत बाळापूर पोलीस ठाण्यात (पोलीस स्टेशनमध्ये) दाखल अपहरण प्रकरणातील पीडित मुलगी व आरोपीचा शोध घेण्यात कक्षाला यश आले आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी तसेच शहर उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडून महिला व बाल अत्याचारासंदर्भातील गुन्ह्यांचा तपास सुरू आहे. बाळापूर पोलीस ठाण्यात अप. क्र. ८८/२०२६ अंतर्गत कलम १३७(२) भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास १० मे २०२६ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे वर्ग करण्यात आला होता. तपासादरम्यान गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार पीडित मुलगी व आरोपी मुंबईतील मानखुर्द (पूर्व) परिसरात राहत असल्याची माहिती समोर आली. त्यानुसार वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथक तयार करून मुंबई येथे रवाना करण्यात आले. पथकाने सिंधुदुर्ग चाळ, महाराष्ट्र नगर, मानखुर्द परिसरात शोधमोहीम राबवून पीडित मुलगी व आरोपी अजीम खान अफजल खान (२०), रा. गाजीपुरा, बाळापूर, जि. अकोला याला ताब्यात घेतले. त्यानंतर दोघांना पुढील तपासासाठी अकोला येथे आणण्यात आले. पुढील कायदेशीर कारवाईसाठी तपास डायरीसह पीडित मुलगी व आरोपीला बाळापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलीस निरीक्षक कविता फुसे, महिला पोलीस हवालदार लतिका मैद, पोलीस हवालदार दिनेशकुमार शिरसाट, महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल वैशाली रणवीर, महिला पोलीस हवालदार शिल्पा मगर, वाहनचालक पोलीस कॉन्स्टेबल भागवत काळे तसेच पोलीस कॉन्स्टेबल गणेश खुपसे यांनी पार पाडली.

# अकोटात खत पुरवठ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता

## शेतकऱ्यांनी तक्रार करण्याचे प्रशासनाचे आवाहन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. २७ :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर अकोट तालुक्यासह जिल्ह्यात युरिया आणि डीएपी खतांच्या उपलब्धतेबाबत शेतकऱ्यांची चिंता वाढू लागली आहे. बाजारात या खतांच्या खरेदीसाठी कृषी केंद्रांबाहेर भर उन्हात शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा लागत असून, खत पुरवठा मंदावल्याचे चित्र दिसून येत आहे.

कृषी क्षेत्रातील चर्चेनुसार, जिल्ह्यात युरिया आणि डीएपी खतांचा बफर स्टॉक उपलब्ध करून देण्यात आला असला तरी नव्या पुरवठ्याचा वेग कमी झाल्याची माहिती समोर येत आहे. दुसरीकडे, काही खत कंपन्यांकडून 'लिंकिंग' पद्धतीचा अवलंब केला जात असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. त्यामुळे अनेक विक्रेत्यांनी युरिया व डीएपी खत खरेदीबाबत सावध भूमिका घेतल्याचे सांगितले जात आहे.



परिणामी बाजारात या खतांची उपलब्धता कमी झाल्याचे दिसत आहे. खरीप हंगाम जवळ आल्याने शेतकरी मोठ्या प्रमाणावर खत खरेदीसाठी गर्दी करत आहेत. मात्र मागणीच्या तुलनेत पुरेसा पुरवठा झाला नाही तर परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना वेळेवर खत उपलब्ध होत नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

दरम्यान, राज्य शासनाने युरिया आणि डीएपी खतांच्या लिंकिंगवर कठोर बंदी घालण्याचे आदेश दिले आहेत. तसेच या प्रकरणात दोषी आढळणाऱ्या कंपन्या किंवा विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. तथापि, आंतरराष्ट्रीय युद्धजन्य परिस्थितीमुळे खत निर्मिती आणि पुरवठा साखळीवर परिणाम झाल्याचे संबंधित सूत्रांकडून सांगितले जात आहे.

### लिंकिंग होत असल्यास शेतकऱ्यांनी तक्रार द्यावी

खत कंपन्या किंवा विक्रेत्यांकडून लिंकिंग पद्धतीचा अवलंब होत असल्यास शेतकऱ्यांनी लेखी तक्रार करावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. तक्रारदारांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल. प्राप्त तक्रारींची सखोल चौकशी करून संबंधित कंपन्या किंवा विक्रेत्यांविरुद्ध कठोर गुन्हे दाखल करण्याची तयारी प्रशासनाने दर्शविली आहे.

## महत्त्वाचे

### आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत एम. बी. कराटे संघाची चमकदार कामगिरी




**मूर्तिजापूर :** नेपाळमधील काकरबिटा येथे २२ ते २४ मे दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय ''मयूर कप'' कराटे स्पर्धेत एम. बी. कराटे संघाच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले. या स्पर्धेत भारत, श्रीलंका, भूतान आणि पाकिस्तानसह विविध देशांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन नेपाळचे पर्यावरण मंत्री कोशी प्रांत यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच आयोजक समितीच्या वतीने स्पर्धेचे अध्यक्ष गंगाधर जाधव यांच्या उपस्थितीत भारतीय संघाला विशेष सन्मानचिन्ह आणि कप प्रदान करण्यात आला. या स्पर्धेत महाराष्ट्रातून सहभागी झालेल्या एम. बी. कराटे संघाच्या खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कौशल्याचे प्रदर्शन करत अनेक पदके पटकावली.

### दिराने केला विधवा वहिनीचा विनयभंग

**पातूर:** पातूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या संत रविदास नगर येथे एका विधवा महिलेच्या घरात घुसून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी दिरासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिला विधवा असून ती आपल्या मुलांसह राहत असून शिलाईकाम करून उदरनिर्वाह करते. आरोपी शिवलाल भिका पुरुषोत्तम (वय ३२) हा तिचा दिर असून तोही त्याच परिसरात राहतो. दिनांक २४ मे २०२६ रोजी रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास फिर्यादी महिला घरी असताना आरोपी दारूच्या नशेत आला आणि कोणतेही कारण नसताना शिवीगाळ व वाद घालू लागला. फिर्यादीने त्याला दारू पिऊन घरी जाण्यास सांगितले असता, आरोपीने ''मला घरी जायचे नाही, तुझ्यासोबत झोपायचे आहे'' असे लज्जास्पद वक्तव्य करून तिचा विनयभंग केल्याचे तक्रारीत नमूद आहे. यानंतर फिर्यादीने आरोपीच्या कुटुंबीयांना समजावण्यासाठी संपर्क साधला असता कमला भिका पुरुषोत्तम (वय ५५), लीला संतोष चंचरे (वय ३६) आणि रुख्मिना (वय अंदाजे ३४) यांनीही फिर्यादीला अश्लील शिवीगाळ केल्याचा आरोप आहे.

### 'बार्टी'ला पूर्णवेळ महासंचालक द्यावा

**अकोला :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे येथे पूर्णवेळ महासंचालक नसल्याने संस्थेच्या कामकाजावर परिणाम होत असल्याचा आरोप करत, तात्काळ सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, अशी मागणी अकोल्यातील सामाजिक कार्यकर्ते तथा विधी अभ्यासक नितीन साहेबराव जामनिक यांनी मुख्यमंत्री व मुख्य सचिवांकडे ई-मेलद्वारे केली आहे. 'बार्टी' ही अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकासासाठी कार्यरत महत्त्वाची संस्था आहे. मात्र, पूर्णवेळ महासंचालक नसल्याने दैनंदिन कामकाज, धोरणात्मक निर्णय आणि शिष्यवृत्ती योजनांच्या अंमलबजावणीत अडथळे निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता व्यक्त करत, संस्थेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी बांधीलकी असलेला आणि संवेदनशील प्रशासकीय अधिकारी देण्याची मागणी करण्यात आली आहे.

## शाखा अभियंता राठोड यांची पाहणी

# मोखा-जानोरीमेड येथील निकृष्ट दर्जाचे हौद तोडण्याचे आदेश

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**जानोरीमेळ, दि. २७ :** मोखा-जानोरीमेळ ग्रामपंचायत अंतर्गत वार्ड क्रमांक १ आणि २ मध्ये गुरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी बांधण्यात आलेल्या हौदांच्या निकृष्ट दर्जाच्या कामाची अखेर प्रशासनाने दखल घेतली आहे. पंचायत समिती बाळापूरचे शाखा अभियंता राठोड यांनी प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित हौद तोडण्याचे स्पष्ट आदेश देणार असल्याचे सांगितले.सदर हौदांची लांबी सुमारे २२ फूट असून रुंदी साडेतीन ते चार फूट आहे.

दोन्ही गावांमध्ये हे हौद अवघ्या महिनाभरापूर्वी बांधण्यात आले होते. मात्र सुरुवातीपासूनच हौदांना मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या असून त्यात पाणी साठत नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली होती. दि. २७ मे २०२६ रोजी दुपारी पंचायत समिती बाळापूरचे शाखा अभियंता राठोड यांनी दोन्ही हौदांची पाहणी केली. पाहणीनंतर त्यांनी काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाल्याचे मान्य केले. ''ग्रामसेवकांना लेखी आदेश देऊन हे दोन्ही हौद तोडण्यास सांगितले जाईल. हौद तोडले नाहीत तर संबंधित बिल मंजूर करण्यात येणार नाही,'' असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, हे काम पंचायत समितीच्या निधीतून ग्रामपंचायतीमार्फत करण्यात आले होते. पंचायत समिती सभापती रामकृष्ण सोनटक्के यांनीही या कामावर नाराजी व्यक्त करत संबंधित ठेकेदार, ग्रामसेवक व ग्रामपंचायत प्रशासनाने निकृष्ट हौद तोडून नव्याने दर्जेदार बांधकाम करावे, असे निर्देश दिले. ग्रामपंचायत सदस्य हरिभाऊ ओंकार तायडे यांनी सांगितले की, या निकृष्ट कामाबाबत वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने सुरुवातीला दुर्लक्ष केले. मात्र वृत्तपत्रांत बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर प्रशासन जागे झाले आणि पाहणी करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते देवराव परघरमोर यांनी ग्रामपंचायतीच्या कारभारावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ग्रामसभा नियमित होत नसल्याचा तसेच ग्रामसेवक केवळ मासिक बैठकीपुरतेच उपस्थित राहत असल्याचा आरोप त्यांनी केला.

## भंते ज्ञानज्योती महास्थविर यांचे लोहारा येथे जंगी स्वागत

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कळंबी-महागाव, दि. २७ :** बाळापूर तालुक्यातील लोहारा गावात ताडोबा अभयारण्य परिसरातील प.पू. भंते ज्ञानज्योती महास्थविर व त्यांच्या संघाचे उत्साहात जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी 'जय भीम'च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

भंते ज्ञानज्योती महास्थविर हे प्रसिद्ध बौद्ध भिक्खू आणि सामाजिक कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. महाराष्ट्रासह देशभरात ते बुद्ध धम्माचा प्रचार-प्रसार तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे प्रबोधन करण्याचे कार्य करीत आहेत. धम्म, समता आणि



मानवतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी भंते ज्ञानज्योती महास्थविर विविध धम्म पदयात्रांचे आयोजन आणि नेतृत्व करतात. मुक्तीभूमी (येवला) ते त्रिरश्मी लेणी (नाशिक) या भव्य धम्म पदयात्रेचे त्यांनी यशस्वी आयोजन केले होते.

चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा अभयारण्य परिसरात 'संघरामगिरी' येथे त्यांचे मुख्य केंद्र असून, तेथे धम्म शिकवणी व प्रवचनांचे आयोजन केले जाते. विपश्यना, धम्म प्रवचने तसेच बौद्ध तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून ते समाजाला मार्गदर्शन करतात. याशिवाय लहान मुलांमध्ये बौद्ध धम्म आणि श्रमण संस्कृतीची जपणूक व्हावी यासाठी ते नियमितपणे बाल श्रमणेर शिबिरांचे आयोजनही करतात.

सध्या जलंब ते पातुर्डा दरम्यान पायी धम्मयात्रा सुरू असून, या यात्रेदरम्यान वेळ काढून भंते ज्ञानज्योती महास्थविर यांनी लोहारा गावाला भेट दिली. त्यांच्या उपस्थितीमुळे गावातील महिला संघ तसेच नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. महिला संघाने दिलेला वेळ हा ''सोन्याचा क्षण'' असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# गरीबांच्या ताटातील घासावर डल्ला?

## पातूरातील काही शिवभोजन केंद्रांवर बनावट नोंदींचा आरोप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**पातूर, दि. २७ :** गोरगरिबांना अल्प दरात भोजन उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेली शासनाची शिवभोजन योजना पातूर तालुक्यात कथित गैरव्यवहारांच्या भोवऱ्यात सापडल्याची चर्चा सुरू आहे. काही शिवभोजन केंद्र चालकांकडून बोगस लाभार्थी दाखवून शासनाच्या अनुदानाचा गैरवापर होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, शासनाच्या मोबाईल ॲपवर प्रत्यक्ष लाभार्थ्यांचे फोटो अपलोड करण्याऐवजी जुनी छायाचित्रे



किंवा आधी अपलोड केलेल्या फोटोंचे पुन्हा फोटो काढून नवे लाभार्थी दाखविले जात असल्याची चर्चा आहे. काही केंद्रांवर अत्यल्प प्रमाणात अन्न शिजवून अवघ्या काही तासांत १०० ते १७५ लाभार्थींना भोजन दिल्याचे दाखविले जात असल्याचा आरोपही होत आहे.

शासनाकडून प्रति थाळी २५ रुपये अनुदान दिले जाते, तर लाभार्थ्यांकडून १० रुपये घेतले जातात. मात्र भोजनाची गुणवत्ता, सीसीटीव्ही देखरेख आणि प्रत्यक्ष नोंदी याकडे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून सीसीटीव्ही फुटेज, ॲपवरील नोंदी आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांची पडताळणी करावी तसेच दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

❑ शिवथाळीबाबत येत असलेल्या तक्रारींची सखोल चौकशी करण्याचे आदेश पातूर पुरवठा निरीक्षकांना देण्यात आले आहेत.
**- येन्नवार,** जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला

❑ पातूर शहरासह तालुक्यात सुरू असलेल्या शिवथाळी केंद्रांची जिल्हा पुरवठा अधिकारी आणि त्यांच्या अधिनस्त कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक कारवाई करावी.''
**- दिगंबर खुरसडे,** तालुका अध्यक्ष, शिवथाळी केंद्र, पातूर

## नगरपालिकेच्या पोटनिवडणुकीदरम्यान मुख्याधिकारी दोन दिवस अनुपस्थित

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. २७ :** अकोट नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ४ च्या पोटनिवडणुकीची प्रक्रिया सुरू असताना मुख्याधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शशिकांत बाबर हे सलग दोन दिवस कार्यालयात अनुपस्थित असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

पालिकेच्या प्रभाग क्रमांक ४ ची पोटनिवडणूक जाहीर झाल्यानंतर दि. ७ मेपासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. तसेच उमेदवारांचे नामांकन अर्ज १८ ते २६ मेदरम्यान स्वीकारण्यात आले. या महत्त्वपूर्ण निवडणूक प्रक्रियेदरम्यान मुख्याधिकारी कार्यालयात उपस्थित नसल्याने विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय




होत असल्याची तक्रार समोर येत आहे.

दरम्यान, शहरात राष्ट्रीय जनगणना, अतिक्रमण हटाव मोहीम आणि पोटनिवडणुकीसारखी महत्त्वाची कामे सुरू असताना मुख्याधिकारी दोन दिवस गैरहजर राहिल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मुख्याधिकारी सुट्टीवर आहेत की अधिकृत बैठकीसाठी बाहेरगावी गेले आहेत, याबाबत कार्यालयात कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, मुख्याधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीबाबत कार्यालयातील नोटीस बोर्ड किंवा हरकत नोंदवहीमध्ये कोणतीही नोंद करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे सोशल मीडियावरही या विषयाची जोरदार चर्चा सुरू असून नागरिक संताप व्यक्त करत आहेत.शहरातील अतिक्रमण हटाव मोहीम संवेदनशील भागात सुरू असताना एखादी अनुचित घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार, असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

❑ गेल्या दोन दिवसांपासून मुख्याधिकारी शशिकांत बाबर कार्यालयात उपस्थित नाहीत. शहरात राष्ट्रीय जनगणना, पोटनिवडणूक आणि अतिक्रमण हटाव मोहीम सुरू असताना जबाबदार अधिकाऱ्यांची अनुपस्थिती ही गंभीर बाब आहे. मुख्याधिकारी सुट्टीवर किंवा बैठकीसाठी बाहेरगावी असल्यास त्याची नोंद नोटीस बोर्ड अथवा हरकत नोंदवहीमध्ये करणे आवश्यक आहे. या प्रकाराकडे वरिष्ठांनी गांभीर्याने लक्ष न दिल्यास संबंधितांविरोधात आंदोलन करण्यात येईल.
**- रोशन पर्वतकर,** जिल्हाध्यक्ष, वैद्यकीय आघाडी शिवसेना

## मुर्तिजापूर तालुक्याची मान्सून २०२६ पूर्वतयारी आढावा सभा



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मुर्तिजापूर, दि. २७ :** आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मुर्तिजापूर तालुक्याच्या मान्सून२०२६ पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. ही सभा सोमवार, दि. २६ मे २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता नगरपरिषद कार्यालय, मुर्तिजापूर येथील सभागृहात आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस मुर्तिजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार हरिष पिंपळे तसेच नगराध्यक्ष हर्षल साबळे यांची विशेष उपस्थिती होती. सभेचे अध्यक्षस्थान उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी भूषविले. सभेत आगामी मान्सून काळात विविध विभागांनी करावयाच्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. अतिवृष्टी, पूरस्थिती, नाल्यांची स्वच्छता, धोकादायक व जीर्ण इमारती, वीजपुरवठा, आरोग्य सेवा, आपत्ती व्यवस्थापन साहित्याची उपलब्धता, निवारा केंद्रांची तयारी, आपत्कालीन संपर्क व्यवस्था तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजनांबाबत संबंधित विभागांना सूचना देण्यात आल्या.

यावेळी आमदार हरिष पिंपळे यांनी सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवून काम करण्याचे आवाहन केले. नागरिकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी सतर्क राहण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच मान्सूनपूर्व कामांचे योग्य नियोजन व वेळेत अंमलबजावणी झाल्यास नैसर्गिक आपत्तीमुळे होणारी जीवित, पशुधन व वित्तीय हानी टाळण्यास मोठी मदत होईल, असेही त्यांनी सांगितले. नगराध्यक्ष हर्षल साबळे यांनी नगरपरिषद स्तरावर आवश्यक त्या सर्व पूर्वतयारीची कामे सुरू असून ती वेळेत पूर्ण करण्यात येत असल्याची माहिती दिली.

उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी सर्व यंत्रणांनी सतर्क राहून आपत्कालीन परिस्थितीत तातडीने प्रतिसाद देण्याचे निर्देश दिले. तसेच प्रत्येक विभागाने आपल्या नियंत्रण कक्षाची माहिती अद्ययावत ठेवून आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामग्री सज्ज ठेवावी, अशा सूचना तहसीलदार श्रीमती शिल्पा बोबडे यांनी संबंधित विभागप्रमुखांना दिल्या.

या बैठकीस शहर, ग्रामीण व माना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, गटविकास अधिकारी पंचायत समिती मुर्तिजापूर, मुख्याधिकारी नगरपरिषद मुर्तिजापूर, कृषी विभाग, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभाग, पाटबंधारे विभाग, जलसंधारण विभाग, सर्व राजस्व मंडळ अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि संबंधित यंत्रणांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

**मान्यता** | शासनाच्या ज्वारी खरेदीला प्रारंभ

# दहा हजार क्विंटल खरेदीचे उद्दिष्ट

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. २७ :** रब्बी पणन हंगाम २०२५-२६ अंतर्गत किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत ज्वारी खरेदी प्रक्रियेला अकोट येथे सुरुवात झाली आहे. तालुका खरेदी-विक्री संस्था तसेच कृषीभूषण फार्मर प्रोड्युसर कंपनी यांना कडधान्य, मका आणि ज्वारी खरेदीसाठी मान्यता देण्यात आली असून, तहसीलदार अकोट यांनी दि. २५ मे २०२६ रोजी यासंदर्भातील आदेश जारी केले आहेत.

दि. २४ मे २०२६ पासून ऑनलाईन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांकडून शासकीय धान्य गोदामात ज्वारी खरेदीला सुरुवात करण्यात आली आहे. शासन निर्णय क्रमांक



खरेदी-११२५/प्र.क्र.१८२/ना.पु.२९, दि. ४ नोव्हेंबर २०२५ नुसार एफएक्यू दर्जाची भरडधान्ये खरेदी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

खरेदी प्रक्रियेदरम्यान दैनंदिन अहवाल गोदाम व्यवस्थापकांकडे नियमित सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. अहवाल सादर करण्यात विलंब झाल्यास संबंधित संस्था जबाबदार राहील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. तसेच ज्वारी, मका किंवा इतर भरडधान्ये एफएक्यू दर्जाची नसल्यास ती स्वीकारण्यास किंवा ताब्यात घेण्यास नकार देण्याचा अधिकार गोदाम व्यवस्थापकांना देण्यात आला आहे. खरेदीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांचे सातबारा, ८-अ तसेच पीकपेरा ऑनलाईन तपासूनच धान्य खरेदी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

भविष्यात तपासणीदरम्यान सातबाऱ्यात फेरफार आढळल्यास संबंधित खरेदी केंद्राला जबाबदार धरून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. खरेदीपूर्वी केंद्रावर चाळणी, आर्द्रता तपासणी यंत्र, ग्रेडिंगसाठी आवश्यक साहित्य, बारदाना तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शासनाच्या अटी व शर्तींचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना तहसील कार्यालयाकडून देण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांची गोदामावर गर्दी होऊ नये यासाठी दररोज ४० ते ५० शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे खरेदीसाठी बोलावले जात असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**तालुका खरेदी-विक्री संघाचे व्यवस्थापक डी. एस. हिंगणकर यांनी सांगितले की, ''ज्या शेतकऱ्यांनी ज्वारी विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी केली आहे, त्यांनाच कार्यालयामार्फत एसएमएस पाठवून शासकीय गोदामात बोलावण्यात येत आहे. शासनाने २०२५-२६ हंगामासाठी १० हजार क्विंटल ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. यासाठी तालुक्यातील ८५९ शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे.**

अजिंक्य भारत

# आपलं वाशिम

अकोला, गुरूवार, दि. २८ मे २०२६ www.ajinkyabharat.com



# जिल्ह्यासाठी आणखी २०,३४० क्विंटल अनुदानित खतांचा साठा दाखल

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २७ :** खरीप पेरणीचा हंगाम अवघ्या महिनाभरावर येऊन ठेपल्याने जिल्ह्यातील बळीराजा शेतीकामांच्या नियोजनात व्यस्त झाला आहे. ऐन हंगामात खतांची तीव्र टंचाई भासू नये आणि अन्नदात्याची ऐनवेळी धावपळ होऊ नये, यासाठी प्रशासकीय पातळीवर अत्यंत वेगवान हालचाली सुरू आहेत. याच पार्श्वभूमीवर, वाशिम रेल्वे स्थानकावर रासायनिक खतांची आणखी एक रॅक दाखल झाली असून जिल्ह्यात तब्बल २०,३४० क्विंटल (२,०३४ मेट्रिक टन) खतांचा मोठा साठा उपलब्ध झाला आहे. थेट रेल्वे वॅगन्सद्वारे मोठ्या प्रमाणात खत पोहोचल्याने यंदाचा खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी चिंतामुक्त आणि सुकर होण्याची चिन्हे दिसत आहेत.





❑ शेतकऱ्यांनी केवळ डीएपी खताचाच आग्रह न धरता १२:३२:१६, १०:२६:२६, २०:२०:०:१३, युरिया, एसएसपी आणि टीएसपी यांसारख्या इतर पर्यायी खतांचा वापर करावा, जेणेकरून पिकांना संतुलित पोषण मिळेल आणि कृषी केंद्रांवर रांगा लावण्याची वेळ येणार नाही. कोणत्याही खतासोबत इतर औषधे किंवा बियाणे घेण्याची सक्ती केल्यास कृषी विभागाकडे तातडीने तक्रार करावी. साठेबाजी किंवा काळाबाजार करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल.

**अभिजित देवगिरकर,**
कृषी विकास अधिकारी, वाशिम

दाखल झालेला हा संपूर्ण साठा सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या आवाक्यातील म्हणजेच पूर्णपणे शासन अनुदानित खतांचा आहे. यामध्ये पिकांसाठी अत्यंत आवश्यक असणाऱ्या युरिया, डीएपी आणि १९:१९:१९ या प्रमुख रासायनिक खतांचा समावेश आहे. रेल्वे स्थानकावरील मालधक्क्यावर वॅगन्स लागताच हे खत उतरवण्याचे काम वेगाने सुरू झाले असून, ते तातडीने जिल्ह्यातील अधिकृत कृषी केंद्रांवर आणि विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्यांमध्ये वितरणासाठी रवाना करण्याची प्रक्रिया युद्धपातळीवर राबवली जात आहे.

वाशिम जिल्ह्याची वाढती मागणी लक्षात घेता, सद्यस्थितीत उपलब्ध झालेल्या या समाधानकारक साठ्याव्यतिरिक्त आणखी १,२१० क्विंटल (१२१ मेट्रिक टन) डीएपी खत रवाना करण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. खरीप पेरणीच्या मुख्य कालखंडात जिल्ह्यातील शेतकऱ्यांना एकाही बॅगसाठी वणवण भटकावे लागू नये, यासाठी कृषी विभाग आणि राज्य सरकारकडून नियोजन केले जात आहे.

मान्सूनच्या संभाव्य आगमनाचा अंदाज घेऊन जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी बियाणे आणि खते खरेदीचे आर्थिक गणित मांडण्यास सुरुवात केली आहे. ऐन पेरणीच्या वेळी बाजारात गर्दी किंवा कृत्रिम टंचाई निर्माण होऊ नये, म्हणूनच हा साठा वेळेपूर्वीच उपलब्ध करण्यात आला आहे. हंगामाच्या तोंडावरच मोठ्या प्रमाणात अनुदानित खत बाजारात आल्याने साठेबाजी करणाऱ्यांवर आणि चढ्या दराने खतांची विक्री करून शेतकऱ्यांची लूट करणाऱ्यांवर थेट वचक बसेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

कृषी विभागाने दिलेल्या माहितीनुसार, अनेकदा शेतकरी केवळ डीएपी खताचाच आग्रह धरतात, ज्यामुळे बाजारात विनाकारण कृत्रिम टंचाई सदृश परिस्थिती निर्माण होते. शेतकऱ्यांनी केवळ डीएपीवर अवलंबून न राहता इतर पर्यायी खतांचा वापर करावा. यामुळे पिकांना संतुलित पोषण तर मिळेलच, शिवाय कृषी केंद्रांवर खतांसाठी तासनतास रांगा लावण्याची गरजही पडणार नाही.

### हे आहेत उत्तम पर्यायी खतांचे पर्याय

१२:३२:१६, १०:२६:२६, २०:२०:०:१३, युरिया + एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट), टीएसपी (ट्रिपल सुपर फॉस्फेट) या पर्यायी खतांमध्येही पिकांच्या वाढीसाठी आवश्यक असणारे घटक योग्य प्रमाणात उपलब्ध असल्याने शेतकऱ्यांनी त्यांचा वापर वाढवावा, असे आवाहन तंत्रज्ञांनी केले आहे.

### दाखल झालेला एकूण अनुदानित खत साठा

युरिया: ११,००० क्विंटल, डीएपी: ५,७९० क्विंटल, १९:१९:१९ खत: ३,५५० क्विंटल, एकूण साठा: २०,३४० क्विंटल

## महत्त्वाचे

### प्राथमिक आरोग्य केंद्रात तपासणी शिबिर





**मानोरा:** तालुक्यातील पोहरादेवी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात २६ मे रोजी संशयित क्षयरुग्णांसाठी विशेष डिजिटल एक्स-रे तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ५७ संशयित रुग्णांची अत्याधुनिक मशीनद्वारे तपासणी करण्यात आली, तर ३२ जणांचे थुंकीचे (स्पुटम) नमुने पुढील तपासणीसाठी गोळा करण्यात आले. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. परभणकर आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. चापे यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. शिबिरात एक्स-रे तंत्रज्ञ अक्षय इंगळे यांनी रुग्णांची तपासणी केली. यावेळी उपस्थित नागरिकांना क्षयरोग (टीबी) आणि डेंग्यू या आजारांची लक्षणे तसेच घ्यावयाची काळजी याविषयी आरोग्य विभागाच्या वतीने सविस्तर मार्गदर्शन व आरोग्य शिक्षण देण्यात आले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिंदे, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. जाकीर हुसेन, औषध निर्माण अधिकारी अमोल राठोड, आरोग्य निरीक्षक पुंजाजी भागवत, जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई, प्रवीण जतकर यांच्यासह आरोग्य सेवक, गटप्रवर्तक प्रीती गाडगे, वाहनचालक कदीरभाई आणि स्थानिक आशा कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### मांगवाडी-साखरा रस्ता दुरुस्तीची मागणी

**रिसोड :** मांगवाडी फाटा-चिंचांबा भर मार्गे साखरा या राज्य मार्गाची तत्काळ दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी खासदार अनुप धोत्रे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंत्यांकडे पत्राद्वारे केली आहे. २२ मे रोजी त्यांनी यासंदर्भात निवेदन सादर केले. रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहनधारकांसह नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः मराठवाड्याला जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग असल्याने या रस्त्यावर दररोज शेकडो वाहनांची वर्दळ असते. केलसोला, साखरा तसेच हिंगोलीकडे जाण्यासाठी हा मार्ग सर्वात जवळचा आणि महत्त्वाचा मानला जातो. रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे अपघाताचा धोका वाढला असून, वाहनचालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे संबंधित मार्गाची तत्काळ दुरुस्ती करून आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, असे खासदार धोत्रे यांनी पत्रात नमूद केले आहे.

# बेलोरा जिल्हा परिषद शाळेची इमारत अतिधोकादायक; पालकांमध्ये चिंता

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २७ :** तालुक्यातील विठोली ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या बेलोरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इमारत अत्यंत जीर्ण झाली असून ती कोसळण्याच्या अवस्थेत आहे. शैक्षणिक वर्ष सुरू होण्यासाठी आता अवघा महिन्याभराचा कालावधी शिल्लक असतानाही ही जीर्ण इमारत पाडण्यात आली नसल्याने, आगामी काळात विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ही डेड हाऊस ठरत असलेली इमारत तातडीने पाडून तिथे नवीन इमारत बांधण्यात यावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते विशाल ठाकरे व ग्रामस्थांनी २० मे रोजी मनोराचे गटविकास अधिकारी यांना पुन्हा एकदा निवेदन सादर केले.

बेलोरा येथील या शाळेच्या दुरावस्थेबाबत विशाल ठाकरे गेल्या अनेक वर्षांपासून प्रशासनाकडे सतत पाठपुरावा करत आहेत. या पाठपुराव्याची दखल घेत वाशिमच्या उपशिक्षणाधिकाऱ्यांनी ९ मार्च रोजी या शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन जीर्ण इमारतीची पाहणी केली होती. तसेच, ही इमारत पाडून लवकरच नवीन वर्गखोली बांधून देण्याचे आश्वासन दिले होते. या संदर्भात मनोराच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांनी २० मार्च रोजी ठाकरे यांना लेखी पत्रही दिले होते. मात्र, त्यानंतर दोन महिने उलटूनही प्रशासकीय पातळीवर कोणतीही ठोस हालचाल झाली नाही. पावसाळा तोंडावर आला असतानाही जुनी इमारत न पाडल्याने पालकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी विलंब न लावता तात्काळ ही इमारत पाडावी आणि नव्या बांधकामाला सुरुवात करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

❑ बेलोरा येथील शाळा इमारतीच्या एका वर्गखोलीच्या बांधकामाला प्रशासकीय मंजुरी मिळाली असून, त्यासाठी १४ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. संबंधित जुन्या शाळा खोलीचे निर्लेखन (इमारत पाडण्याची प्रक्रिया) करून घेण्याबाबतच्या सूचना स्थानिक ग्रामपंचायतीला देण्यात आल्या आहेत.

**अनिल पवार,**
गटशिक्षणाधिकारी, मनोरा

# अरुणावती नदीच्या संगमावर पवित्र स्नानासाठी गर्दी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कोंडोली, दि. २७ :** सध्या सुरू असलेल्या पवित्र अधिकमासाचे निमित्त साधून तालुक्यातील प्रसिद्ध धार्मिक स्थळ असलेल्या श्रीक्षेत्र कोंडोली येथे भाविकांची दर्शनासाठी अफाट गर्दी उसळत आहे. त्यातच आज, २७ मे रोजी कमला एकादशी (पद्मिनी एकादशी) चा अत्यंत शुभ योग आल्यामुळे कोंडोली परिसराला एखाद्या मोठ्या यात्रेचे स्वरूप आले आहे. या विशेष पर्वणीवर हजारो महिला व पुरुष भाविकांनी येथील उत्तरवाहिनी अरुणावती नदी आणि संगमाच्या पवित्र स्थानी पहाटेपासूनच स्नानासाठी मोठी गर्दी केली होती.

श्रीक्षेत्र कोंडोली येथील श्री पितांबर महाराज (गुरु श्री गजानन महाराज) मंदिर हे संपूर्ण विदर्भात व परिसरात लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. अधिकमासाचे महात्म्य लक्षात घेऊन दररोज बाहेरगावांहून, तसेच कोंडोली व परिसरातील ग्रामीण भागातून हजारो भाविक दर्शनासाठी येथे दाखल होत आहेत. भाविक सर्वप्रथम अरुणावती नदीच्या पवित्र संगमावर श्रद्धेने स्नान करतात आणि त्यानंतर श्री पितांबर महाराजांच्या चरणी लीन होऊन दर्शनाचा लाभ घेत आहेत.

आज बुधवार, २७ मे रोजी अधिकमासातील महत्त्वपूर्ण मानली जाणारी कमला एकादशी असल्याने भाविकांच्या उत्साहाला उधाण आले होते. पहाटे ४ वाजेपासूनच मंदिर परिसर श्री गजानन महाराज आणि श्री पितांबर महाराज यांच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. दिवसभर मंदिरात दर्शनासाठी लांबच लांब रांगा लागल्याचे पाहायला मिळाले. भाविकांच्या या अलोट गर्दीमुळे कोंडोली गावातील बाजारपेठेतही मोठी आर्थिक उलाढाल होत असून, मंदिर परिसरात भजने, कीर्तने आणि धार्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले आहे.

# एकबुर्जी प्रकल्पावर मान्सूनपूर्व आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण संपन्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २७ :** पावसाळ्यात उद्भवणाऱ्या कोणत्याही आपत्तीचा सामना करण्यासाठी सर्व विभागांनी आपापसात चोख समन्वय आणि संपर्क ठेवणे अनिवार्य आहे. आपत्तीच्या काळात एकही जीवित किंवा वित्तहानी होणार नाही, याची काळजी यंत्रणेने घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने वाशीम तालुक्यातील एकबुर्जी प्रकल्पावर २६ मे रोजी एक दिवसीय मान्सूनपूर्व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, उपविभागीय पोलिस अधिकारी नवदीप अग्रवाल, तहसीलदार निलेश पळसकर, ग्रामीण ठाणेदार श्रीदेवी पाटील, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत आणि नागपूर एस पी आर एफ चे पोलीस उपनिरीक्षक बोंदर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना तहसीलदार निलेश पळसकर यांनी प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश स्पष्ट केला. स्थानिक लोकांमध्ये आपत्तीशी सुनियोजित लढा देण्याची संस्कृती निर्माण करणे हा या प्रशिक्षणाचा हेतू आहे. धोका आणि वाईट परिस्थितीचे योग्य विश्लेषण करून गावांनी स्वतःचा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करावा, जेणेकरून आपत्तीच्या काळात गाव प्रशासनाला बळकटी मिळेल,असे त्यांनी सांगितले. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, सद्यस्थितीत हवामान बदलामुळे अतिवृष्टी, पूर आणि वीज पडणे अशा आपत्तींचा धोका वाढला आहे.

# बंजारा समाजाच्या चौफेर विकासासाठी पोर्यातारा मिशन देशभरात कार्यरत

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. २७ :** हरितक्रांतीचे प्रणेते व महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे प्राथमिक शिक्षण झालेल्या विठोली येथील ऐतिहासिक शाळेत पोर्यातारा मिशन या संघटनेचे चार दिवसीय राष्ट्रीय चिंतन शिबिर उत्साहात पार पडले. बंजारा समाजाच्या चौफेर विकासासाठी हे मिशन संपूर्ण भारतभरातील आपल्या संघटन सहकाऱ्यांच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न करेल, असा ठाम आशावाद संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. डॉ. पंडित चव्हाण यांनी समारोप प्रसंगी व्यक्त केला.

विठोली येथील जिल्हा परिषद शाळेत मागील चार दिवसांपासून या विशेष चिंतन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



संघटनेचे राष्ट्रीय पदाधिकारी तथा तांडा सुधार समितीचे महासचिव नामा बंजारा यांच्या पुढाकाराने आणि अथक परिश्रमातून हे शिबिर यशस्वी झाले. या शिबिराचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, यात देशभरातील नामवंत विधीज्ञ, प्राध्यापक, डॉक्टरेट मिळवलेले शिक्षणतज्ज्ञ आणि बंजारा सामाजिक चळवळीतील अग्रगण्य कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून विविध विषयांवर सखोल मंथन केले.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. चव्हाण यांनी बंजारा समाजाच्या सद्यस्थितीवर आणि आरक्षणाच्या मुद्द्यावर तीव्र चिंता व्यक्त केली. ते म्हणाले की, संपूर्ण भारतभरात समान बोलीभाषा, एकाच प्रकारच्या रितीभाती, पारंपरिक पेहराव आणि समृद्ध व वैभवशाली संस्कृती असलेला बंजारा समाज विखुरलेला आहे. मात्र, महाराष्ट्रात शासनाच्या उदासीन धोरणामुळे या समाजाला अनुसूचित जमातीच्या हक्काच्या आरक्षणापासून अद्यापही वंचित राहावे लागत आहे. इतकेच नव्हे तर, सद्यस्थितीत राज्यात मिळणाऱ्या तुटपुंज्या आरक्षणातही इतर घटकांकडून होणाऱ्या घुसखोरीला बंजारा समाजाला सामोरे जावे लागत आहे, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. शासनाने या प्रकाराला तात्काळ आळा घालून बंजारा समाजाला न्याय द्यावा, अशी आग्रही मागणी या शिबिराच्या माध्यमातून संघटनेच्या वतीने करण्यात आली. या चार दिवसीय दौऱ्यादरम्यान, शिबिरात सहभागी झालेल्या देशभरातील सर्व पदाधिकारी आणि प्रतिनिधींनी बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पोहरादेवी या तीर्थक्षेत्राला भेट दिली.

# जैन साधू-संतांच्या सुरक्षेसाठी राष्ट्रीय संत सुरक्षा धोरण लागू करण्याची मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा, दि. २७ :** रीवा मध्यप्रदेश येथे सध्या ग्रीष्मकालीन वाचनेकरिता वास्तव्यास असलेल्या जैन आर्यिका श्रुतमती व उपशममती माताजींचा रस्ते अपघातात दिनांक २० मे ला झालेला घटनेत मृत्यू झाल्याची क्लेशदायक घटना असून, या प्रकरणाची उच्चस्तरीय निष्पक्ष चौकशी करण्यात यावी आणि भविष्यात जैन साधू-संतांच्या सुरक्षेसाठी देशपातळीवर ठोस राष्ट्रीय संत सुरक्षा धोरण लागू करण्यात यावे, या मागणीसाठी आज समस्त जैन समाजाच्या वतीने माननीय तहसीलदारामार्फत जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक,मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले.

नुकत्याच घडलेल्या आर्यिका माताजींच्या अपघात प्रकरणाबाबत जैन समाजात तीव्र दुःख आणि संताप व्यक्त होत आहे. उपलब्ध तथ्ये आणि व्हिडिओ क्लिप्स पाहता हा केवळ एक अपघात नसून घातपाताचा संशय निर्माण करणारी घटना आहे, अशी भीती समाजाने निवेदनात व्यक्त केली आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची एसआयटी किंवा न्यायिक चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

जैन साधू-संत हे पूर्णपणे निशस्त्र, अहिंसक आणि पायी विहार करणारे तपस्वी असतात. ते कोणत्याही प्रकारची सुरक्षा किंवा वाहन वापरत नाहीत. केवळ पायी चालून संपूर्ण समाजात शांतता आणि संयमाचा संदेश देणाऱ्या या संतांवर सातत्याने होणारे जीवघेणे हल्ले आणि वाढते अपघात ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.

यावेळी समस्त जैन समाजाच्या वतीने निवेदनाबद्दल जैन धर्मगुरूंचे रक्षण करण्याबाबत प्रमुख मागण्या करण्यात आल्या, यामध्ये उच्चस्तरीय चौकशी, अपघाताच्या घटनेची एसआयटी मार्फत निष्पक्ष चौकशी व्हावी, परिसरातील सर्व सीसीटीव्ही आणि डिजिटल पुरावे सुरक्षित करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

## ओडीएफ प्लस मॉडेल | जिल्हा परिषदेने आता कसली कंबर

# महिनाभरात १०० गावे हागणदारीमुक्त करण्याचे प्रशासनाचे उद्दिष्ट

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २७ :** स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील जास्तीत जास्त गावांना 'ओडीएफ प्लस मॉडेल' (हागणदारीमुक्त अधिक) श्रेणीत आणण्यासाठी जिल्हा परिषदेने आता कंबर कसली आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील स्वच्छतेची गती वाढवण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी दिलेल्या कडक निर्देशानंतर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे यांनी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन अंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांची एक तातडीची आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी गेल्या सहा महिन्यांत जिल्ह्यात एकही गाव मॉडेल म्हणून घोषित न





झाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली असून, पुढील ३० दिवसांत १०० गावे ओडीएफ प्लस मॉडेल करण्याचे कडक उद्दिष्ट प्रशासनाला दिले आहे.

जिल्हा परिषदेत पार पडलेल्या या महत्त्वपूर्ण बैठकीदरम्यान अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी कामात दिरंगाई करणाऱ्या यंत्रणेला चांगलाच डोस दिला. ओडीएफ प्लस मॉडेलसाठी आवश्यक असलेली आणि प्रलंबित राहिलेली कामे पूर्ण करण्यास टाळाटाळ करणाऱ्या कर्मचाऱ्यांची थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनात सुनावणी लावण्याचे निर्देश त्यांनी दिले. कामातील सुस्तपणा खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा देत त्यांनी बैठकीतूनच जिल्ह्यातील सहाही तालुक्यांच्या गटविकास अधिकाऱ्यांना (बीडीओ) दूरध्वनीवरून संपर्क साधला आणि या विषयाचे गांभीर्य त्यांच्या लक्षात आणून दिले.

ग्रामीण भागातील या मोहिमेला गती देण्यासाठी तालुकानिहाय उद्दिष्ट ठरवून देण्यात आले आहे. यामध्ये रिसोड तालुक्यासाठी ५ गावे आणि मानोरा तालुक्यासाठी १५ गावांचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. याशिवाय उर्वरित कारंजा, मंगरूळपीर, मालेगाव आणि वाशिम या चारही तालुक्यांना प्रत्येकी २० गावे मॉडेल करण्याचे टार्गेट देण्यात आले आहे. पुढील एका महिन्यात हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी करायच्या कार्यवाहीचे एक सूक्ष्म नियोजन (मायक्रो प्लॅनिंग) या बैठकीत तयार करण्यात आले. या बैठकीला विस्तार अधिकारी सचिन गटलेवार यांच्यासह जिल्हा कक्षातील तज्ज्ञ सल्लागार आणि तालुकास्तरावरील गट समन्वयक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सर्वोच्च न्यायालयाच्या विविध मार्गदर्शक तत्त्वांचा दाखला देत, देशात लागू झालेल्या घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६ ची काटेकोर अंमलबजावणी गावस्तरावर करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याचे आवाहन किरण कोवे यांनी केले. तसेच शासनाच्या निर्देशानुसार ग्रामीण भागात स्वच्छता आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी "स्वच्छ गाव, सुरक्षित जलवायु" ही विशेष जनजागृती मोहीम युद्धपातळीवर राबविण्याच्या सुचनाही त्यांनी अधीनस्थ कर्मचाऱ्यांना दिल्या.

दरम्यान, या बैठकीत एक भावनिक प्रसंगही पाहायला मिळाला. शासनाकडून वेळेवर निधी प्राप्त न झाल्यामुळे जिल्हा व तालुका पातळीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे गेल्या ६ महिन्यांपासून वेतन थकले असल्याची व्यथा कर्मचाऱ्यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमोर मांडली.

# शेतीच्या वादातून दोन गटांत हाणामारी, आठ जणांवर गुन्हा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरूळपीर, दि. २७ :** तालुक्यातील पेडगाव येथे शेतीच्या वादातून दोन गटांत झालेल्या हाणामारी झाली. पोलिसांनी दोन्ही गटांतील आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे परिसरात काहीकाळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

विनोद जाधव यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, त्यांनी सन २०२४ मध्ये राजूसिंग चव्हाण यांच्याकडून ४६ आर शेती खरेदी केली होती. २३ मे रोजी ते पत्नीसमवेत शेतात काम करत असताना आरोपी गणेश चव्हाण, राजूसिंग चव्हाण, सुरेश चव्हाण व अर्चना चव्हाण यांनी शेतामध्ये धुरा पाडण्यावरून वाद घातला. यावेळी आरोपींनी शिवीगाळ करत मारहाण केली. गणेश चव्हाण याने हातातील विळ्याने वार करण्याचा प्रयत्न केला. विळा डोक्यावर लागल्याने जखम झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच मारहाण करून जीवे मारण्याची धमक दिल्याचा आरोप करण्यात आल आहे. वादावरून दुसऱ्या गटातील राजूसिंग चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, शेतातील अतिक्रमणाच्या पंचकमिटीसमोर चर्चा सुरू असताना वाव निर्माण झाला. यावेळी विनोद जाधव यांनी अश्लील शिवीगाळ केल्याच आरोप करण्यात आला आहे. त्यानंत वर्षा जाधव व कांताबाई राठोड यांनी दगड मारून मारहाण केली, तर केशव राठोड व विनोद जाधव यांनी शिवीगाळ करत धमक्या दिल्याचे तक्रारीत म्हटल आहे. दोन्ही बाजूंच्या तक्रारीवरून मंगरूळपीर पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# विराहित परिसरात जिओ नेटवर्क सेवा ठप्प; मोबाईलधारक त्रस्त

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मुर्तिजापूर, दि. २७ :** मुर्तिजापूर तालुक्यातील विराहित परिसरातील गावांमध्ये गेल्या दोन वर्षांपासून जिओ नेटवर्कची गंभीर समस्या निर्माण झाली असून नागरिकांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. मोबाईल नेटवर्क अत्यंत कमजोर असल्याने साधे कॉलिंगही व्यवस्थित होत नसल्याची तक्रार ग्राहकांकडून करण्यात येत आहे.



स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, व्हॉट्सअॅप व्हिडिओ कॉल तर दूरच, साधे फोन कॉलदेखील अनेकदा लागत नाहीत. इंटरनेट डाटा उपलब्ध असूनही नेटवर्क योग्य प्रकारे कार्यरत नसल्याने ऑनलाईन कामांवर मोठा परिणाम होत आहे. ग्राहक दर महिन्याला २८ दिवसांच्या रिचार्जसाठी सुमारे ३५० रुपये खर्च करतात, मात्र त्याचा अपेक्षित फायदा मिळत नसल्याची नाराजी व्यक्त केली जात आहे.

नेटवर्क मिळवण्यासाठी अनेकांना घराच्या छतावर जावे लागते, तर काहींना गावाबाहेर जाऊन कॉल करावे लागतात. एकीकडे कंपनीकडून ५ नेटवर्कच्या मोठमोठ्या जाहिराती केल्या जात असताना प्रत्यक्षात ग्रामीण भागात मूलभूत सेवा देखील मिळत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या नेटवर्क समस्येमुळे गावातील ऑनलाईन शैक्षणिक उपक्रम, शासकीय सेवा, बँकिंग व्यवहार आणि इतर डिजिटल कामांवरही विपरीत परिणाम होत आहे. अनेक नागरिकांनी कंपनीकडे वारंवार तक्रारी करूनही केवळ आश्वासने मिळत असल्याचे सांगितले. प्रत्यक्षात समस्या सोडवण्यासाठी कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

ग्रामीण भागातील ग्राहकांकडून नियमित रिचार्जच्या माध्यमातून लाखो रुपयांचा महसूल मिळत असतानाही सेवा मात्र अत्यंत निकृष्ट दर्जाची दिली जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. मुर्तिजापूरपासून हाकेच्या अंतरावर असलेल्या या गावांमध्ये आपत्कालीन परिस्थितीतही फोन लागत नसल्याने गंभीर अडचणी निर्माण होत आहेत. दरम्यान, गावकऱ्यांनी जिओ कंपनीच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष गावात पाहणी करून नेटवर्क सेवा तातडीने सुरळीत करावी, अशी मागणी केली आहे.

> ❑ मी जिओची ग्राहक असून गेल्या एक-दोन वर्षांपासून साधा व्हिडिओ कॉलसुद्धा करू शकत नाही. फोनवर बोलण्यासाठी उन्हात किंवा पावसात घराच्या छतावर जावे लागते. दर महिन्याला रिचार्ज करूनही कोणताही फायदा होत नाही. कंपनीने या समस्येची तातडीने दखल घ्यावी.
>
> **- अलका कट्यारमल**

> ❑ शैक्षणिक आणि ऑनलाईन कामांसाठी मला गावाबाहेर जावे लागते. तिथेही पुरेसे नेटवर्क मिळत नाही. त्यामुळे अभ्यास आणि ऑनलाईन कामात अडथळे येत आहेत. कंपनी ५च्या जाहिराती करते, पण येथे ४ सुद्धा व्यवस्थित चालत नाही.
>
> **- यश राजू विर,** विद्यार्थी

> ❑ गेल्या चार वर्षांपासून घरात साधा कॉलही लागत नाही. कोणाला फोन करायचा असल्यास शेताच्या बांधावर जावे लागते. जिओ कंपनीने लवकरात लवकर तोडगा काढावा, अन्यथा दुसरा पर्याय स्वीकारावा लागेल.
>
> **- विनोद कट्यारमल**

## मूर्तिजापूर बस स्थानकावर भीषण अपघात; महिला गंभीर जखमी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मुर्तिजापूर, दि. २७ :** मूर्तिजापूर शहरातील बस स्थानक परिसरातील अतिक्रमणाचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीर ठरला असून, आज झालेल्या अपघातात एका महिलेला बसची जोरदार धडक बसल्याने त्या गंभीर जखमी झाल्या आहेत. प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी अकोला येथे हलविण्यात आले आहे.

सिरसो येथील रहिवासी मीराबाई रामभाऊ इंगळे या आपल्या गावाहून मूर्तिजापूर बस स्थानकावर आल्या होत्या. बसस्थानकाबाहेर पडत असताना एमएच १४ एमए ४८११ क्रमांकाच्या बसने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने धाव घेत त्यांना उपचारासाठी लक्ष्मी देशमुख रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने डॉक्टरांनी त्यांना पुढील उपचारासाठी अकोला येथे रेफर केले. दरम्यान, या अपघातानंतर बस स्थानक परिसरातील वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. स्थानक परिसरात वाहनचालकांकडून बिनधास्तपणे गाड्या पार्क केल्या जात असल्याने प्रवाशांना ये-जा करण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच बस स्थानकाच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढल्याने बसच्या ये-जा करण्यासाठी रस्ता अत्यंत अरुंद झाला आहे.

विशेष म्हणजे बस स्थानकात प्रवेश आणि बाहेर पडण्यासाठी एकाच मार्गाचा वापर केला जात असल्याने नेहमीच अपघाताचा धोका निर्माण होत असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, प्रशासनाने वेळेत अतिक्रमण हटवून वाहतूक व्यवस्था सुधारली असती, तर हा अपघात टाळता आला असता. त्यामुळे या अपघाताला नेमके जबाबदार कोण, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

घटनेनंतर काही काळ बस स्थानक परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. आता तरी प्रशासन जागे होऊन अतिक्रमण हटविण्यासाठी ठोस कारवाई करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## महत्त्वाचे

### नरसिंग महाराज झोपडी येथे श्रीमद भागवत कथेचे आयोजन



**अकोट :** अकोट येथील श्री संत नरसिंग महाराज संस्थान व श्री संत नरसिंग महाराज झोपडी यांच्या संयुक्त विद्यमाने पवित्र अधिक मासानिमित्त श्रीमद भागवत कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. अधिक ज्येष्ठ महिन्यात सोमवार, दि. १ जून ते रविवार, दि. ७ जून २०२६ दरम्यान हा धार्मिक सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे. या भागवत कथेचे निरूपण प्रसिद्ध कथावाचक ह.भ.प. कुंजबिहारी महाराज (कामरगावकर) यांच्या मधुर वाणीमधून होणार असून, परिसरातील भाविकांना कथा श्रवणाची सुवर्णसंधी लाभणार आहे. दररोज दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत श्रीमद भागवत कथा आयोजित करण्यात आली आहे. तसेच सप्ताहाच्या समारोपानिमित्त सोमवार, दि. ८ जून रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. अशोक महाराज राजगुरु यांचे काल्याचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. सप्ताहादरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता हरिपाठ तर रात्री ८ ते १० या वेळेत हरिकीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. कीर्तनकारांची नावे दररोज भागवत कथेदरम्यान जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. याशिवाय विटाळी, सावरगाव, वणी वारुळा आणि नंदीपेठ येथील भजन मंडळेही या धार्मिक कार्यक्रमात सेवा देणार आहेत. समस्त ग्रामस्थ तसेच परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रीमद भागवत कथा श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक भागवत कथा सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### रस्त्यावरील धुळीने नागरिक त्रस्त; अनोखे आंदोलन

**अडगाव बु.:** अकोट-हिवरखेड रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामामुळे उडणाऱ्या धुळीने नागरिक हैराण झाले आहेत. जड वाहनांच्या वर्दळीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात धूळ पसरत असून वाहनचालक, व्यापारी आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. कंत्राटदाराकडून नियमित पाणी मारले जात नसल्याचा आरोप करत छत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने अडगाव बु. बसस्थानकावर अनोखे आंदोलन करण्यात आले. कार्यकर्त्यांनी हातात झोळी घेऊन पाण्याच्या टँकरसाठी भीक मागण्याचे आंदोलन केले. आंदोलनाची दखल घेत कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत रस्त्यावर पाणी मारण्यास सुरुवात केली.

## जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालयात विज्ञान शाखा सुरू करण्याची मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अडगाव बु., दि. २७ :** अडगाव बु. येथील जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालयात विज्ञान शाखा सुरू करण्यात यावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांना निवेदन देण्यात आले आहे.



अडगाव बु. येथील जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालयात सन १९८५ पासून कला शाखा सुरू आहे. मात्र विज्ञान शाखेची सुविधा उपलब्ध नसल्याने परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी तालुकास्तरावर जावे लागत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असून वेळेचाही अपव्यय होत आहे. अकोट- हिवरखेड राज्य महामार्गावरील या महाविद्यालयाचा स्वतःचा मोठा परिसर असून पुरेशा वर्गखोल्याही उपलब्ध आहेत. अडगाव बु. परिसरातील मालठाणा, शिवाजीनगर, चितळवाडी, खंडाळा, सदरपूर, चोरवड, एदलापूर, अडगाव खुर्द आणि सीरसोली या गावांतील शेकडो विद्यार्थी विज्ञान शाखेच्या शिक्षणासाठी तालुक्याच्या ठिकाणी जात आहेत.

ही मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनमोहन व्यास, गोपाल कोल्हे, माजी सरपंच अशोक घाटे, शाळा समिती अध्यक्ष विलास वानखडे तसेच शिक्षणमित्र अमोल खंडारे यांनी नागरिकांच्या वतीने केली आहे.

## हिवरखेडजवळील बेलखेड शेतशिवारातील अस्वल अखेर जेरबंद

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**हिवरखेड, दि. २७ :** हिवरखेड परिसरातील बेलखेड शेतशिवारात अचानक अस्वल दिसून आल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वी या भागात बिबट्या आणि वाघाच्या हालचालींची चर्चा सुरू होती. त्यात आता अस्वलाच्या प्रवेशामुळे ग्रामीण भागातील नागरिक आणि शेतकरी अधिक चिंतेत सापडले आहेत.



बेलखेड परिसर हा शेतीप्रधान भाग असून सध्या शेतकरी खरीप हंगामाच्या तयारीत व्यस्त आहेत. अशा परिस्थितीत शेतशिवारात अस्वल दिसल्याने अनेक शेतकरी शेतात जाण्यास घाबरत आहेत. पीक पेरणी करावी की नाही, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. विशेषतः सकाळी लवकर आणि सायंकाळच्या वेळेत शेतात काम करणाऱ्या शेतमजुरांमध्येही भीतीचे वातावरण आहे.

स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, परिसरात गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा कडाका मोठ्या प्रमाणात वाढला आहे. जंगल परिसरातील पाण्याचे स्रोत आटल्याने पाण्याच्या शोधात हे अस्वल शेतशिवारात आले असावे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. काही शेतकऱ्यांनी अस्वल फिरताना पाहिल्यानंतर तातडीने गावात माहिती देण्यात आली. त्यानंतर परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी गावकऱ्यांच्या मदतीने अस्वलाचा शोध घेण्यास सुरुवात केली. काही काळ शोधमोहीम राबविल्यानंतर वनविभागाला अस्वलाला पकडण्यात यश आले. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला.

दरम्यान, वनविभागाने नागरिकांना कोणत्याही वन्य प्राण्याला पाहिल्यास घाबरून न जाता तात्काळ प्रशासनाला माहिती देण्याचे आवाहन केले आहे. तसेच अशा प्राण्यांच्या जवळ जाणे, त्यांना चिथावणी देणे किंवा गर्दी करणे टाळावे, असेही सांगण्यात आले आहे.

बेलखेड परिसरातील शेतकऱ्यांनी वनविभागाने या भागात नियमित गस्त वाढवावी तसेच वन्य प्राण्यांना सुरक्षितरित्या जंगल परिसरात सोडण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे. वन्य प्राण्यांच्या वाढत्या वावरामुळे शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेबरोबरच पिकांच्या नुकसानीचाही प्रश्न निर्माण होत असल्याने प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाचे सौंदर्यीकरण करून 'भीम सृष्टी' उभारण्याची मागणी

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**तेल्हारा, दि. २७ :** तेल्हारा शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान हे नागरिक, युवक, विद्यार्थी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्थान मानले जाते. मात्र सध्या उद्यानात आवश्यक सुविधा, आकर्षक सौंदर्यीकरण आणि ऐतिहासिक माहितीचा अभाव असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या उद्यानाचा सर्वांगीण विकास करून त्या ठिकाणी ''भीम सृष्टी'' उभारण्यात यावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या तेल्हारा तालुका व शहर शाखेच्या वतीने करण्यात आली आहे.



यासंदर्भात तेल्हारा नगरपालिकेच्या अध्यक्षा व मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात उद्यान परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित माहिती फलक, संविधान प्रेरणा स्थळ, आकर्षक विद्युत रोषणाई, बैठकीची व्यवस्था, हिरवळ, कारंजे, वाचन कट्टा, मुलांसाठी खेळ साहित्य तसेच समाजप्रबोधन करणारी शिल्पे उभारण्याची मागणी करण्यात आली आहे.या माध्यमातून शहरातील युवकांना संविधान, सामाजिक समता आणि शिक्षणाची प्रेरणा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास निवेदनात व्यक्त करण्यात आला आहे.तसेच ''भीम सृष्टी'' ही केवळ वास्तू नसून सामाजिक परिवर्तन, समता आणि मानवतेचा संदेश देणारे प्रेरणास्थळ ठरेल. त्यामुळे तेल्हारा शहराच्या सांस्कृतिक व सामाजिक वैभवात भर पडेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदर मागणीची गांभीर्याने दखल घेऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाचे तातडीने सौंदर्यीकरण करून ''भीम सृष्टी'' उभारण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली. या निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष अशोक दारोकार, शहराध्यक्ष प्रवीण पोहरकार, महिला आघाडी तालुका अध्यक्षा विद्याताई शामस्कार, कल्पनाताई हिवराळे, नगर परिषद गटनेत्या कान्होपात्रा फाटकर, विरोधी पक्षनेते राजेश खारोडे, नगर परिषद सदस्य कैलास ठोकणे, पंचफुलाताई कवर, रिनाताई आसरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## बांधकाम कामगारांच्या प्रलंबित अर्जांची तात्काळ तपासणी सुरू करा

### अकोला बिल्डींग पेंटर्स बांधकाम मजूर असोसिएशनचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणीकृत लाभार्थ्यांच्या प्रलंबित अर्जांची तपासणी प्रक्रिया गेल्या जवळपास एक वर्षापासून रखडलेली असल्याचा आरोप करत ती तात्काळ सुरू करण्यात यावी, अशी मागणी अकोला बिल्डींग पेंटर्स बांधकाम मजूर असोसिएशनच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष शैलेश शंकरराव सूर्यवंशी आणि सचिव पंचशील गजघाटे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या नोंदणी व नूतनीकरण प्रक्रियेसाठी शासनाने नवीन प्रणाली लागू केली होती. या प्रक्रियेनुसार स्थानिक आमदारांच्या नियंत्रणाखाली समिती स्थापन करण्याची अधिसूचना जाहीर करण्यात आली होती. मात्र, ही नवीन प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी प्रशासनाला तब्बल सहा ते आठ महिन्यांचा कालावधी लागला. परिणामी, गेल्या दहा ते बारा महिन्यांपासून ऑनलाईन अर्ज सादर करूनही अनेक कामगारांची नोंदणी आणि नूतनीकरण प्रक्रिया पूर्ण होऊ शकलेली नाही. त्यामुळे नोंदणीकृत लाभार्थी आणि असंघटित बांधकाम कामगार विविध शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित राहत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नवीन अधिसूचनेनुसार समितीची प्रक्रिया निष्क्रिय करून मंडळाच्या कर्मचाऱ्यांमार्फत कार्यालयीन कामकाज पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आल्याचेही निवेदनात म्हटले आहे. तरीदेखील प्रलंबित अर्जांची तपासणी तातडीने सुरू करून पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

**आक्रमकता** | **शिवसेना स्टाईलने आंदोलन छेडणार : जीवन खवले**

## करोडी फाटा ते जऊळखेड मार्गे दहीहंडा फाटा रस्त्याचे अपूर्ण काम तातडीने पूर्ण करा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. २७ :** अकोट तालुक्यातील करोडी फाटा ते जऊळखेड मार्गे दहीहंडा फाटा या मार्गावरील रस्त्याचे काम गेल्या पाच महिन्यांपासून रखडले असून, अर्धवट अवस्थेमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते तथा शिवसैनिक जीवन खवले यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाविरोधात आक्रमक भूमिका घेत आंदोलनाचा इशारा दिला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित रस्त्याचे केवळ २५ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित ७५ टक्के काम अद्याप अपूर्ण आहे. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, अकोट यांना वेळोवेळी निवेदने देण्यात आली आहेत. मात्र, त्यानंतरही विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. रस्त्याच्या कामाबाबत विचारणा केल्यास अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत असल्याचेही सांगण्यात येत आहे. डांबराचे दर वाढणे, टेंडर प्रक्रिया आणि निधीअभावी काम रखडल्याची कारणे सांगितली जात आहेत. मात्र, आवश्यक निधी आणि नियोजन नसताना काम सुरू करून नागरिकांना त्रास दिला जात असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. अर्धवट रस्त्यामुळे वाहनधारक, शेतकरी तसेच विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. धुळीचे प्रमाण वाढल्याने तसेच रस्त्याची दुरवस्था झाल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.

दरम्यान, स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्ते जीवन खवले यांनी आता या प्रश्नावर आक्रमक पवित्रा घेतला आहे. पुढील दोन ते चार दिवसांत रस्त्याचे काम पुन्हा सुरू न झाल्यास समस्त नागरिकांच्या वतीने ''शिवसेना स्टाईल'' आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच पुढील परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोट यांची राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

> ❑ करोडी फाटा ते जऊळखेड मार्गे दहीहंडा फाटा या रस्त्याचे काम अर्धवट सोडण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. चार दिवसांत काम सुरू न झाल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोट यांच्या विरोधात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.''
>
> **- जीवन खवले,**
> सामाजिक कार्यकर्ते तथा शिवसैनिक, अकोला जिल्हा

## श्री संत एकनाथ महाराजांच्या दरबारात श्रींचा तीर्थक्षेत्रीय सप्ताह

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. २७ :** श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, श्री क्षेत्र श्रद्धासागर, अकोट यांच्या वतीने दरवर्षी विविध तीर्थक्षेत्रांवर श्री संत वासुदेव महाराज यांचा श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह आयोजित करण्यात येतो. यावर्षीचा तीर्थक्षेत्रीय सप्ताह श्री संत एकनाथ महाराजांच्या पवित्र दरबारात, श्री क्षेत्र पैठण येथे आयोजित करण्यात आला आहे.

मागील काही वर्षांत श्री क्षेत्र सिंदी रेल्वे, त्र्यंबकेश्वर, सासवड, मुक्ताईनगर, नेवासा, देहू, पिंपळनेर आदी महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांवर हा सप्ताह भव्य आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला आहे. यंदाचा सप्ताह छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील श्री संत एकनाथ महाराज संस्थान, श्री क्षेत्र पैठण येथे दि. ३ ते १० जूनदरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या कालावधीत श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तसेच अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाचे व्यासपीठ नेतृत्व ह.भ.प. अंबादास महाराज मानकर करणार आहेत. दररोज सकाळी ११ वाजता ह.भ.प. उमेश महाराज मोहोकार यांची श्री ज्ञानेश्वरी आणि श्री भावार्थ रामायण या ग्रंथांवर प्रवचन सेवा होणार आहे. तसेच दि. ९ जून रोजी ज्ञानेश्वरी पारायण समाप्तीनिमित्त ह.भ.प. वासुदेवराव महाराज महल्ले यांची विशेष प्रवचन सेवा आयोजित करण्यात आली आहे. सप्ताहाच्या समारोपानिमित्त काल्याचे कीर्तन ह.भ.प. ज्ञानेशप्रसाद महाराज पाटील यांच्या वाणीतून संपन्न होईल.

अजिंक्य भारत
# आपलं बुलडाणा
बुलडाणा, गुरूवार, दि. २८ मे २०२६


## महत्त्वाचे

### धनादेश अनादर प्रकरणी तीन महिन्यांची शिक्षा

**खामगाव :** धनादेश अनादर प्रकरणात न्यायालयाने आरोपीस तीन महिने सक्षम कारावास व दुप्पट रक्कम देण्याचे आदेश दिल्याने शहरात चर्चेला उधाण आले आहे. फिर्यादी अशोक रतन परदेशी यांनी त्यांचे नातवाईक तथा ओळखीचे अमित अशोक परदेशी यांना हातउसने म्हणून १ लाख ५० हजार रुपयांची आर्थिक मदत केली होती. सदर रक्कम परतफेड करण्यासाठी आरोपीने दि. १२ जून २०२० रोजी त्याच्या खात्यातील धनादेश क्रमांक ०४९१२६ रक्कम १ लाख ५० हजार रुपयांचा फिर्यादीस दिला होता. फिर्यादी यांनी संबंधित धनादेश बँकेत जमा केला असता तो न बटबिता परत आला. त्यानंतर फिर्यादी यांनी त्यांचे अधिवक्ता ॲड. टी. व्ही. मोहता यांच्या मार्फत आरोपीस कलम १३८, निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टनुसार कायदेशीर नोटीस बजावली होती. मात्र, आरोपीने नोटिशीची पूर्तता न केल्याने फिर्यादी यांनी न्यायालयात धाव घेतली. या प्रकरणी कि. फौ. प्र. क्र. ७७९/२०२० अंतर्गत प्रकरण न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्रमांक ४, खामगाव येथे सुरू होते. सुनावणीदरम्यान फिर्यादीकडील साक्षी व कागदपत्रे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी अमित अशोक परदेशी यांना दोषी ठरविले. न्यायालयाने आरोपीस धनादेशाच्या दुप्पट म्हणजेच ३ लाख रुपये फिर्यादीस देण्याचे आदेश दिले असून, तसेच तीन महिने सक्षम कारावासाची शिक्षाही सुनावली आहे. या प्रकरणात फिर्यादीतर्फे अधिवक्ता तरुणकुमार विजयसिंग मोहता यांनी बाजू मांडली. सदर निकाल दि. २६ मे २०२६ रोजी देण्यात आला.

### आई-वडिलांना मारहाण; मुलगा व सुनेविरुद्ध गुन्हा

**खामगाव :** मुलगी परत आणण्याच्या कारणावरून आई वडिलांना शिवीगाळ व मारहाण केल्याची घटना खामगाव तालुक्यातील हिंगणा कारेगाव येथे घडली. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी मुलगा व सुने विरोधात गुन्हा दाखल केला आहे. दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी जानराव जगदेव जाधव (५५) रा. हिंगणा कारेगाव, ता. खामगाव, जि. बुलडाणा यांनी खामगाव ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली. तक्रारीनुसार, त्यांचा मुलगा गणेश जानराव जाधव व सून चैताली गणेश जाधव यांनी ''तुम्ही मुलगी का परत आणायला लावली'' या कारणावरून फिर्यादी व त्यांच्या यावेळी आरोपी गणेश जाधव याने फिर्यादीस काठीने मारहाण केली, तर आरोपी चैताली जाधव हिने फिर्यादीच्या पतीचे केस ओढून चापटा-बुक्क्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. ही घटना २६ मे रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी खामगाव ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये कायम भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ११८(१), ११५(२), २९६, ३५१ (२), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वैद्यकीय अहवाल व फिर्यादीच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोहेका किरण राऊत करीत


### शेगावातील पांडे गल्लीतील घराला आग

**शेगाव :** येथील पांडे गल्लीतील एका घरातील कुटुंबातील सर्वजण सकाळी ६ वाजता माहूरला देवदर्शनासाठी निघून गेल्यानंतर त्यांच्या बंद घराला २६ मे रोजी सकाळी १० ते ११ वाजता दरम्यान अचानकपणे आग लागल्याची घटना घडली. याबाबत शेजाऱ्याकडून कळताच घराचे मालक महादेव खेडकर हे जवळपास ११० कि.मी. वरून घराकडे परत फिरले. मात्र तोपर्यंत आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. सदर आगीबाबत न. प. च्या अग्निशमन दलाला कळताच सदर घराचा विद्युत पुरवठा महावितरण विभागाकडून खंडीत करण्यात येऊन आग विझविण्याची कार्यवाही करण्यात आली. या आगीत खेडकर यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. दोन टीव्ही संच, फ्रिज, वॉशिंग मशिन, मिक्सर, गॅस शेगडी, गाद्या, तसेच घरी ठेवलेले दागिने यांचे नुकसान झाले आहे. हे घर नुकतेच बांधण्यात आले होते. सदर नुकसानीबद्दल खेडकर यांनी तहसीलदार शेगाव यांना निवेदन दिले आहे.

# जिल्ह्यातील ५८ गावे पाणी टंचाईग्रस्त

## विंधण विहिरी व कुपनलिकांद्वारे प्रशासकीय उपाययोजना

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.२७ :** तीव्र उन्हाळ्याच्या झळा सोबत जिल्ह्यातील ५८ गावांना पाणीटंचाईच्या झळा देखील बसू लागल्या आहे.या गावांसाठी प्रशासनाने तातडीच्या उपायोजना सुरू केल्या असून विंधन विहिरी व विहीर अधिग्रहण सुरू आहे.

जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारणासाठी जिल्हाधिकारी डॉ. प्रविणकुमार देवरे यांनी खामगाव, शेगाव आणि मलकापूर तालुक्यातील ५१ गावांमध्ये ५८ विंधण विहिरी व १० कुपनलिका मंजूर केल्या आहेत. संबंधित प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सादर केले होते. तहसीलदार, गट विकास अधिकारी तसेच भूवैज्ञानिकांनी गावांमध्ये तीव्र पाणीटंचाई असल्याची शिफारस केल्यानंतर ही प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. शासनाच्या ३ फेब्रुवारी १९९९ च्या निर्णयान्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून ही मंजुरी देण्यात आली असून, मंजूर कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश ग्रामीण पाणी पुरवठा विभागाला देण्यात आले आहेत. मंजूर गावांमध्ये खामगाव तालुक्यातील लाखणवाडा बु., खामगाव ग्रामपंचायत, जळका भडंग, नायदेवी, हिवरखेड, चिचपूर आदी गावांचा समावेश आहे. शेगाव तालुक्यातील सवर्णा, माटरगाव बु., घुई, जाणोरी, भोनगाव, खातखेड तसेच मलकापूर तालुक्यातील दाताळा, देवधाबा, बलाड, वाघूड, भडाग्रा, धरणगाव, रनथम आदी गावांमध्येही उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. या आदेशानुसार मंजूर कामे शासनाच्या सर्व नियम व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून पूर्ण करण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद बुलढाणा यांच्यावर सोपविण्यात आली आहे. कामे सुरू करण्यापूर्वी कमी खर्चाच्या पर्यायी उपाययोजना शक्य नसल्याची खात्री करणे बंधनकारक राहणार आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, नव्या विंधण विहिरी अथवा कुपनलिका सुरू करण्यापूर्वी नादुरुस्त हातपंप दुरुस्त करण्यास प्राधान्य द्यावे. तसेच कामांचे जिओ-टॅगिंग करून छायाचित्रांसह नोंद ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संबंधित कामे ३० जून २०२६ पूर्वी पूर्ण न झाल्यास मंजुरी आपोआप व्यपगत होणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. विंधण विहिरी पूर्ण झाल्यानंतर संबंधित गावांमध्ये पुरेसे पाणी उपलब्ध झाल्यास टँकरद्वारे अथवा खाजगी विहीर अधिग्रहणाद्वारे सुरू असलेला पाणीपुरवठा बंद करण्याची दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. अपूर्ण राहिलेल्या कामांचे देयक पाणीटंचाई निधीतून अदा करण्यात येणार नसल्याचा इशाराही आदेशात देण्यात आला आहे. दरम्यान, संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांना महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ अंतर्गत आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले असून, कामांच्या प्रगतीचा साप्ताहिक अहवाल प्रत्येक गुरुवारी सादर करण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

## उपविभागीय अधिकारी ॲक्शन मोडमध्ये; अवैध रेती वाहतूक करणारी वाहने पकडली

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लोणार दि.२७ :** लोणार आणि परिसरातून रात्रीच्या आणि पहाटेच्या सुमारास मोठ्या प्रमाणावर अवैध रेतीची वाहतूक होत असल्याची बातमी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती. या बातमीची गंभीर दखल घेत, लोणारच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी आज धडक मोहीम राबवून अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांवर थेट रस्त्यावर उतरून मोठी कारवाई केली.


या धडक कारवाई दरम्यान, कोणतीही वैध रॉयल्टी कागदपत्रे नसलेले अवैध रेतीचे डंपर प्रशासनाने रंगेहात पकडले. अधिकाऱ्यांनी वाहन जप्त करून पोलीस ठाण्यात लावले आहे. या कारवाईमुळे तालुक्यातील रेती माफियांचे धाबे दणाणले आहेत. प्रथम च पदभार घेतलेल्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी दाखवलेल्या या सिंघम स्टाईल तत्परतेचे लोणारकरांकडून जोरदार स्वागत होत आहे. जप्त केलेल्या वाहनांवर लाखो रुपयांचा दंड ठोकण्याची आणि गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. ''अवैध रेती उपसा आणि वाहतूक करणाऱ्यांची गय केली जाणार नाही,'' असा इशारा प्रशासनातर्फे देण्यात आला आहे. ही कारवाई प्रथमच जॉईन झालेले उपविभागीय अधिकारी सानप साहेब, नायब तहसीलदार मयूर इप्पर साहेब, ग्राम महसूल अधिकारी सचिन शेवाळे यांनी केली.



**बातमीमुळे अधिकाऱ्यांनी लावली नाकाबंदी -** लोणार परिसरातील मुख्य रस्त्यांवरून महसूल प्रशासनाची नजर चुकवून रेतीची अवैध वाहतूक सुरू असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. बातमी समोर येताच, उपविभागीय अधिकाऱ्यांनी महसूल विभागाच्या पथकासह तातडीने मंठा रोड येथे नाकाबंदी केली. या अचानक केलेल्या नाकाबंदीमुळे अवैध रेती वाहून नेणाऱ्या चालकांमध्ये एकच खळबळ उडाली.

## नगरसेवक व सफाई कामगारांतील वाद पोलिस ठाण्यात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**खामगाव दि.२७ :** शहरातील प्रभाग क्रमांक १२ मध्ये साफसफाईच्या कामादरम्यान नगरसेवक आणि सफाई कामगार यांच्यात झालेल्या वादाचे प्रकरण थेट पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचल्याने शहरात चर्चेला उधाण आले आहे. सफाई कर्मचाऱ्यांनी नगरसेवक तहसीन शाह कासम शाह यांच्याविरोधात शिवाजी नगर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केल्याची माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रभाग क्रमांक १२ मध्ये महानगरपालिकेच्या वतीने नियमित साफसफाईचे काम सुरू असताना नगरसेवक तहसीन शाह कासम शाह व त्यांच्या काही सहकाऱ्यांकडून मागील महिनाभरापासून मुकादम आणि सफाई कामगारांना त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यापूर्वीही काही किरकोळ वाद झाले होते. मात्र त्यावेळी संबंधित कामगारांनी आपसात चर्चा करून प्रकरण शांततेत मिटवले होते. दरम्यान, मंगळवार दि. २७ मे २०२६ रोजी सकाळच्या सुमारास पुन्हा एकदा वाद निर्माण झाला. सफाई कामगारांनी दिलेल्या माहितीनुसार, दैनंदिन साफसफाईचे काम सुरू असताना नगरसेवकांनी एका कामगारासोबत शाब्दिक वाद घालत शिवीगाळ केली. तसेच खोट्या तक्रारींमध्ये अडकवण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावेळी संबंधित कामगाराची कॉलर पकडून जातीवाचक शब्दांत अपमान केल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या घटनेनंतर सफाई कामगारांमध्ये संतापाची लाट उसळली. मोठ्या संख्येने सफाई कर्मचारी सकाळी सुमारे १० वाजताच्या दरम्यान शिवाजी नगर पोलिस स्टेशनमध्ये दाखल झाले. त्यांनी नगरसेवक तहसीन शाह कासम शाह यांच्याविरोधात लेखी तक्रार देत योग्य कारवाईची मागणी केली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी संबंधित पक्षांकडून माहिती घेण्यास सुरुवात केली असून, वृत्त लिहेपर्यंत पोलिस स्टेशनमध्ये चौकशी व पुढील कारवाई सुरू होती. या घटनेमुळे प्रभाग क्रमांक १२ मध्ये काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## नगरसेवक मुसा यांच्यावरील अपात्रता कारवाई स्थगित

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२७ :** स्थानिक नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ मधून निवडून आलेले नगरसेवक मोहम्मद इसा मोहम्मद मुसा यांना जात वैधता प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने दिलासा दिला आहे. न्यायालयाने जात वैधता समितीच्या आदेशाला अंतरिम स्थगिती देत, संबंधितांना नगरसेवक पदावर कायम ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.. माहितीनुसार, डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या खामगाव नगरपरिषद निवडणुकीत मोहम्मद मुसा हे नामाप्र पक्षाकडून विजयी झाले होते. त्यांच्या प्रमाणपत्राबाबतच्या प्रस्तावावर सुनावणी करत जात वैधता समितीने ६ मे २०२६ रोजी संबंधित जात प्रमाणपत्र अवैध ठरविले होते. त्यानंतर उपविभागीय अधिकारी कार्यालयाने मूळ जात प्रमाणपत्र सादर करण्याचे आदेश देत, नगरसेवक पदावरून अपात्र ठरविण्याचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविला होता. नगरपरिषद अधिनियमातील तरतुदीनुसार, जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर संबंधित सदस्याचे पद आदेशाच्या तारखेपासून रिक्त मानले जाते, तसेच अपात्रतेची नोंद शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करणे बंधनकारक असल्याने मोहम्मद मुसा यांना नोटीसही बजावण्यात आली होती. शासनाची दिशाभूल करून जात प्रमाणपत्र प्राप्त केल्याचा ठपकाही त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. मोहम्मद मुसा बांनी ॲड. राम कारोडे यांच्यामार्फत उच्च न्यायालयात याचिका दाखल करून जात वैधता समितीच्या आदेशाला आव्हान दिले. न्यायमूर्ती राज वाकोडे यांच्या सुट्टीकालीन खंडपीठासमोर सुनावणी झाली असता, न्यायालयाने मुख्याधिकारी नगरपरिषद निवडणूक निर्णय अधिकारी खामगाव, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी राज्य निवडणूक आयोग, अतिरिक्त सचिव नगरविकास विभाग तसेच गुलजमा शाह जहीर शाह यांना नोटीस बजावून उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात मोहम्मद मुसा यांच्या वतीने ॲड. राम कारोडे, तर गुलजमा शाह जहीर शाह यांच्या वतीने ॲड. साक्षी तिवारी व ॲड. राहुल धांडे यांनी काम पाहिले. राज्य शासनाच्या वतीने ॲड. सी. ए. लोखंडे यांनी बाजू मांडली.

## दोन किलो गांजासह आरोपीस अटक

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**जळगाव जा .दि.२७ :** जळगाव जामोद पोलिसांनी अंमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करत गांजाची वाहतूक करणाऱ्या एका आरोपीला अटक केली. या कारवाईत २ लाख २ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे २६ मे रोजी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास कॉटन मार्केटसमोर छापा टाकण्यात आला.

पंचांसमक्ष करण्यात आलेल्या कारवाईदरम्यान आरोपी उत्तम शहादेव तायडे (वय ५५, रा. दानापूर, ता. तेल्हारा, जि. अकोला) याच्या ताब्यातून २ किलो ३७० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला. जप्त गांजाची किंमत १ लाख १८ हजार ५०० रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली. याशिवाय आरोपीकडून बजाज प्लॅटिना दुचाकी (एमएच ३० बीक्यू ०२४५) किंमत ७२ हजार रुपये व रेडमी कंपनीचा मोबाईल किंमत १२ हजार रुपये असा एकूण २ लाख २ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. पोलिसांनी आरोपीकडे विचारपूस केली असता त्याने एका महिलेचे नाव सांगितल्याची माहिती समोर आली असून, पोलिसांकडून त्या अनुषंगाने पुढील तपास सुरू आहे. सपोनि नागेश प्रकाश मोहोड यांच्या फिर्यादीवरून या प्रकरणी जळगाव जामोद पोलीस ठाण्यात कलम ८ (क) व २० (ब) एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ठाणेदार नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि नारायण सरकटे करीत आहेत.

## शिवसेनेचे विविध मागण्यांसाठी उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि.२७ :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) खामगाव तालुका व शहर पदाधिकाऱ्यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी, खामगाव यांना विविध जनहिताच्या मागण्यांसंदर्भात निवेदन देण्यात आले. शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांच्या समस्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

निवेदनात पेट्रोल, डिझेल व घरगुती गॅस सिलेंडरच्या वाढत्या दरांमुळे नागरिकांना मोठा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे नमूद करण्यात आले. तसेच शेतकऱ्यांना शेती मशागतीसाठी लागणारे डिझेल कॅनमधून उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय नीट परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान झाले असून, संबंधित दोषींवर कठोर कारवाई करून त्यांना तातडीने अटक करावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. याशिवाय शेतकऱ्यांना लागणारी खते व बियाणे मुबलक प्रमाणात उपलब्ध करून द्यावीत, रखडलेली पीकविमा रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी, अशा विविध मागण्या करण्यात आल्या. दरम्यान, प्रशासनाने या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला. यावेळी तालुका प्रमुख श्रीराम खेळदार, शहर प्रमुख रवी जैन यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

**आंदोलन** चिखली तालुका काँग्रेसच्यावतीने तहसीलदारांना निवेदन

## मोदी सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे महागाई वाढली- राहुल बोंद्रे

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**चिखली दि.२७ :** पेट्रोल-डिझेलसाठी नागरिकांना एक- दोन किलोमीटरच्या रांगा लावाव्या लागत असून रात्रभर पंपावर थांबण्याची वेळ जनतेवर आली आहे. २४-२४ तास लोकांना पेट्रोल-डिझेलसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. पेट्रोल, डिझेल आणि गॅस दरवाढमुळे सर्वसामान्य नागरिकांचे कंबरडे मोडले आहे. ही महागाई नैसर्गिक नाही, तर मोदी सरकारच्या चुकीच्या निर्णयांमुळे निर्माण झालेली आहे. सरकार जनतेच्या खिशातील पैसा काढून घेत आहे. इराण आणि रशिया भारताला स्वस्त दरात इंधन देण्यास तयार असतानाही सरकार अमेरिकेच्या दबावाखाली काम करत असल्याचा घणाघात माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी केला.

पेट्रोल, डिझेल दरवाढ आणि दिवसेंदिवस वाढणाऱ्या महागाई विरोधात तसेच शेतकऱ्यांना कॅनमध्ये डिझेल उपलब्ध करुन देण्यासाठी दि. २७ मे रोजी चिखली तालुका काँग्रेसच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी राहुलभाऊ बोंद्रे बोलत होते. शेतकऱ्यांच्या टॅक्टरला डिझेल मिळत नाही, कॅनमध्ये डिझेल देत नाही आणि त्यामुळे प्रचंड त्रास शेतकऱ्यांना होतोय, शेतीची कामे थांबलेली आहेत. काल-परवाच खताचे भाव ३०० रुपयांनी वाढलेत. सरकारने जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये. सामान्य जनता आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा चिखली तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा थेट इशारा देण्यात आला.

याप्रसंगी राहुलभाऊ बोंद्रे यांच्यासह तालुका काँग्रेसचे अध्यक्ष रामभाऊ जाधव, माजी सभापती विष्णु पाटील कुळसुंदर, समाधान सुपेकर, भाई प्रदिप आंभोरे, नंदुभाऊ शिंदे, श्याम पठाडे, डॉ. माहेमंद इसरार, सचिन बोंद्रे, युवक काँग्रेसचे अंबादास वाघमारे, गाजी बाबा, विजय पाटील शेजोळ, ज्ञानेश्वर सुरूशे, शिवनारायण म्हस्के, श्रीकांत राउत, विजय राउत, गणेश जवंजाळ, सिध्देश्वर परीहार, अरूण शेळके, गजानन डुकरे, रामभाउ भुसारी, विनोद बोर्डे, दिलीप खंदलकर, विश्वदिप पडोळ, शिवराज पाटील, बिदुसिंग इंगळे, दत्तात्रय करवंदे, दिपकभाउ हाके, रामधन मोरे, गजानन डुकरे पाटील, मुकेश वाघ, प्रमोद रतपारखी, लोखंडे, गणेश ठेंग, सज्जाद खान, संतोष देशमुख, गजानन घायाळ, रामकृष्ण कापसे, प्रविण वानखेडे, दशरथ क्षिरसागर, देवेंद्र भुसारी, राजु बनसोडे, संजय गिरी, अक्षय साखरे, शमीम भाई, शेख युनूस, शेख निसार, दया नाटेकर, संदिप पैठणे, मनोहर शेळके, श्रीकांत देशमुख, विजय सरोदे, संतोष क-हाडे, नंदु पाटील म्हस्के यांच्यासह असंख्य पदाधिकारी व

## सुल्तानपूर जालना महामार्गावर रेतीने घेतला एक बळी; टिप्परची दुचाकीला धडक

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**लोणार दि.२७ :** अंजनी खुर्द मार्गावर भानापूरजवळ रेती भरलेल्या टिप्परने दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीस्वार गजानन हरिभाऊ मुळे (रा. उदनापूर, ता. लोणार) यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे मिळालेल्या माहितीनुसार, मृतक गजानन मुळे हे आपल्या दुचाकीवरून (२८ ६८३०) जात असताना, समोरून येणाऱ्या अशोक लेलँड कंपनीच्या रेती वाहक (२८ ८३०२) टिप्परने त्यांना जोराची धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, गजानन मुळे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

**तणावाचे वातावरण आणि पोलिसांची कारवाई**

अपघाताची माहिती मिळताच परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, प्रसंगावधान राखून पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवून वाहतूक सुरळीत केली. यावेळी डीवायएसपी संतोष खाडे साहेब, आलेवार साहेब, लक्ष्मण कटक सर, नागरे साहेब आणि केदार साहेब यांच्यासह पोलीस प्रशासनाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी सुलतानपूर येथील प्रतिष्ठान नागरिक शेख खाजा शेख उमर व शेख खाजा शेख अख्तर यांनीसुद्धा सहकार्य केले.

**अपघातांची मालिका सुरूच**

या महामार्गावर गेल्या महिन्याभरापासून अपघातांचे सत्र सुरूच आहे. विशेष म्हणजे, अवघ्या आठ दिवसांतील सुलतानपूर ते अंजनी खुर्द दरम्यानची ही दुसरी मोठी अपघाती घटना आहे. वारंवार घडणाऱ्या या अपघातांमुळे परिसरात भीतीचे वातावरण असून, संबंधित प्रशासनाने या रस्त्यावरील वाहतुकीबाबत आणि सुरक्षेबाबत ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिक करत आहेत.

अजिंक्य भारत

# आपलं खामगांव

बुलडाणा, गुरूवार, दि.२८ मे २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### मंदिरातील चोरीप्रकरणी आरोपीस अटक

**खामगाव :** येथील प्रसिध्द जगदंबा देवी संस्थान (घाटपुरी मंदिर) येथे झालेल्या चोरीचा गुन्हा उघडकीस आणण्यात स्थानिक गुन्हे शाखेला (एलसीबी) मोठे यश आले आहे. याप्रकरणी अकोला जिल्ह्यातील एका सराईत आरोपीला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून ३ लाख २० हजार रुपये किमतीची सोन्याची लगट जप्त करण्यात आली आहे. मागील वर्षी, म्हणजेच २४ डिसेंबर २०२५ च्या रात्री ९ २५ डिसेंबर २०२५ च्या सकाळी ६ वाजेदरम्यान अज्ञात चोराने घाटपुरी येथील जगदंबा देवी मंदिराच्या खिडकीचे गज तोडून आत प्रवेश केला होता. चोरट्याने मंदिरातील देवी आणि गणपतीच्या अंगावरील ७३,००० रुपये किंमतीचे सोन्या चांदीचे दागिने चोरून नेले होते. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस स्टेशन, खामगाव येथे अप क्र. ३९७ /२०२५, कलम ३३१ (४), ३०५ (बीएनएस) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. बुलडाणा स्थानिक गुन्हे शाखेचे पथक या गुन्ह्याचा समांतर तपास करत होते. तपासादरम्यान तांत्रिक पुरावे आणि गोपनीयबातमीदारांकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा माग काढला. अमोल काशीराम तेलगोटे वय ३९ वर्षे, रा. रिधोरा, असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता, त्याने चोरीची कबुली दिली. त्याच्याकडून गुन्ह्यातील सोन्याची २० ग्रॅम २० मिली वजनाची लगट किंमत ३,२०,००० रुपये जप्त करण्यात आली आहे. आरोपीची वैद्यकीय तपासणी केल्यानंतर, पुधल कायदेशीर कारवाईसाठी त्याला मुद्देमालासह शिवाजीनगर पोलीस स्टेशन, खामगाव यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

### घरासमोरुन मोटरसायकल चोरी

**खामगाव :** शहरातील सिव्हील कॉलनी परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरासमोर उभी असलेली बुलेट मोटारसायकल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अनंत मनीकराव बुरकुल वय ५४ रा. देऊळगाव राजा यांनी आपली काळया रंगाची बुलेट ३५० क्रमांक एमएच २१ बीसी ६८६७ ही मोटारसायकल २४ मे रोजी रात्री घरासमोर उभी करून ठेवली होती. दरम्यान २४ मे रोजी रात्री १० वाजेपासून ते २५ मे रोजी सकाळी ६ वाजेदरम्यान अज्ञात चोरट्याने सदर मोटारसायकल चोरून नेली. चोरीस गेलेल्या मोटारसायकली ची किंमत अंदाजे १ लाख ८० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे. याप्रकरणी देऊळगाव राजा पोलीस ठाण्यात कायम अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०३ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याची नोंद पोहेकॉ. विनोद गवई यांनी केली असून पुढील तपास पोहेका सयद मुसा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे

### बैलाचे शिंग लागून वृद्ध शेतकऱ्याचा मृत्यू

**खामगाव :** बोरी अडगाव येथे बैलगाडीला बैलजोडी जुंपत असताना शिंग लागल्याने एका ७५ वर्षीय वृध्द शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना २६ मे रोजी घडली. घडलेल्या या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. शांताराम वामन टिकार (७५), रा. बोरी अडगाव हे आज, २६ मे २०२६ च्या सकाळी आपल्या नेहमीच्या कामासाठी बैलगाडीला बैलजोडी जुंपत होते. दरम्यान, गावातील एक मोकाट गाय (देवगाय) अचानक तिथे आली आणि बैलांच्या अंगावर धावून गेली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे बैल बिथरले आणि त्यांनी सैरावैरा धावण्यास सुरुवात केली. बैलांनी मान जोरात हलवल्यामुळे, जवळच उभे असलेल्या शांताराम टिकार यांच्या गुप्तभागाला बैलाचे शिंग जोरात लागले. या अपघातात ते गंभीर जखमी झाले. घटनेनंतर नातेवाइकांनी तातडीने त्यांना उपचारासाठी खामगाव येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले.

# डिझेल-पेट्रोल वाचवायचे तर ट्रिपल सीट आणि ओव्हरलोडिंगला परवानगी द्या; ठाकरेंच्या शिवसेनेचा सरकारला खोचक टोला

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापूर दि.२७ :** ''इंधन बचत म्हणजेच इंधन निर्मिती'' असा कानमंत्र राज्याला देणाऱ्या परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या घोषणेची हवा काढत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने मलकापूर शहरात सरकारवर जोरदार राजकीय टोलेबाजी केली आहे. वाढत्या महागाईत आणि धावपळीच्या युगात इंधन बचतीचे सल्ले देणाऱ्या सरकारला आरसा दाखवण्यासाठी उद्धव ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख गजानन पुंडलिक ठोसर यांच्या नेतृत्वात प्रशासनाला एक उपरोधिक आणि मागणीवजा निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात नमूद मुद्द्यांनुसार धावपळीच्या युगात वाहनांशिवाय जगणे अशक्य शिवसेनेने आपल्या निवेदनात सर्वात आधी सर्वसामान्य आणि कष्टकरी जनतेची व्यथा मांडली आहे. आजच्या गतिमान आणि धावपळीच्या युगात शेतकरी, शेतमजूर, नोकरदार अशा कोणत्याही घटकाला वाहनांशिवाय आपले दैनंदिन काम पूर्ण करणे अशक्य झाले आहे. प्रत्येक कुटुंबाकडे आज गरजेपोटी एकापेक्षा जास्त वाहने आहेत. शेतातील कामे आणि मजुरीसाठी मजूर वर्गही आता मोठ्या प्रमाणावर वाहनांचा वापर करत आहे. अशा परिस्थितीत केवळ सल्ले देऊन इंधन बचत होणार नाही, हे ठाकरेंच्या कार्यकर्त्यांनी स्पष्ट केले. परिवहन मंत्र्यांच्या इंधन बचत सल्ल्यावर थेट आक्षेप परिवहन मंत्र्यांनी जनतेला काटकसरीने डिझेल-पेट्रोल वापरा असा जो कानमंत्र दिला आहे, तो वस्तुस्थितीला धरून नाही, असा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. दुचाकीवर ट्रिपल सीट आणि चारचाकीत ओव्हरलोडिंगला परवानगी द्या! इंधन बचतीचा उद्देश खऱ्या अर्थाने साध्य करण्यासाठी शिवसेनेने सरकारला अत्यांत खोचक आणि उपरोधिक पर्याय सुचवले आहेत. जर पेट्रोल-डिझेल वाचवायचे असेल, तर: दुचाकी वाहनांवर तीन प्रवाशांना (ट्रिपल सीट) प्रवास करण्याची परवानगी देण्यात यावी. यामुळे वाहनांची संख्या कमी होऊन इंधन नक्कीच वाचेल, असा टोला आंदोलकांनी सरकारला लगावला आहे. आरटीओ आणि पोलिसांची कारवाई शिथिल करण्याचे आदेश द्या जोपर्यंत देशातील आणि राज्यातील पेट्रोल-डिझेलची टंचाई संपत नाही, तोपर्यंत दुचाकीवर ट्रिपल सीट किंवा चारचाकीत ज्यादा प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांची अडवणूक थांबवण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. अशा वाहनधारकांवर होणारी दंडात्मक व पोलीस कारवाई शिथिल करण्याचे निर्देश तात्काळ प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि पोलीस विभागाला द्यावेत, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे. प्रशासकीय स्वाक्षरी आणि उपस्थिती: या आंदोलनाचे आणि निवेदनाचे गांभीर्य लक्षात घेऊन मलकापूर येथील उपविभागीय कार्यालयात निवेदन देताना शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन पुंडलिक ठोसर, विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शहरप्रमुख हरीदास गणबास, उपशहरप्रमुख बाळू पोलाखरे, किसान सेना उपतालुकाप्रमुख गजानन मेहेंगे, शाखाप्रमुख शेख रफीकभाई, सादीक खान यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# राज्यस्तरीय सौंदर्य कला पुरस्काराने कल्पना दिनेश वर्मा सन्मानित




अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि.२७ :** स्थानिक जानेफळ येथील मेकअप आर्टिस्ट कल्पना दिनेश वर्मा यांना बी दि चेंज फॉउंडेशन शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर यांच्या वतीने राज्यस्तरीय सौंदर्य कला पुरस्कार -२०२६ देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी मंचावर अभिनेत्री तथा मिसेस इंडिया २०२१निवेदिता पगार व शुभांगी थोरात प्रोफेशनल मेकअप आर्टिस्ट अँड एजूकेटर ह्या उपस्थित होत्या. त्यांच्या व प्रमुख पाहुणे यांच्या उपस्थितीमध्ये कल्पना दिनेश वर्मा यांना स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व शाल देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांनी मेक अप, मेहंदी, शिवणकाम अशा विविध क्षेत्रात केलेल्या भरीव कार्यामुळे पुरस्कृत करण्यात आले. चला बदल घडवूया म्हणत या संस्थेने मेकअप आर्टिस्ट, फोटोग्राफी, हेअर स्टायलिस्ट, फॅशन आर्टिस्ट, आरी वर्क, हेअर आर्टिस्ट, मेहंदी आर्टिस्ट, कॉस्मेटो लॉजिस्ट, ब्रायडल आर्टिस्ट इत्यादी कला क्षेत्रात काम करणाऱ्या विविध गुणवंतांचा सत्कार या ठिकाणी केला. सौंदर्याच्या क्षेत्रात मिळालेल्या या राज्यस्तरीय पुरस्कारामुळे जानेफळ च्या नावलौकिकात अधिक भर पडली आहे.

# आईच्या स्मृती दिनानिमित्त ठाणेदारांनी केले अनाथांना अन्नदान

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**अमडापूर दि.२७ :** अमडापूर पोलीस स्टेशन येथे नव्याने रुजू झालेले व आपल्या कार्यातून थोड्याच कालावधीत परिसरात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे दबंग अधिकारी श्री सहाय्यक पोलीस निरीक्षक जयसिंग राजपूत साहेब यांची अशीही समाजसेवा केली आहे. ठाणेदार राजपूत साहेब यांची मातोश्री कै. गंगाबाई पदमसिंह राजपूत (सिसोदिया) यांच्या ५ वे (पुण्यस्मरण) स्मृतिप्रित्यर्थ सेवा संकल्प प्रतिष्ठान, पळसखेड सपकाळ येथे दि.२६ मे २०२६ रोजी अन्नदान कार्यक्रम आयोजन करून गरजू व उपेक्षित लोकांना जेवण दिले.

या कार्यातून समाजाने दुर्लक्षित घटक असलेले व सेवा संकल्प येथे आश्रयास असलेले येथे आश्रयास असलेले लोकांना आमच्याकडून सेवा घडली. व आमच्या मातोश्री यांच्या स्मृतिपित्यर्थ अन्नदान करण्यात आले. ठाणेदार जयसिंग राजपूत, पत्नी अमृता यांनी केलेल्या या कार्याबद्दल समाजात व परिसरात त्यांचे कौतुक केले जात आहेत. यापूर्वीही त्यांनी शेतकरी, परिसरातील गरीब जनता यांच्यावरील अन्यायाबाबत परखड भूमिका घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्याबाबत प्रयत्न केलेले आहेत. त्यांनी केलेल्या या कार्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे. डॉ. पालवे व सेवा संकल्प प्रतिष्ठान यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# प्रथम जनगणना पूर्ण केल्याबद्दल वर्षा राजपूत यांचा सत्कार

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**शेगाव दि.२७ :** शेगाव शहरातून सर्वप्रथम जनगणना कार्य पूर्ण करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कुमारी वर्षा राजपूत मॅडम यांचा नगरपरिषद कार्यालयात सत्कार करण्यात आला. हा सत्कार नगराध्यक्ष प्रकाश शेगोकार, मुख्याधिकारी तथा जणगणणा प्रभारी अधिकारी जयश्री काटकर बोराडे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी माननीय नगरसेवक रवींद्र उमाळे, अतिरिक्त चार्ज अधिकारी प्रवीण डिगोळे, राजवर्धन पाटील तसेच देवताळे सर उपस्थित होते. जनगणना हे अत्यंत जबाबदारीचे आणि महत्वाचे कार्य असून ते वेळेत व अचूकपणे पूर्ण केल्याबद्दल उपस्थित मान्यवरांनी कुमारी वर्षा राजपूत यांचे कौतुक केले. त्यांच्या कार्यतत्परतेमुळे इतर कर्मचाऱ्यांनाही प्रेरणा मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमात जनगणना प्रक्रियेचे महत्व, नागरिकांचा सहभाग आणि प्रशासनाच्या समन्वयातून होत असलेल्या कामांचा आढावा घेण्यात आला. उपस्थितांनी कुमारी वर्षा राजपूत यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# डोंगर शेवली येथे अपंग व्यक्तीस मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मंगरूळ नवघरे दि.२७ :** चिखली तालुक्यातील डोंगर शेवली येथे एका अपंग व्यक्तीस मारहाण करून शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी अमडापूर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

अमडापूर पोलीस स्टेशन येथे दाखल झालेल्या माहितीनुसार, फिर्यादी (वय ३८, रा. डोंगर शेवली, ता. चिखली, जि. बुलढाणा) यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी नंदकिशोर जगन्नाथ सावळे व जगन्नाथ त्र्यंबक सावळे, दोघेही रा. डोंगर शेवली, यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत विविध कलमांसह अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २६ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजताच्या सुमारास फिर्यादी व त्यांचे पत्नी शेतातून घरी जात असताना डोंगर शेवली शिवारातील विजय सावळे यांच्या शेताजवळ ही घटना घडली. आरोपी क्रमांक एक हा फिर्यादी व त्यांच्या पतीचे फोटो काढत असल्याचा संशय आल्याने फिर्यादीने त्यास विचारणा केली. त्यावेळी आरोपीने फिर्यादीच्या पतीच्या अपंगत्वाचा सार्वजनिक ठिकाणी अपमान करत फिर्यादीचा हात धरून जवळ ओढल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. फिर्यादीने आरडाओरड केल्यानंतर तिचे पती मध्यस्थी करण्यासाठी गेले असता आरोपी क्रमांक एक याने तेथे पडलेला दगड उचलून त्यांच्या मानेवर मारहाण करून जखमी केल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच आरोपी क्रमांक दोन याने फिर्यादी व त्यांच्या पतीस धक्काबुक्की करून शिवीगाळ तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही सांगण्यात आले आहे. या प्रकरणी अमडापूर पोलिसांनी कायम टीव्ही अप क्र. १४३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ७४, ११८(१), ११५, ३५२, ३५१(२), ३(५) तसेच अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ मधील कलम ९२(अ), ९२(ब) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास करीत असून ठाणेदार जयसिंग राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय बालाजी सानप पोलीस कर्मचारी प्रदीप चोपडे तपासात सहकार्य करीत आहेत.

# राम नदी स्वच्छता अभियानातून सेवेकऱ्यांनी दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**रायपूर दि.२७ :** ''अध्यात्मातून समाजसेवा आणि समाजसेवेतून पर्यावरण संरक्षण'' हा संदेश देत श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक व बालसंस्कार सेवा मार्ग केंद्र (दिडोंरी प्रणित) रायपूर यांच्या वतीने राम नदी स्वच्छता अभियान उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. गंगादशहरा उत्सवानिमित्त दि. १७ मे ते २५ मे २०२६ या कालावधीत देशभर राबविण्यात आलेल्या नदी व जलस्त्रोत स्वच्छता अभियानांतर्गत रायपूर परिसरातील पळसखेड भट्ट येथील राम नदी व धरण परिसर स्वच्छ करण्यात आला.

पहाटेपासूनच महिला व पुरुष सेवेकरी नदी परिसरात दाखल झाले. हातात झाडू, फावडे, टोपल्या घेऊन सेवेकऱ्यांनी नदीपात्रातील प्लास्टिक, कचरा व घाण हटवून परिसर स्वच्छ केला. अनेक सेवेकऱ्यांनी स्वतः नदीपात्रात उतरून श्रमदान केले. ''नदी स्वच्छ तर जीवन सुरक्षित'' असा संदेश देत पर्यावरण संवर्धनाची जनजागृतीही करण्यात आली. या उपक्रमादरम्यान वातावरण भक्तिमय झाले होते. पावसाळा चांगला व्हावा, शेतकऱ्यांना भरघोस पीक यावे आणि परिसरात सुख-समृद्धी नांदावी यासाठी पर्जन्यसूक्ताचे सामूहिक पठण करण्यात आले. आबासाहेब मोरे यांच्या प्रेरणेने देशभरातील विविध केंद्रांमार्फत नदी स्वच्छता अभियान, किल्ले-गड स्वच्छता मोहीम, विवाहसंस्कार अभियान, स्वयंरोजगार अभियान तसेच शेतकऱ्यांसाठी विषमुक्त व कमी खर्चातील सेंद्रिय शेती अभियान प्रभावीपणे राबविले जात आहे. या माध्यमातून समाजसेवा आणि राष्ट्रसेवेचा संदेश तळागाळापर्यंत पोहोचत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. या अभियानात रायपूर व पळसखेड भट्ट येथील महिला-पुरुष सेवेकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. केंद्रातील विविध विभागांचे कार्यरत सेवेकरी देखील उपस्थित होते. सेवेकऱ्यांच्या श्रमदानामुळे राम नदी परिसर स्वच्छ, सुंदर आणि प्रसन्न दिसून येत होता. स्थानिक नागरिकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत सेवेकऱ्यांच्या कार्याला सलाम केला.

**निवेदन** | माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांची कृषीमंत्र्यांकडे मागणी

# खतांची कृत्रिम साठेबाजी व काळाबाजार करणाऱ्यांचे परवाने रद्द करा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**खामगाव दि.२७ :** आगामी खरीप हंगाम २०२६ च्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना डीएपी व युरिया खतांचा आवश्यक आणि निर्धारीत दरात पुरवठा व्हावा, तसेच खतांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी,या मागणी संदर्भात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते तथा माजी आ. दिलीपकुमार सानंदा यांनी मंगळवार दि.२६ मे २०२६ रोजी मुंबई येथील कृषी मंत्र्यांच्या दालनामध्ये राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेवुन निवेदन सादर केले.या निवेदनाची तात्काळ दखल घेत कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बुलढाणा जिल्हा कृषी अधिक्षक व संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित कारवाई करण्याचे लेखी निर्देश दिले आहेत.



**निवेदनाची तात्काळ दखल : कृषी विभागाने केली भरारी पथकाची नेमणुक**

सानंदांनी दिलेल्या निवेदनाची तात्काळ दखल घेत कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, जिल्हा कृषी अधीक्षक यांना कठोर कारवाईचे निर्देश दिले आहे. दरम्यान, जिल्हा कृषी अधीक्षकांनी कृषीमंत्र्यांच्या आदेशानुसार खामगाव व शेगाव तालुक्यासाठी विशेष भरारी पथकाची नेमणुक केली आहे. तसेच कृषी विभागाकडून सर्व कृषी केंद्र चालकांच्या मोबाईल व्हॉटसॲपवर खतांचा काळाबाजार टाळण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.

निवेदन सादर करतांना सानंदा यांनी कृषीमंत्र्यांसोबत चर्चा करतांना सांगितले की, खामगाव व शेगाव तालुक्यासह बुलढाणा जिल्हयातील अनेक कृषी केंद्र चालकांनी मोठ्या प्रमाणात डीएपी आणि युरिया खतांचा साठा करून ठेवला आहे. शेतकऱ्यांनी खतांची मागणी केल्यानंतर त्यांना खत उपलब्ध करून दिले जात नसून, काही ठिकाणी डीएपी किंवा युरिया घेण्यासाठी इतर खतांची जबरदस्तीने लिंकिंग केली जात आहे. तर काही कृषी केंद्र संचालकांकडून सध्या १३५० रुपये कमाल किरकोळ किंमत (एमआरपी) असलेली डीएपीची गोणी तब्बल १७५० रुपयांना विकली जात असून, २६६ रुपये किंमतीची युरियाची गोणी ३५० रुपयांपर्यंत विक्री केली जात असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक लूट सुरू असल्याचे सानंदा यांनी कृषीमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. शेतकरी हिताचे सरकार म्हणून कृषी विभागाने या गंभीर प्रकाराला वेळीच आळा घालावा, कृतिम साठेबाजी थांबवावी आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी सानंदा यांनी निवेदनात केली होती. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी संपूर्ण कृषी विभाग शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचा शब्द दिला व आपल्या निवेदनाची तात्काळ दखल घेवुन शेतकरी हितासाठी संबंधित यंत्रणा कार्यान्वीत केल्याबददल माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी शेतकऱ्यांच्या वतीने कृषीमंत्र्याांचे आभार मानले आहेत.

# अंढेरा येथे मोफत नेत्रतपासणी शिबीर उत्साहात संपन्न




अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**अंढेरा दि.२७ :** समता फाउंडेशन, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ अकोला, माऊली कृषी सेवा केंद्र अंढेराचे संचालक नानाभाऊ आंधळे व लॉयन्स नेत्र रुग्णालय छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने अंढेरा येथे दि. २७ मे २०२६ रोजी अंढेरा येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे मोफत नेत्रतपासणी शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला अंढेरा, सेवानगर, पिंप्री आंधळे येथील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिरामध्ये डॉ संदीप गायकवाड,डॉ मंगेश निकाळजे, लायन्स नेत्र रुग्णालय छत्रपती संभाजी नगर या तज्ज्ञ डॉक्टरांकडून तब्बल ७५ रुग्णांची डोळ्यांची तपासणी करण्यात आली. तसेच यामध्ये मोतीबिंदू, दृष्टीदोष आदी असलेले एकुण ११ रुग्णांची दि. २९ मे २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. यावेळी या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध झाली असून आयोजक संस्थांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करण्यात येत आहे. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी सोमीनाथ चांदलकर,नितीन सोनवणे,सुरज गुप्ता, विवेक मोकाळकर समता फाउंडेशन,महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ अकोला,माऊली कृषी सेवा केंद्र अंढेरा तसेच लॉयन्स नेत्र रुग्णालय छत्रपती संभाजीनगर यांच्या प्रतिनिधींनी विशेष परिश्रम घेतले.

## महत्त्वाचे

### अपर मुख्य सचिव यांचा दौरा

**जालना** : राज्याचे अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे हे दि. २९ मे २०२६ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. शुक्रवार दि. २९ मे रोजी सकाळी ८ वाजता ड्रायपोर्ट प्रकल्प दरेगाव, ता.जालना येथे भेट देवून पाहणी, सकाळी ९ वाजता मोतीबाग चौपाटी येथे आगमन व सुशोभिकरण कामाला भेट व पाहणी, सकाळी ९.१५ वाजता जिल्हा रेशीम कोष बाजारपेठ, सिरसवाडी रोड, जालना येथे आगमन भेट व पाहणी करणार आहेत. सकाळी १० ते ११ वाजता शासकीय विश्रामगृह, जालना येथे राखीव, सकाळी ११ ते दुपारी १२.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे आढावा बैठक व पाहणी. दुपारी १२.३० वाजता उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, प्रशासकीय इमारत दुसरा मजला, जालना येथे भेट व पाहणी. दुपारी १.१५ वाजता उपविभागीय अधिकारी कार्यालय, जालना येथे भेट व पाहणी. दुपारी २ वाजता कृषी पर्यटन केंद्र लालवाडी, ता.अंबड येथे आगमन व भोजन. दुपारी ३ वाजता तहसिल कार्यालय, अंबड व आधार केंद्र, तहसिल कार्यालय परिसर तसेच महा-ई-सेवा केंद्र अंबड येथे भेट व पाहणी. दुपारी ३.४५ वाजता सह दुय्यम निबंधक कार्यालय, अंबड येथे भेट व पाहणी. सायंकाळी ४.३० वाजता उपअधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय, अंबड येथे भेट व पाहणी. सायंकाळी ५.३० वाजता सुपर फिफ्टी उपक्रमास भेट (स्थळ - प्रियीयम इन्स्टीट्युट ऑफ सायन्स, मंठा चौफुली, जालना) सोईनुसार छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

### शासकीय वसतिगृहात मोफत प्रवेशासाठी अर्ज करा

**जालना** : समाज कल्याण कार्यालयांतर्गत मुलां-मुलींचे शासकीय वसतिगृहासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह जालना, भोकरदन, अंबड, बदनापुर, घनसावंगी, संत रामदास शासकीय वसतिगृह, जालना व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, जालना, अंबड, मंठा, भोकरदन या शासकीय वसतिगृहामध्ये सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश देण्यात येत आहेत. याकरीता गरजु व पात्र विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org/ या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच शालेय विद्यार्थ्यांनी दि. ३० जुन पर्यंत ऑनलाईन अर्ज करावे. तर इयत्ता ११ वी आणि बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी दि.१५ जुलै २०२७ ही अर्ज करण्याची शेवटची तारीख असेल.यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागासप्रवर्गसह इतर प्रवर्गाच्या इयत्ता आठवी, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये रिक्त असणाऱ्या जागेवर विनामुल्य प्रवेश ऑनलाईन पध्दतीने गुणवत्तेनुसार देण्यात येणार आहे. जर गुणवत्तेनुसार किंवा जागेअभावी विद्यार्थ्याला शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही तरच त्याला ''भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा अर्ज सादर करता येईल. जे विद्यार्थी वसतिगृह योजनेचा अर्ज भरणार नाहीत त्यांना ''भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना व वसतिगृह दोन्ही योजनेचा लाभ मिळणार नाही. ज्या तालुक्यामध्ये शासकीय वसतिगृहे नाहीत अशा तालुक्यात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यासाठी सदर नियम शिथील केला आहे. शासकीय वसतिगृहात विनामुल्य निवास व भोजनासह शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता, ग्रंथालय, जिम व इंटरनेट वाय-फाय इत्यादी सुविधा विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येतात. तरी गरजु विद्यार्थ्यांनी प्रवेशाबाबतचे अर्ज करण्यासाठी https://hmas.mahait.org/ या संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाईन अर्ज करा.

# जालन्यातील व्यापारी व लघु उद्योजकांचा खा.शिंदे यांच्याकडे विविध मागण्यांचा अट्टाहास

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जालना : दि. २७ :** शिवसेनेचे नेते संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे यांनी शिवसंवाद मेळाव्यास सुरुवात होण्यापूर्वी जालना शहरातील उद्योजक, व्यापारी, डॉक्टर्स, वकील आणि शेतकऱ्यांसोबत संवाद साधून विकास विषयक मागण्या आणि त्यांचे प्रश्न व समस्या ऐकून घेतल्या.

प्रामुख्याने जालना औद्योगिक वसाहती मध्ये सिमेंटचे रस्ते करावेत, एमआयडीसीचा चौथा टप्पा मंजूर करावा, जालना ते छत्रपती संभाजीनगर रेल्वे, मेट्रो रेल्वे व बसेस सुरू कराव्यात, शहराला नवीन वळण रस्ता व्हावा, बियाणे विक्रेत्या ऐवजी कंपनीवर गुन्हा दाखल व्हावा, जालना शहरातील बहुचर्चित सिंधी मार्केटचे काम त्वरित हाती घ्यावे, नवीन उद्यान, नवीन नाट्यगृह तसेच शहरातील मोकळ्या मैदानांचे सुशोभीकरण करावे, वाढीव सेल टॅक्स कमी करावा, इंधनाचे भाव वाढत असल्याने मका किंवा इतर धान्यापासून शेतकऱ्यांच्या मार्फत इथेनॉल निर्मिती व्हावी. शेतकरी लघु उद्योजक झाले पाहिजे, त्यासाठी शहराजीकच्या शेतकऱ्यांना लघु उद्योगासाठी प्राधान्य द्यावे, अशी मागणी करण्यात आली. शेतकऱ्यांची फळफळावळे दिल्ली अथवा इतर ठिकाणी वाहून नेण्यासाठी ओव्हरलोडसाठी मंजुरी देण्यात यावी. नदीजोड प्रकल्पाला गती द्यावी, सिंचन क्षमता वाढण्यासाठी नवीन बंधारे तसेच इतर कामांना मंजुरी द्यावी, वकील संघासाठी नवीन कार्यालय व सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, महात्मा फुले जनआरोग्य योजना राबविताना अडचणी येत असल्याची तक्रारही करण्यात आली. अशा विविध महत्त्वपूर्ण मागण्या यावेळी खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकडे करण्यात आल्या.

## मिरची व्यापारी शेख मोहसीन यांची चोरट्यांकडून निर्घृण हत्या

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जाफराबाद : दि. २७ :** जाफराबाद शहरात मंगळवारी मध्यरात्रीनंतर घडलेल्या थरारक घटनेने संपूर्ण शहर हादरले आहे. बुलेट दुचाकी चोरी करणाऱ्या चोरट्यांचा पाठलाग करणाऱ्या मिरची व्यापारी शेख मोहसीन शेख मजीद (वय ४६) यांची धारदार शस्त्राने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली. या हल्ल्यात त्यांचा पुतण्या शेख साहिल (वय २२) हा देखील जखमी झाला असून त्याच्यावर जालना येथे उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २७ मे २०२६ रोजी रात्री अंदाजे १ ते २ वाजेच्या दरम्यान जाफराबाद शहरातील सिद्धार्थ नगर, चिखली रोड परिसरातील घरासमोर उभी असलेली बुलेट दुचाकी काही चोरटे चोरून घेऊन जात होते. ही बाब वाहन मालक शेख मोहसीन यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी आपला पुतण्या शेख साहिलसह चोरट्यांचा पाठलाग सुरू केला.

चिखली रोडवरील जंजाळवाडी परिसरात शेख मोहसीन यांनी चोरट्यांना गाठले असता आरोपींनी स्वतःजवळील धारदार शस्त्राने दोघांवर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात शेख मोहसीन यांच्या डोक्यावर, मानेवर, पाठीवर व डाव्या दंडावर अशा तब्बल सात ठिकाणी वार करण्यात आले. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, जालना येथे नेत असताना रस्त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

या हल्ल्यात जखमी झालेल्या शेख साहिल शेख मोबिन यांच्यावर जालना येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले असून संपूर्ण जाफराबाद शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आहे. या प्रकरणी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली जाफराबाद पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सतीश जाधव पुढील तपास करीत आहेत.

मयत शेख मोहसीन हे जाफराबाद येथील न्यू हायस्कूलमध्ये कार्यरत असलेले शेख मोबिन सर यांचे लहान बंधू होते. शेख मोहसीन यांच्या अशा अचानक व दुर्दैवी निधनामुळे जाफराबाद शहरासह संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## शासकीय मुलींच्या वसतिगृहात विनामुल्य प्रवेश अर्ज वाटप सुरु

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना : दि. २७ :** सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात मुलींचे शासकीय वसतिगृह जालना/मंठा व संत भगवानबाबा मुलींचे शासकीय वसतिगृह जालना/मंठा येथे विनामुल्य प्रवेश अर्ज कार्यालयीन वेळेत वसितगृहात उपलब्ध आहेत.

इच्छुक विद्यार्थिनींनी प्रवेश स्वीकारण्याचे आवाहन मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह अधिक्षिका प्रियंका लोंढे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. संपर्क क्र. ९८२२६४९७४१.

## औद्योगिक वसाहतीत धारदार शस्त्राद्वारे दहशत माजविणाऱ्या दोघांना बेड्या ठोकल्या

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**



**जालना : दि. २७ :** दि.२७ मे २०२६ रोजी १ वाजेच्या दरम्यान भागात २ युवक अवैधरित्या धारदार शस्त्र खंजर बाळगुन दहशत निर्माण करीत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांना मिळाल्याने त्यांच्या सुचनेप्रमाणे पोलीस स्टेशनचे अंमलदार तात्काळ भागातील स्वराज पार्कीग समोरील रोडवर येथे जावुन सदर इसमास ताब्यात घेवुन त्यांचे कडुन २ धारदार खंजर मीळुन आल्याने आरोपी ओमकार शामधन सिंघल, वय २२ वर्ष रा. संतोषीमातानगर, मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर, ओमकार गिरीजाशंकर शेळके, वय १९ वर्ष रा.धनगर पिंप्री ता.अंबड जि.जालना यांच्या विरुध्द पोहेकॉ प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे यांच्या फिर्यादीवरून २ वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस उपनिरीक्षक मनसुब वेताळ, पोहेकॉ रवि देशमुख हे करीत आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधिक्षक तेगबीर सिंह संधु, अपर पोलीस अधिक्षक विक्रम साळी, व उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी साहेब यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार पोलीस ठाणे चंदनझिरा यांचे नेतृत्वात पो.स्टे चंदनझिराचे सपोउपनि मनसुब वेताळ, प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, रविंद्र देशमुख, यांनी केली आहे.

## त्यागमूर्ती माता रमाई यांना अभिवादन



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना : दि. २७ :** शहरातील मस्तगड येथील डॉ.आंबेडकर स्मारक या ठिकाणी आज बुधवार रोजी त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनी अभिवादन करण्यात आले. सर्वप्रथम महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभेच्या राज्य सदस्य छाया हिवाळे, मराठवाडा विभागीय महासचिव भास्कर घेवंदे, जालना जिल्हाध्यक्ष संजय हेरकर, महासचिव राजकुमार दांडगे, उपाध्यक्ष सुलेखा मनवर, संघटक कांताबाई रत्नपारखे, राजेंद्र पवार, छाया बनकर यांची उपस्थिती होती.

## मान्सून पूर्वतयारीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज



**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**मोती तलाव येथे आपत्कालीन शोध व बचाव साहित्याची रंगीत तालीम**

**जालना : दि. २७ :** आगामी मान्सून कालावधीच्या पार्श्वभूमीवर संभाव्य आपत्कालीन परिस्थितीला तात्काळ व प्रभावी प्रतिसाद देता यावा, तसेच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम व सज्ज राहावी यासाठी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आशिमा मित्तल यांच्या निर्देशानुसार व जालना शहर महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण शशिकांत हदगल यांच्या मार्गदर्शनाखाली जालना शहरातील मोती तलाव येथील विसर्जन कुंड परिसरात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग व अग्निशमन विभाग, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्कालीन शोध व बचाव साहित्याची भव्य रंगीत तालीम आयोजित करण्यात आली होती.

यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, मनपा आयुक्त अंजली शर्मा, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी दिपक काजळकर तसेच अग्निशमन अधिकारी संदीप दराडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याशिवाय अग्निशमन विभाग, जालना, बदनापूर व अंबड येथील अधिकारी व कर्मचारी, तसेच रायगड येथे प्रशिक्षण पूर्ण करून आलेले 'आपदा मित्र' मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

रंगीत तालीमेदरम्यान पूर, अतिवृष्टी, पाण्यात अडकलेल्या नागरिकांचा बचाव, आपत्कालीन स्थलांतरण तसेच नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी वापरण्यात येणाऱ्या अत्याधुनिक शोध व बचाव साहित्यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. यामध्ये फायबर बोट, इन्फ्लाटेबल रबर बोट, स्कुबा सेट, फायर जेल ब्लँकेट, लाईफबोये, बॅटरी कटर, बॅटरी स्प्रेडर, फ्लोटींग पंप, पोर्टेबल जनरेटर, पोर्टेबल पंप, मेगाफोन, सेफ्टी नेट, लाईफ जॅकेट व रिफ्लेक्टर जॅकेट आदी साहित्यांच्या कार्यपद्धती व वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

तसेच पाण्यात बुडणाऱ्या व्यक्तीचा सुरक्षिततरित्या बचाव कसा करावा, पूरस्थितीत रबर बोटीद्वारे नागरिकांचे स्थलांतरण कशा पद्धतीने करावे, आपत्कालीन परिस्थितीत समन्वय साधून तात्काळ प्रतिसाद कसा द्यावा याबाबत अग्निशमन विभागामार्फत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण देण्यात आले.

मान्सून कालावधीत उद्भवणाऱ्या संभाव्य नैसर्गिक आपत्तींचा प्रभाव कमी करण्यासाठी तसेच नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात येत असून, अशा प्रकारच्या रंगीत तालीम व प्रशिक्षण उपक्रमांमुळे आपत्ती प्रतिसाद यंत्रणांमध्ये समन्वय, तत्परता व कार्यक्षमता अधिक बळकट होत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

## पद्म पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना** : प्रजासत्ताक दिन दि. २६ जानेवारी, २०२७ रोजी घोषित होणाऱ्या पद्म पुरस्काराकरिता (पद्मश्री, पद्म भूषण, पद्मविभूषण) शिफारशी केंद्र शासनामार्फत नामांकन प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

पद्म पुरस्कार हे सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक असून ते अतिशय प्रतिष्ठेचे आहेत. याबाबतचे अधिनियम आणि नियम केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या www.padmaawards.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. त्यानुसार जालना जिल्ह्यातील पद्म पुरस्कारासाठी पात्र व इच्छुक मान्यवरांची वैयक्तीकरीत्या ऑनलाईन नामांकन पोर्टलवर दि. ३१ जुलै २०२६ पर्यंत सादर करण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, यांनी आवाहन केले आहे.

**संवाद** | **कार्यकर्त्यांच्या कार्याची दखल घेतली जाणार असल्याचे आश्वासन**

# जिल्हा परिषदेवर भगवा फडकविण्यासाठी जोमाने कामाला लागा-खा.श्रीकांत शिंदे

**दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी**

**जालना : दि. २७ :** शिवसेनेचे मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे महाराष्ट्र आशेने पाहत आहे. त्यांचे कार्यकर्त्यांकडे बारीक लक्ष असते. एका सामान्य महिलेस राज्यसभेवर पाठवून खासदार करणारे शिंदे तुमच्याही कार्याची दखल घेतल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास संसदरत्न खासदार श्रीकांत शिंदे यांनी शिवसंवाद दौऱ्यात पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना दिला.

पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर बोलताना खा. शिंदे म्हणाले की, मुंबईत बसून तुमच्या समस्या समजणार नाहीत म्हणून तुमच्याशी थेट संवाद साधायला आलो आहे. याआधी विधानसभेच्या निवडणुकीअगोदर ६२ मतदार संघात कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची संवाद साधला होता. पालिका, महापालिका निवडणुकीआधीही आपण कार्यकर्त्यांशी बोलायला आलो होतो. लोकसंपर्क आणि मेहनत याशिवाय यश मिळत नाही. खुद्द आपले नेते एकनाथराव शिंदे हे १८ /१८ तास काम करतात. आपणही पक्षासाठी दररोज किमान चार तास काम करायला पाहिजे.

मेहनत घेतली तर यश नक्की मिळते. पालिका निवडणुकीमध्ये कमी जागा लढवूनही आपण जास्त जागा जिंकल्या होत्या, याकडे त्यांनी लक्ष वेधले. विधानसभेतही त्याच प्रकारचे यश मिळाले होते. आता सहा महिन्यानंतर जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुका आहेत. तुम्हाला आतापासूनच कामाला लागावे लागणार आहे. युती होईल की नाही हे वरिष्ठ नेते




ठरवतील पण प्रत्येक सर्कलमध्ये आपला स्वतंत्र उमेदवार राहील, अशा पद्धतीने काम करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. पदाधिकारी कार्यकर्त्यांकडून निधी वाटपाबाबत केलेल्या मागणीस अनुसरून बोलताना ते म्हणाले की, येणारे दिवस आपल्यासाठी खूप चांगले राहणार आहेत. एकनाथराव शिंदे मुख्यमंत्री असताना भरघोस आणि आता उपमुख्यमंत्री असतानाही योग्य तो निधी दिला जात आहे. बाकी खात्याकडूनही निधी दिला जात आहे. तथापि निधी मिळत नाही म्हणून काम थांबवायचे नाही. कारण आपले नेते जर एखाद्या सामान्य महिलेची दखल घेऊन त्यांना खासदार करू शकतात तर तुमच्यासारख्या कार्यकर्त्यांचीही ते निश्चितपणे दखल घेतील, असा मला विश्वास आहे. जेथे आपले आमदार, खासदार, मंत्री नव्हते तेथेही शिवसेनेच्या जागा निवडून आलेल्या आहेत. तुमच्याकडे तर भोकरदन, बदनापूर आणि जालन्यासाठी आमदार, मंत्री आणि खासदार उपलब्ध आहेत. तुमच्या तीन विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी आ.अर्जुनराव खोतकर आणि आ.अब्दुल सत्तार यांच्यावर टाकण्यात आली आहे. ते अनुभवी नेते आहेत. तुमच्या सगळ्या मागण्या आणि सूचना मी लक्षात घेतल्या आहेत.

निवडणुकीआधी मी पुन्हा येईल पण आपण जोमाने कामाला लागा असे आवाहन खा. शिंदे यांनी केले. यावेळी माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले की, जालना जिल्हा मुळात शिवसेनेचा बालेकिल्ला राहिलेला आहे. पाच पैकी शिवसेनेचे तीन आमदार होते. जिल्हा परिषद, नगर परिषद, जिल्हा बँक अशा संस्था शिवसेनेच्या ताब्यात होत्या. या जिल्ह्यात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि एकनाथराव शिंदे यांना मानणारे शिवसैनिक मोठ्या प्रमाणात आहेत. श्रीकांत शिंदे यांच्यासारखे अभ्यासू आणि कष्टकरी नेतृत्व मिळाल्याने शिवसैनिकांमध्ये चैतन्य आले आहे. मी आपणास खात्री देतो की आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकल्याशिवाय राहणार नाही. यावेळी खा.भुमरे यांनीही कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांच्यावतीने निश्चितपणे शिवसेनेचा भगवा फडकेल अशी ग्वाही दिली. शेवटी आभार अभिमन्यू खोतकर यांनी मानले.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, गुरूवार २८ मे २०२६

# पशुधनावर 'एल निनोचे' संकट
# सरकारकडून चारा बियाणे मोफत

## सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज; चाराटंचाई टाळण्यासाठी उपाययोजना

**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**



**अमरावती, दि.२७ :** एल निनोमुळे यंदा कमी पावसाची शक्यता असून भविष्यात पशुखाद्य व हिरव्या चाऱ्याची टंचाई उद्भवू शकते. त्यामुळे पशुपालकांनी चारा उत्पादन वाढीचे नियोजन करावे असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे. त्यासाठी शंभर टक्के अनुदानावर चारा बियाणे योजना सुरू केली आहे. गेल्या काही वर्षांत कमी दुष्काळी परिस्थिती आणि कमी पावसामुळे पशुपालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला आहे. विशेषत: उन्हाळ्यात हिरवा चारा उपलब्ध नसल्यामुळे जनावरांचे आरोग्य बिघडले, दूध उत्पादन घटते. पशुखाद्याचा खर्च वाढतो.

या योजनेंतर्गत शुगर ग्रेझ, स्पीड फीड ज्वारी आणि सुधारित मका यासारख्या दर्जेदार चाऱ्यांचे बियाणे उपलब्ध करून दिले जाते.यावर्षी एल निनो सक्रिय राहण्याची शक्यता असल्याने मान्सूनवर प्रतिकूल परिणाम होऊन यंदा सरासरीपेक्षा कमी पाऊस पडू शकतो. असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तविली आहे. पशुसंवर्धन विभागामार्फत वैरण विकास योजनेंतर्गत आणि विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पांतर्गत पशुपालकांना १०० टक्के अनुदानावर चारा बियाणे उपलब्ध करून दिले जाणार आहे.

एल निनो मुळे संभाव्य आपत्ती टाळण्यासाठी प्रत्येक जिल्हा नियोजन व विकास समिती अंतर्गत नावीन्यपूर्ण योजना किंवा आपत्ती निवारण निधीतून चारा बियाणे योजना राबविणार आहे.

१०० टक्के चारा बियाणे योजनेंतर्गत शेतकऱ्यांना चाऱ्याच्या बियाण्यासाठी १०० टक्के अनुदानावर दिले जाते. विशिष्ट मर्यादेत प्रतिहेक्टर अनुदान मिळते. यात ज्वारी, मका, बाजरी, वैरणाच्या बियाण्यांचा समावेश आहे.शेतकऱ्यांच्या नावावर शेती व सिंचनाची सुविधा असावी. किमान ३ ते ४ दुधाळ पशुधन हे आवश्यक आहे. अर्जासाठी सातबारा उतारा, आधार कार्ड आवश्यक आहे. भविष्यात पशुखाद्य व चाऱ्याची टंचाई उद्भवणार कमी पाऊस किंवा खंडित पावसामुळे भविष्यात पशुखाद्य तसेच चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

> विदर्भ मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पांतर्गत बियाण्यांसाठी ऑनलाइन अर्ज करावा, जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत बियाण्यांसाठी नजीकच्या पशुवैद्यकीय चिकित्सालयाशी संपर्क साधावा. **डॉ. संजय कावरे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त**

# अंजनगाव बारीत वादळी पाऊस





**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**अंजनगाव बारी, दि.२७ :** जिल्ह्यासह अंजनगाव बारी परिसरात दुपारी साडेतीन ते सुमारे चार वाजताच्या दरम्यान अचानक हवामानात बदल झाला आणि जोरदार वादळी वाऱ्यासह मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली. उकाड्याने त्रस्त नागरिकांना यामुळे काहीसा दिलासा मिळाला. वादळी वाऱ्याचा तडाखा इतका तीव्र होता की कोंडेश्वर मार्गावरील मुख्य लाईनवर तांत्रिक बिघाड निर्माण होऊन विजेचा पुरवठा पूर्णत: खंडित झाला.महावितरणने नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पुरवठा जाणीवपूर्वक बंद केला असून युद्धपातळीवर दुरुस्तीची कामे सुरू असल्याची माहिती दिली.

वादळामुळे झाडांची पडझड, वाकलेले खांब, सैल झालेल्या तारा अशी परिस्थिती निर्माण झाली असून महावितरणने नागरिकांना धोकादायक ठिकाणी जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे.दुरुस्ती पूर्ण झाल्यावरच विजपुरवठा पूर्ववत केला जाईल, असा संदेशही देण्यात आला आहे. अचानक आलेल्या पावसाने उकाड्यात होरपळलेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. शेतकऱ्यांच्या उकरड्या झालेल्या पिकांना या पावसामुळे चांगली बेहिल मिळाल्याने शेतकरी समाधानी दिसत आहेत.

आयएमडी यांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील २४ तासांत अनेक जिल्ह्यांत तीव्र उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूरवर्धा याशिवाय काही ठिकाणी रात्रीही उष्ण राहण्याची दाट शक्यता वर्तवण्यात आली आहे. या संदर्भातील सूचना मंत्रालय, मुंबई येथे जारी करण्यात आल्या असून नागरिकांच्या मोबाईलवर उष्णतेचे व पावसाचे अलर्ट संदेश देण्यात आले आहेत. तत्पुवी नागरिकांना महत्त्वाची सूचना.विजपुरवठा दुरुस्ती पूर्ण होईपर्यंत संयम ठेवावा.पडलेली झाडे, तारा, विद्युत खांबांच्या आसपास जाणे टाळावे .तीव्र उकरड्यामुळे गरजेपुरतेच बाहेर पडावे.पुरेसे पाणी पिणे, टोपी/छत्रीचा वापर करणे, वृद्ध व लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी.

## थोडक्यात

### शेतशिवारातून बांधकाम साहित्य लंपास

अमरावती : अंजनगाव बारी येथे असलेल्या शेतातील बांधकामावर पाणी मारण्यासाठी महिला गेली. त्यावेळी तिला पाण्याची मोटार, पाण्याच्या तीन प्लास्टिक टाकी, ५ क्विंटल लोखंडी सळाख, १२ बॅग सिमेंट चोरीला गेल्याचे दिसले. या साहित्याची अंदाजे किंमत ४० हजार रुपये आहे. महिलेच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### अल्पवयीन मुलीला फूस लावून पळविले

अमरावती : आई-वडील कामावर गेले असता, त्यांची १४ वर्षीय मुलगी घरी होती. मात्र ते परत आले तर त्यांना मुलगी घरी दिसली नाही. शोध घेवूनही ती सापडली नाही. तिला अज्ञाताने नेल्याची तक्रार पालकांनी फूस लावून पळवून बडनेरा पोलीस ठाण्यात नोंदवली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### जुन्या वादातून युवकावर चाकू हल्ला

अमरावती : जुन्या वादातून युवकाच्या दुचाकीची तोडफोड करीत त्याच्या भावावर चाकू हल्ला केला. त्यात तो गंभीर जखमी झाला. ही घटना शहा पॅलेस, लालखडी रिंगरोड येथे घडली. घटनेच्या वेळी जखमीसह त्याचा भाऊ नातेवाईकाच्या लग्नात सहभागी होण्यासाठी आले होते. तेथे नातेवाईक युवकाने जुना वाद उकरून काढत त्याच्यावर चाकूने हल्ला केला. या प्रकरणी जखमीचा भाऊ शहबाज शहा असलम शहा (३०, रा. बिसमिल्ला नगर) याने नागपुरी गेट पोलिसात फिर्याद नोंदवली. पोलिसांनी चाकू हल्ला करणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### कुंभारवाडा परिसरात मद्यपींवर कारवाई

अमरावती : कुंभारवाडा चौकात दारूच्या नशेत गोंधळ घालत नागरिकांना शिवीगाळ करणाऱ्या एकावर फ्रेजरपुरा पोलिसांनी कारवाई केले. या संदर्भात बाबुलाल हसन रायलीवाले (५५) याच्यावर गुन्हा दाखल केला.

### वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यांवर कारवाई

अमरावती : तीन विक्रेत्यांनी खाद्यपदार्थाची हातगाडी सार्वजनिक ठिकाणी आमरोडवर लावली. त्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण झाला होता. तिनही विक्रेत्यांवर गाडगे नगर पोलिसांनी रहदारीला अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला.

# मनपाच्या कचरा वाहतूक गाड्यांवर कारवाई करा

## शिवसेनेचे आयुक्तांना निवेदन



**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**अमरावती, दि.२७ :** महानगरपालिकेसाठी घनकचरा वाहतूक करणाऱ्या कोणार्क कंपनीच्या वाहनांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मनपा आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. संबंधित कंपनीच्या अनेक कचरा वाहतूक गाड्या विमा, परमिट व फिटनेस प्रमाणपत्रांशिवाय शहरात धावत असल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे.मनपाने कंत्राटी पद्धतीवर नियुक्त केलेल्या कोणार्क कंपनीकडून मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अशा बेकायदेशीर वाहनांमुळे अपघात झाल्यास नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो तसेच विमा नसल्यामुळे नुकसानभरपाईचा प्रश्नही निर्माण होणार असल्याचे म्हटले आहे. शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मनपा प्रशासनावर दुर्लक्षाचा आरोप करत, कंत्राटदाराच्या वाहनांची कागदपत्रे तपासण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असल्याचे स्पष्ट केले. संबंधित वाहनांचे नोंदणी क्रमांक, आरसीच्या प्रती, छायाचित्रे व व्हिडिओ पुरावे उपलब्ध असल्याचा दावा करण्यात आला आहे.निवेदनात मनपा व आरटीओच्या संयुक्त पथकामार्फत ४८ तासांत विशेष तपासणी मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. अपूर्ण अथवा अवैध कागदपत्र असलेल्या गाड्या तात्काळ जप्त करून कंपनी व चालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर विभागीय चौकशी करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.. आवश्यक असल्यास न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचाही इशारा देण्यात आला. निवेदन देताना शिवसेना शहरप्रमुख प्रवीण हरमकर, माजी विरोधी पक्षनेते गोविंद दायमा, उपमहापौर मनीष रामावत, रामा सोळंके, बाळा सावरकर, पंजाबराव तायवाडे, मुन्ना चव्हाण, कमलेश गुप्ता, विनोद मेंडळरकर, राजू हेरे, श्रीकांत शर्मा, विनोद बामटकर, रुपेश आलेकर, संदीप मानेकर यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

# तळ्यातील गाळ काढण्यावरून दोन गटात हाणामारी

**नांदगाव खंडेश्वर,दि.२७ :** श्री रामनाथ स्वामी मंदिर परिसरात असलेल्या तळ्यातील गाळ व पाणी काढण्यावरून दोन गटात वाद झाला. त्याचे रुपांतर एकमेकांना हाणामारी करण्यात झाले.

ही घटना वाढोणा रामनाथ येथे घडली. या प्रकरणी मंगरूळ चव्हाळा पोलिसांनी परस्परविरोधी तक्रारीवरून एकूण ६४ जणांविरुद्ध गुन्हे दाखल केलेत. फिर्यादी नितीन रामकृष्ण गायधनी (५२) हे श्री रामनाथ स्वामी मंदिर देवस्थानाचे अध्यक्ष आहेत. घटनेच्या वेळी त्यांनी मंदिर परिसरातील तळ्यातील गाळ व पाणी काढले. त्याला विनोदमोतीराम चौधरी (६०) यांनी कोणाला विचारून तळ्यातील गाळ काढला असा जाब विचारत मारहाण केली. त्यात फिर्यादीसह काही जण जखमी झाले, तर द्रोणाचार्य पद्माकर ठाकरे (५०) यांनी या संदर्भात परस्परविरोधी तक्रार दाखल केली.

# हर्षवर्धन देशमुख, दिलीपबाबू इंगोलेंच्या अमृत महोत्सवी सत्कार सोहळ्याची जय्यत तयारी

## सेवाभावातून नेतृत्वापर्यंत: एक अमृत प्रवास या संकल्पनेवर नेत्रदीपक सोहळा

**अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**अमरावती, दि.२७ :** शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या वैचारिक वारसाची जपवणूक करत महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक आणि मूल्याधिष्ठित परंपरेत मोलाचे योगदान देणाऱ्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख तथा कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांच्या अमृत महोत्सवानिमित्त भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सेवाभावातून नेतृत्वापर्यंत एक अमृत प्रवास या संकल्पनेवर आधारित हा विशेष सोहळा रविवार, दिनांक ३१ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, शिवाजी नगर, अमरावती येथे भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आल्याची माहिती शिव परिवाराच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.पत्रकार परिषदेत शिव परिवाराच्या वतीने सांगण्यात आले की, शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत राहून हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणाऱ्या या दोन्ही व्यक्तिमत्त्वाचा प्रवास हा केवळ संस्थात्मक नेतृत्वाचा नसून सामाजिक बांधिलकी, संस्कार आणि सेवाभाव जपणाऱ्या कार्यसंस्कृतीचा आदर्श मानला जातो. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची





संधी उपलब्ध करून देत समाजपरिवर्तनाची चळवळ उभी करण्यात या दोनही नेतृत्वाचा मोठा वाटा राहिला आहे.

या अमृत महोत्सव सोहळ्यास देशातील विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मविभूषण खा. शरदचंद्र पवार राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश भूषणजी गवई, केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी, महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री डॉ. पंकजजी भोयर तसेच अमरावती महानगरपालिकेचे महापौर म श्रीचंद तेजवानी उपस्थित राहणार आहेत. यासोबतच श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, राजकीय क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी गण यांचीही उपस्थिती लाभणार आहे. या सोहळयात मा. हर्षवर्धनजी देशमुख आणि मा. दिलीपबाबू इंगोले यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संघटनात्मक कार्याचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, शिस्त, संस्कार आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा यावेळी घेण्यात येणार असून अनेक मान्यवर त्यांच्याविषयी मनोगत व्यक्त करणार आहेत.कार्यक्रमाच्या निमित्ताने अमरावती शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षणप्रेमी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे सांगितले जात आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या कार्याशी भावनिक नाते असलेल्या अनेकांसाठी हा सोहळा म्हणजे कृतज्ञतेचा आणि प्रेरणेचा उत्सव ठरणार आहे.या अमृत महोत्सव सोहळयास संपूर्ण विदर्भ तसेच राज्यातून हजारो मान्यवर मंडळी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे नियोजनासाठी शिव परिवाराच्या वतीने शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य दिव्य असा स्टेज उभारण्यात येणार आहे.

नागरिकांना कार्यक्रम बघता यावा यासाठी प्रत्येक ठिकाणी एलईडी स्क्रीन उभारण्यात येणार आहे. सोबतच श्री हर्षवर्धन देशमुख आणि दिलीपबाबु इंगोले यांच्या जीवनावरील चित्रफीत देखील दाखविण्यात येणार आहे. नागरिकांची सुनियोजित बैठक व्यवस्था या प्रांगणात करण्यात येणार असून यामध्ये व्हीआयपी व्यवस्था, शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद, ज्येष्ठ नागरिक, महिला, पत्रकार यांच्यासाठी देखील स्वतंत्र व्यवस्था असणार आहे. कार्यक्रमाला येणाऱ्या प्रत्येकासाठी भव्य अशी भोजन व्यवस्था, पार्किंग या सर्व गोष्टीची बारकाईने व्यवस्था करण्यात आली आहे.शिव परिवाराच्या आनंदात भर घालणाऱ्या या कार्यक्रमासाठी सर्व वैदर्भीय नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक शिव परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण https://youtube.com/live/zMByqXESvUgfeature=share या लिंक वरून करण्यात येणार आहे. तसेच https://shivaji.live या युट्युब चॅनलवरुन सुध्दा कार्यक्रम प्रत्यक्ष पाहता येईल.या पत्रकार परिषदेला संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजाननराव पुंडकर, ॲड.जे.व्हि.पाटील पुसदेकर, सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, प्रा. सुभाषराव बनसोड, सुरेश दादा खोटरे, सचिव प्राचार्य डॉ.वि.गो ठाकरे, डॉ. पद्माकर सोमवंशी,स्विकृत सदस्य प्राचार्य अंबादास कुलट, डॉ.अमोल महल्ले, विजय ठोकळ, डॉ . आजीवन सभासद बबनराव चौधरी, राजाभाऊ सुंदरकर,आदी मान्यवर उपस्थित होते.

**दुर्लक्षित** | **लोकप्रतिनिधींची अनास्था, नागरिक व शेतकऱ्यांचे हाल!**

# तलाठी कार्यालयाची इमारत कोसळून दोन वर्षे उलटली

**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**शेंदुरजना घाट, दि.२७ :** एकीकडे सरकार 'शासन आपल्या दारी' अशा घोषणा देत असताना, दुसरीकडे मात्र महसूल विभागाचा कणा समजले जाणारे तलाठी कार्यालयच प्रशासकीय अनास्थेचा बळी ठरले आहे. शेंदुरजना घाट येथील तलाठी कार्यालयाची जुनी इमारत अत्यंत मोडकळीस आली होती. ही इमारत कधीही कोसळू शकते, त्यामुळे नवीन इमारत मंजूर करावी अशी वारंवार मागणी स्थानिक नागरिकांनी केली होती. मात्र, स्थानिक लोकप्रतिनिधींनी या गंभीर समस्येकडे साफ दुर्लक्ष केले.

परिणामी, दोन वर्षांपूर्वी ती जीर्ण इमारत अचानक कोसळली. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, या घटनेला दोन वर्षांचा प्रदीर्घ कालावधी लोटूनही नवीन इमारतीसाठी प्रशासकीय पातळीवर कोणतीही हालचाल दिसत नाही.



त्यामुळे आमचे हक्काचे तलाठी कार्यालय कधी होणार? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. सध्याची परिस्थिती पाहता, शेंदुरजना घाट येथील तलाठी कार्यालयाचा गाडा तात्पुरत्या स्वरूपात मलकापूर येथून हाकला जात आहे. परंतु, यामुळे सामान्य जनतेला नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शेंदुरजना घाट येथील वृद्ध शेतकरी, नागरिक आणि शाळकरी मुलांना दाखले व शासकीय कामांसाठी तब्बल १ किलोमीटरची पायपीट करत मलकापूर येथील तात्पुरत्या कार्यालयात जावे लागत आहे. वेळ आणि पैशांचा अपव्यय हक्काची इमारत नसल्याने शेंदुरजना घाट मंडळ कार्यालयांतर्गत येणाऱ्या अनेक गावातील शेतकऱ्यांना नाहक फेऱ्या माराव्या लागत आहेत.

> दोन वर्षे झाली तरी साधी हालचाल नाही, हे लोकप्रतिनिधींचे अपयश आहे. शेतकऱ्यांना लहान-सहान कामासाठी १ किलोमीटर दूर जावे लागते. सरकारने तात्काळ नवीन इमारतीचे बांधकाम सुरू करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. **स्थानिक संतप्त नागरिक व शेतकरी.**

शेंदुरजना घाट हे परिसरातील एक मुख्य केंद्र आहे. येथील हक्काची मंडळ कार्यालय इमारत लवकरात लवकर उभी राहणे अत्यंत गरजेचे आहे. जनतेच्या या तीव्र भावना आणि होणारी गैरसोय लक्षात घेता, राज्याचे महसूल मंत्री चंद्रकांतदादा बावनकुळे या गंभीर प्रश्नाकडे वैयक्तिकरीत्या लक्ष देतील का? ते या इमारतीसाठी निधी मंजूर करून शेंदुरजना घाटवासीयांना दिलासा देणार का? याकडे आता संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# आयपीएस भामरे यांच्या धडक कारवाईने अवैध व्यवसायिकांमध्ये दहशत

**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**चांदूरबाजार, दि.२७ :** येथे नुकतेच नियुक्त झालेले आयपीएस सागर भामरे यांनी अवैध धंद्यांविरोधात सुरू केलेल्या धडक कारवाईमुळे परिसरातील गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.



चांदूरबाजार पोलीस स्टेशन हद्दीत अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या अवैध दारू विक्री, रेती तस्करी, वरली मटका, जुगार तसेच गुटखा व्यवसायावर आयपीएस सागर भामरे यांनी कठोर भूमिका घेत सलग कारवाया सुरू केल्या आहेत. या कारवाईमुळे अनेक मोठे तस्कर आणि अवैध व्यवसाय करणारे सध्या भयभीत झाले असून काहींनी आपले धंदे बंद केल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, आयपीएस सागर भामरे यांच्यासारखे कर्तव्यदक्ष आणि कठोर पोलीस अधिकारी कायमस्वरूपी येथे कार्यरत राहिले तर चांदूरबाजार परिसरातील अवैध धंद्यांना पूर्णपणे आळा बसू शकतो. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे सामान्य नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून पोलीस प्रशासनाबद्दलचा विश्वास वाढताना दिसत आहे. मात्र, आयपीएस सागर भामरे हे काही दिवसांसाठीच चांदूरबाजार पोलीस स्टेशन येथे कार्यरत असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे त्यांच्या बदलीनंतर पुन्हा पूर्वीसारखी परिस्थिती निर्माण होईल का ? असा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे.सध्या तरी भामरे यांच्या कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून परिसरात कायद्याचा धाक निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
अमरावती, गुरूवार २८ मे २०२६



# थोडक्यात

## गळफास घेत वृद्धाची आत्महत्या

अमरावती : वडापुरा टेकडी येथे ७० वर्षीय वृद्धाने झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. लक्ष्मण श्यामराव शिंदे (७०, रा. वडारपुरा) असे मृतकाचे नाव आहे. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी मर्ग नोंदवला.

## समाजकंटकांकडून चारचाकीला आग

अमरावती : सुदर्शन नगर येथे घरासमोर उभ्या असलेल्या चारचाकीला (एमएच २२-एक्स ८०५५) चार युवकांनी आग लावली. त्यानंतर ते पळून गेले. ही घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

## शेतातून चोरून ट्रॅक्टर लंपास

अमरावती : गेल्या आठ महिन्यांपासून शेतातील पोल्ट्री फार्म बंद असून तेथेच शेतीच्या कामासाठी आवश्यक असलेला ट्रॅक्टर (एमएच २७-बीबी १३६६) उभा होता. अज्ञात चोरट्याने ट्रॅक्टर, ३ गॅस सिलेंडर, दोन जुने बंद कुलर, दोन जनरेटरच्या बॅटरी असे एकूण ३ लाख ७८ हजार ५०० रुपयांचे साहित्य चोरून नेले. ही घटना गणोरी येथील शेत शिवारात घडली. शरद नारायण भारसाकळे (५९, रा. दस्तुरनगर, अमरावती) यांच्या तक्रारीवरून भातकुली पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला.

## शाळेतून लॅपटॉप चोरी

अमरावती : दुसऱ्या जिल्ह्यातून महिला प्राचार्य म्हणून महर्षि पब्लिक स्कूलमध्ये बदली होवून आली. त्यांनी त्यांचा लॅपटॉप व अन्य साहित्य असलेली बॅग शाळेतच ठेवली होती. अज्ञाताने सामान अस्ताव्यस्त करीत लॅपटॉपसह बॅग असे एकूण २६ हजारांचे साहित्य चोरून नेले. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत इसम जखमी

अमरावती : हातगाडीवर भाजी विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या ५० वर्षीय व्यक्तीला भरधाव अज्ञात वाहनाने धडक दिली. त्यात विक्रेत्याला जबर दुखापत झाली. ही घटना रेल्वे कॅबिनजवळ घडली. बडनेरा पोलिसांनी जखमी भाजी विक्रेत्याच्या तक्रारीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला.

## भरधाव दुचाकीची वृद्धाला धडक

अमरावती : पत्नीसह पायदळ निघालेल्या भाष्कर माणिकराव देशमुख (६६, रा. वृंदावन केली. कॉलनी, चिलम छावणी) यांना भरधाव दुचाकीने धडक दिली. त्यात त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. ही घटना वृंदावन कॉलनी येथील आरटीओ कार्यालयाच्या समोरील रस्त्यावर घडली.

## जनावरांची वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई

अमरावती : कत्तलीच्या उद्देशाने जनावरांची वाहतूक करणाऱ्या वाहनावर (एमएसच २७-एजी ३९०७) नागपुरी गेट पोलिसांनी कारवाई केली. ही कारवाई लालखडी मार्गावर करण्यात आली. वाहनात निर्दयतेने कांबलेली ३ जनावरे आढळली. वाहन व जनावरांसह पोलिसांनी एकूण १ लाख २८ हजारांचे साहित्य जप्त केले, तर अहेफाज खान हिफाजत खान (३२) याच्यावर गुन्हा नोंदवला.

## अवैध दारू विकेत्यांवर कारवाई

अमरावती : खोलापुरी गेट पोलिसांनी विजय मनोहर हरणे याच्यावर कारवाई करीत त्याच्या ताब्यातून ६८० रुपयांची देशी दारू जप्त केली, तर वलगाव पोलिसांनी टाकरखेडा संभू येथे कारवाई केली. या वेळी नरेश गणपतराव पाटील यांच्या ताब्यातून ४०० रुपयांची दारू जप्त केली.

# हायअलर्ट : जिल्ह्यात उष्णतेची लाट!

## मोबाईलवर अचानक वाजला सायरन | नागरिकांची उडाली भंबेरी

**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**अमरावती, दि.२७ :** टिंग-टिंग-टिंग... असा अचानक आणि नेहमीपेक्षा वेगळा, मोठा सायरनसारखा आवाज मोबाईलवर वाजला आणि स्क्रीनवर लाल रंगात इंग्रजीत संदेश चमकला- 'Extremely Severe Alert'. हा कुठला घातपाताचा किंवा आपत्तीचा संदेश तर नाही ना? या भीतीने मंगळवारी दुपारी चार वाजतादरम्यान अचानक अनेकांच्या काळजाचा ठोका चुकला आणि जिल्ह्यातील नागरिकांची चांगलीच भंबेरी उडाली. हा संदेश दुसरा कोणताही नसून हवामान विभागाने पुढील २४ तासांत अमरावतीसह विदर्भात येणाऱ्या अति तीव्र उष्णतेच्या लाटेचा दिलेला थेट इशारा होता. मात्र, अनेक नागरिकांना या डिजिटल यंत्रणेची पूर्ण माहिती नसल्याने काही काळ परिसरात भीतीचे आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते.

मंगळवारी दुपारी ४ वाजताच्या दरम्यान अचानक जिल्ह्यातील लाखो नागरिकांच्या मोबाईलवर एकाच वेळी तीव्र कंपन आणि मोठ्या आवाजासह एक पॉप-अप मेसेज आला. इंग्रजीमध्ये असलेल्या या संदेशात अमरावती, वर्धा, नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये पुढील २४ तासांत भयानक उष्णतेची लाट आणि वॉर्म नाईट (उष्ण रात्र) राहण्याचा इशारा देण्यात आला होता.

सर्वसामान्य नागरिक आपापल्या




कामात व्यस्त असताना अचानक मोबाईल अशा पद्धतीने वाजल्याने अनेकांना सुरुवातीला काही कळेनासे झाले. माझा फोन हॅक तर झाला नाही ना? किंवा काही मोठी दुर्घटना घडली की काय? अशी शंका घेत अनेकांनी तात्काळ शेजाऱ्यांकडे आणि मित्रांकडे धाव घेतली.

मोबाईलवर हा मेसेज धडकताच काही मिनिटांतच सोशल मीडियावर याचे स्क्रीनशॉट व्हायरल झाले. तुमच्त्याही मोबाईलवर असा मेसेज आला का? हा मेसेज खरा आहे की खोटा? अशा प्रश्नांचा पूर व्हॉट्सॲप ग्रुप्सवर आला होता. सुशिक्षित तरुण आणि जाणकारांनी हा मॅसेज हवामान खात्याचा अधिकृत इशारा असल्याचे स्पष्ट केल्यानंतर कुठे नागरिकांचा जीव भांड्यात पडला.

हा केवळ हवामान विभागाचा चाचणी आणि सतर्कता संदेश असून नागरिकांनी घाबरून न जाता केवळ वाढत्या उन्हापासून स्वत:चा बचाव असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

शहरासह जिल्ह्यात दीर्घ काळानंतर झालेल्या पावसामुळे नागरिकांना वाढत्या तापमानापासून मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या काही दिवसांपासून तीव्र उकाडा आणि तापमानात सातत्याने वाढ होत असल्याने नागरिक हैराण झाले होते दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत होता. मात्र अचानक वातावरणात बदल होऊन ढगाळ वातावरण निर्माण झाले आणि काही भागात जोरदार तर काहीनागरिकांनी घाबरून न जाता केवळ वाढत्या उन्हापासून स्वत:चा बचाव ठिकाणी हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांनीही समाधान व्यक्त केले. उष्णतेमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाल्याचे चित्र दिसून आले. दुसरीकडे शेतकऱ्यांमध्येही आनंदाचे वातावरण आहे. उन्हाच्या तीव्र झळांमुळे पिकांवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात होती. अशातच झालेल्या पावसामुळे जमिनीतील उष्णता कमी होण्यास मदत झाली आहे.

# श्री संत रुपलाल महाराज स्मारक विकास आराखडा अडचणीत

**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, दि.२७ :** श्री संत शिरोमणी रुपलालजी महाराज राष्ट्रीय स्मारक विकास आराखडा ता. अंजनगाव सुर्जी या प्रस्तावा मधील त्रुटी पूर्तता तसेच प्रस्ताव पुढील कारवाई करिता पाठविण्याकरता दि. २२ मे रोजी दुपारी १.०० वाजता शासकीय विश्रामगृह अंजनगाव सुर्जी येथे बैठक पार पडली. बैठकीमध्ये उपविभागीय अभियंता अघम दर्यापूर व उपअभियंता राऊत अंजनगाव सुर्जी उपस्थित होते. गेली एक वर्षांपूर्वीच शासनाकडे सादर झालेला ८० कोटी २६ लाखाचा प्रस्ताव हा अमान्य करण्यात आला असे अभियंता अघम यांचे कडून सांगण्यात आले व एवढा मोठा निधी स्मारकाला देता येत नाही हे सुद्धा सांगण्यात आले. स्मारकामध्ये मंदिर,संत रुपलाल महाराजांची भव्य स्टयाचू मूर्ती, रस्ता व पूल सुद्धा देता येत नाही असे सांगण्यात आले यावरून एकंदरीत शासनाला निधीमध्ये काटकसर करून कमीत कमी निधी संत रुपलाल महाराज स्मारकाला द्यायची भूमिका सरकारची दिसते.अश्या ह्या गौड बंगाल पद्धतीने सदरचा प्रस्ताव हा अडचणीत आणण्याचा प्रकार शासनाकडून दिसून येत आहे ह्या मुख्य बाबीवर अखिल भारतीय बारी महासंघाची भूमिका आहे की, जो प्रस्ताव अमरावतीच्या बैठकीमध्ये देण्यात आला तोच शासनाने कायम ठेवावा. ज्यामध्ये श्री संत रुपलाल महाराजांची भव्य मूर्ती,महाराजांचे मंदिर, रस्ता, नदी व नाल्यावरील पूल यांचा समावेश असावा.व तोच कायम करावा अशी ठाम भूमिका अखिल भारतीय बारी महासंघाने



घेतली आहे व तसें लेखी पत्र सुद्धा देण्यात आले आहे . जर शासनाला रस्ते व पूल यामध्ये खर्च झेपवत नसेल तर हायवे रोडवरील कुठलीही जमीन भूसंपादन करून राष्ट्रीय स्मारका करता द्यावी जेणेकरून पूल व रस्ताच बांधावा लागणार नाही.अशी भुमिका सुद्धा बारी महासंघाच्या वतीने मांडण्यात आली. महासंघाच्या वतीने सुरेश भोंडे, निलेश ढगे, मनोहर मुरकुटे, उमेश भोंडे, रमेश धुळे, दिनेश भोंडे ह्यांनी आपली बाजू उपस्थित अधिकाऱ्यांसमोर मांडली . अखिल भारतीय बारी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि. रमेशचंद्रजी घोलप यांनी सुद्धा शासनाने दिलेला नवीन प्रस्ताव अमान्य आहे पूर्वीचाच शासनाने जुना ८० कोटी २६ लाखाचा प्रस्ताव हाच मान्य करावा अशी आग्रही भूमिका महासंघाच्या वतीने घेण्यात आली.

# जरुड -डवरगाव-राजुरा बाजार रस्त्याची अवस्था दयनीय

**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**बेनोडा शहीद, २७ :** वरुड तालुक्यातील जरुड -डवरगाव - राजुरा बाजार गावच्या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेल्या खड्डयांमुळे नागरिकांचे हाल होत आहेत. अनेक ठिकाणी रस्ता पूर्णपणे उखडून गेला असून, वाहन चालवणे म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखे झाले आहे.मात्र याकडे संबंधित प्रशासन व लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. दररोज या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठ्या प्रमाणात शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. विशेषत दुचाकीस्वारांना कमरेचा व पाठीचा त्रास वाढत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

## नागरिकांचे होत आहेत हाल !

शालेय वाहने तसेच शेतीसाठी व आठवड्यातून गुरुवार दिवशी बैल बाजार राजुरा बाजार येथे भरतो



त्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्याना जनावरे नेण्याआणण्यासाठी जाणाऱ्या वाहनांनाही या खराब रस्त्याचा फटका बसत आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेकवेळा या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत निवेदने देऊनही लोकप्रतिनिधी व संबंधित बांधकाम विभाग हे केवळ स्वत:चा विकास साधत आहेत नागरिकांचे त्यांना फारसे देणे घेणे दिसत नाही. सदर रस्ता हा जीवघेणा ठरला आहे. याला लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभाग तसेच सुद्धा जबाबदार आहे. कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. पावसाळ्यात तर परिस्थिती अधिकच बिकट होते खड्डयांमध्ये पाणी साचल्याने अपघातांचा धोका वाढतो.

नागरिकांमध्ये प्रशासन व लोकप्रतिनिधीं विरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत असून निवडणुकीच्या वेळी आश्वासने देणारे नेते आता मात्र दिसेनासे झाले आहेत असा संतापजनक सूर उमटत आहे.

तत्काळ रस्त्याची दुरुस्ती करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. लोकप्रतिनिधी व बांधकाम विभाग यांनी हा रस्ता वाऱ्यावर सोडला आहे. संबंधित विभाग आणि लोकप्रतिनिधी गेल्या अनेक वर्षापासून हा रस्ता उखडलेला असून दिवसाकाठी अपघात मालिका सुरूच आहे. लोकप्रतिनिधींना अद्यापही जाग कशी आली नाही. असेच जर सुरु राहले तर हा रस्ता आमच्या साठी जीवघेणा ठरेल.यात तीळमात्र शंका नाही .

**राजेंद्र तायवाडे**

# श्रुती तडस यांचा सत्कार



**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**यावली शहीद, दि.२७ :** यावली शहीद येथील श्रुती अरुणराव तडस सरळ सेवा परीक्षा २०२५ मध्ये उत्तीर्ण होऊन जिल्हा लेखा व कोषागार कार्यालय अमरावती येथे कनिष्ठ लेखापाल पदी निवड झाल्याबद्दल यावली शहीद येथे आयोजित ग्राम जयंती महोत्सव या कार्यक्रमात खासदार बळवंत वानखडे तथा माजी पालकमंत्री एड. यशोमती ताई ठाकूर यांच्या हस्ते श्रुती तडस यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी वं. राष्ट्रसंत जन्मस्थळ मंदिर अध्यक्ष रामचंद्र कांडलकर, सचिव सुनील देशमुख, ह.भ. प. सुनील महाराज लांजुळकर, गोपाल सालोटकर, डॉ.देवेंद्र यादव, सुधाकर इंगळे,अतुल यावले, श्रीकृष्ण पखाले,अरुण तडस आदी मान्यवर विचार पिठावर उपस्थित होते.

# डॉ.वैभवकुमार निमकर यांना राज्यस्तरीय कृषिरत्न पुरस्कार

**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**अमरावती, दि.२७ :** २५ मे रोजी झालेल्या राज्यस्तरीय कृषिरत्न पुरस्कार २०२६ डॉ. वैभवकुमार निमकर यांना प्राप्त झाला.. कृषिरत्न राज्यस्तरीय पुरस्कार हा महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभाग व राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठान याद्वारे दरवर्षी आयोजित करण्यात येते. यावर्षी राज्यस्तरीय कृषिरत्न पुरस्कार चे २१ वे वर्षे होते. सोबतच शेतकरी, शेतमजूर, कृषी शास्त्रज्ञ,कृषी संशोधक, कृषी अधिकारी ,कृषी युवा कार्यकर्ता ,कृषी युवा नेतृत्व , कृषी सेवा केंद्र , कृषी संदर्भात मार्गदर्शन , कृषी संदर्भात योग्य समुपदेशन , शेतकरी आत्महत्या ग्रस्त कुटुंब यांचे सात्वन व आधार अशा प्रकारच्या विविध योजना शेतकऱ्यापर्यंत राबवून त्यांना जनकल्याणकारी योजनांचा लाभ मिळावा व त्यांचे जीवन सुजलाम सुफला व्हावे हा आशावाद असतो.. राज्यस्तरीय कृषिरत्न पुरस्कार २०२६ यामध्ये महाराष्ट्र राज्यातून तब्बल १८ कृषी नेतृत्वाची निवड करण्यात आली त्यामध्ये अमरावती,



वाशिम, बुलढाणा, चंद्रपूर, नाशिक, पुणे, सातारा, सांगली देहू , आळंदी या जिल्ह्यातील वर गावातील कष्टकरी शेतमजुरांना विशेष राज्यस्तरीय कृषिरत्न पुरस्कार प्राप्त झाला. त्यामध्ये वखरणी ,नांगरणी, पेरणी , फवारणी ,उत्कृष्ट बैल जोडी,तिफन , तिफनकरी, अशा विविध जातीनिहाय गणने मधून उत्तम आणि प्रतिभावंत शेतकऱ्याची निवड करण्यात येते. त्याचबरोबर शेतकऱ्याला कुठले प्रकारची अडीअडचण आल्यास त्याला आर्थिक मदत करणे व त्यामधील सुप्त गुणांना वाव कसा मिळेल त्यासाठी महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग, राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठान, कृषी विज्ञान केंद्र, नेहमी पाठीशी गंभीर परिस्थितीत खंबीरपणे उपस्थित असते. यामध्ये रासायनिक खतांचा वापर, शेती पूरक संसाधने, शेतमाल भाव, शेती पूरक साधने व हत्यारे, शासनाच्या विविध योजना अशा प्रकारचे व्याख्याने व आपले निवेदनातून डॉ. वैभवकुमार निमकर करतात. शेतकरी, शेतमजूर , कष्टकरी, या लोकांना विशेषत: मार्गदर्शन करण्याचे प्रण डॉ. निमकर यांनी घेतले. सोबतच डॉ. निमकर कृषी विभागाचे विद्यार्थी असून त्यांना एग्रीकल्चर ,हॉर्टिकल्चर , बायोटेक्नॉलॉजी ,ॲग्री इंजिनिअरिंग असा दांडगा अनुभव आहे. सोबतच डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला या ठिकाणी त्यांची पदवीही मेरिटमध्ये उत्तीर्ण आहेत. म्हणूनच त्यांच्या कला, क्रीडा ,शिक्षण ,साहित्य, कृषी ,मनोरंजन, खेळ ,संवादाचे कौशल्य त्यांचे या गोष्टींचा विचार करून यावर्षीचा राज्यस्तरीय कृषिरत्न पुरस्कार २०२६ त्यांना मिळाला. हा पुरस्कार भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली. पुरस्कृत श्रमसाफल्य फाउंडेशन, कृषी विज्ञान केंद्र, घातखेड, जि.अमरावती या ठिकाणी मोठ्या थाटामाटात हा कार्यक्रम सन्माननीय प्रमुख पाहुण्यांचे हस्ते पार पाडला.. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभाग अमरावतीचे विभागीय सहसंचालक सन्माननीय सातपुत, जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी सन्माननीय घोरपडे , तालुका कृषी अधिकारी गुल्हाने, राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश दादा साबळे, ग्रामगीताचार्य पौर्णिमा ताई सवई, प्रा. काळे, कृषी विज्ञान केंद्राचे संचालक कळस्कर, सोबतच कृषी विभाग अमरावतीचे सर्व सन्माननीय अधिकारी वर्ग व राजीव गांधी कृषी प्रतिष्ठानचे पदाधिकारी त्याचबरोबर सर्व शेतकरी, शेतमजूर व कष्टकरी यांची उपस्थिती प्रामुख्याने अभिमानास्पद आणि समाधानी होती. डॉ. निमकर यांचे अभिनंदन होत आहे.

## तहसील कार्यालयाच्या गेटवर चढून शेतकऱ्याचा आत्महत्येचा प्रयत्न

# तक्रार दाखल करा,नाहीतर जीव देईन!

**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**अमरावती, दि.२७ :** शेतीच्या पाणंद रस्त्याच्या वादातून एका शेतकऱ्याने थेट तहसील कार्यालयासमोरील मुख्य गेटवर चढून दुपट्ट्याचा गळफास घेत आत्महत्येचा प्रयत्न केल्याने तहसील परिसरात एकच खळबळ उडाली. भर उन्हात सुरू झालेल्या या आंदोलनामुळे प्रशासनाची मोठी धावपळ उडाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, देवगाव येथील शेतकरी अतुल खारोडे हे तहसीलदार पुष्पा सोळंके यांच्या निर्देशानुसार धाडी, सेलगाव, वडाळी, देवगाव व खोडगाव परिसरातील शेती पाणंद रस्त्याच्या मोजणीसाठी संबंधित ठिकाणी गेले होते असा अतुल खारोळे यांचं म्हणणं आहे. मोजणीदरम्यान दोन शेतकरी गटांमध्ये वाद निर्माण झाल्याचे सांगण्यात येत आहे. यावेळी काही शेतकऱ्यांनी आपल्याला मारहाण



केल्याचा आरोप अतुल खारोडे यांनी केला.

मला तहसीलदार मॅडमनी बोलावले होते. मात्र, वाद सुरू झाल्यानंतर त्या तेथून निघून गेल्या. संबंधित शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करून तहसीलदारांनीच तक्रार द्यावी, अशी मागणी अतुल खारोडे यांनी केली.

दरम्यान, अमरावती जिल्ह्यात तापमान ४५ अंशांच्या आसपास असताना भर उन्हात अतुल खारोडे यांनी तहसील कार्यालयाच्या मुख्य गेटवर चढून दुपट्ट्याचा गळफास घेत आंदोलन सुरू केले. जोपर्यंत तक्रार दाखल होत नाही, तोपर्यंत खाली उतरणार नाही; अन्यथा जीव देईन, असा इशारा त्यांनी दिल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलीस प्रशासन तातडीने घटनास्थळी दाखल झाले. ठाणेदार सुरज बोंडे यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचारी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न करत होते. भर उन्हात सुरू असलेल्या या प्रकारामुळे तहसील कार्यालय परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.

अखेर तहसीलदार पुष्पा सोळंके व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित घटनेबाबत लेखी तक्रार तयार करून पोलिसांकडे सुपूर्द केली. त्यानंतर अतुल खारोडे हे गेटवरून खाली उतरले असून पोलीस प्रशासनासोबत पोलीस ठाण्यात जाऊन अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली.यानंतर पोलिसांनी दोन्ही शेतकरी गटांवर गुन्हे दाखल केले असून पुढील तपास सुरू आहे. या संपूर्ण प्रकारामुळे तहसील कार्यालय परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. प्रशासनाच्या हस्तक्षेपानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. स्टंटबाजी.. ? लोकप्रियतेचा प्रयत्न..? की समस्याठी आंदोलन

अतुल खारोडे यांनी यापूर्वीही वीज वितरण कंपनीच्या विरोधात अशाच प्रकारचे आंदोलन केले होते. यावेळी महसूल प्रशासनाच्या आणि राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी शेतकरी पाणंद रस्ता प्रकल्पाच्या कामकाजात आडकाठी करून मनमानी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. पुन्हा स्टंटबाजी करून लोकप्रियता मिळवण्याचा प्रयत्न झाला आहे.

या संदर्भात तहसीलदार पुष्पा सोळंके यांनी सांगितले की, मी धाडी, सेलगाव, वडाळी, देवगाव आणि खोडगाव येथील शेती पाणंद रस्त्यांच्या कामासाठी गेले होते. मात्र, मोजमाप करताना कोणताही वाद झाला नाही. पण मी तेथून आल्यानंतर वाद झाल्याची माहिती मिळाली.

**पुष्पा सोळंके, तहसिलदार**

# पांदण रस्त्याचे काम अडविल्यामुळे कामबंद




**अजिंक्य भारत| प्रतिनिधी**

**आष्टी, दि.२७ :** मुख्यमंत्री पांदण रस्ते योजना अतिशय प्रभावीपणे राबविण्यात येत आहे कोणत्याच काही ठिकाणी अडचणी येत नाही परंतु भातकुली तालुक्यातील आष्टी ते कामनापुर पांदन रस्ता एक शेतकरी जाणीवपूर्वक रस्ता मिळवीत आहे त्यामुळे आष्टी ते कामनापूर रस्त्याचे काम बंद पडले आहे अशी तक्रार येथील शेतकऱ्यांनी आपल्या लेखी निवेदनात वरिष्ठाकडे केली आहे. काही शेतकऱ्यांची म्हणणे आहे की काही वर्षापासून या रस्त्याच्या अतोनात आम्हाला सामना करावा लागला कित्येक वर्षापासून या रस्त्याचे काम झाले नाही परंतु आता हा रस्ता शासनाने मंजूर करून येथील शेतकऱ्यांना दिलासा दिला परंतु एका शेतकऱ्याने आपल्या शेताजवळ हा रस्ता हेतू हेतू पुरस्कार अडवल्याची येथील शेतकरी बोलत आहे तरी सदर प्रकरणाची तात्काळ पाहणी करून संबंधित व्यक्तीवर कार्यवाही करण्याचे येथील शेतकरी (विजय नंदकिशोर ठाकरे, पुरुषोत्तम मानकर, संतोष मानकर, गजानन सातव, हरिभाऊ ठाकरे, नरेश कलंत्री, उमेद अन्सार नायक, सुशीला मानकर, सचिन सातव, सुभाषराव सातव इत्यादी शेतकऱ्यांनी भातकुली तहसीलदार यांना निवेदन दिले आहे तरीही या पांदण रस्त्याकडे पालकमंत्री व महसूल प्रशासनाने त्वरित लक्ष द्यावे अशी विनंती सुद्धा केली आहे.

## थोडक्यात



### फुलसावंगी येथे वारकरी बाल संस्कार शिबिर

**फुलसावंगी :** महागाव तालुक्यातील फुलसावंगी येथील प्रसिद्ध पुनेश्वर मंदिराच्या पायथ्याशी ग्रामीण भागातील लहान मुलांवर अध्यात्म, समाजसेवा आणि वारकरी संप्रदायाचे संस्कार रुजवून त्यांना व्यसनांपासून दूर ठेवण्याच्या उदात्त हेतूने युवा कीर्तनकार ह.भ.प. गणेश महाराज भानुसे यांच्या नेतृत्वात वारकरी बाल सुसंस्कार शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात परिसरातील शेकडो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शिबिरार्थींना वारकरी शिक्षण, अभंग, भजन, कीर्तन, संत परंपरा आणि मृदंग वादनाचे धडे देण्यात आले. ह.भ.प. गणेश महाराज भानुसे यांच्या मार्गदर्शनाखाली युवकांमध्ये सकारात्मक बदल घडवून चांगल्या विचारांची दिशा देण्यात आली. या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पुनेश्वर संस्थानचे अध्यक्ष अरुण धकाते, सचिव योगेश बाजपेयी, सर्व पदाधिकारी, गायक गजानन मस्के, अंकुश चपलवाड, मृदंग वादक करण भानुसे, वैभव डुमारे व गावकऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. परिसरातील नागरिकांनी शिबिराला मोठा प्रतिसाद दिला. सुप्रसिद्ध कीर्तनकार ऋषिकेश शेंबाळपिंपरीकर यांच्या काल्याच्या कीर्तनाने या शिबिराची सांगता झाली.



### एमआरपी संदर्भात कायदा करण्याची मागणी

**उमरखेड :** अखिल भारतीय ग्राहक पंचायत शाखेच्यावतीने येथील उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. ग्राहकांचे आर्थिक शोषण थांबवून हिताचे संरक्षण करण्यासाठी, केंद्र शासनाने विविध वस्तूंवर आकारण्यात येणारी कमाल किरकोळ किंमत (एमआरपी) निर्धारित करणारा स्वतंत्र कायदा करावा, अशी मुख्य मागणी या निवेदनाद्वारे प्रशासनाकडे करण्यात आली आहे. सध्याच्या एमआरपी पद्धतीमुळे उत्पादक, वितरक आणि विक्रेते अवास्तव दर छापत असल्याने ग्राहकांची मोठी फसवणूक होत आहे. प्रामुख्याने औषधे, वैद्यकीय उपकरणे, सौंदर्यप्रसाधने आणि नामांकित कंपन्यांच्या उत्पादनांवर अवाजवी दर टाकले जातात. हे शोषण थांबवण्यासाठी नवीन कायदा करताना वस्तूचे मूळ उत्पादन मूल्य आणि सर्व कर यांचा स्पष्ट उल्लेख पॅकिंगवर करणे बंधनकारक करावे, अशी मागणी निवेदनात आहे. या निवेदनाच्या प्रती पंतप्रधान, अर्थमंत्री, ग्राहक संरक्षण मंत्री यांच्यासह स्थानिक आमदार किसनराव वानखेडे आणि खासदार नागेश पाटील आष्टीकर यांना पाठवण्यात आल्या आहेत. निवेदन देताना अखिल भारतीय ग्राहक पंचायत उमरखेड शाखेचे अध्यक्ष प्रा. प्रकाश देशमुख, उपाध्यक्ष दत्ता गंगासागर, कार्यालय प्रमुख ॲड. विलासराव देवसरकर, कोषाध्यक्ष यशवंत गिरी, सहसचिव विजय सोनवणे आणि कार्यकारणी सदस्य भारत कुलकर्णी उपस्थित होते.



### नेर येथे विविध मागण्यांसाठी तहसीलदारांना निवेदन

**नेर (परसोपंत) :** राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ प्रणीत प्रोटान संघटनेने शुक्रवारी (दि. २२) नेर तालुक्यात प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी तहसीलदारांना निवेदन दिले. शासन स्तरावर होणाऱ्या अन्यायाचा निषेध करण्यासाठी आणि प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी संघटनेने हे पाऊल उचलले असून, या माध्यमातून पहिल्या टप्प्यातील आंदोलनाची सुरूवात करण्यात आली आहे. या निवेदनाद्वारे कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाचे निवारण करण्याची मागणी करण्यात आली. न्यायालयीन आदेश असूनही सरकार प्राध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना हक्कापासून वंचित ठेवत असल्याचा आरोप संघटनेने केला. वेतन, नियुक्ती, पदोन्नती, वेतन आयोग, वरिष्ठ व निवडश्रेणी, पूर्णवेळ मान्यता, समान वेतन आणि अतिरिक्त समायोजन या मागण्यांसाठी हा संघर्ष सुरू आहे. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यानुसार ५ जून २०२६ रोजी जिल्हास्तरीय धरणे आंदोलन आणि ५ जुलै २०२६ रोजी राज्यस्तरीय रॅली काढण्यात येईल. शाळा व महाविद्यालये बंद करण्याच्या सरकारी धोरणामुळे कर्मचाऱ्यांची होणारी अडवणूक थांबवण्यासाठी भविष्यात हा लढा अधिक गतिमान आणि उग्र स्वरूपात केला जाईल. निवेदन सादर करताना संघटनेचे कार्यकर्ते प्राध्यापक निलेश मोखाडे, अरविंद कुडमेथे, अविनाश शेंडे, वासुदेव शेंडे, अनिरुध्द मुंदाने, राजीव डफाडे आणि सुनिल गवई उपस्थित होते. या निवेदनामुळे शैक्षणिक क्षेत्रातील प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले आहे.

### तंत्रशिक्षण पदविका प्रवेश प्रक्रिया सुरू

**यवतमाळ :** महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण विभागाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील तंत्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमाची केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २० मे ते २२ जून दरम्यान यवतमाळच्या शासकीय तंत्रनिकेतन सुविधा केंद्रात सुरू केली आहे. या प्रक्रियेत दहावीनंतर प्रथम वर्ष आणि बारावी, आयटीआय नंतर थेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी स्वतंत्र अर्ज करावे लागतील. २४ जूनला तात्पुरती आणि २ जुलैला अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होईल. जात, आर्थिक दुर्बल, दिव्यांग, नॉन-क्रिमीलेअर आणि राष्ट्रीयत्व प्रमाणपत्रे जोडणे अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी सुविधा केंद्रप्रमुख यू. एम. शिरभाते यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळचे प्राचार्य ए. पी. मटाले यांनी केले.

# यवतमाळात काँग्रेसचा ट्रॅक्टर-डबकी मोर्चा

## आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या नेतृत्वात एल्गार; खत टंचाई, पीक विमा आणि वीज प्रश्नावर आंदोलन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २७ :** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांसमोर उभ्या ठाकलेल्या खत टंचाई, बोगस बियाणे, प्रलंबित पीक विमा आणि विस्कळीत वीज पुरवठा या गंभीर प्रश्नांवर यवतमाळमध्ये काँग्रेसच्यावतीने भव्य ट्रॅक्टर-डबकी मोर्चा काढण्यात आला. आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या नेतृत्वात निघालेला हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल्याने संपूर्ण शहराचे लक्ष वेधले गेले. आंदोलनानंतर मागण्यांचे निवेदन प्रशासनाला सादर करण्यात आले.




खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांसमोर उभ्या ठाकलेल्या डीएपी व युरिया खतांच्या कृत्रिम टंचाई, बोगस खते-बियाणे-कीटकनाशकांचा वाढता सुळसुळाट, रखडलेला पीक विमा, वाढते पेट्रोल-डिझेल दर तसेच अपुरा व विस्कळीत वीजपुरवठा या गंभीर प्रश्नांवर आज यवतमाळ शहरात काँग्रेस पक्षाच्या वतीने आक्रमक ट्रॅक्टर-डबकी मोर्चा काढण्यात आला. यवतमाळ विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या नेतृत्वात तालुका काँग्रेस कमिटी, शहर काँग्रेस कमिटी, यवतमाळ जिल्हा युवक काँग्रेस, तसेच काँग्रेस पक्षाच्या विविध आघाड्यांच्या वतीने या भव्य आंदोलनाचे आयोजन करण्यात आले होते. मोर्चाची सुरुवात शहरातील मेडिकल चौक (दोन पंजा) येथून झाली. त्यानंतर लाठीवाला पेट्रोल पंप मार्गे संविधान चौक, दत्त चौक, महात्मा ज्योतिबा फुले स्मारक परिसरातून हा मोर्चा थेट जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकलण्यात आला. ट्रॅक्टर, डबकी आणि जोरदार घोषणाबाजीमुळे संपूर्ण शहर दणाणून गेले होते. आंदोलनानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात शेतकऱ्यांना शेती कामांसाठी कॅनमध्ये डिझेल उपलब्ध करून देणे, शेतीसाठी रात्रीची सिंगल फेज वीज सुरळीत सुरू करणे, सोयाबीन-कापूस-तूर पिकांचा रखडलेला पीक विमा मंजूर करणे, डीएपी व युरिया खतांचा पुरेसा पुरवठा करणे, बोगस खते-बियाणे-कीटकनाशकांवर कठोर कारवाई करणे, इंधन दरवाढ कमी करणे तसेच शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव देण्याची प्रमुख मागणी करण्यात आली आहे. यावेळी माजी मंत्री शिवाजीराव मोघे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. आमदार बाळासाहेब मांगुळकर यांनीही शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारने तात्काळ ठोस निर्णय न घेतल्यास आगामी काळात आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा दिला. या मोर्चामध्ये रमेश भिसणंकर, प्रा. डॉ. बबलू उर्फ अनिल देशमुख, रवी ढोक, वैशाली सवाई, स्वाती येंडे, प्रमोद बगाडे, राजेंद्र गौतम पाटील, प्रा. पंढरी पाठे, कृष्णा पुसनाके, उत्तमराव खंदारे, जाफर खान, अशोक भुतडा यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### आंदोलनातील प्रमुख मागण्या

**खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. यामध्ये शेती मशागत व इतर कृषी कामांसाठी शेतकऱ्यांना कॅनमध्ये डिझेल उपलब्ध करून द्यावे आणि शेतीसाठी रात्रीच्या वेळी सिंगल फेज वीजपुरवठा खंडित न करता तो नियमित व सुरळीत सुरू ठेवावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. यासोबतच सोयाबीन, कापूस आणि तूर पिकांचा थकीत पीक विमा तातडीने मंजूर करण्यात यावा तसेच बाजारपेठेतील डीएपी व युरिया खतांचा कृत्रिम तुटवडा त्वरित थांबवण्यात यावा. तसेच बाजारात मोठ्या प्रमाणावर विक्री होत असलेल्या बोगस खते, बियाणे आणि कीटकनाशकांच्या अवैध व्यापारावर प्रशासनाने तातडीने कडक पावले उचलून कठोर कारवाई करावी, अशी आग्रही मागणी या आंदोलनाद्वारे करण्यात आली आहे.**

## 'अति तिथे माती'; काँग्रेस आता रस्त्यावर उतरणार!

### ॲड. सचिन नाईक यांचा इशारा; जिल्ह्यात सध्या पीकविम्याचा प्रश्न गंभीर

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि.२७ :** 'अति तिथे माती, हा न्याय आता सरकारला लागू करण्याची वेळ आली आहे. सरकारची मनमानी आता खपवून घेतली जाणार नाही,' असा इशारा काँग्रेसचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांनी दिला. बुधवारी (दि.२७) त्यांनी यवतमाळ येथील 'दैनिक अजिंक्य भारत'च्या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली, यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी त्यांच्यासोबत राजीव गांधी पंचायत राज संघटनचे प्रदेशाध्यक्ष संजय ठाकरे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष आरीज बेग आणि प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव प्रा. संजय वानखेडे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, जिल्ह्यात सध्या पीकविम्याचा प्रश्न गंभीर आहे. यावर सरकारला ठराविक कालमर्यादेचा इशारा दिला असून, मागण्या मान्य न झाल्यास काँग्रेस तीव्र आंदोलन करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच, आदिवासी आणि दलितांच्या बजेटमधील कपात, रखडलेले सिंचन प्रकल्प आणि शहरांच्या डीपीआरमधील आरक्षणाचे मुद्दे उचलून धरत काँग्रेस आता रस्त्यावर उतरून संघर्ष करणार असल्याचे त्यांनी सांगितले. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी पक्षाची ताकद वाढवण्यावर भर दिला जात आहे. याबद्दल बोलताना ते म्हणाले की, 'आम्ही नवीन 'संघटना सृजन कार्यक्रम'हाती घेतला आहे. प्रत्येक तालुक्यात युवक काँग्रेस, एनएसयूआय, महिला काँग्रेस आणि सेवा दल अशा चारही आघाड्यांचे नवीन अध्यक्ष नेमले जातील. एससी, एसटी, ओबीसी आणि मायनॉरिटी सेलमध्येही नव्या दमाचे पदाधिकारी नियुक्त करून एक चैतन्यमय संघटना उभी केली जाईल.' स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसदर्भात बोलताना ॲड. नाईक यांनी सरकारवर कडाडून टीका केली. 'सरकारची अवस्था 'घाईचे काम आणि नशिबाचे तीन टक्के' अशी झाली आहे. ७५ टक्क्यांच्या नियम लावून ग्रामीण जनतेचा मतदानाचा अधिकार नाकारला जात आहे. भाजपला माहित आहे की ग्रामीण जनता त्यांच्या विरोधात आहे, म्हणूनच हा लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रकार सुरू आहे,' असा आरोप त्यांनी केला. तरुणांना काँग्रेसच्या विचारसरणीकडे आकर्षित करण्यासाठी 'सर्वोदय संकल्प शिबीरे' आणि 'संविधानाच्या रस्त्याने' असे प्रभावी उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी शेवटी सांगितले.



## डॉ. वीरा मांडवकर यांचे शास्त्रीय नृत्य स्पर्धेत सुयश

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**कळंब, दि. २७ :** महाराष्ट्र शासनाच्या 'आर्ट अँड कल्चर ऑफ इंडिया, नॅशनल डान्स कॉंटेस्ट अँड फेस्टिवल २०२६' आणि 'मिनिस्ट्री ऑफ कल्चर' यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथे आयोजित 'नॅशनल कलाउगम फेस्टिवल'मधील भारतीय शास्त्रीय कथक नृत्य स्पर्धेत एकल नृत्य सादर करून कळंब येथील इंदिरा महाविद्यालयाच्या प्राध्यापक डॉ. वीरा मांडवकर यांनी द्वितीय पुरस्कार प्राप्त केला आहे.

या व्यापक स्तरावरील राष्ट्रीय नृत्यस्पर्धेत देशभरातून जवळपास एक हजार स्पर्धक सहभागी झाले होते. यामध्ये कथक, भरतनाट्यम, कुचिपुडी, मोहिनीअट्टम, सेमिक्लासिकल, बॉलीवूड आणि लोकनृत्य अशा वेगवेगळ्या नृत्यप्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. या स्पर्धेचे आयोजन आर्ट अँड कल्चर ऑफ इंडियाचे चीफ एक्झीक्युटीव्ह ऑफिसर अंकुर नारायण यांनी केले होते. डॉ. वीरा मांडवकर यांनी कथक नृत्याचे प्रशिक्षण शीतल लचके यांच्याकडे घेतले आहे. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय नृत्यगुरु शीतल लचके, पवन मांडवकर, शकुंतला डहाळकर व सिंधू मांडवकर यांना दिले. यापूर्वीही अनेक स्पर्धांमध्ये पारितोषिके प्राप्त केलेल्या डॉ. वीरा मांडवकर यांच्या या सुयशाबद्दल इंदिरा महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी वृंद आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

## संघटना बळकटीसाठी एकजुटीने काम करा

### ॲड. सचिन नाईक : पुसदनगरीत नवनिर्वाचित जिल्हाध्यक्षांचे स्वागत

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पुसद, दि. २७ :** येथे नवनिर्वाचित काँग्रेस जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांचे आगमन झाले असता शहर काँग्रेस कमिटीने पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी ढोल-ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीत भव्य जल्लोषात स्वागत केले. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी परिसर विविध घोषणांनी दणाणून सोडत नवीन जिल्हाध्यक्षांचा पुष्पहार, शाल आणि श्रीफळ देऊन अत्यंत उत्साहात जाहीर सत्कार सोहळा घडवून आणला. यावेळी ॲड. नाईक यांनी संघटना बळकटीसाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.



जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांनी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, स्व. सटवजीराव नाईक फलक, हजरत तवक्कल शाह दर्गा, संतोषी माता मंदिर व महामानवांना अभिवादन केले. नाईक यांनी संघटना बळकटीसाठी एकजुटीने काम करण्याचे जाहीर आवाहन केले. प्रसंगी रंगराव काळे, झिया शेख, सय्यद इस्तियाक, नगरसेवक ॲड. वासिम अहमद, साहेबराव ठेंगे, मोहन विश्वकर्मा, नाना बेले, विलास वाघमारे, ज्ञानदीप कांबळे, वैभव पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सुजित मानकामे यांनी सूत्रसंचालन तर अभिलाश खैरमोडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला अब्दुल वाहब, सय्यद जानी, ॲड. भडांगे, जब्बार लाखे, गाझी ओसामा, फिरोज खान, इर्शाद कुरेशी, प्रकाश नेमायते, ॲड. पद्माकर विघ्ने, अशोकराव मस्के, प्रकाश वायकोळे, कैलासराव गावनर, डॉ. माणिकराव चिलकर, ॲड. गोपाल मस्के, पवन मस्के, सचिन गडदे, राजू जामकर, प्रभाकर मस्के, सचिन खटके, अशोक देवकते, गजानन भडांगे, संभाजी गावंडे, पंडितराव मस्के, प्रकाश टेकाळ, सतीश सरगर, करण मस्के, पवन येडतकर, दादाराव शिरगिरे, अनिकेत मस्के, पृथ्वीराज मार्कंडे, योगेश जामकर, हरिभाऊ खरात, गजानन वायकुळे, नितीन वायकुळे, डॉ. मोहसीन व सोहेल चव्हाण उपस्थित होते.

## मेलोडी चॉकलेट वाटून आंदोलन

### युवक काँग्रेसचा इंधन दरवाढीचा तीव्र निषेध

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २७ :** यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष सचिन नाईक यांच्या नेतृत्वाखाली उमरखेड विधानसभा युवक काँग्रेसने इंधन दरवाढ आणि पेट्रोल-डिझेल तुटवड्याविरोधात सोमवारी (दि. २५) काळी-टेंभी येथील गायकवाड पेट्रोल पंपावर वाहनधारकांना मेलोडी चॉकलेट वाटून अनोखे आंदोलन केले. सरकारच्या गोड आश्वासनांचा आणि महागाईचा निषेध करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले.




सर्वसामान्य जनतेला मोठी आश्वासने देऊन प्रत्यक्षात मात्र पेट्रोल आणि डिझेलचे दर गगनाला भिडवले आहेत. ऐन गरजेच्या वेळी इंधनाचा पुरवठा विस्कळीत करणाऱ्या सरकारचा निषेध करण्यासाठी नागरिकांना चॉकलेट वाटप करण्यात आले. या आंदोलनात युवक काँग्रेस उमरखेड विधानसभेतील सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वांच्या एकजुटीने आणि आक्रमक घोषणाबाजीतून पेट्रोल पंप परिसर दणाणून सोडला होता. जनतेच्या खिशाला कात्री लावणाऱ्या या महागाईवर आणि प्रशासनाच्या अकार्यक्षमतेवर तात्काळ नियंत्रण न आल्यास, आगामी काळात हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी देण्यात आला. याप्रसंगी आंदोलनात सचिन नाईक, शैलेश कोपरकर, स्वप्नील नाईक, इम्रान पठाण यांच्यासह पक्षाचे इतर प्रमुख कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घाटंजी येथे शासकीय ज्वारी खरेदीस पुन्हा सुरुवात

## दै. अजिंक्य भारतच्या पाठपुराव्याला यश, ५३७ वंचित शेतकऱ्यांना दिलासा, ऑनलाईन नोंदणीचे आवाहन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

✦ अमोल कावळे

**घाटंजी, दि. २७ : येथे शासकीय ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट वाढवून केंद्र त्वरित सुरू न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा भारतीय किसान संघाने दिला होता. 'अजिंक्य भारत' वृत्तपत्राने रविवारी (दि. २४) या संदर्भातील वृत्त प्रसिद्ध करून केलेल्या पाठपुराव्यामुळे प्रशासनाने तातडीने दखल घेत घाटंजी येथील ज्वारी खरेदी केंद्र मंगळवारी (दि. २६) पासून पुन्हा सुरू केले आहे.**



अजिंक्य भारत
24 May 2026 - Page 19

घाटंजी नाफेड केंद्राचे उद्दिष्ट वाढवून ज्वारी खरेदी त्वरित सुरू करा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

घाटंजी, दि.२३ : घाटंजी तालुक्यात नाफेडद्वारे सुरू असलेली शासकीय ज्वारी खरेदी केवळ १३६५ क्विंटलचे उद्दिष्ट पूर्ण झाल्याचे सांगून प्रशासनाने अचानक बंद केली आहे. प्रशासनाच्या या मनमानी आणि शेतकरीविरोधी कारभारामुळे तालुक्यातील शेकडो शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. या अन्यायाविरोधात भारतीय किसान संघाने अत्यंत आक्रमक भूमिका घेतली असून, आज २२ मे २०२६ रोजी यवतमाळच्या जिल्हा उपनिबंधकांना ई-मेलद्वारे निवेदन पाठवून खरेदी केंद्र तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे.

घाटंजी तालुक्यात यंदा एकूण ५९९ ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांनी शासकीय हमीभावाने विक्री करण्यासाठी ऑनलाइन नोंदणी केली होती. मात्र, खरेदी केंद्रावर केवळ ६२ शेतकऱ्यांची ज्वारी घेऊन केंद्र तडकाफडकी बंद करण्यात आले. त्यामुळे उर्वरित ५३७ शेतकरी आपली ज्वारी विकण्यासाठी आजही केंद्राच्या चकरा मारत असून हवालदिल झाले आहेत. पावसाळा तोंडावर आल्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. हक्काची ज्वारी विकली न गेल्यास खुल्या बाजारपेठेत व्यापारी शेतकऱ्यांची आर्थिक लूट करण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे शासकीय हमीभावाने खरेदी सुरू राहणे अत्यंत गरजेचे आहे. 'केवळ १३६५ क्विंटलचे किरकोळ उद्दिष्ट दाखवून नोंदणी केलेल्या ५३७ शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणे हा त्यांच्यावर मोठा अन्याय आहे.

घाटंजी तालुक्यात यंदा एकूण ५९९ ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांनी शासकीय दराने विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी केली होती. मात्र, खरेदी केंद्रावर केवळ १३६५ क्विंटलचे मर्यादित उद्दिष्ट पूर्ण झाल्याचे सांगत प्रशासनाने ६२ शेतकऱ्यांची ज्वारी खरेदी करून केंद्र अचानक बंद केले होते. त्यामुळे ५३७ शेतकरी संकटात सापडले होते. पावसाळा तोंडावर आलेला असताना आणि खुल्या बाजारपेठेत व्यापारी आर्थिक लूट करत असल्याने हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांच्या हक्कासाठी भारतीय किसान संघाने जिल्हा उपनिबंधक, यवतमाळ यांना ई-मेलद्वारे निवेदन सादर करून आक्रमक भूमिका घेतली होती. केवळ १३६५ क्विंटलचे उद्दिष्ट दाखवून ५३७ शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणे अन्यायकारक आहे. प्रशासनाने पुढील ३ दिवसांत ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट वाढवून केंद्र पुन्हा सुरू न केल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन केले जाईल,' असा स्पष्ट इशारा भारतीय किसान संघाचे विदर्भ प्रांत युवा प्रमुख राम नारायणराव जिल्लडवार यांनी दिला होता. या इशाऱ्यानंतर आणि 'अजिंक्य भारत'च्या वृत्त मालिकेनंतर शासकीय यंत्रणा हलली. वरिष्ठ पातळीवरून घाटंजी केंद्राचे ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट वाढवून थेट ३००० क्विंटल करण्यात आले. त्यानुसार केंद्रावर पुन्हा रीतसर खरेदी सुरू झाली आहे. भारतीय किसान संघाच्या या यशस्वी लढ्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये आता आनंदाचे वातावरण पसरले आहे.

### वंचित शेतकऱ्यांना संधी

**घाटंजी केंद्रावर शासकीय ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट वाढवून ३००० क्विंटल करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, अद्यापही ज्या ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी अपूर्ण किंवा राहिली असेल, त्यांच्यासाठी शासकीय पोर्टल सरू ठेवण्यात आले आहे. तरी सर्व वंचित शेतकऱ्यांनी त्वरित आपली ऑनलाईन नोंदणी पूर्ण करून घ्यावी आणि शासकीय हमीभावाचा लाभ घ्यावा, असे आवाहन भारतीय किसान संघाने केले आहे.**

### स्वाधार योजनेसाठी ३० मेपर्यंत मुदतवाढ

**यवतमाळ, दि. २७ :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी दि. ३० मेपर्यंत ऑनलाईन अर्जाताल त्रृटी पूर्ण करुन त्याची प्रत कार्यालयात सादर करण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाने केले आहे. तसेच जे विद्यार्थी कागदपत्राची पुर्तता करणार नाही अशा विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षात अर्ज करता येणार नाही व तो स्वाधार योजनेपासुन वंचित राहील, असे आयुक्तालय समाज कल्याण पुणे यांनी कळविले आहे. स्वाधार योजनेसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सर्व कागदपत्रासह अपलोड करुन ३० मेपर्यंत समाज कल्याण कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

अजिंक्य भारत
# आपलं यवतमाळ
गुरुवार, दि. २८ मे २०२६ www.ajinkyabharat.com



# गावगाड्याचा फड रंगणार!

## ग्रामपंचायत निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि. २७ :** राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ आणि २०२५ मध्ये मुदत संपलेल्या, तसेच सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा अधिकृत कार्यक्रम जाहीर केला आहे. या प्रक्रियेनुसार जून आणि जुलै महिन्यात आरक्षणाचे विविध टप्पे पार पडणार असून १० जुलै रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध केली जाईल. निवडणूक आयोगाच्या या मोठ्या घोषणेमुळे इच्छुकांची धडधड वाढली असून, 'कोणाची जम्बो लॉटरी लागणार आणि कोणाचा पत्ता गुल होणार', याकडे आता संपूर्ण ग्रामीण भागाचे डोळे लागले आहेत.

राज्य निवडणूक आयोगाने आगामी ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्य आरक्षण सोडतीचे वेळापत्रक जाहीर केल्याने ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. घोषित कार्यक्रमानुसार, ८ जून २०२६ पर्यंत आरक्षणाची सोडत काढण्यासाठी विशेष ग्रामसभेची पूर्वसूचना दिली जाईल. त्यानंतर १२ जून २०२६ पर्यंत विशेष ग्रामसभा बोलवून तहसीलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली आरक्षणाची प्रत्यक्ष सोडत काढण्यात येईल. या सोडतीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (ओबीसी) तसेच या सर्व प्रवर्गांतील महिला आणि सर्वसाधारण महिलांच्या आरक्षणाचा निर्णय घेतला जाणार आहे. पुढील टप्प्यात, १७ जून २०२६ पर्यंत प्रभागनिहाय आरक्षण प्रारूप अधिसूचनेला (नमुना ब) जिल्हाधिकारी मान्यता देतील आणि १९ जून २०२६ रोजी हे प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारूप अधिकृतपणे प्रसिद्ध केले जाईल. या प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीबाबत स्थानिक नागरिकांना आपल्या हरकती व सूचना दाखल करण्यासाठी १९ ते २५ जून २०२६ असा कालावधी देण्यात आला आहे. नागरिकांकडून प्राप्त झालेल्या या सर्व हरकतींवर ३ जुलैपर्यंत उपविभागीय अधिकारी (एसडीओ) आपले अभिप्राय देतील. त्यानंतर, ८ जुलैपर्यंत उपविभागीय अधिकाऱ्यांचे अभिप्राय विचारात घेऊन अंतिम अधिसूचनेस (नमुना अ) जिल्हाधिकारी मान्यता प्रदान करतील. सर्वात शेवटी १० जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी मान्य केलेल्या या अंतिम प्रभाग रचनेला (नमुना अ) संपूर्ण जिल्ह्यात व्यापक प्रसिद्धी दिली जाईल, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी दिली आहे. यासोबतच, राज्य निवडणूक आयोगाने बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट ग्रामपंचायतींच्या सर्व निवडणुकांमध्ये 'ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे) आदेश, २०२६' या सुधारित आदेशाचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत.

### आरक्षण सोडतीचे वेळापत्रक

**निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या नवीन कार्यक्रमानुसार ग्रामपंचायत सदस्य आरक्षणाची प्रक्रिया अतिशय वेगाने पूर्ण केली जाणार आहे. यात ८ जूनपर्यंत विशेष ग्रामसभेची नोटीस काढून १२ जूनपर्यंत प्रत्यक्ष आरक्षण सोडत काढण्याची मुदत निश्चित करण्यात आली आहे. यानंतर १९ जून रोजी आरक्षणाचे प्रारूप जाहीर करून २५ जूनपर्यंत त्यावर स्थानिक पातळीवर हरकती व सूचना स्वीकारल्या जातील. प्राप्त हरकतींची पडताळणी करून उपविभागीय अधिकारी ३ जुलैपर्यंत आपला अहवाल देतील, ज्याच्या आधारे जिल्हाधिकारी ८ जुलै रोजी अंतिम अधिसूचनेला मंजुरी देतील आणि शेवटी १० जुलै रोजी अंतिम प्रभाग रचना संपूर्ण जाहीर करून या प्रक्रियेची सांगता केली जाईल.**

# सर्वसमावेशक संघटन, लोकशाहीचे रक्षण हेच आमचे प्रमुख ध्येय!

## जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक; युवकांना काँग्रेसमध्ये देणार प्राधान्य

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

✦ राजकुमार भीतकर

**यवतमाळ, दि.२७ :** अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या 'संघटन सृजन अभियाना'अंतर्गत यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी ॲड. सचिन नाईक यांची नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांनी आज (दि. २७) 'दैनिक अजिंक्य भारत'च्या यवतमाळ आवृत्ती कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी त्यांच्यासोबत राजीव गांधी पंचायत राज संघटनचे प्रदेशाध्यक्ष संजय ठाकरे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष आरीज बेग आणि प्रदेश काँग्रेस कमिटीचे महासचिव प्रा. संजय वानखेडे उपस्थित होते. या सदिच्छा भेटीदरम्यान त्यांनी जिल्ह्याची राजकीय परिस्थिती, पक्षापुढील आव्हाने आणि भविष्यातील रणनीती यावर 'अजिंक्य-संवाद' या विशेष कार्यक्रमात दिलखुलास संवाद साधला.

अजिंक्य भारत संवाद

याप्रसंगी बोलताना ॲड. नाईक म्हणाले की, सर्वप्रथम मी पक्षाच्या राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा पातळीवरील वरिष्ठ नेतृत्वाचे मनापासून आभार मानतो. अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने देशभरात 'संघटन सृजन अभियान'राबविले. त्याचे पडसाद आपल्या महाराष्ट्रात आणि यवतमाळ जिल्ह्यातही उमटले. पक्षाचे केंद्रीय निरीक्षक संजय कपूर यांनी आपल्या जिल्ह्यात तब्बल ८ ते १० दिवस मुक्काम ठोकून संपूर्ण दौरा केला. तळागाळातील परिस्थिती समजून घेतल्यानंतर पक्षाने माझ्यावर हा विश्वास टाकला आहे. 'बुडत्याला काठीचा आधार' म्हणतात, तसे आज जनतेला काँग्रेसकडून मोठ्या अपेक्षा आहेत. येणाऱ्या काळात काँग्रेस पक्ष यवतमाळ जिल्ह्यात कसा अधिक सर्वसमावेशक होईल, यावर माझा भर असेल. ज्या तरुण-तरुणींमध्ये सामाजिक समज आणि कर्तृत्व आहे, अशा हिऱ्यांचा शोध घेऊन त्यांना संघटनेत योग्य स्थान दिले जाईल. यवतमाळ जिल्हा हा प्रामुख्याने एकेकाळचा काँग्रेसचा बालेकिल्ला असून या जिल्ह्यात मागासवर्गीय, आदिवासी, अनुसूचित जाती, विमुक्त व भटक्या जमाती आणि १८ अलुतेदार-बलुतेदारांचा जिल्हा आहे. 'पाचही बोटे सारखी नसतात', त्यामुळे समाजातल्या या वंचित घटकांना त्यांचे घटनात्मक अधिकार मिळवून देणे हे आमचे कर्तव्य आहे. शासनाच्या ज्या काही वर्तमान योजना आणि कायदे आहेत, त्यांचा थेट लाभ या घटकांपर्यंत पोहोचवून त्यांचे जीवनमान उंचाविण्यासाठी काँग्रेस पक्ष संपूर्ण ताकदीने मैदानात उतरेल. याप्रसंगी ॲड. सचिन नाईक पुढे म्हणाले की, आज 'दोन दगडांवर पाय' ठेवून चालणाऱ्या सत्ताधाऱ्यांसमोर लोकशाही टिकविणे हेच सर्वांत मोठे आव्हान आहे. राज्यातील आणि केंद्रातील विद्यमान सरकार सातत्याने संविधानाला पायदळी तुडवून केवळ स्वतःच्या सत्तेचे राजकारण करत आहे. हे देशाच्या लोकशाही समोरील मोठे संकट आहे. पण 'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणे आम्ही नियोजनबद्ध पद्धतीने जनतेची शक्ती एकवटून या संविधानविरोधी प्रवृत्तींना चोख उत्तर देणार आहोत. कार्यकर्त्यांसाठी मूलभूत पायाभूत सुविधा उभारण्यासोबतच, जनतेशी बांधील असणारे एक मजबूत आणि उत्तरदायी संघटन आम्ही उभे करत आहोत. महागाई, बेरोजगारी, शेतकरी आत्महत्या आणि खतांचा तुटवडा यांमुळे जनता होरपळत आहे. मात्र, 'काँग्रेस जनतेच्या प्रश्नांपासून दूर गेली आहे' असा आरोप नेहमी होतो, यावर तुम्ही काय सांगाल? या प्रश्नांच्या उत्तरात ॲड. सचिन नाईक यांनी सांगितले की, 'हा केवळ विरोधकांचा अपप्रचार आहे. आज सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे शेतकरी, कष्टकरी आणि तरुणांमध्ये तीव्र असंतोष आहे. या घटकांसाठी असणारे घटनात्मक बजेटही हे सरकार देऊ शकलेले नाही. 'लोका सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः कोरडे पाषाण' अशी सध्याच्या सरकारची अवस्था आहे. आम्ही या सर्व अन्यायाविरुद्ध थेट जनतेमध्ये जाऊन एक मोठा 'जनआक्रोश' निर्माण करू. लोकांमध्ये जनजागृती मोहीम राबवून, काँग्रेस पक्ष पीडितांच्या खांद्याला खांदा लावून उभा राहील. येणाऱ्या काळात काँग्रेस हा जनतेचा बुलंद आवाज बनेल.

### तरुणांमध्ये राजकीय जाणीव निर्माण करू



**आजच्या तरुणाईला 'संविधानाचा चष्मा'घालण्याची नितांत गरज आहे. तरुण वर्ग सध्या जात, धर्म आणि तात्पुरत्या प्रलोभनांच्या चुकीच्या प्रभावाखाली येऊन राजकारणाकडे पाहत आहे. यामुळे 'दिशाहीन'व्यवस्था निर्माण होते. तरुणांमध्ये राजकीय आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी जिल्हा काँग्रेस कमिटीने कंबर कसली आहे. येत्या वर्षभरात जिल्ह्यातील किमान १,००० तरुण-तरुणींना घटनात्मक दृष्टिकोनातून व्यवस्थेकडे पाहण्याचे विशेष प्रशिक्षण देण्याचा आमचा ठाम मानस आहे. 'तरुणांच्या हाताला काम आणि डोक्यात संविधानाचा विचार'हीच आमची खरी शक्ती असेल, असे मतही यावेळी जिल्हाध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांनी व्यक्त केले.**

## थोडक्यात

### पैसे मागितल्याने दगडाने मारहाण

**दारव्हा:** उसने दिलेले पैसे परत मागितल्याच्या कारणावरून दारव्हा पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या पळशी येथे एका व्यक्तीला रस्त्यावरील दगडाने मारहाण करून जखमी केल्याची घटना घडली. पोलीस सूत्रांनुसार, उदयभान हरी जाधव (वय ५० वर्षे, रा. पळशी) यांनी आरोपी लक्या रंगराव राठोड (वय ४० वर्षे, रा. पळशी) याला शेती वाहती करण्यासाठी १५,००० रुपये उसने दिले होते. सदर उसने दिलेले पैसे जाधव यांनी परत मागितले असता, आरोपीने वाद घालण्यास सुरुवात केली. चिडलेल्या आरोपीने जाधव यांना शिवीगाळ करत रस्त्यावर पडलेला दगड उचलून त्यांच्या डोक्यात मारला. यामध्ये जाधव गंभीर जखमी झाले असून आरोपीने त्यांना जीवे मारण्याची धमकीही दिली. जाधव यांच्या जबानी रिपोर्टवरून दारव्हा पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे.

### दुकानावर बसलेल्या मायलेकावर हल्ला

**दिग्रस:** जुन्या वादाचा राग मनात धरून संगणमताने मायलेकाला लाथाबुक्क्यांनी व काठीने बेदम मारहाण केल्याची घटना दिग्रस येथील चमनपुरा परिसरात घडली. नसीम बी सेश सीध्दीक (वय ४५ वर्ष, रा. जिजामाता चमनपुरा मंदिर) या दुकानावर बसलेल्या असताना ही घटना घडली. आरोपी शाहु मुस्ताक शेख, राहील मुस्ताक शेख, मुस्ताक शेख आणि मयरुल बी मुस्ताक शेख यांनी एकत्र येत "काल रात्री तुम्ही खूप अरेरावी करत होते" असे म्हणून वाद घातला. आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करत, त्यांना व त्यांच्या मुलाला लाथाबुक्क्यांनी आणि काठीने मारहाण करून जखमी केले व जीवे मारण्याची धमकी दिली. या तक्रारीवरून दिग्रस पोलिसांनी सर्व आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

### दुचाकीच्या धडकेत पादचारी जखमी

**पुसद:** अनुप्रभा हॉटेलसमोर भरधाव आणि निष्काळजीपणे दुचाकी चालवून एका पादचाऱ्याला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. या प्रकरणी मुजाहीद खान मजिद खान (वय ३२ वर्षे, रा. अनसिंग, ता. वाशीम) यांनी पोलिसात तक्रार दिली आहे. आरोपी सतीश सुधाकर जाधव (वय ४० वर्षे, रा. गायमुख नगर, पुसद) हा आपली दुचाकी (क्र. एम एच ३७ ई ३४८१) घेऊन भरधाव वेगाने जात होता. त्याने रस्त्याने जाणाऱ्या फिर्यादीच्या मामाला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात त्यांच्या उजव्या पायाला गंभीर फ्रॅक्चर झाले असून जबड्यालाही मोठी दुखापत झाली आहे. पुसद शहर पोलिसांनी या घटनेची नोंद केली असून आरोपीला अद्याप अटक झालेली नाही.

# अतिक्रमण मोहिमेत गरिबांवरील अन्याय थांबवा

## पक्क्या अतिक्रमणांना अभय दिल्याचा आरोप, हॉकर्स असोसिएशनचा आंदोलनाचा इशारा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २७ :** नगरपरिषदेतर्फे शहरात सध्या राबविल्या जाणाऱ्या अतिक्रमण हटाव मोहिमेमध्ये गोरगरीब हातगाडी चालकांवर दुजाभाव करून मोठा अन्याय केला जात असल्याचा गंभीर आरोप यवतमाळ हॉकर्स असोसिएशनने केला आहे. प्रशासनाने राजकीय दबावापोटी पक्की अतिक्रमणे सोडून केवळ गरिबांचे रोजगार उद्ध्वस्त केल्यामुळे असोसिएशनने या पक्षपाती कारवाईविरोधात तीव्र संताप व्यक्त करीत थेट आंदोलनाचा इशारा दिला आहे.



शहराचा विकास व्हावा आणि रस्ते मोकळे व्हावेत याला हॉकर्स असोसिएशनचा विरोध नाही. परंतु, नगरपरिषद प्रशासनाकडून संतापजनक पद्धतीने दुजाभाव करीत ही कारवाई केली जात आहे. सध्या सुरू असलेल्या या मोहिमेत रस्त्यावरील ढकल ठेलेवाले आणि पोटाची खळगी भरणाऱ्या गोरगरीब हातगाड्यावाल्यांनाच लक्ष्य केले जात आहे. त्यांची दुकाने उध्वस्त केली जात आहेत. याउलट, त्याच रस्त्यावरील श्रीमंत व्यावसायिक आणि राजकीय नेत्यांच्या कार्यकर्त्यांची पक्की अतिक्रमणे काढण्याची हिंमत नगरपरिषद कर्मचारी दाखवत नाहीत. गरिबांसाठी एक आणि धनदांडग्यांसाठी दुसरा न्याय कोणत्या कायद्यात आहे, असा सवाल उपस्थित होत आहे. आधीच देशात आणि राज्यात महागाईने कळस गाठला आहे. त्यातच मुख्यमंत्री शासनाला मदत करण्याचे आवाहन करतात, मात्र स्थानिक प्रशासन गरिबांच्या जीवावर उठले आहे. नगरपरिषदेने यवतमाळ हॉकर्स असोसिएशनसोबत मिळून टाऊन कमिटी स्थापन करून हे प्रश्न सोडवणे गरजेचे आहे. परंतु, प्रशासन केवळ गोरगरिबांना उद्ध्वस्त करीत आहे. जर नगरपरिषद रोजगार देऊ शकत नाही, तर तो उध्वस्त का करते, असा सवाल यवतमाळ हॉकर्स असोसिएशनचे अध्यक्ष सूरज खोब्रागडे यांनी केला असून पुढील तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# खुनी नदीकाठावरील अवैध कत्तलखाना उद्ध्वस्त

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**पांढरकवडा, दि. २७ :** शहरातील खुनी नदीकाठावर सुरू असलेल्या संशयित अवैध कत्तलखान्याचे पक्के बांधकाम नगर परिषद आणि पोलिस प्रशासनाने संयुक्त कारवाई करीत बुलडोझरच्या सहाय्याने पूर्णपणे जमीनदोस्त केले. शहरात अवैध जनावर कत्तल तसेच तस्करी रोखण्यासाठी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या उद्देशाने दोन्ही प्रशासकीय विभागांनी कठोर पावले उचलत ही मोठी धडक कारवाई येथे पूर्ण केली.

गेल्या काही दिवसांपासून पांढरकवडा पोलिसांकडून अवैध जनावर तस्करी व कत्तलींविरोधात विशेष मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वीच शहरातील मस्जीद वॉर्ड परिसरात कत्तलीसाठी बांधून ठेवलेल्या पाच जनावरांची सुरक्षित सुटका करण्यात आली होती. त्या प्रकरणी पोलिसांनी तिघांविरुद्ध रीतसर गुन्हे दाखल करून पुढील तपास सुरू केला होता. दरम्यान, स्मशानभूमी परिसरातील खुनी नदीलगत असलेल्या एका पक्क्या बांधकामामागे अवैध जनावरांची कत्तल होत असल्याचा संशय स्थानिक पोलिसांना आला होता. पोलिसांनी याबाबत तातडीने नगर परिषद प्रशासनाला माहिती दिल्यावर संबंधित जागेची बारीकाईने पाहणी करण्यात आली. तसेच चौकशीत संबंधित पक्के बांधकाम पूर्णपणे अवैध असल्याचे प्रशासकीय पातळीवर निष्पन्न झाले. यानंतर नगर परिषद व पोलिसांनी बुलडोझरच्या साहाय्याने संयुक्त कारवाई करीत ते बांधकाम पाडून टाकले. कारवाईदरम्यान परिसरात कायदा सुव्यवस्थेसाठी कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात केला होता. पूर्वीही अशी कारवाई झाली होती. शहरात अवैध कत्तल होऊ नये म्हणून प्रशासन कठोर पावले उचलत आहे.

# कत्तलीसाठी जाणाऱ्या २८ गोवंशांची सुटका

## तिघांवर गुन्हे दाखल, पांढरकवडा पोलिसांची कारवाई

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २७ :** पांढरकवडा पोलिसांनी पाटणबोरी ते मांडवी रस्त्यावरील नदीकाठच्या शेतात छापा टाकून, तेलंगणातील आदिलाबाद येथे कत्तलीसाठी अत्यंत क्रुरतेने बांधून नेण्यात येणाऱ्या २८ गोवंश जनावरांची यशस्वी सुटका केली. या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हे दाखल केले असून, गुन्ह्यात वापरलेल्या वाहनासह एकूण ९ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई पोलिस पथकाने गुप्त माहितीवरून केली.



ठाणेदार पोलिस निरीक्षक एल.डी. तावरे यांना कत्तलीच्या उद्देशाने जनावरे डांबून ठेवल्याची खात्रीलायक माहिती मिळाली होती. त्यांनी तात्काळ गुन्हे शोध पथक आणि पोलिस उपनिरीक्षक नितीन सुशीर यांना घटनास्थळी रवाना केले. पोलिसांनी शेतात छापा मारला असता, तिथे क्रुरतेने बांधलेली ६ लाख ४० हजार रुपये किमतीची २८ गोवंश जनावरे (बैल आणि गोऱ्हे) मिळून आली. तसेच ही जनावरे तेलंगणात वाहून नेण्यासाठी आणलेले ३ लाख रुपये किमतीचे पिकअप वाहन (क्र. एमएच-२९ झेड-१२७८) पोलिसांनी जप्त केले. सुटका केलेली सर्व जनावरे कोंडवाडा नगर परिषद, पांढरकवडा यांच्या स्वाधीन करण्यात आली आहेत. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी चंद्रकांत आत्राम (वय २२, रा. पाटणबोरी), आल्ताफ उर्फ मुद्दन शेख मन्नान (वय २८, रा. पाटणबोरी) आणि शफी मुद्दसीर (रा. आदिलाबाद, तेलंगणा) यांच्याविरोधात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, प्राणी क्रुरता प्रतिबंधक अधिनियम आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. सदर यशस्वी कारवाई यवतमाळचे पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलिस अधीक्षक अशोक थोरात आणि सहाय्यक पोलिस अधीक्षक रॉबीन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक एल.डी. तावरे, पोलिस उपनिरीक्षक नितीन सुशीर, पोलिस हेकॉ. विलास जाधव, नायक पोलिस कॉं. सुनील राठोड, नायक पोलिस कॉं. सचिन काकडे आणि पोलिस कॉं. राजू मुत्तलवार यांनी पार पाडली. या गुन्ह्याचा पुढील तपास नायक पोलिस कॉं. सुनील राठोड करीत आहेत.

# सराईत गुन्हेगाराकडून चार दुचाक्या केल्या जप्त

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. २७ :** यवतमाळ शहर पोलिसांनी डी.बी. पथकाद्वारे पिंपळगाव बायपास रोडवरून चोरीला गेलेल्या मोटारसायकलच्या संजय श्रीधर ढवळे यांच्या तक्रारीवरून तात्काळ वेगाने कारवाई केली. पोलिसांनी पारस अपार्टमेंटच्या पडित इमारतीत सापळा रचून आरोपी मनोज भास्कर देमनगुंडे याला अवघ्या काही तासांत मुद्देमालासह अटक केली असून त्याच्याकडून चोरीच्या गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत.



चांदोरे नगरचे फिर्यादी संजय श्रीधर ढवळे यांची हिरो होंडा स्लेंडर मोटारसायकल एम.एच. २७ एस. ८३८१ विश्वशांती नगरमधून चोरीला गेली होती. पोलिसांनी गुन्हा र.क्र. २९/२०२६ कलम ३०३(२) बी.एन.एस. अन्वये गुन्हा नोंदविला. ठाणेदार पोलिस निरीक्षकांच्या सूचनेनुसार पथकाने गोपनीय बातमीदाराच्या माहितीवरून कारवाई केली. आरोपी मनोज भास्कर देमनगुंडे रा. बालाजी मंगल कार्यालय पिंपळगाव याला चोरीचे वाहन विकताना पकडण्यात आले. त्याच्या ताब्यातून एकूण एक लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार जप्त केलेल्या चार गाड्यांमध्ये फिर्यादीच्या मोटारसायकलसह टी.व्ही.एस. ॲक्टिव्हा, पॅशन प्रो आणि आणखी एका टी.व्ही.एस. कंपनीच्या दुचाकीचा समावेश करण्यात आला.

# सप्तखंजेरीच्या निनादात पेटली प्रबोधनाची मशाल

## पिंजरी येथे सत्यपाल महाराज यांचे कीर्तन, कार्यक्रमाला हजारो नागरिकांची उपस्थिती

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि. २७ : तालुक्यातील पिरंजी येथे महापुरुषांच्या संयुक्त जयंती व स्मृतिदिनानिमित्त गावकऱ्यांनी प्रबोधनपर कीर्तनाचे आयोजन केले होते. यामध्ये प्रसिद्ध सप्ताखंजेरी वादक सत्यपाल महाराज यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. पावसाच्या हजेरीनंतरही हजारो नागरिकांच्या अलोट गर्दीत हा सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सत्यपाल महाराज यांनी उपस्थितांमध्ये समाजप्रबोधनाची मशाल पेटवत मानवी मूल्यांचा जागर केला.**



कार्यक्रमाची सुरुवात सत्यपाल महाराज यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमा पूजनाने झाली. त्यांनी संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून पर्यावरण रक्षणाचा संदेश दिला. महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या क्रांतिकारी कार्याचा आढावा घेत त्यांनी मुलींना उच्च शिक्षण देण्याचे आवाहन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानातील समता व बंधुतेच्या मूल्यांवर भाष्य करीत त्यांनी सुशिक्षित प्रतिनिधी निवडण्याचे आवाहन केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रयतेच्या कल्याणाचा विचार आणि संत गाडगेबाबांच्या स्वच्छतेच्या व व्यसनमुक्तीच्या विचारांवर त्यांनी विशेष भर दिला. या कीर्तनाला मुस्लिम बांधवही मोठ्या संख्येने उपस्थित होते. सत्यपाल महाराज यांनी ढाणकी येथील शेख जब्बार भाई यांना मंचावर बोलावून पुस्तके भेट दिली. स्वतःची भगवी टोपी त्यांच्या डोक्यावर आणि त्यांची जाळीदार टोपी स्वतःच्या डोक्यावर परिधान करत महाराजांनी सामाजिक व धार्मिक भेदाच्या भिंती तोडणारा धार्मिक एकात्मतेचा संदेश दिला. हा प्रसंग पाहून श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला. खंजेरीच्या ठेक्यावर 'दारू सोडा, लेकरं शिकवा' आणि 'अंधश्रद्धा फेका, विज्ञान कवटाळा' अशा घोषणांनी प्रांगण दुमदुमले. अनेक श्रोत्यांनी जागेवरच व्यसन सोडण्याची शपथ घेतली. या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील महिला, पुरुष व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मंडळींनीही या सोहळ्याला हजेरी लावली होती.

# पैनगंगा नदीचे पाणी पोहोचले ढाणकीत

## दोन महिन्यांच्या कसरतीनंतर यश, नागरिकांना दिलासा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**ढाणकी, दि. २७ :** येथे तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्याने नवनियुक्त नगराध्यक्षा अर्चना वासमवार आणि उपनगराध्यक्ष दत्त दिगंबर वानखेडे यांनी दोन महिन्यांच्या अथक कसरतीनंतर अखेर नादुरुस्त जलवाहिनी सुरू केली. यामुळे पैनगंगा नदीचे पाणी ढाणकी जलशुद्धीकरण केंद्रात पोहोचले असून ग्रामस्थांना जीवन प्राधिकरण योजनेच्या माध्यमातून शुद्ध पाणी मिळण्याचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे.



तत्कालीन पालकमंत्री मनोहररावजी नाईक यांनी खनिजकर्म निधीतून एक कोटी १४ लाख रुपये खर्च करून ही जीवन प्राधिकरण योजना मंजूर केली होती. अनेक वर्षांपासून बंद असलेली ही जलवाहिनी पूर्ववत करण्यासाठी पाणीपुरवठा सभापती मुनवर रहीम, कर्मचारी बाळू मुरादे, प्रमोद गायकवाड, अशोक वाळूककर यांनी अहोरात्र मेहनत घेतली. जलशुद्धीकरण केंद्रात पाणी आले असले तरी प्रत्यक्ष नळाद्वारे पाणी मिळण्यासाठी नागरिकांना आणखी आठ ते दहा दिवस वाट पहावी लागणार आहे. गावातील जुन्या तीन इंची पाईपलाईनवर एकूण १४४ वॉल बसवण्यात आले आहेत. दररोज दहा वॉल सुरू केले तरी संपूर्ण गावात पाणी पोहोचण्यासाठी किमान चौदा दिवसांचा कालावधी लागतो. ही जुनी वितरण प्रणाली सध्या पाणी पुरवठ्यामध्ये मोठा अडथळा ठरत आहे. त्यामुळे जोपर्यंत ढाणकी गावातील ही सर्व जुनी पाणी वितरण व्यवस्था पूर्णपणे बदलून नवीन पाणी वितरण प्रणाली कार्यान्वित केली जात नाही, तोपर्यंत येथील नागरिकांना नियमितपणे किंवा दिवसाआड शुद्ध पाणी मिळणे तांत्रिकदृष्ट्या पूर्णपणे अशक्य असल्याचे स्पष्ट होत असून यावर नवीन कायमस्वरूपी यशस्वी तोडगा काढणे अत्यंत गरजेचे असल्याचे संबंधित प्रशासनाने सांगितले आहे.